म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३२९८

REFBK-0026728

# मदरंगी

- शान्ता ज. शेळके

संदर्भ
निबंध
३४९६
२६७२८
२२।७।९२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
वा. क्र. ३४९६
२६७२८
ग्रंथ : शाखा (स्थळ प्रत)

# मदरंगी

शान्ता ज. शेळके

REFBK-0026728

विमल प्रकाशन

प्रकाशन क्र.५४

प्रकाशक-मुद्रक :
विनोद व. सरपोतदार
विमल प्रकाशन
६९३, नारायण पेठ,
जोशी भवन, कुंटे चौक
पुणे ४११० ३०

© शान्ता ज. शेळके

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९९१

मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी

टाईपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
११२०, सदाशिव पेठ
निंबाळकर तालीम चौक,
पुणे ४११० ३०

मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११० ३०.

मूल्य : ६५ रुपये

*नाशिक येथील वैशंपायन कुटुंबास—*
*तुम्ही सर्वांनी मला घरगुती, अनौपचारिक*
*आणि जिव्हाळ्याचे नाते दिलेत.*
*त्याची ही कृतज्ञ, सप्रेम अल्प खूण*

—शान्ताबाई

# प्रास्ताविक

कवितेच्या खालोखाल ललितलेख हा माझ्या आवडीचा साहित्यप्रकार आहे. कवितेमध्ये जो मुक्त आत्माविष्काराचा आनंद लाभतो तो तर ललितलेख लिहिताना माझ्या अनुभवाला येतोच, पण त्याव्यतिरिक्तही कधी चिंतनाच्या, कधी निसर्गवर्णनाच्या, कधी आवडलेल्या साहित्यकृतीच्या आस्वादाच्या, कधी व्यक्तिचित्रणाच्या तर कधी दैनंदिन जीवनातील साध्या साध्या अनुभवग्रहणाच्या अंगानेही हे ललितलेखन निर्माण होत जाते. मुख्य म्हणजे इतरांशी संवाद साधण्याची आपल्याला जे उत्कटपणे जाणवले त्यात इतरांना सहभागी करून घेण्याची जी अनावर हौस मला आहे ती या प्रकारच्या लेखनात मला भरपूर प्रमाणात भागवता येते. माझ्यापेक्षा फार मोठ्या ताकदीच्या, सर्जनशील लेखकांनी या प्रकारचे विपुल, समर्थ लेखन केले आहे. आज या साहित्यरूपाला खूप सूक्ष्मता, मुक्त लवचिकपणा प्राप्त झाला आहे. प्रारंभीच्या काळातली कृत्रिम आणि साचेबंद सांकेतिकता जाऊन आता ललितलेखन हे कितीतरी प्रवाही, मोकळे, विकासशील झालेले दिसते. त्यामुळेही या प्रकारचे मला आकर्षण वाटते.

दोन वर्षांपूर्वी 'केसरी'त 'असे आणि तसे' हे सदर मी काही काळ चालवत होते. 'मदरंगी'तले बरेच लेख त्या सदरासाठी प्रथम लिहिले गेले. 'केसरी'ने लेखनाचे पूर्ण स्वातंत्र्य तर मला दिलेच, पण प्रारंभी प्रफुल्लकुमार अकलूजकर आणि नंतर आल्हाद गोडबोले या साहित्यप्रेमी उपसंपादकांनी मजकडून सातत्याने व चिकाटीने हे लेख लिहवून घेतले. त्यांच्यामुळे हे लेखन झाले असे म्हणण्यास हरकत नाही. लेख छापून आल्यानंतर वाचकांनी त्याविषयीच्या आपल्या ज्या प्रतिक्रिया मला कळवल्या त्यामुळेही लेखनाबद्दलचा माझा उत्साह वाढला. या सर्व सुहृदांचे ऋण मी मान्य करते.

'मदरंगी' या शीर्षकाचाही थोडा खुलासा करायला हवा. 'मदरंगी' हा कन्नड

भाषेतला शब्द असून त्याचा अर्थ 'मेंदी' असा आहे. हा सुंदर शब्द जेव्हा मला प्रथम कळला तेव्हा त्याने मला विलक्षण भुरळ घातली. एकूणच वेगवेगळ्या भाषा, त्यांतले अनोखे शब्द, जुने मराठी शब्द, वापरातून गेलेले पण अर्थाच्या सूक्ष्मतरल छटा व्यक्त करणारे शब्द या साऱ्यांविषयी मला प्रथमपासूनच उत्कट कुतूहल आणि आकर्षण आहे. 'मदरंगी' शब्दाचा एका लेखात मी खुलासाही केला आहे. संग्रहाच्या नामकरणाचा प्रश्न आला तेव्हा 'मदरंगी' हेच नाव मी संग्रहासाठी निश्चित केले.

'विमल प्रकाशन'चे विनोद सरपोतदार यांनी हौसेने व जिव्हाळ्याने 'मदरंगी'चे प्रकाशन करण्याची तयारी दाखवली. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी 'मदरंगी'चे सुंदर मुखपृष्ठ सिद्ध केले. दोघेही जवळचे स्नेही. त्यांचे आभार मानत नाही. त्यांची हीच आपुलकी सतत राहावी येवढे मात्र मनापासून वाटते.

–शान्ता ज. शेळके

१९ आदर्शनगर
पुणे-सातारा रोड, पुणे ३७
विजयादशमी
१७ ऑक्टोबर, १९९१

# अनुक्रमणिका

मी कोण आहे ? / ७
लाल लाल झगा लाल लाल गोळी / ११
भयाण / १७
सांग मंग देस अळ्ये तारिले ? / २२
शिशुकौतुक / २७
झाडे ! झाडे ! / ३२
संवाद, विसंवाद आणि असंवाद / ३७
समांतर / ४२
अशीही जनरेशन गॅप / ४८
रमणा, वागुरा, कामण्णा, मदरंगी / ५३
मी एक ऐकणारी / ५८
शोकान्तिका एका मांजराची / ६४
अनाहूत पाहुणा / ७०
कलकत्त्याचे कावळे / ७५
शब्दांच्या आगेमागे. . . / ८०
शकुन्तला सासरी जाते. . . / ८५
एक जपानी काव्यविशेष / ९१
कवडसे / ९८
पुठ्ठे, कव्हरे, सैनिकीकरण / १०६
थोडेसे शब्दांविषयी / ११२
चिनी शहाणपण / ११९
शेबा, परत ये / १२३
अलगूजवाली / १२७
प्रेमपुराण / १३४
. . . रूटीन / १४०
वो ही किनारा हो गया / १४७
रात्र काळी घागर काळी / १५४

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
विभाग
दा. क्र. ३२८६
२६७२८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# मी कोण आहे ?

खरेच, मी कोण आहे ? आयुष्यात वारंवार हा प्रश्न मला पडत आला आहे. प्रथमच एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. हा प्रश्न आध्यात्मिक पातळीवरून, 'कोऽहं' वगैरे अर्थाने मला पडलेला नाही किंवा मुद्दाम अज्ञान अगर वेडेपणा पांघरून नाटकी परिणाम साधण्यासाठीही हा प्रश्न मी विचारत नाही. व्यावहारिक अर्थाने मी कोण आहे हे मला चांगले टाऊक आहे. म्हणजे माझे नावगाव, मुद्दा पत्ता, व्यवसाय अशा अर्थाने माझी ओळख मला आहे आणि वयाबरोबर स्वतःच्या सर्व मर्यादांसह— ती ओळख माझी मला अधिकाधिक पटत चालली आहे. तरीदेखील मी कोण, हा प्रश्न उरलेलाच आहे. कधी कधी त्याचे उत्तर ओझरते मिळालेसे वाटते तर कधी तो मला फार अस्वस्थ करतो.

या अस्वस्थतेची सुरुवात मी वयाने लहान असतानाच झाली. लहानपणी मी अनेकदा खोड्या करत असे. खोटे बोलत असे. दुसऱ्यांच्या घरी पाहिलेल्या वस्तूंकरता हट्ट धरून बसत असे. वागू नये तशी वागत असे. खरे तर सर्वच लहान मुले अशी असतात. मी काही अगदी जगावेगळी होते असे नाही. अशा वेळी मला कधी बोलणी बसायची, कधी मार मिळायचा, तर कधी आणखी काही शिक्षा व्हायची. यातही काही वावगे होते असे नाही, पण या साऱ्यांबरोबर आणखी एक गोष्ट घडे तिचा मला भारी उपद्रव होई. माझे जरा कुठे काही चुकले, की आईने नाहीतर आजीने लगेच मला दरडावून विचारावे, 'अगं, असं वागणं तुला शोभतं का ? आपण कोण आहोत, आपलं घर काय आहे, आपले वाडवडील कसे होते, या गोष्टींचा जरा विचार करशील की नाही ?'

आईच्या किंवा आजीच्या तोंडून बाहेर पडणारी ही वाक्ये म्हणजे जणू ब्रह्मास्त्रच होते. ते अस्त्र माझ्यावर सुटले की, माझ्या तोंडाला कुलूपच बसायचे. मी

मनातून अगदी ओशाळून जायची. आपल्या लहानशा चुकीचा परिणाम इतका दूरगामी होत असेल, आपले नाव, घराणे, वाडवडील यांना त्यामुळे एवढा बट्टा लागत असेल, तर आपला गुन्हा खरोखरीच फार मोठा असला पाहिजे, असे मला वाटायचे आणि अपराधी जाणिवेचे एक दडपण माझ्या मनावर पडायचे. मग नंतरचे काही दिवस मी अगदी सुतासारखी सरळ वागायची. पण ते वयच असे होते की, पुन्हा कधी तरी माझे काही चुकायचे. मग पुन्हा बोलणी-मार, आणि मुख्य म्हणजे ती नावं, घर, वाडवडील यांची प्रतिष्ठा सांभाळण्याची जबाबदारी !

लहानपणी मी हे सगळे मुकाट्याने सहन करीत असे, पण पुढे मी शाळेत जाऊ लागले, माझी अक्कल जराशी वाढली आणि मी आई किंवा आजी यांच्या दरडावण्याला जुमानीतनाशी झाले. कारण माझ्या ध्यानात आले की, इतर अनेक सामान्य घरे, घराणी असतात त्यांपैकीच आपले एक घर आहे. आमची कोष्ट्यांची जात. विणकरांचा व्यवसाय. एखाद्या आजोबांचा हात मागावर जरा सफाईने चालत असेल, तर एखाद्या पणजोबांना चार सणंगे आठवड्याला जादा काढता येत असतील. ही काय ती आमच्या घराण्याची प्रतिष्ठा, नावलौकिक, पराक्रम; आणि माझ्या एखाद्या चुकीमुळे म्हणे त्याला बट्टा लागतो ! सगळेच किती हास्यास्पद. आपण एकंदरीने सामान्य आहोत ही जाणीव जेव्हा मला झाली, तेव्हा आनंदाने माझे मन अगदी हलकेफूल होऊन गेले. आणि घराण्याचा मोठेपणा, प्रतिष्ठा, परंपरा वगैरे राखण्याचे ओझे ज्यांच्या मानगुटीवर बसलेले असते, अशा दुर्दैवी जीवांची मला कीव आली. पायांतली एक अवजड साखळी तुटल्याचे मला समाधान वाटले.

पण वय जसजसे वाढत चालले, तसतसे माझ्या ध्यानात आले की, पायातली एक साखळी तुटली तर तिची जागा घ्यायला इतर कितीतरी साखळ्या पुढे येतात. डोक्यावरची एक जबाबदारी गेली तरी तिथे इतर जबाबदाऱ्या आपल्या हजर आहेतच. शाळेत असताना 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे गीत आम्ही म्हणत असू. 'प्रभावशाली परममंगला महाराष्ट्र देशा । तुला प्रभाती प्रसन्न हृदये प्रणाम परमेशा' हे 'माझे रामायण' कादंबरीच्या अखेर दिलेले गीत मला अत्यंत आवडत असे. शाळेतच नाथमाधवांच्या कादंबऱ्या मी वाचल्या. हरिभाऊ आपटे यांच्या 'उषःकाल', 'गड आला पण सिंह गेला' सारख्या कादंबऱ्यांची पारायणे केली. तेव्हा आपण मराठे आहोत हे प्रकर्षाने मनावर ठसले. मग मराठी बाणा, महाराष्ट्राची उज्ज्वल परंपरा, शिवप्रभूंचा वारसा वगैरे वगैरे गोष्टींची जाणीव झाली आणि हे

सारे आपल्याला जपायचे आहे, नव्हे, पुढे चालवायचे आहे या नव्या जबाबदारीचे ओझे मस्तकावर घेऊन बसले. घर, वाडवडील, जात यांच्या कचाट्यातून मी सुटते न सुटते तो ही नवी पीडा सुरू झाली. मी अगदी नगण्य आहे, यःकश्चित आहे हे समजल्यामुळे मनाला जो सुंदर मुक्तपणा आला होता तो नाहीसा झाला.

प्रांत, प्रांताभिमान, प्रांताची परंपरा यांच्या नव्या साखळ्यांनी पुन्हा एकवार मला जखडून टाकले. काही काळ या नव्या साखळ्या मी अलंकारांसारख्या जपतही होते, पण जो जो त्यांना जपावे तो तो त्यांनी मला अधिकच जखडून टाकावे. बरे, नुसते एवढ्याने भागत होते असे नाही. दररोज स्वतःची एक ना एक नवी ओळख मला कुणीतरी पटवून द्यावी आणि त्या ओळखींने माझे मीच चकित, भयभीत होऊन जावे, असा प्रकार सुरू झाला. मग कधी सह्याद्रीचा लोहपाषाण माझ्या देहात संचरे, तर कधी भीमा, गोदा, कृष्णा यांचे पाणी माझ्या रक्तातून वाहू लागे. कधी पंढरीच्या विठ्ठलाचा 'गजर हरिनामाचा' माझ्या अणुरेणूंतून उसळत राही आणि बुक्क्याचा वास नाकाभोवती दरवळू लागे, तर कधी आपण ज्ञानदेव-तुकारामादी संतांची लेकुरे आहोत असा मला साक्षात्कार होई. तो सह्याद्री, त्यावरचे ते गडकोट, ती भवानी तलवार, ते ओव्या-अभंग आणि ते लावण्या-पोवाडे या साऱ्यांचे मिळून मनात असे एक विलक्षण रसायन तयार होई की, माझे मलाच काही कळेनासे होई. साऱ्या अस्तित्वालाच एक वेगळा रंग येई.

या नशेत, धुंदीत काही काळ गेला. कधी कधी स्वतःचा अभिमान वाटे, तर कधी लहानपणासारखेच या साऱ्यांविरुद्ध माझे मन बंड करून उठे. वाटे, तो सह्याद्री, तो लोहपाषाण, त्या भीमा, गोदा, कृष्णा, ते शिवप्रभू आणि तो मराठी बाणा हे सारे फार थोर असेल, नव्हे, आहेच, पण तरी यांचा सतत जुलूम मजवर का म्हणून ? मी सतत यांचे वारसदार असायलाच हवे का ? माझी मी कधीच असायची नाही ? माझी ओळख घेऊन जगात मी कधीच का वावरायचे नाही ?

हाही काळ गेला. माझी क्षितिजे विस्तारली. आता मी 'भारतीय' बनले होते, आणि हा वारसा तर भलताच महान होता. आता सह्याद्रीची जागा हिमालयाने घेतली होती. भीमा-कृष्णेच्या जागी गंगा-यमुना आल्या होत्या. शिवाजी महाराजांच्या रांगेत चंद्रगुप्त, विक्रमादित्य येऊन बसले होते. ज्ञानदेव-तुकारामांच्या जोडीला मीरा-कबीर-सूरदास-चंडिदास या संतांचा अंतर्भाव झाला होता. अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठीशी इतर अनेक भाषा स्पर्धा करीत होत्या. बाप रे ! बाप रे !

केवढा हा विशाल भूतकाळ. केवढा हा प्रचंड वारसा. कितीजणांशी मला जोडणारी किती ही नाती ! या साऱ्यांशी मी जशी जखडून बांधली गेले होते. लहानपणी आई मला फक्त आमचे घर, वाडवडील, जात एवढ्यांचीच जाणीव करून द्यायची. ते माझे घर वास्तवात केवढे तरी अफाट होते. माझ्या वाडवडिलांची परंपरा थेट वेदकालाशी जाऊन पोहोचली होती. माझा आप्तविस्तार साऱ्या देशाला व्यापून उरला होता आणि माझे घराणे म्हणजे हा संपूर्ण भारत होता !

कुणी म्हणेल एवढ्या भव्यदिव्य, उज्ज्वल परंपरेचा खरे तर माणसाला अभिमान वाटायला हवा. बरोबर आहे ते. तरी देखील केव्हातरी हे सारे पाश तोडावेसे वाटतात. आपले आपण, आपल्या साऱ्या क्षुद्रतेसह, आपणच असावे असे वाटते. आभाळाने टाकली आणि धरणीने झेलली इतके मला भोवतालच्या या साऱ्या बंधनांपासून मोकळे नाही का होता येणार ? खरेच ! असे का होऊ नये बरे ?

घर, जात, प्रांत, देश, भाषा, धर्म, इतिहास अशा पायऱ्या एकामागे एक ओलांडत आता मी अशा जागी येऊन पोहोचले आहे की, तिथून मागे वळून बघताना हे सारे खूप दूरस्थ, अंधुक वाटते. तसे या साऱ्यांबद्दल माझ्या मनात प्रेम आहे. यांच्याविषयी मला अभिमान, आदर वाटतो. वयाच्या वेगवेगळ्या वळणांवर यांतल्या प्रत्येक गोष्टीने मला खूपसे काही सुंदर, उदार, गंभीर असे दिले आहे. मला आधार दिला आहे. आत्मप्रत्यय दिला आहे आणि माझ्यामधल्या अनेक चांगल्या गोष्टींचे त्यांनी पोषणही केले आहे. त्याबद्दल अवश्य ती कृतज्ञताही माझ्या मनात आहे, पण तरी देखील आज या गोष्टी मला नकोशा वाटतात. मनात येते, या साऱ्यांचे पाश तोडून मी अगदी स्वतंत्र अशी कधी होईन का ? माझी केवळ मीच अशी आत्मनिर्भर, आत्मपर्याप्त अवस्था मला कधी लाभेल का ? जसा आभाळात तरंगणारा ढग, जशी वाऱ्याची स्वैर झुळूक, जशी पावसाची हलकीशी सर, जसे एखादे पान किंवा फूल तशी मी मुक्त, नुसती, केवल अशी असेल का ? वाटते, तसे जर मला होता आले, तरच कदाचित मी कोण या प्रश्नाचे उत्तर मला मिळेल. कारण तेव्हा मग मी कुणीच असणार नाही.

□

# लाल लाल झगा लाल लाल गोळी

इतरांच्या बाबतीत काय घडत असेल माहीत नाही, पण मला मात्र साहित्याची गोडी लागली ती शब्दांच्या द्वारा. ऐकलेले किंवा वाचलेले काही आकलन होण्यापूर्वी मला शब्दच आधी जाणवायचे. एखादे माणूस जसे जाणवते तसे, नाकाडोळ्याने, अगदी जिवंतपणे जाणवायचे. साहित्यातले शब्द पुस्तकांतून माझ्यापर्यंत पोहोचण्यापूर्वी घरातल्या, शेजारपाजारच्या संभाषणांतून, भाषाव्यवहारातून, ऐकलेल्या गोष्टींतून, गाण्यांतून शब्दांनी माझ्याशी जवळीक साधली. जिव्हाळ्याचे नाते जोडले. एकूणच शब्द मला आवडत असत आणि एकदा ते कानांवर पडले की, स्मरणात पक्के राहूनही जात. त्या शब्दांचा नाद, उच्चारातून जाणवणारी स्वरांची वळणे, चढउतार, त्यांत अनुस्यूत असलेली लय-सारे मनावर विलक्षणपणे ठसत असे. आणि गंमत अशी की, शब्दांच्या नादातच मी गुंग होऊन जाई. त्यांना काही अर्थ असला पाहिजे, तो आपल्याला कळला पाहिजे, असा माझा मुळीच आग्रह नसे. किंबहुना शब्द नुसते 'असतात' एवढीच माझी त्या शब्दांविषयीची भावना होती. हे शब्द माझ्या मनाशी सरळ संवाद साधत. एखादा शब्द आवडला की तो मी पुनःपुन्हा स्वतःशी म्हणत असे. लिमलेटची गोळी चघळावी तसा तो सतत जिभेवर घोळवत असे आणि असा तो घोळवताना त्यांच्या नादानेच विलक्षण सुखावून जात असे.

लिमलेटच्या गोळीवरून आठवण झाली. मी त्या वेळी पाच सहा वर्षांची असेन. माझे काहीतरी बिनसले होते. मी मोठमोठ्याने रडत होते. माझ्या मावशीने मला कडेवर उचलून घेतले आणि लिमलेटची लालभडक गोळी माझ्या हातात दिली. माझे रडे एकदम थांबले. त्या दिवशी माझ्या अंगात लाल रंगाचा झगा होता. मावशी गमतीने म्हणाली, 'लाल लाल झगा लाल लाल गोळी.' तितक्यात तिच्या

ध्यानात आले की, माझ्या हातात लाल रंगाची काचेची एकेक बांगडी होती. ती लगेच म्हणाली, 'लाल लाल बांगडी' आणि आता पुढे काय म्हणावे, या विचारात पडली. ती सकाळची वेळ होती. आम्ही घराच्या मधल्या चौकात उभ्या होतो. तिथे चुलाण्यावर आंघोळीचे मोठे थोरले तपेले तापत होते. चुलीत लाकडे सारलेली होती. जाळाची आंच लागताच एका लाकडाच्या फटीतून लाल रंगाची एक लठ्ठ अळी धडपडत बाहेर आली. मावशीने खाली वाकून अलगद तिला उचलले, बाजूला ठेवले. जीवदान मिळाल्यामुळे अळी तुरुतुरु चालत निघून गेली. मावशीचीही समस्या पूर्ण झाली. ती चटकन म्हणाली, 'लाल लाल अळी' आणि अगदी सहज अभावितपणे एक चिमुकली कविता जन्माला आली—

लाल लाल झगा
लाल लाल गोळी
लाल लाल बांगडी
लाल लाल अळी !

कुणाला कल्पनेने जुळवून सांगितलेली वाटावी अशी ही घटना, अगदी अक्षरशः खरी आहे. मावशी साधी, अशिक्षित, खेड्यात वावरणारी गृहिणी होती. शाळेच्या दोन तीन इयत्ता जेमतेम झाल्या असतील, पण तिला जात्यावर ओव्या म्हणायला आवडत असे. आणि जुनी पारंपरिक स्त्रीगीतेही ती व माझी आई सतत गाऊन दाखवत. त्यामुळे गाण्यातली लय मावशीच्या मनात भिनलेली असावी आणि त्यातूनच हे काव्य निर्माण झाले असावे. ती अद्‌भुत कविता ऐकून मी भलतीच खूष होऊन गेले. विशेषतः त्यातली 'लाल लाल' ही शब्दसंहती मला विलक्षण आवडली. पुढे किती तरी दिवस मी त्या चार ओळी म्हणत असे. कधी त्या तालावर नाचतही असे. काही दिवसांनी आजोबांनी माझ्यासाठी डाळिंबी रंगाच्या खड्यांचे डूल करून आणले. ते हौसेने माझ्या कानांत घातले गेले. आता माझ्या— म्हणजे मावशीच्या— कवितेत थोडी सुधारणा झाली. मुळातला 'बांगडी' शब्द काढून तिथे आम्ही 'डूल' शब्द घातला.

वर दिलेल्या चार ओळी हा कदाचित कवितेशी झालेला माझा पहिला परिचय असावा. त्या कवितेत यमक होते, प्रास होता आणि 'लाल' रंगामुळे तिला एक चित्रदर्शित्वही प्राप्त झाले होते. कवितेच्या शब्दांनी मला अधिक भुलवले, की त्यातल्या नादवलयांनी मला अधिक भुरळ घातली हे आज सांगणे अवघड आहे.

त्या दोहोंचा एकरस सांधा माझ्या मनात जुळला असावा.

जरा नंतरची एक घटना. ही माझी मावशी अतिशय नादिष्ट होती. जात्यावर तर ती तऱ्हेतऱ्हेच्या ओव्या म्हणत असेच, पण एरव्हीही सतत एखादे लोकगीत, स्त्रीगीत तिच्या ओठांत खेळत असायचे. पारंपरिक गोड चालीवर ती ते गुणगुणत राहायची. हे सारे अभावितपणे माझ्या कानी पडे आणि कानांतून थेट मनात संथपणे मुरत राही. ती सगळी गाणी मला आता आठवत नाहीत, पण त्यांतल्या काही ओळी आठवतात. मावशीच्या एका गाण्यातल्या या अशाच स्मरणात राहिलेल्या चार ओळी. त्या तुटक, संदर्भहीन आहेत. पण आज वाटते, ती एक स्वतंत्र कविता देखील होऊ शकेल.

पाणी चढलंय ग चढलंय ग पहिल्या पायरीवरी
घागर उचलली उचलली दंडामांड्यांवरी
चोळी तडकली तडकली डाव्या भुजेवरी
शिंपी बोलवा बोलवा मायेच्या साजणी

नदीला पूर आला आहे. पाणी भरायला आलेली कुणी एक स्त्री घाटावर उभी आहे. पाण्याचा जोर इतका की ते घाटाच्या सर्व पायऱ्या बुडवून टाकून पहिल्या पायरीशी हेलकावत आहे. ही स्त्री पाण्यात घागर भरून दंडामांड्यांवर ती उचलते. घागर उचलताना तिचे दंड स्वाभाविकपणे फुगतात. अंगातली चोळी दाटते आणि डाव्या भुजेवर तिची शिवण उसवून ती तडकते. पण ती स्त्री आपल्याच सख्या-सोबतिणींना, 'मायेच्या साजणीं'ना शिंप्याला बोलवायला सांगते. हे शब्दचित्र तर मला आवडलेच, पण त्यातल्या विशिष्ट शब्दांच्या पुनरुक्तीने मला अगदी वेडावून टाकले. त्या चार ओळी मी वारंवार म्हणत असे. अजूनही म्हणते. पुढे बऱ्याच वर्षांनी कालिदासाचे 'शाकुंतल' वाचताना शकुंतलेच्या अंगातली काचोळी तिला घट्ट होते आणि तिच्या सख्या 'आम्हाला बोल लावण्याऐवजी तुझ्या पयोधरांचा विस्तार करणाऱ्या यौवनालाच बोल लाव' असे तिला म्हणून तिचे वाढते तारुण्य सूचित करतात. हा प्रसंग समोर आला तेव्हा मला डाव्या भुजेवर चोळी तडकलेल्या घाटावरच्या त्या नवयौवनेचे चित्र एकदम आठवले आणि अधिक अर्थपूर्ण होऊन पुन्हा एकदा जाणवले.

अशा कितीतरी लोकगीतांच्या ओळी त्या काळात मी ऐकल्या. त्यांतल्या काही आठवतात, काही विसरून गेल्या आहेत, तर काहींना पुढल्या जीवनामध्ये माझ्या

स्वतःच्या व्यक्तिगत सुखदुःखांच्या अनुभवांतून जाताना अगदी अनपेक्षित, वेगळे संदर्भ मिळाले आहेत. मावशीसारखीच आईलाही गाण्यांची आवड होती. तिने सांगितलेल्या कितीतरी गाण्यांच्या ओळी वेगवेगळ्या कारणाने मनात जाग्या होतात. काही गाण्यांमधले देवाचे जीवन लौकिक मानवी पातळीवर उतरते आणि मग देवांचे अतिमानुष रूप आपल्या दैनंदिन जीवनसरणीशी एक गमतीदार जवळीक साधते. घरातली लहान मुले खेळायला बाहेर जातात आणि धुळीने माखून मळकट होऊन, कपडे चुरगाळून संध्याकाळी घरी परत येतात. माझ्या लहानपणी माझी धाकटी भावंडे अशा अवतारात घरी परत आली की, आईला हटकून एक लोकगीत आठवायचे. ती त्या भावंडांना म्हणे—

हनुमंता आलास का रे बाळा ?
लंका जाळून झालास काळा !

भीमपराक्रमी, महाबळी, रामसेवापरायण हनुमंताचे देखणे रूप रामदासांच्या ‘भीमरूपी महारुद्रा’सारख्या स्तोत्रांतून, ‘रामरक्षे’तून मनावर ठसण्यापूर्वी ते आईच्या तोंडून ऐकलेल्या या दोन ओळींनी माझ्या ओळखीचे करून दिले. रामायणातला भव्यदिव्य हनुमान एकदम शाळकरी वयातल्या खोडकर मुलांच्या पंक्तीला येऊन बसला आणि अंजनीमातेने लंका जाळून आलेल्या आपल्या गुणी बाळाला दिलेली प्रेमळ दटावणी त्याचे एक वेगळेच मानवी विलोभनीय बालरूप मनावर उत्कटतेने रेखून गेली.

रामायणाप्रमाणे महाभारतातल्याही व्यक्तिरेखा आधी अशा या घरगुती गाण्यांतूनच माझ्याजवळ आल्या. द्रौपदीवस्त्रहरणाच्या हृदयद्रावक प्रसंगावर कितीतरी लोकगीते अनामिक कविकवयित्रींनी रचलेली आहेत. आईला असे एक गाणे ठाऊक आहे. वयपरत्वे ती ते आता जवळजवळ विसरून गेली आहे, पण त्यातल्या काही मधल्यामधल्या ओळी तिला आजही आठवतात आणि ती त्या आवडीने म्हणून दाखवते. डोळ्यांसमोरून एखादा गतिमान चित्रपट सरकत जावा, तशी त्या गाण्यातून द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगाची चित्रमालिका उलगडत जाते. उदाहरणार्थ : द्रौपदीला वस्त्रे पुरवून कृष्ण तिची लाज राखतो त्या वेळचे राजसभेतले हे दृश्य बघावे-

शेवटी नेसवीला आपला पितांबर
सुदर्शनचक्र फिरे अनिवार

अधोमुख लज्जित दुर्योधन
साधु म्हणती 'बरा झाला अपमान !'
दुर्योधन म्हणे 'वस्त्रांच्या घड्या घाली'
देवे माव केली एक नाहीच राहिली !

संकट टळून गेल्यावर द्रौपदी आपल्या लाडक्या भावाला मेजवानी देते. त्या वेळच्या तिच्या भावना पुढल्या काही ओळींतून किती हृद्यपणे व्यक्त झाल्या आहेत ! ती कृष्णाला म्हणते—

माझ्या धावण्या किती धावसी चक्रपाणी !
तुझ्यावरूनी देह टाकीन ओवाळुनी
माझ्या धावण्या किती धावसी येरझारा
बैस देवा ! घालिते तुला वारा !

आणि नंतर द्रौपदीने कृष्णाला दिलेला मेजवानीमधला विविध पदार्थांचा रोचक तपशील. सर्वसामान्य माणसांचे देवाशी एकदम जवळचे नाते जोडणारा—

आलं लिंबू मेथिया माइनमूळ
आंबा आवळा करवंद जायफळ
शेवटी वाढला शुभ्र जिरेसाळी भात
वरी वरण मुगाचं ते पवित्र
झाले भोजन विडा दिला पंचकोनी

आणि असे कृष्णाचे जेवण झाल्यावर तो द्रौपदीला म्हणतो—

स्वस्थ भोजन व्हावे द्रौपदी बहिणी !

शालेय क्रमिक पुस्तकांतून कविता माझ्या जवळ येण्यापूर्वी ती अशी घरात, शेजारीपाजारी ऐकलेल्या ओव्यांतून, गाण्यांतून, लोकगीतांतून मला येऊन भेटली. अक्षरशः गळयात पडली. कारण कविता पाठ करायची असते हे कळण्यापूर्वी ती मुळी आपोआपच मला पाठ होत गेली. अनेक शब्द त्यांचा अर्थ न कळतासुद्धा स्मृतिकोशात गोळा झाले. अनेक घटनांतला सूक्ष्म भाव आकलन होण्याआधीच त्या शब्दांतून चित्रांकित झाल्या. गाणे म्हणजे काय याची जाणीव होण्यापूर्वीच त्यातले नादमाधुर्य, विशिष्ट वर्णांच्या पुनरुक्तीतून निर्माण होणारे अनुप्रास, यमके, कवितेला प्राणभूत असणारी तिची अंतर्गत लय, ताल, तिच्यातले विशिष्ट विराम आणि खटके— सगळे बालवयात ऐकलेल्या या गाण्यांनी मला कसे अलगद,

सहजपणे समजावून दिले. आता वाटते, त्या वयात जर हे सारे ऐकायला मिळाले नसते, तर आपल्या आनंदात केवढी तरी उणीव राहून गेली असती. पुस्तकांच्या पानांतून कविता भेटण्याआधी ती अशी अवतीभोवती भरून राहिलेल्या हवेसारखी माझ्या जाणिवेत झिरपली. हे तिचे ऋण फार मोठे आहे.

□

# भयाण

फार वर्षांपूर्वीची गोष्ट. मी एक छायाचित्र पाहिले होते. साधे काळ्यापांढऱ्या रंगातले. कुठे पाहिले होते, ते आता नक्की आठवत नाही. कदाचित छायाचित्रांच्या एखाद्या इंग्रजी संकलनात असेल. कदाचित फोटोग्राफीवरच्या एखाद्या मातबर पाश्चात्य मासिकात असेल. ते मी पाहिले होते एवढे मात्र नक्की. परवा काही कारण नसताना अचानक त्या चित्राची आठवण आली. इतक्या तीव्रतेने आठवण आली की, ते क्षणभर आपल्या साऱ्या तपशिलांनिशी माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले.

काय होते त्या छायाचित्रात ?

एक तरुण स्त्री आरशासमोर बसून त्यात बघून प्रसाधन करत आहे, असे ते चित्र होते. आरसा समोरच्या टेबलावर बसवलेला - उभा लांबटगोल. टेबलावर प्रसाधनाचे साहित्य मांडलेले. समोरच्या खुर्चीवर एक तरुणी अर्धवट पाठमोरी, तिरपी अशी बसलेली. आपल्याला तिचा चेहरा मागूनही किंचितसा दिसत आहे आणि समोरच्या आरशात तिचे अर्ध्या वक्षभागापर्यंतचे प्रतिबिंब उमटले आहे. त्यात तिचा चेहरा पूर्ण दिसत आहे. मुखावर हसरा भाव, आपल्या सौंदर्याची सगर्व जाणीव आणि निश्चिंत आत्मतृप्ती.

अशी छायाचित्रे आपण अनेक बघतो. आरशापुढे बसून प्रसाधनात रमलेली तरुण मुलगी, हे दृश्य काही तसे फार अनोखे वा अपूर्वाईचे नव्हे. ते घराघरांत प्रत्यक्ष दिसते. फोटोग्राफीचा व्यवसाय करणाऱ्या धंदेवाईक कारागिरांचाही तो एक आवडता विषय आहे. मग मी पाहिलेल्या त्या छायाचित्रात एवढे विशेष असे काय होते ? वर्षानुवर्षे माझ्या अबोध मनात त्याने दडी मारून बसावे आणि एका असावध क्षणी अचानक जाणिवेच्या पातळीवर उसळून येऊन माझा कबजा घ्यावा अशी त्या चित्रात किमया तरी काय होती ?

तेच आता सांगायचे आहे.

मी ते छायाचित्र प्रथम पाहिले त्या वेळी मलाही एक सुंदर फोटो यापलीकडे त्यात विशेष काही जाणवले नाही. मी छायाचित्र निरखून पाहिले. त्यातले बारीक तपशील ध्यानात घेतले. फोटोग्राफरच्या रसिकतेचे, त्याच्या कसबाचे कौतुक केले. पाच दहा मिनिटे अशी गेली असतील आणि मग एकदम पाण्याच्या संथ पृष्ठभागावर तरंग उमटावेत तसे ते चित्र जरा हलल्यासारखे, हेलकावल्यासारखे वाटले. त्यातल्या रेषा विसकटल्या. एकात एक मिसळल्या. मी भांबावले. हा काय चमत्कार आहे मला कळेना. आपल्याला दृष्टिभ्रम तर होत नाही ना असेही क्षणभर वाटून गेले. पुन्हा मी समोरच्या छायाचित्राकडे न्याहाळून पाहिले. चित्र अर्थात होते तसेच होते. पण त्यात जेवढे होते तेवढेच आहे असे वाटेना. त्यात आणखी काहीतरी होते. काय बरे ? काय होते ते ?

मी चित्र जरा अंतरावर धरून पुन्हा एकवार बारकाईने पाहिले आणि मला एकदम धक्का बसला. पाठीच्या कण्यातून बर्फासारखे थंडगार काहीतरी वाहत गेले. समोरच्या छायाचित्रात आता मला एक कवटी दिसत होती. होय. एक विशाल कवटी. टेबलावरचा लांबटगोल आरसा ही त्या कवटीची बाह्यरेषा होती. त्यातले तरुणीच्या चेहऱ्याचे प्रतिबिंब आणि टेबलाच्या पार्श्वभूमीवर दिसणारा तिचा खरा पाठमोरा चेहरा या दुरून दिसणाऱ्या डोळ्यांच्या रिकाम्या खोबणी किंवा खाचा होत्या. छायाचित्रातील प्रतिबिंबाची टेबलाभोवती लावलेली पांढरीशुभ्र चुण्याचुण्यांची नाजूक झालर ही त्या कवटीवरच्या विचकलेल्या दातांच्या रांगेसारखी हुबेहूब वाटत होती. चित्र जवळून पाहिले तर आरशात बघून हौसेने प्रसाधन करणारी एक सुंदर तरुणी आणि तेच चित्र जरा अंतरावर धरून पाहिले, तर डोळ्यांच्या रित्या खोबणी आणि दातांची लांबलचक रांग दाखवणारी एक शुष्क, निर्मांस पांढरीशुभ्र कवटी. एक सांगायचे राहिलेच. आपल्या सुंदर प्रतिबिंबाकडे बघून स्मिताने जरा विलग झालेले त्या तरुणीचे ओठ कवटीमध्ये झडून गेलेल्या नाकाआडची भोके अस्पष्टपणे दाखवत, सूचित करत होते.

छायाचित्राचा हा नवा अर्थ जाणवला आणि मी अंतर्बाह्य शहारून गेले. आता त्याच्याकडे मला बघवेना, पण बघण्याचे विकृत कुतुहलही आवरता येईना. मी पुन्हा पुन्हा ते छायाचित्र एकदा जवळून, एकदा लांबून बघण्याचा चाळा करू लागले आणि छायाचित्रकाराने ही भयाण गंमत हेतुतःच केली होती याबद्दल माझी खात्री

पटली. त्या तरुणीच्या छायाचित्रातून व्यक्त होणारे तारुण्य, सौंदर्य, जीवन या साऱ्यांचा अंतिम परिणाम सूचित कवटीच्या द्वारा त्याने दाखवून दिला होता. जवळून जे सुंदर, मादक, शाश्वत दिसते, ते शेवटी संपूर्णपणे अनाकर्षक, अशाश्वत, निरर्थक असते हे त्याने जळजळीत दाहकपणाने मनावर ठसवले होते. मी पुस्तक मिटले. चित्र नजरेआड केले. माझ्या दैनंदिन जीवनात बुडून गेले. पण नंतरही वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या निमित्ताने त्या चित्राचे मला स्मरण होतच होते. कालांतराने त्याचा मला विसर पडला. नव्हे, अप्रिय गोष्टी मन कुठेतरी खोल दडवून ठेवते तसे ते चित्र माझ्या स्मरणशक्तीने माझ्यापासून दडवून ठेवले होते. पण आज एका अनपेक्षित क्षणी, स्मरणशक्तीने बाळगलेल्या त्या सावधपणालाही हुलकावणी देऊन ते विलक्षण छायाचित्र डोळ्यासमोर अचानक उभे राहिले होते. आपला भीषण आशय मला समजावून सांगत होते.

चित्र डोळ्यासमोर उभे राहिले आणि मध्यंतरी गेलेल्या अनेक वर्षांनी माझ्या ठायी जमा करून ठेवलेल्या काही नव्या अनुभवांनी, जाणिवांनी, केलेल्या वाचनाने आणि प्रौढ वयात अपरिहार्यपणे येणाऱ्या उदास शहाणिवेने स्मरणातल्या त्या छायाचित्राला अर्थाची नवनवी परिमाणे जोडली आहेत,असे माझ्या ध्यानात आले. ते चित्र प्रथम पाहिले तेव्हा आजच्यापेक्षा मी कितीतरी तरुण होते. चित्राचा अर्थ तेव्हा बौद्धिक पातळीवर जाणवला, हादरा देऊन गेला तरी मानसिक पातळीवर त्याने मला फारसे विचलित केले असेल असे वाटत नाही. आज मात्र ते छायाचित्र आठवताच मनात चवताळलेल्या मधमाश्यांचे मोहळ घोंघावत उठावे तसे काहीतरी झाले. मधल्या काळात ऐकलेली, क्वचित पाहिलेली मरणे आठवली.काही दूरच्या केवळ परिचितांची, तर काही जवळच्या जिवलगांची. ती मरणे कवटीचा अर्थ अधिक तीव्रतेने सांगून गेली. जीवनाचे तात्पर्य मरण. सुंदर चेहऱ्याला मिळालेला अंतिम पूर्णविराम म्हणजे मांस झडून गेलेली, बुबुळे हरवलेल्या डोळ्यांच्या रित्या खोबणीतून जगाकडे निर्विकारपणे बघणारी आणि विचकलेल्या दातांनी जीवनाचा उपहास करणारी फक्त एक कवटी.

मग आठवू लागले वाचलेल्या साहित्यात इथे तिथे आलेले कवटीचे संदर्भ. बी. ए.च्या वर्गात असताना शेक्सपियरचे 'हॅम्लेट' अभ्यासले होते. प्रेतासाठी खड्डे खोदणारे कामगार आणि मनाच्या एका अतिशय तरल, जवळजवळ विकृत अवस्थेत त्यांच्याशी बोलणारा हॅम्लेट आठवला. राजवाड्यातला एके काळचा

गमत्या, खुशमस्कऱ्या यॉरिक याची कवटी खड्डे खोदताना मातीतून बाहेर येते. काहीसा वेडसर झालेला हॅम्लेट ती हातात घेऊन तिला उद्देशून म्हणतो, 'अरे बेट्या यॉरिक, किती विनोदी होतास रे तू ! आम्हा साऱ्यांना किती खदखदून हसवायचास. एके काळी तुझ्या खांद्यावर बसून मी हिंडलो आहे. इथे, या इथे असणाऱ्या पण आता गायब झालेल्या तुझ्या ओठांचे मी मुके घेतले आहेत. . . छे ! त्या आठवणीनेही आता पोटातून कसे उमदळून येते. तुझा तेव्हाचा तो थट्टेखोर स्वभाव, ते हसणे, ती गाणी, त्या सगळ्या गमती कुठे गेल्या रे ?' यॉरिकची ती चेहरा हरवून बसलेली कवटी आता मला आठवली आणि छायाचित्रातल्या कवटीला ती एक अधिकचे परिमाण देऊन गेली.

तशीच पु. भा. भावे यांची ती 'रूप' नावाची सुंदर कथा. कथेचा नायक आपल्या तरुण, देखण्या, बुद्धिमान, प्रेमळ मैत्रिणीबरोबर सारा दिवस आनंदात घालवतो. तिच्याबरोबर समुद्रकिनाऱ्यावर हिंडतो. जीवनाच्या उल्लासाने दोघेही अगदी मोहरून गेलेले असतात आणि नेमक्या त्याच वेळी, आनंदाच्या अत्युच्च लाटेवर तरंगत असताना कथानायकाला समुद्रकिनाऱ्यावरच्या रेतीत अर्धवट पुरली गेलेली एक कवटी सापडते. माणसाची कवटी बघून कथानायकाला धक्का बसतो. त्याच्या साऱ्या जीवनोत्साहावर, आनंदावर ती कवटी मृत्यूचे भयाण सावट पसरवते. जीवनाचे तात्पर्य अटळ कठोरपणाने त्याला दाखवून देते.

जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांमधून माणसांचे सांगाडे, कवट्या यांचे संदर्भ येतात. माणसांचे चेहरे बघता बघता पुसट होत विरून जातात आणि आतला कवटीचा आकार स्पष्ट होतो. एका कथेत ते म्हणतात, 'आपण सारे मरणाचे पोस्टडेटेड चेक्स आहोत.' 'वहाणा' नावाच्या कथेत असा मजकूर येतो, 'हॉस्पिटलमध्ये आणखी एक फोटो होता. चेहऱ्याचा. कवटीवर आंधळी दोन शून्ये. खाली दातांची रांग. मनुष्याच्या जीवनाचे समीकरण ते हेच. दोन काळी आंधळी शून्ये भागिले बत्तीस. पाकिटात नोटा ठेवायला कप्पा असतो तसा भागाकार ठेवायला मधला त्रिकोण.'

मर्ढेकरांच्या कवितांतही या प्रकारचे कवटीचे संदर्भ सापडतात. त्यांच्या एका कवितेतल्या या ओळी अंगावर काटा उभा करतात.

हाडांचे सापळे हासती
झडणाऱ्या मांसास पाहुनी

किती लपविले तरी शेवटी
दातांचे दिसणारच पाणी

पहा टाकुनी प्रश्न काय वा
निशाण तुमच्या हो बुद्धीचे,
घुमेल डमरूतून डोक्यांच्या
हास्य वाळलेल्या मज्जांचे

'ज्ञानियांचा राजा' असलेल्या ज्ञानदेवांनी जीवनाला सतत विळखा घालून बसलेल्या मृत्यूचे स्मरण देताना म्हटले आहे, 'मृत्यू हा गर्भातच जीवाला शोधत येतो.' अत्यंत रसिक वृत्तीने 'शृंगार शतक' लिहिणाऱ्या भर्तृहरीने देखील 'मेदोऽस्थिमांसमज्जासृक् संघातेऽस्मिन त्वचावृते । शरीरनाम्नि को मोहः सदा दुर्दर्शदर्शने - मेद, अस्थी, मांस, मज्जा, रक्त यांचा समुदाय असलेल्या, चामड्याने वेढलेल्या आणि गलिच्छ दिसणाऱ्या या शरीर नावाच्या वस्तूचा मोह बाळगावा असे तिच्यात आहे तरी काय ?' असा प्रश्न विचारला आहे. जीवनाची क्षणभंगुरता, वैफल्य, मृत्यूचे अटळपण हे साऱ्याच प्रतिभावंतांना असे सतत जाणवले आहे, अस्वस्थ करून गेले आहे. त्याने जीवनातल्या सर्व रसांबद्दल, सुखोपभोगांबद्दल त्यांच्या मनात अरुची, विरक्ती निर्माण केली आहे.

प्रतिभाशाली लेखकांची गोष्ट वेगळी, पण एका साध्या छायाचित्रकाराला ही जाण असावी याचे नवल वाटते आणि प्रसाधन करणाऱ्या सुंदर तरुणीच्या चित्रातून त्याने कवटीचा अंतिम आकार उमटवून दाखवावा, याचे तर अधिकच नवल वाटते.

□

# सांग मंग देस अठ्चे तारिले ?

मराठीत आज ग्रामीण दलित कविता लिहिल्या जात आहेत. विविध बोलीभाषांतल्या कवितांचीही त्यात भर पडत आहे आणि कवितेचा मूळ प्रवाह अनेक अंगांनी विकसित, समृद्ध होत आहे. तथापि ही प्रक्रिया आताच सुरू झाली आहे, असे नाही. कितीतरी वर्षांपासून ती हळूहळू पण निश्चित घडत राहिली आहे. 'सुगी' हा मराठीतला ग्रामीण कवितांचा पहिला प्रातिनिधिक संग्रह. तो एकोणीसशे तेहतीसमध्ये प्रसिद्ध झाला. त्याचे संकलन प्रसिद्ध कवी ग. ल. ठोकळ यांनी केले होते आणि वि. स. खांडेकर यांनी त्याला दीर्घ विवेचक प्रस्तावना लिहिली होती. ठोकळांनी या संग्रहाला 'जानपदगीता'चा संग्रह म्हटले होते. खांडेकरांनी 'सुगी'चे स्वागत करताना 'प्रादेशिक बोलीभाषेतले शब्द विपुल प्रमाणात वापरल्यामुळे अशा कवितांच्या रसग्रहणाला वाचकांना अडचण पडेल' अशी एक रास्त भीती व्यक्त केली होती. आज इतक्या वर्षांनंतर ती भीती व्यर्थ ठरलेली दिसत आहे. कारण 'उपरा', 'उचल्या'सारखी आत्मकथने, 'गोतावळा', 'भंडारभोग'सारख्या कादंबऱ्या, वाहरू सोनावणे यांच्या 'गोधड' सारख्या आदिवासी बोलीतल्या कविता— साऱ्यांचेच मराठीने मुक्त स्वागत केले आहे.

'सुगी'तल्या ग्रामीण कवितांत दोन प्रकार आढळतात. एक रविकिरण मंडळाच्या आणि त्या परंपरेतल्या इतर कवींनी 'लई', 'वादूळ' 'म्वॉप' असे शब्द वापरून लिहिलेली कृतक ग्रामीण कविता आणि दुसरी नामवंत नसलेल्या, पण त्या त्या बोलीभाषेत मुरून तिचा रसकस आत्मसात केलेल्या कवींनी लिहिलेली अस्सल ग्रामीण कविता. तिचे वेगळेपण आजही जाणवते आणि कृतक ग्रामीण कवितेचे पितळ तिच्यापुढे स्पष्टपणे उघडे पडते. 'सुगी'तली 'मागणी' ही कवी सुरेश

यांची कविता अशी अस्सल ग्रामीण कविता आहे. ती अहिराणी भाषेत लिहिली आहे. गावचे एक पाटील आहेत. त्यांना तारा नावाची मुलगी आहे. तिला मागणी आलेली आहे. तारा या स्थळी द्यावी की न द्यावी या बाबतीत पाटील आपल्या पत्नीचा सल्ला घेत आहेत. कविता मोठी नाट्यपूर्ण आहे. तिचा प्रारंभ असा—

मागनं उनं आजले
सांग मंग देस अठ्ये तारिले ?

पाटील पत्नीला म्हणतात, 'मागणे आले आहे. सांग तर मग, तारीला इथे देऊ या का ?' आता लेक द्यायची म्हटल्यावर घरदार, नावलौकिक सारे विचारात घेणे आलेच. ते वर्णन बघावे—

से घरना मोठा, सुखी खाइपीसन
नहि देनं लेनं डोकावर मन मन
से नवाजेल या भर तालूकामन
'पडणार वान नहि राइ' म्हने 'बाबिले.'

स्थळ थोरामोठ्यांचे आहे. व्याही खाऊनपिऊन सुखी आहेत. डोक्यावर कुणाच्या देण्याचे ओझे नाही. त्यांचे नाव तर साऱ्या तालुक्यात गाजलेले आहे. शिवाय ते म्हणतात, 'तुमच्या लाडक्या लेकीला आमच्या घरात इतकीसुद्धा कसली वाण पडणार नाही.' पाटील असा घराण्याचा मोठेपणा प्रथम पत्नीला सांगतात. आता तारा जिथे नांदणार त्या घराण्याची आणखी वैशिष्ट्ये कोणती ? तर ती पाटील सांगतात—

घर कडीपाटनं, वर चुनगच्ची जिना
है ऱ्हातं घर अन् सेतसं गोठा पुनां
से वतनदार पाटील, म्हणे कालिना
नहि छाती कोनी नाव ठिई कूळले !

'व्याह्याचे राहते घर लाकडी कडीपाट असलेले आहे. चुनेगच्ची जिना आहे. त्यांना गावात स्वतःचे घर आहे. तसा शेतावर गोठाही आहे. गोठा म्हटला की भरपूर गुरेढोरे आलीच. बरे, ते आपल्याच तोलाचे वतनदार मुलकी पाटील आहेत आणि कुळाबाबत बोलायचे झाले तर घराणे अशा शुद्ध रक्ताचे आहे की, बिशाद काय कुणी त्याला नावे ठेवील !'

से गावकूसने हेरमळा न्यामिना
चालतीस मोटा रोज तिन्ही सांजना
या साले लावा म्हने बाग केळिना
घर बसले चाली उना सगा आपने !

पाटील पुढे आपल्या पत्नीला सांगतात, 'अग, गावकुसाला व्याह्यांचा सुंदर मळा आहे. रोज तिन्हीसांजा तिथे मोटा चालतात आणि मळ्याला पाणी पुरवतात. या वर्षी तर ते केळीचे बाग देखील लावण्याचा विचार करत आहेत. पाहिलेस ना, कसे सुरेख स्थळ घरबसल्या चालत आले आहे !'

आपल्या भावी व्याह्याचे चोख घराणे, श्रीमंती, सुंदर राहते घर, शेतमळ्यांचे वैभव हे सांगून झाले. पण त्यांच्या घरची रीतभात नको का कळायला ? त्याशिवाय मुलगी तिथे द्यायची कशी ? त्यासंबंधी पत्नीच्या मनात काही शंका असल्यास त्या दूर करायला म्हणून पाटील पुढे या स्थळाचे वर्णन करतात—

बहु आलोखीना उना कधी पाव्हना
नहि निघू देस तो त्येले चाहाविना
है बरं सगंपन येस ध्यानमन मना
जर पटत हुई हा सल्ला मनमा तुले !

'माणसे नुसतीच श्रीमंत नाहीत, तर त्यांना वागण्याची रीतही टाऊक आहे. आल्यागेल्या पाहुण्यांचे आतिथ्य ते मनापासून करतात. घरी कुणी पाहुणा आला, तर चहा पाजल्यावाचून ते त्याला निघू देत नाहीत. मग सांग, ही सोयरीक तुझ्या मनाला येते का ? नाही ? जर हा सल्ला तुला मनातून पटत असेल तर सांग पाहू !'

आतापर्यंतच्या कडव्यांतून पाटलांनी मुलीसाठी सांगून आलेल्या स्थळाविषयी अत्यंत अनुकूल अशी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. पण सोयरीक ठरवताना बघायला हवी ती मुख्य गोष्ट म्हणजे नवरा मुलगा. तो कसा आहे ? कसा असेल ? यासंबंधीची पत्नीची उत्सुकता भरपूर वाढविल्यानंतर पाटील आता राखून ठेवलेला महत्त्वाचा मुद्दा बाहेर काढतात. ते नवऱ्या मुलाचे वर्णन करतात—

आंडोर एकला पुना सात नवसना
से देखलपनमा गोरासा तोंडना
इरपीनसारखा उच्चासा हाडना
आत्तेसे चमकस मिसुर जसी ओठले !

'मुलगा तर दृष्ट लागावी असा देखणा आहे. एक तर तो साता नवसासायासांनी झालेला एकुलता एक लेक आहे. रूप विचारशील तर गोरापान, सुंदर चेहऱ्याचा आहे. एखाद्या युरोपियन माणसासारखे त्याचे हाडपेर उंचपुरे बळकट आहे. पुन्हा वयाने किती तरुण ! आता आता कुठे त्याच्या ओठावर मिसरूड चमकू लागली आहे !'

मुलाच्या रूपगुणाचे वर्णन म्हणजे पाटलांनी आपल्या भात्यातला काढलेला अखेरचा बाण होय. मुलीच्या आईला आणि मुलीलाही सर्वांत जास्त कुतुहल वाटणार ते जावयाबद्दल. तेव्हा पाटील जावयाचे सुरेख चित्र पत्नीपुढे रंगवतात. तरीही पाटलीणबाई अजून मुग्धच आहेत. त्या काही बोलत नाहीत. कदाचित त्या या सर्व भपकेबाज वर्णनाने दिपून मूक झाल्या असाव्यात. घराणे, कूळ, श्रीमंती, रीतभात, प्रत्यक्ष नवरा मुलगा साऱ्यांचे वर्णन करून झाल्यावर पाटील थोडे समजुतीने, थोडे वैतागाने शेवटी पत्नीला म्हणतात—

वग नसिब भागले भेटनीच चांगनी
व्व ! पोर नाव ली जव्हय तव्हय आपनी
जर उपटाई खडकले कधी धडकनी
ती अक्षी अपना रडी मंग नाव ले

'बघ बाई, कसे सोन्यासारखे स्थळ आपल्या नशिबाने आयते घरी चालत आले आहे ! इथे जर आपण तारीला दिली, तर तिचे भाग्य उजळेल. पोरगी जन्मभर आपले नाव कृतज्ञतेने काढत राहील; पण असे स्थळ डावलून जर एखाद्या खडकावर पोरीला ढकलून दिली, तिथे तिला आपटली तर मग ती कायम आपल्या नावाने रडत राहील. सांग देऊ या का इथे तारीला ?'

ही संपूर्ण कविता म्हणजे एक नाट्यमय असा चित्रपट आहे. त्यातून एका खानदानी, सभ्य, कुलशीलवान घराचे दर्शन आपल्याला घडते. या ताराचे वडील हे गावातले पाटील आहेत, म्हणजे त्यांचेही घराणे नामवंत आहे. पाटील फारसे शिकलेले नसावेत. 'कन्या वरयते रूपं । माता वित्तं पिता श्रुतं । बान्धवाः कुलमिच्छन्ति । मिष्टान्नमितरे जनाः' हा श्लोक त्यांच्या कानावरून गेला असण्याची सुतराम शक्यता नाही. तरीही अनुभवाने आणि व्यवहाराच्या अवलोकनाने त्या श्लोकाचे मर्म त्यांना चांगले कळलेले आहे. त्यामुळे ताराला सांगून आलेल्या स्थळाचे सारे महत्त्वाचे तपशील त्यांनी पाटलीणबाईंना व्यवस्थित समजावून

सांगितले आहेत. कवितेत तारा कुठेही येत नाही, परंतु उपवर मुलीच्या मनाचा, भावी स्थळाविषयी आणि विशेषतः पतीविषयी तिला वाटत असलेल्या उत्सुकतेचा विचार केला, तर तारा जवळच कुठे तरी आडोशाला उभी राहून हे सगळे वर्णन ऐकत असेल, याबद्दल आपल्याला शंका उरत नाही. पाटलीणबाई प्रत्यक्षात काही उत्तर देत नाहीत, पण असे सोन्यासारखे स्थळ त्या तरी थोड्याच हातचे दवडणार ? योग्य वेळी सोयरीक ठरून हे लग्न झाले असणार आणि तारा सुखाने सासरी नांदू लागली असणार हे वाचकाला कविता संपवतानाच कळून चुकते.

'सुरेश' कवींबद्दल मराठी कवितेच्या इतिहासात कुठे कसली नोंद झाल्याचे माझ्या तरी पाहण्यात नाही, पण त्यांची ही अहिराणी भाषेतली कविता मात्र आजही आपल्या मनाशी संवाद साधू शकते आणि आपल्या दृष्टीने ते पुरेसे आहे. नाहीतरी कवीपेक्षा कविताच महत्त्वाची नसते का ?

□

# शिशुकौतुक

नीटसे आठवत नाही, पण 'मॅकॉल्स' किंवा 'कॉलियर्स' असे कुठले तरी इंग्रजी नियतकालिक असावे. बऱ्याच वर्षांपूर्वी त्यात मी एक व्यंगचित्र पाहिले होते. एका तान्ह्या बाळाच्या पाळण्यावर एक प्रौढ स्त्री— बहुधा बाळाच्या आईची मैत्रीण— ओणवी झाली आहे आणि बोबड्या बोबड्या लडिवाळ शब्दांत ती त्याच्याशी बोलत आहे, असे ते चित्र होते. इथपर्यंत चित्र अगदी स्वाभाविक होते. कारण आपण सारेच लहान बाळांशी बोबडे बोलतो. चित्रातला विनोद होता तो पुढेच.

पाळण्यातले ते लहान मूल कपाळाला आठ्या घालून, रागीट नजरेने त्या बाईकडे बघत होते आणि व्यंगचित्रकाराने त्या मुलाच्या तोंडी स्वच्छ, शुद्ध, स्पष्ट इंग्रजीत वाक्य घातले होते, 'What the hell do you mean by that.' त्या वाक्याने मला एकदम खदखदून हसू आले. लहान मुलांचे चित्रविचित्र लाड करणाऱ्या स्त्रियांच्या— विशेषतः त्यांच्या आयांच्या— प्रवृत्तीवर व्यंगचित्रकाराने त्या चित्रात अगदी थोडक्यात, पण मोठी मार्मिक टीका केली होती. आजही ते चित्र आठवले की मला हसू येते.

आयुष्यात अनेक अवघड गोष्टींना, व्यक्तींना तोंड देण्याचा प्रसंग आपणा साऱ्यांवरच येत असतो, पण आपल्या बाळांचे अवास्तव कौतुक करणाऱ्या आयांना तोंड देण्याइतका दुसरा कठीण प्रसंग क्वचितच कुणाच्या वाट्याला येत असेल. वस्तुतः वात्सल्य ही अतिशय गोड आणि स्वाभाविक भावना आहे आणि विशिष्ट मर्यादेपर्यंत तिचे दर्शन सुंदरही वाटते. एक फ्रेंच की स्पॅनिश, कुठल्यातरी भाषेतली म्हण मी— अर्थात इंग्रजीतून— वाचली होती. तिचा आशय असा होता, 'जगात एकच सुंदर मूल आहे. कुठल्याही आईपाशी ते तुम्हाला सापडेल !' प्रत्येक आईला आपले मूल सुंदर, गुणी, अलौकिक वाटते, असा त्या म्हणीचा अर्थ होता. मला ती म्हण फार आवडली होती. तेव्हा आईने आपल्या मुलाचे कौतुक करावे, यात तसे वावगे काहीच नाही आणि अशा वेळी आपणही सारे त्या कौतुकात आनंदाने

सहभागी होतो. पण आया जेव्हा लाडक्या लेकरांची अवास्तव कौतुके करू लागतात तेव्हा आपली फार बिकट परिस्थिती होते. श्रीकृष्णाने आपण माती खाल्ली नाही, हे सिद्ध करण्यासाठी तोंड उघडले आणि यशोदामातेला त्यात विश्वरूपदर्शन घडले असे म्हणतात. अनेक आयांना आपल्या मुलांच्या साध्या सहज कृतीत असेच विश्वरूपदर्शन घडत असते. आमच्या एका मैत्रिणीला नातू झाला. पहिलेवहिले नातवंड म्हणून अर्थातच तिला त्याचे भारी अप्रूप वाटत होते आणि आम्हालाही ते मूल नातवंडासारखेच असल्यामुळे आम्ही आपल्या परीने त्या कौतुकात सहभागी होत होतो. पण पुढे आजीच्या कौतुकाची मजल इतकी गेली की, त्याला हसून मूक संमती दर्शवणेही आम्हाला कठीण होऊन बसले. त्या कौतुकाचा एक नमुना असा– 'आमच्या पिल्लाला ना, संगीताचा जन्मजात कान आहे बघा. भीमसेन किंवा कुमार गंधर्व किंवा किशोरी आमोणकर यांची टेप लावली ना की गुलाम नेमका समेवर मान डोलावतो !' आजी बाळाचे एवढे कौतुक करूनच थांबली नाही, तर तिने कुठली तरी क्लासिकल संगीताची टेप लावून बाळाच्या संगीतप्रेमाचे आम्हाला लगेच प्रात्यक्षिकही दाखवले. आता मला मुळात शास्त्रीय संगीत फारसे कळत नाही आणि समेच्या जागा, हरकती, मुरक्या वगैरेंचे तर मला सुतराम ज्ञान नाही. तेव्हा बाळ नेमके समेवर मान डोलावते.किंवा काय ते मला कसे कळावे ! पण आमची दुसरी एक मैत्रीण जरा तारतम्य कमी.असलेली होती. तिने फटकळपणे एकदम म्हटले, 'अग कसली सम नि कसले काय घेऊन बसलीस ? लहान लेकरू ते. त्याला कसलाही आवाज कानावर पडला, तर ते इकडे तिकडे बघणारच ! त्यात कसले संगीताचे ज्ञान नि संगीताचा कान ?' मैत्रिणीचे ते उद्गार ऐकून आजीबाई गारठल्याच. मनातून त्या जरा नाराजही झाल्या असाव्यात. मला एकदम आठवण झाली– गारुड्याची पुंगी ऐकून नाग डोलतो म्हणे. तो म्हणे संगीतावर लुब्ध होतो. पण ही सगळी कविकल्पना आहे. वस्तुतः नागाला संगीताचा काय, पण कसलाच कान नसतो. तो डोळ्यांनी ऐकतो. गारुडी जेव्हा पुंगी वाजवतो तेव्हा त्या नादाच्या लहरी नागाच्या डोळ्यांच्या त्वचेवर आदळतात. त्याने तो त्रस्त होतो आणि मस्तक हलवू लागतो. त्याला आपण नागाचे डोलणे म्हणतो. याला शास्त्रीय आधार आहे. संस्कृतमध्ये नागाला 'चक्षुःश्रवा' म्हणजे डोळ्यांनी ऐकणारा असेच म्हणतात. जी गोष्ट नागाच्या तथाकथित संगीतप्रेमाची तीच गोष्ट माझ्या मैत्रिणीच्या नातवंडाच्या संगीताच्या कानाची !

अशा आया आपणा सर्वांना कधी ना कधी भेटतात आणि त्यांची शिशुकौतुके ऐकण्याची वेळही आपणांवर सतत येत असते. मुलीने जरा 'आ' केले की आईला आपली मुलगी थेट लता मंगेशकर असल्याचा साक्षात्कार होतो. लहानग्या मुलाने वडिलांच्या कामाच्या कागदावर रेघोट्या ओढल्या की, पालकांना त्या रेघोट्यांत पिकासोची चित्रकला दिसू लागते. पोरांच्या विध्वंसक वृत्तीला अनुसरून मुलांनी एखादे खेळणे, मोटार किंवा पोटात शिट्टी बसवलेली बाहुली किंवा कुत्रा मोडूनतोडून टाकला, तर माझ्या लहानपणी अशा खोड्यांबद्दल सणसणीत मार मिळत असे. आजच्या सुशिक्षित आणि महत्त्वाकांक्षी पालकांची प्रतिक्रिया फार वेगळी होते. त्यांना मुलांच्या त्या उपद्व्यापांमध्ये भावी इंजिनिअर, शास्त्रज्ञ, संशोधक यांचे दर्शन घडते आणि मुलांच्या भवितव्याची अनेक सोनेरी स्वप्ने त्यांच्या डोळ्यांपुढे तरळू लागतात. पूर्वीच्या मोठ्या थोरल्या एकत्र कुटुंबातून अनेक लहान मुले असत. त्यांची अवास्तव कोडकौतुके करायला किंवा साध्या खोड्यांतून अनेक चित्रविचित्र भविष्याकृती बघायला एकतर कुणाला वेळ नसे किंवा तितकी तल्लख कल्पनाशक्ती नसे. मुले कशी परसातल्या रोपट्यासारखी सहज स्वाभाविक रीत्या लहानाची मोठी व्हायची. अर्ध्या चड्डीतले पोरगे पायजम्यात आले किंवा परकरपोलक्यातली पोरगी साडीचोळीत आली, तरी काही फार अद्‌भूत घडले असे मुळी कुणाला वाटत नसे. ते बदल सहज स्वीकारले जात. हल्लीची कुटुंबे छोटी असतात. आईवडील सुशिक्षित असतात आणि एक किंवा दोनच मुलांचा परिवार. तेव्हा पालक त्या मुलांकडे नको तेवढे लक्ष देतात. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल स्वतःच्या अवास्तव कल्पना करून घेतात. नाही नाही त्या गुणांचा त्या मुलावर आरोप करतात. पालकांच्या या अतिरिक्त अवधानामुळे मूल फुलण्याऐवजी खुरटते. सहज उमलत, विकसत जाण्याऐवजी ते कोमेजून जाते. आणि पुढे मुलांनी आपल्या अपेक्षा पुरवल्या नाहीत म्हणजे त्यांच्या संगोपनात आपण कुठे कमी पडलो, याचा पालक विचार करत बसतात. एका नामांकित शिक्षणतज्ज्ञाने उद्‌गार काढले आहेत, 'व्हॉट टूडेज चिल्ड्रेन नीड इज सम हेल्दी निग्लेट' आपल्या मुलांकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष पुरविण्याऐवजी त्यांच्याकडे थोडे दुर्लक्ष केलेले बरे. त्याने ती जास्त मुक्त वातावरणात वाढतात !

माझ्या अनेक मैत्रिणींना माझी ही मते आवडत नाहीत. त्या मला म्हणतात, 'तुला काय अनुभव आहे मुलांचा ? अग, आजचा काळ किती बदलला आहे.

उद्याच्या स्पर्धाशील जगात आमच्या मुलांना वावरायचे आहे, पुढे यायचे आहे, स्वतःची प्रगती करून घ्यायची आहे. त्यांच्यावर असे लक्ष ठेवले नाही, तर त्यांचे भविष्य मातीमोल होऊन जाईल. म्हणून आम्हाला त्यांची इतकी काळजी घ्यावी लागते !' मला स्वतःच्या मुलांचा अनुभव नाही ही गोष्ट खरीच आहे; पण मी घरात, शेजारीपाजारी, मित्रमैत्रिणींच्या आणि परिचितांच्या घरी तिथल्या मुलांचे जे अवलोकन केले आहे, ते पुष्कळदा मन उदास आणि सचिंत करणारे आहे. महत्त्वाकांक्षी पालक ही मला एक भयानक गोष्ट वाटते. त्यातला आणखी भयंकर प्रकार मुलांवर कला, करियर, संस्कृती, बहुश्रुतता वगैरे वगैरे लादू बघणाऱ्या पालकांचा. माझ्या एका मैत्रिणीला उत्तम गायिका व्हायचे होते. दुर्दैवाने तिला ते जमले नाही. मग तिने मोर्चा वळवला आपल्या मुलीकडे. गायिका होण्याचे आपले अपुरे राहिलेले स्वप्न तिने मुलीच्या द्वारा पूर्ण करण्याचा चंग बांधला. झाले. मुलीला गाण्याच्या शिकवण्या सुरू झाल्या. क्लासिकल म्युझिकसाठी वेगळे शिक्षक, लाइट म्युझिकसाठी वेगळे शिक्षक, नाट्यसंगीतासाठी आणखी वेगळे शिक्षक, असा धडाका आईने लावला. बरे, मुलीलाही संगीताची आवड असती, तर मग सारे सुरळीत झाले असते. तिने आईचे स्वप्न थोड्या तरी प्रमाणात पुरे केले असते. पण मुलीने एकूणच त्या संगीत सासुरवासाचा इतका धसका घेतला की, तिचे थोडेफार जे संगीतप्रेम असेल तेही त्यामुळे खुरटून गेले. या सगळ्या भानगडीत मुलीचे लग्नाचे वय उलटून चालले. शेवटी एके दिवशी ती चक्क एका मुलाबरोबर पळून गेली. मामाकडे जाऊन तिने त्या मुलाशी रीतसर लग्न लावले आणि आज ती अतिशय सुखी गृहिणी आहे. दोन गोड मुलांची आई आहे. आईने तिचा जो छळ केला, त्याचा इतका खोल ठसा तिच्या मनावर उमटला आहे की, स्वतःच्या मुलांना तिने अत्यंत स्वाभाविकपणे वाढवायचे ठरवले आहे.

प्राध्यापक किंवा लेखक आईबाप ही एक अशीच विलक्षण गोष्ट आहे. त्यांच्या मुलांना वाङ्मयीन संदर्भ कळले नाहीत, तर आईवडिलांना तो स्वतःचा व्यक्तिगत अवमान वाटतो. घरात इतकी पुस्तके असताना आपल्या मुलांनी ती उघडूनसुद्धा बघू नयेत याचे त्यांना अतिशय दुःख होते. विशेषतः आईवडील आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर ग्रेसच्या कवितेतली प्रतिमासृष्टी किंवा ॲब्सर्ड थिएटर अशा गहन विषयांवर विद्वत्तापूर्ण चर्चा करत असताना मुलांनी चित्रपटसृष्टीतल्या तारेतारकांच्या तथाकथित प्रेमप्रकरणांमध्ये रस घेऊन बोलत राहावे, ही तर त्यांना

मुलांच्या असंस्कृततेची कमाल वाटते. अशा घरांतून वेगळेच दुभंगलेपण जाणवते. यातूनच काही वेळा मोठ्या गमतीही घडतात. मुले घरामध्ये 'फिल्म फेअर' किंवा 'स्टार अँड स्टाईल'सारखी भिकार अन् टुकार मासिके आणतात, म्हणून त्यांच्यावर चिडणारी माझी एक प्राध्यापिका मैत्रीण हळूहळू स्वतःच त्या 'गॉसिप'मध्ये इतकी रमू लागली की, आम्ही तिच्यातला तो बदल बघून स्तंभितच झालो. दरम्यान तिच्या एका मुलाला 'आयन रँड' या लेखिकेचे इतके वेड लागले की, त्याने 'फाऊंटन हेड' नुकतीच वाचून संपवली आणि आता तो 'व्हेन ॲटलास श्रग्ड'ही तिची अफलातून कादंबरी वाचण्यात रंगला आहे. हे म्हणजे फारच अद्‌भुत घडले !

सगळ्या आयांना आपल्या मुलांत नाही नाही ते गुण का दिसतात आणि त्यांचे अवास्तव कौतुक त्या का करतात हे मला तरी एक न उलगडलेले कोडे आहे. आनंदाची गोष्ट ही की, अशा आयांतही एखादा सुखद अपवाद सापडतो. अशीच एक आई एकदा मला भेटली. तिच्याबरोबर तिची नऊ दहा वर्षांची मुलगी होती. तेव्हा आईने अगदी वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून आपल्या मुलीचे वर्णन केले. ती म्हणाली, 'माझी मुलगी आपली साधीसुधी, शेकडा शंभर पोरी असतात तशी आहे. नाकाडोळ्याने सुमार. अभ्यासातही आहे आपली जेमतेम. दरवर्षी पास होते इतकेच काय ते. खरे म्हणजे ती माझ्यावरच पडली आहे. मीही आपली अशीच होते. सामान्य !'

'पुढे हिच्याबद्दल काय ठरवलंय तुम्ही ?' मी सहज विचारले.

'अहो, आपण काय ठरवणार ? आणि आतापासून बेत आखावेत असे आमच्या मुलीत अलौकिक आहे काय ? थोडी शिकेल, पुढे लग्न होईल आणि चार मुली करतात तसा संसार करील, झाले !'

आईची ही 'कॉमेंट' मुलीला कितपत रुचते आहे हे बघण्यासाठी मी हळूच तिरप्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहिले. ती मनातून हिरमुसली असेल, असे मला वाटत होते; पण ती लबाड पोर आईकडे बघून गालातल्या गालात चक्क हसत होती. त्या वेळी मला एक वेगळाच साक्षात्कार झाला. वाटले, साऱ्या लौकिक अलौकिकाच्या मर्यादांपलीकडचे या मायलेकींचे रक्ताचेच एक घट्ट नाते आहे. त्यांचे दोघींचे मिळून एक खासगी जग आहे. जिथे माझ्यासारख्या परक्या व्यक्तीला मुळीच स्थान नाही. □

# झाडे ! झाडे !

आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणांवर अशी काही झाडे आपल्याला भेटतात की, नंतर पुढे वय कितीही वाढले तरी आपल्याला त्यांचा विसर पडत नाही. माझ्या लहानपणी आमच्या आजोळी मागल्या वाड्यात एक कडूलिंबाचे झाड होते. झाडाचे सारे जिवंत सौहार्द त्या झाडाने प्रथम माझ्या अनुभवाला आणून दिले. वाड्याच्या उजव्या कोपऱ्यात असलेला तो प्रचंड लिंब बाळपणाचा माझा जिवलग मित्र होता. मी जेव्हा जेव्हा आजोळी राहायला येत असे, तेव्हा घरातल्या माणसांइतकीच त्या लिंबालाही भेटण्याची मला ओढ लागे. त्या झाडाशी माझ्या कितीतरी गोड आठवणी निगडित आहेत. माझी धाकटी बहीण आणि मी याच झाडाखाली खेळताना कितीदा तरी भांडलो आणि नंतर त्याच्याच साक्षीने ती भांडणे मिटवून पुन्हा एक झालो. लहानपणी याच लिंबाच्या लिंबोळ्या आम्ही जमवल्या आणि अढीमध्ये पिकवून, दुध्या काळ्या पेन्सिलीचे तुकडे देत घेत त्या छोट्या छोट्या कडूगुळमट आंब्यांची खरेदी विक्री केली. बाहुलींचे लग्न खेळताना तिच्या मांडवावर घालण्यासाठी या लिंबाचा हिरवागार कोवळा पाला आम्ही कितीदा ओरबाडून काढला आणि नागपंचमीच्या दिवशी याच्याच आडव्या फांदीला बळकट दोर बांधून त्यावर इतर बालमैत्रिणींसह मोठे मोठे झोकेही घेतले. बाल्यावस्था संपली, तरी त्या लिंबाविषयीचे माझे प्रेम लवमात्र कमी झाले नाही. पुढे एम. ए. च्या अभ्यासासाठी मी आजोळी येऊन राहिले. रात्री अभ्यास करून कंटाळा आला की, कधी काळोखात, कधी चांदण्यात; स्तब्ध, निश्चल उभ्या असलेल्या त्या झाडाकडे मी नजर टाकी आणि सारा शीण नाहीसा होऊन पुन्हा उत्साहाने मी कामाला लागे. शैशव आणि यौवन यांच्या सीमारेषेवरील त्या भावुक वयात असताना या लिंबावर फुटलेल्या शुभ्र पिवळसर मोहरल्या कडवट मादक

सुवासाने मी अगदी धुंद होऊन जाई. त्या वयात वाचलेल्या, अभ्यासलेल्या कितीतरी कवितांना त्या मोहोराचा गंध बिलगलेला आहे. आजही त्या कविता पुन्हा वाचू लागले, तर तो ओळखीचा दरवळ मला पुन्हा जाणवतो. मनाला उदास हुरहूर व्यापून टाकते.

या कडूलिंबाप्रमाणेच पुण्याला मी कॉलेजमध्ये शिकत असताना कॉलेजच्या वाटेवरच्या एका आंबराईशी माझा स्नेह जडला होता. कॉलेज दुपारी बारा साडेबाराला भरायचे. पुण्यातल्या शुक्रवार पेठेमधल्या चिंचेच्या तालमीलगत तेव्हा कुणाच्या तरी मालकीची एक आंबराई होती. दुपारच्या वेळी तो रस्ता अगदी निर्जन, निर्मनुष्य असे. तिथून जाताना मनाला कसलीशी अमूर्त भीतीही जाणवायची. त्या वेळी जवळच्या गर्द आंबराईची एखाद्या जिवंत माणसाप्रमाणे सोबत वाटे. मनाला तिचा आधार, दिलासा मिळे. उन्हाळ्यात सारी आंबराई गर्द पिवळसर मोहराने नुसती डवरून निघे. हवेत मोहराचा उन्मादक वास गच्च भरलेला असे. त्या सुगंधी हवेवर कोकिळांचे उत्कट टहुकार रेघा ओढत. ती शीत सावली, तो मादक गंध आणि काळीज फोडून उमटणारे कोकिळांचे आर्त स्वर या साऱ्यांचे मिळून एक विलक्षण स्वप्नरम्य वातावरण भोवती तयार होई. 'अर्धी जाग अर्धे स्वप्न' अशा मनोऽवस्थेत त्या रस्त्याने जाणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता.

माझे बालपण देशावर गेले. तिथल्या अनेक झाडांशी बालवयात मैत्री जमली. त्या वेळी आजच्याइतके पुण्याचे शहरीकरण झालेले नव्हते. पुण्याचा परिसर विविध वृक्षांनी नटलेला असे. चैत्रात पालवणारी चिंच, सळसळत्या चमकदार पानांनी चैतन्यमय झालेला पिंपळ, दाढीवाला वड, नांदुरखी, पिंपरी, शेताच्या बांधावर उभ्या असलेल्या बाभळी ही झाडे तशी सुंदर नव्हेत. मला मात्र ती फार देखणी वाटायची. आजही वाटतात. देशावरची बाभळ कुणाला सुंदर वाटते का ? पण तिचा काळाभोर बुंधा, कोवळीलुस पालवी, तिचे काटेसुद्धा मला आवडतात. बाभळीची फुले कुणी जवळून पाहिली, तर तो त्याचे कौतुक केल्याशिवाय राहणार नाही. छोट्या पिवळ्याधमक केसरांचे ते गोंडेदार नाजूक गुच्छ लहानपणी आम्ही हौसेने कानांत घालत असू. बाभळीच्या वाळलेल्या शेंगांची जोडवी मासुळ्या पायांच्या बोटात घालून खुळखुळ आवाज करत चालत असू. बाभळीच्या फुलांना मंद पण मादक सुगंध असतो. ज्याने तो एकवार अनुभवला आहे, त्याला त्याचा नंतर विसर पडणे अशक्य आहे.

देशावरच्या झाडांतले आणखी एक अतिशय सुंदर झाड म्हणजे सावरीचे किंवा देवकापशीचे झाड. या झाडाला संस्कृतमध्ये शाल्मली म्हणतात. शाल्मली हे नाव तसे सुंदर आहे, पण सावरीचा काटेरी बुंधा आणि फांद्या पाहिल्या म्हणजे 'शाल्मली' या ललितमधुर नावापेक्षा सावरी किंवा काटेसावरी हे मराठी नावच या झाडाला अधिक अन्वर्थक आहेसे वाटते. सावरीला वसंत ऋतूत लालगुलाबी फुले येतात. सावरी, पळस, पांगारा ही सारी वसंतात फुलणारी झाडे. आपल्या लालभडक फुलांची उधळण करून ही झाडे रंगपंचमी साजरी करतात. सावरीची माळरानावर उभी असलेली झाडे फुलांनी डवरली म्हणजे निळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्यांची शोभा जपानी पुष्पाकृतींसारखी विलोभनीय वाटते. फुलांचा बहर ओसरला की सावरीला केळ्यांच्या आकाराची हिरवीगार फळे लटकतात. पुढे ही फळे किंवा शेंगा वाळतात, तडकून फुटतात आणि एखाद्या मूल्यवान संदुकीत बंद करून ठेवलेला असावा तसा त्यांत बंदिस्त असलेला तलम रेशमी पांढराशुभ्र कापूस काळ्या सरक्या गाळत रानभरी होतो.

इतर झाडांचे एक वेळ सोडा. साधा देवचाफा बघावा. देशावर खेडोपाडी आढळणारा हा चाफा खूपच ओळखीचा, जवळचा वाटतो. तो पानांनी डवरतो तेव्हा तर आपले लक्ष वेधून घेतोच; पण फांद्यांच्या हातांत विरळ पांढरे पुष्पगुच्छ सावरणारा निष्पर्ण चाफादेखील आपल्या गुळगुळीत फांद्यांच्या चित्रविचित्र नक्षीने नजर बांधून टाकल्याविना राहत नाही. अशा या सुंदर झाडाला देवचाफा किंवा खूरचाफा या नेहमीच्या नावांनी ओळखायचे सोडून काही लोक त्याला मढेचाफा या अभद्र नावाने का संबोधतात कोण जाणे. ते नाव ऐकून कसेसेच वाटते.

आतापर्यंतची बहुतेक झाडे निदान साऱ्यांच्या माहितीची तरी असतील. पण देशावरची अनेक झाडे आता नष्टप्राय होत चालली आहेत. देशावरच्या मुलांनाही ती माहीत नसावीत. गोंदण, भोकर ही झाडे सहसा कुणाला परिचित नसतात. सुंदर आणि टपोऱ्या डोळ्यांना भोकरांची उपमा देतात. पण भोकरीचे झाड कुणी पाहिले आहे ? तशीच गोंदण, गोंदणीला अबोलीच्या रंगाची चिमुकली फळे येतात. ती खाऊन लहानपणी आम्ही जीभ, तोंड चिकट करून घेत असू. आवळी आणि जांभळी, बोरी आणि सीताफळी, खिरणी आणि कांगुणी ही सर्व स्त्रीलिंगी झाडे. या आमच्या बालपणीच्या जिवलग सोबतिणी. आता त्या क्वचितच भेटतात. र. वा. दिघे यांच्या एका कादंबरीत बोरीच्या झाडाचा हृदयस्पर्शी उल्लेख आहे. दिघे यांनी

मराठी प्रणयाला बोरीच्या काट्यांची उपमा दिली आहे. बोरीचा काटा वाकडा असतो. तो पायात घुसला तर मांसाचा लचका तोडूनच बाहेर येतो. मराठी मनात शिरलेले प्रेम असे बोरीच्या काट्याप्रमाणे काळीज विद्ध करून, त्याचा लचका तोडूनच बाहेर पडते. दिघ्यांची ही उपमा वाचताना देशावरची नदीकाठची बोरीची झाडे पुन्हा एकदा माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली, त्यांचे वाकडे काटेही.

मी देशावरची. कोकण मला पूर्ण अपरिचित. ते कधी न पाहिलेल्या मला तिथल्या आंब्रे, नारळी, पोफळीबद्दल आत्मीयता कुठून वाटणार ? पण माधव कवींची 'हिरवे तळकोकण' ही कविता शाळकरी वयात वाचली आणि आपल्या साऱ्या वृक्षवैभवासह कोकण अचानक मला सामोरे आले. या सुंदर कवितेतल्या पुढील ओळी बघाव्यात—

औदुंबरतरु शिवयोग्याचा छाया दे शीतल
शिवयोग्याचा बेल वाढवी भावभक्तीचे बळ
बघून पांढरी भूतपाळ वेताळ काढितो पळ
आइनकिंजळ करिती मांत्रिक मंत्र बळा दुर्बळ !
चिंवचिंव शब्दा करीत निवावर खार भराभर पळे
भेंडिउंडिणींवरी बैसुनी करकरती कावळे
लज्जारंजित नवयुवतींच्या कोमल गालांसम
रंगुनि काजू भरले त्यांनी गिरिडोंगर दुर्गम

या ओळींमध्ये वृक्षांची केवळ निर्विकार खानेसुमारी नाही, तर त्या वृक्षांभोवती नाना प्रकारचे सांस्कृतिक, भावनिक, पारंपरिक संदर्भ हेलकावत आहेत आणि मनाच्या गूढ तारा छेडण्याचे, भावकंपित करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यात आहे.

मला वाटते, नाहीतरी मराठी माणसाला वृक्षांकडे बधिर, निर्विकार वृत्तीने बघताच येत नसावे. संस्कारांनी, परंपरेने, नाना प्रकारच्या बऱ्यावाईट अनुभवांनी व समजुतींनी वृक्षांभोवती संदर्भ निर्माण केलेले असतात. ते वगळून झाडाकडे झाड म्हणून आपल्याला बघता येत नाही. माझीच गोष्ट घ्या. केळीचे झाड पाहिले की, मला बायकांची ती प्रसिद्ध ओवी आठवते—

जन्मामध्ये जन्म बाई केळीचा चांगला
बालकाच्या आधी देह ठेवीते आपला.

तुळस पाहिली की, 'तुळशीखाली पोथी वाचणारा राम' आठवतोच.

अशोकाचे, आंब्याचे झाड पाहिले की, पानांची मंगल तोरणे डोळ्यांपुढे उभी राहतात आणि कानांत सनईचे सूर घुमू लागतात. उंबराचे झाड पाहिले की, 'उंब्रात बांधून वाडे ! उंबरी राहती किडे' इथपासून ते बालकवींच्या 'पाय टाकून जळात बसला असला औदुंबर' इथपर्यंतच्या साऱ्या परिचित काव्यपंक्ती मनात जाग्या होतात. वडाचे झाड पाहिले की, 'वटस्य पत्रस्य पुटे शयानं ! बालं मुकुन्दं मनसा स्मरामि' ही ओळ आपोआप ओठावर येते आणि पिंपळ म्हटल्यावर गीतेतला 'ऊर्ध्वमूल अधःशाख' अश्वत्थ आपल्या साऱ्या भव्यतेसह साक्षात झाल्याचा भास होतो. माणूस आणि झाड यांचे असे हे सनातन अविनाशी नाते आहे. कुणीतरी म्हटले आहे तेच खरे. झाडे म्हणजे एका जागी खिळलेली माणसे आणि माणसं म्हणजे हिंडती फिरती झाडे !

□

# संवाद, विसंवाद आणि असंवाद

दोन विद्वान माणसांची गोष्ट सांगतात. त्यांतला एकजण एकदा दुसऱ्याच्या भेटीला गेला. भेट झाली. त्यानंतर दोघेही आपापल्या जागी खुर्च्यांवर बसून शांतपणे पाइप ओढत राहिले. एकमेकांशी अवाक्षरही बोलले नाहीत. तासाभराने भेटीला आलेला विद्वान उठला आणि यजमानाचा निरोप घेताना हर्षभरित होऊन म्हणाला,

'वा वा ! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू !'

तोंडातला पाइप क्षणभर बाजूला करून यजमानही तितक्याच तृप्त भावनेने बोलला,

'माझाही वेळ फार छान गेला !'

एक तासभर शब्दही न बोलता एकमेकांच्या संगतीत घालवणारे आणि तरीही संवादाचा आनंद मनसोक्त लुटणारे हे दोन विद्वान म्हणजे 'संवाद' या संकल्पनेची परमोच्च आदर्शावस्था म्हटली पाहिजे. जिवलग प्रेमिक, अध्यात्मक्षेत्रातील गुरुशिष्य, एकाच ध्येयाचा किंवा कलेचा ध्यास घेतलेले उत्कट साधक हे असे 'शब्देविण संवादिजे' या अवस्थेप्रत जाऊ शकतात. 'गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्ते छिन्नसंशयाः' 'गुरूचे मौन हेच त्याचे सर्वश्रेष्ठ प्रवचन असते आणि ते ऐकताना शिष्यांच्या मनातल्या साऱ्या शंकांचा निरास होऊन जातो, हे वचन सर्वपरिचित आहे. प्रेमिकांच्या बाबतीत 'शब्दावाचून बोलून गेलो शब्दांच्या पलीकडले' असा अनुभव येत असतो. तरुण प्रेमिकांची गोष्ट सोडा, पण अनेक वर्षे एकत्र संसार केलेली काही वृद्ध जोडपी बघावीत. ती एकमेकांशी सहसा बोलताना कुणाला आढळायची नाहीत, पण प्रापंचिक बाबतीत त्यांची मने इतकी मिळूनजुळून गेलेली असतात की, एकाने जो निर्णय घ्यावा तो दुसऱ्याच्या मनाला आधीच

उमगलेला; इतकेच नव्हे, तर मान्यही झालेला असतो, असे इतरांच्या प्रत्ययाला येते. इथे मनाचेच एक बिनतारी तारायंत्र चालू असते. शब्दांचे माध्यम तिथे अपुरे पडते, असे नव्हे, तर शब्दांची तिथे गरजही उरलेली नसते.

पण मघाशी मी म्हटल्याप्रमाणे ही झाली संवादाची आदर्शावस्था आणि कुठलाही आदर्श हा सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचाच असतो. अत्यंत शुद्ध पाणी हे बेचव, मचूळ लागते. त्याला रुची येते ती मातीचे विविध गंधरस त्यात मिसळल्यामुळे. तशीच निःशब्द संवादाचीही गोष्ट. आपल्यासारख्या सामान्यांना शब्दावाचूनचे संवाद भावणारही नाहीत, की परवडणारही नाहीत. नेत्रपल्लवी, करपल्लवी वगैरेंच्या द्वारा परस्परांना मनोभाव पोहोचवणे एखाद्या वेळी आणि एखाद्या अपवादात्मक अवस्थेत ठीक आहे, पण एरव्ही आपल्याला कठीण, साधे, सरळ, वक्र कसे का होईना, पण बोलणे आणि ठणठणीत बोलणेच हवे असते.

आणि या बोलण्याचे किती अनंत प्रकार असतात. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्या चालीवर 'माणसे तितकी बोलणी' अशी म्हण बनवायला हरकत नाही. 'मोकळा संवाद' असे आपण म्हणतो, पण समाजात वावरताना या तथाकथित मोकळ्या संवादावर कशी आणि किती बंधने पडत असतात ते पाहिले म्हणजे गंमत वाटते. मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपण खूप मुक्त, मोकळे असतो अशी आपली समजूत असते, पण ती खरी असते का ? आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष, एकमेकांच्या जीवनातले अनेक बरेवाईट तपशील ठाऊक असतात. त्यामुळे तिथे कधी मोकळ्या गप्पा होत असल्या, तरी अनेकदा नात्यातल्या जवळिकीमुळेच कधीकधी एक चमत्कारिक अवघडलेपणही अनुभवाला येते. एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह ठाऊक असल्यामुळे मतभेदाचे अवघड विषय बहुधा आपण शिताफीने टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे बोलताना त्यांना कुठे धक्का लागणार नाही, समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही, याची सतत काळजी घ्यावी लागते. गैरसमज तर असे आणि इतक्या क्षुल्लक कारणांमुळे होतात की, ते कसे टाळावेत हे समजतच नाही. माझी एक कित्येक वर्षांची जिवलग मैत्रीण आहे. आम्ही दोघी एकदा एका हॉटेलात जेवायला गेलो. म्हणजे तिने मला प्रेमाने जेवायला नेले. जेवण अगदी भिकार होते आणि त्या मानाने बिल भरमसाट आकारले होते. मी सहज म्हटले, 'केवढं बिल केलंय ?' आता माझ्या बोलण्यात खरोखरच काही वावगे नव्हते. पण तेवढ्यानेच

मैत्रिणीची मर्जी गेली. माझ्या साध्या विधानाला अगदी वाकडे वळण देऊन ती म्हणाली, 'सध्या माझी परिस्थिती जरा बिकट आहे हे खरे; पण म्हणून काय जेवणाचे बिलही मला परवडणार नाही का ? इतकं दारिद्र्य अजून तरी मला आलेलं नाही !' तिचे बोलणे ऐकून मी स्तंभितच झाले. मी बोलले काय आणि तिने त्याचा विपर्यास केला काय ! मी तिला म्हटले, 'तुझ्या आर्थिक परिस्थितीचा, दारिद्र्याचा इथे कुठे प्रश्न आला ? पैसे तू दिलेस काय, मी दिले काय सारखंच की. मी फक्त इतकंच म्हणत होते की, अशा जेवणाला इतकं बिल आकारणं योग्य नाही !' मी किती समजूत घातली, आर्जवे केली, शेवटी क्षमा मागितली, तरी मैत्रिणीच्या मनात अढी राहून गेली ती गेलीच ! आता या नशिबाला काय म्हणावे ? निकटच्या स्नेहातल्या, नात्यातल्या, प्रेमातल्या माणसांशी बोलताना हे असे धर्मसंकट अचानक समोर उभे राहते. कसे बोलावे ते खरोखर कळत नाही.

पण अगदी साधे, सरळ, सहसा मनाला उपद्रव देणार नाही, असे प्रसन्न संवादसुखही काही माणसांबाबत विनासायास अनुभवता येते. जितकी ओळख कमी, जितके व्यक्तिविषयक संदर्भांचे, तपशिलाचे ज्ञान अपुरे, तितक्या गप्पा अधिक रंगतात. आगगाडीतून प्रवास करताना अशा गप्पांची गोडी साऱ्यांनीच कधी ना कधी चाखलेली असते. पुढ्यातले माणूस कोण आहे आपल्याला ठाऊक नसते आणि आपण कोण आहोत याची त्याला कल्पना नसते. म्हणजे तसे एकमेकांचे नाव, गाव, व्यवसाय, हुद्दा, पत्ता आपण एकमेकांना विचारून घेतो, पण ती जुजबी ओळख असते. त्यापलीकडचे काहीही दोघांना ठाऊक नसते. त्यामुळे अशा संवादात एक वेगळेच सुंदर मोकळेपण अनुभवायला मिळते. पुन्हा आपण परस्परांना नंतर कधी भेटू अशी भीती किंवा आशाही तिथे नसते. त्यामुळे प्रवासात माणसे किती भरभरून बोलतात. परक्या माणसाजवळ आपण जेवढे मोकळे होतो, तेवढे जवळच्या माणसापाशी होऊ शकत नाही. या प्रवासातल्या गप्पांत एकदा एक तरुण मुलीने चक्क आपली प्रेमकहाणी मला सांगितली होती, तर दुसरीने नवऱ्याशी होऊ लागलेले आपले गंभीर मतभेद आणि नजीकच्या काळात संभाव्य असलेला घटस्फोट यांची माहितीही भरल्या डोळ्यांनी मला निवेदन केली होती.

परप्रांत, परदेश इथे होणाऱ्या तात्पुरत्या भेटीगाठी आणि त्यातून उद्भवणाऱ्या गप्पा तर अधिकच सुंदर असतात. मी काही फार प्रवास केलेला नाही, पण लंडनला तीन आठवडे मी होते आणि नंतर अमेरिकेत महिनाभर होते. त्या परदेशप्रवासात

अशा क्षणिक परिचयाचे व जवळिकीचे काही हृद्य अनुभव मला आले. लंडनमधल्या प्रसिद्ध ब्रिटिश म्युझियममध्ये हिंडता हिंडता पाय दुखू लागले म्हणून मी एकटीच बाहेरच्या पायऱ्यांवर येऊन बसले होते. जरा वेळाने एक सत्तरीच्या पुढचा रुबाबदार इंग्रज माणूस तसाच पण जरा दूर, पायऱ्यांवरच येऊन बसला. इंग्रज लोक अबोल, दुरावा राखणारे असतात, असे ऐकले होते. म्हणून आपण होऊन त्याच्याशी बोलावे असे धाडस मला करवेना. पण जरा वेळाने तोच माझ्याशी बोलू लागला. माझ्या पोषाखावरून माझे भारतीयत्व त्याने ओळखले असावे. सभ्य, घरंदाज, सुसंस्कृत अशा इंग्रजी माणसाचा तो एक लक्षणीय नमुना होता. त्यात त्याला वाचनाची खूप आवड होती. मग दोघांचे सूर जुळायला वेळ लागला नाही. डिकन्स, पी. जी. वुडहाऊस, हार्डी हे त्याचे आवडते लेखक होते. माझे वाचन त्याच्याइतके नसले, तरी हे लेखक थोडेबहुत मीही वाचलेले होते. गप्पा खूपच रंगल्या आणि आम्ही जायला निघालो तेव्हा त्याचा निरोप घेताना मन खरोखरच चुटपुटले. परदेशातली अशी आणखी एक भेट मला आठवते. अमेरिकेत एका ठिकाणी सुपरमार्केटमध्ये एक अमेरिकन तरुणी भेटली. तिने बाबागाडीत आपली छोटी मुलगी आणली होती. खरेदी उरकून आम्ही दोघी बाहेरच्या व्हरांड्यात आलो होतो. बाबागाडीतली छोटी मुलगी इतकी गोड होती की, तिचे कौतुक केल्यावाचून मला राहवेना. मी तिच्या आईला म्हटले, ‘किती गोंडस बाळ आहे तुमचं !’ त्यावर आई एकदम प्रसन्न होऊन म्हणाली, ‘Yes. isn't she cute?’ आणि मग घटकाभर आम्हा दोघींच्या गप्पा खूपच रंगल्या. मनात आले, भारतीय आई काय किंवा अमेरिकन आई काय, मुलांचे कौतुक दोघींनाही सारखेच प्रिय असते की !

कधीकधी दोन अबोल माणसे एकमेकांच्या सहवासात येतात आणि अचानक दोघांनाही प्रिय असलेला एखादा विषय निघतो. दोघांच्या मनाच्या तारा जुळतात आणि आपला अबोलपणा सोडून दोघे एकदम भरभरून बोलू लागतात. एकदा पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेला परीक्षक म्हणून मी गेले होते. परीक्षेच्या हॉलमध्ये आणखीही एक प्राध्यापक परीक्षक म्हणून माझ्या जोडीला आले होते. तसे आम्ही फार परिचयाचे नव्हतो. तीन तास पेपर लिहिण्यात गर्क झालेल्या त्या मुलांसमोर खरे म्हणजे वयाने वाढलेल्या सरकारी अधिकाऱ्यांसमोर मुकाट बसून राहायचे ही खरोखर एक शिक्षाच होती. आम्ही दोघे चुळबुळत, काहीतरी औपचारिक बोलत टेबलापाशी बसून होतो आणि मग कसा कुणास कळे,

यशवंतांच्या एका कवितेचा संदर्भ आला. त्याबरोबर काळोखाने भरलेल्या खोलीत एकदम दिव्याच्या स्विचवर हात पडावा आणि क्षणार्धात लख्ख प्रकाशाने ती खोली उजळून निघावी तसे झाले. आम्ही दोघेही यशवंतांच्या, एकूण सर्व रविकिरणमंडळाच्या कवितेचे भोक्ते निघालो. दोघांनीही अनेक कविता मुखोद्गत होत्या. मग काय ? त्या कविता चढाओढीने एकमेकांना ऐकवताना ते तीन तास कसे गेले कळलेही नाही.

संवादांच्या अशा अनेक परी. पण काही लोकांशी संवाद करता येत नाही. सतत स्वतः बोलत राहणारे, बैठकीचा ताबा घेणारे, आपलीच मते इतरांना ऐकवत राहणारे, अहंमन्य, कुत्सित, परनिंदाप्रवण असे लोक समोर आले की आपल्याला त्यांच्याशी बोलताच येत नाही आणि खरे तर त्यांना इतर कुणी बोलायलाही नको असते. स्वतःवर, स्वतःच्या विद्वत्तेवर, स्वतःच्या आवाजावर देखील ते इतके खूष असतात की, त्यांचे बोलणे तासन् तास अखंड चालू असते. इतक्या हुशार माणसांना समोरच्या माणसाच्या मुद्रेवर उमटलेला कंटाळा, त्याची अस्वस्थता, त्याने दाबलेल्या जांभया यांचा मात्र जरासुद्धा पत्ता लागू नये, याचे मला नेहमी नवल वाटते.

असे अनेक बरेवाईट संवाद, विसंवाद, असंवाद आपण साऱ्यांनीच कधी ना कधी अनुभवलेले असतात. कधी कधी या संवादांचा किंवा त्याच्यातल्या अडथळ्यांचा कंटाळा येतो. आपले आपण एकटे असावे, कुणाशी बोलू नये असे वाटते. ही अवस्था क्वचित येते, परंतु येते तेव्हा ती अतिशय उत्कट असते. तथापि, भोवतालची माणसे, त्यांची कंटाळवाणी बडबड आपण टाळू शकलो तरी एक व्यक्ती मात्र अशी असते की, तिला आपण कधीच चुकवू शकत नाही. ती व्यक्ती म्हणजे अर्थात आपण स्वतः ! मनाच्या असल्याच काही अवस्थेत तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर जाऊन बसले असतील. माणसांऐवजी वृक्षवल्लींना आपले मित्र करावे, वनचरांशी, पाखरांशी नाते जोडावे अशी अनावर ऊर्मी त्यांना आली असेल, पण तिथे देखील स्वतःचा सहवास त्यांना टाळता आला नाही. मग 'मनाशी संवाद' सुरू झाला. इतकेच नव्हे, तर 'आपलाचि वाद आपणाशी' होतो याचाही त्यांना प्रत्यय आला. एकांतवासात मिळणारा तो त्यांना मोठा लाभ वाटला, परंतु एक परीने ती शिक्षाही आहे, हे त्या थोर अध्यात्मसाधकाला उमगले नसेल काय ?

# समांतर

आरती प्रभूंची एक जुनी कविता मनात घोळत होती. एका रूपसंपन्न मुलीचे शब्दचित्र होते ते. कवितेत एक ओळ होती, 'अवयवच तिचे दागदागिने सतेज चक्षू जहागीरदार !' ओळ सुंदर होती, पण ती आठवताच मन एकदम खूप मागे, भूतकाळात गेले. मी एम. ए. चा अभ्यास करीत होते. संस्कृतच्या एका पेपरासाठी श्रीहर्ष या नाटककाराची तीन नाटके नेमलेली होती— 'नागानन्द', 'रत्नावली' आणि 'प्रियदर्शिका'. त्यांतल्या कोणत्या तरी एका नाटकात नायिकेच्या सौंदर्याचे वर्णन करणारा श्लोक होता. त्याची शेवटची ओळ होती, 'स्वाङ्गैरेव विभूषितासि वहसि खेदाय किं मण्डनम्'— 'आपल्या सुंदर अवयवांनीच तू इतकी सुरेख अलंकृत झाली आहेस की, शरीराला निष्कारण ओझे होऊन दुखवणाऱ्या या अलंकारांची तुला आवश्यकता काय ?' 'स्वाङ्गैरेव विभूषितासि' आणि 'अवयवच तिचे दागदागिने' या दोहोंत आढळलेल्या साधर्म्याने मन चकित झाले.

काही वाचताना, ऐकताना हे असेच काही पूर्वी कधीतरी, कुठेतरी वाचले ऐकले आहे असे अनेकदा जाणवते. त्याच त्या भावनांच्या छाया पडछाया वेगवेगळ्या ठिकाणी हेलकावताना दिसतात. मनातल्या अंतर्लीन पूर्वस्मृतींना जाग आणतात. स्थल, काल, भाषा यांच्या सीमा ओलांडून प्रतिभावंतांच्या प्रतिभेचे असे समांतर आविष्कार प्रकट होतात. हा एक प्रकारचा वाङ्मयीन पुनःप्रत्यय आपणाला येत असतो.

एकदा रेडिओवर 'अमर भूपाळी' चित्रपटातली होनाजी बाळाची ती प्रसिद्ध लावणी ऐकत होते. त्यात या किंवा अशा काही ओळी ऐकल्या, 'नको दूर देशी जाऊ सजणा... कधि एकान्ती तुझ्यासंगती बसुनी नाही भाषण केले । लाजण्यामध्ये रे दिन गेले.' ओळी अतिशय आर्त, हृदयस्पर्शी होत्या, पण त्या ऐकत असताना

माझ्या मात्र मनात खोल कुठेतरी काही चाळवले. वाटू लागले, असेच, हेच, पण वेगळ्या संदर्भात काहीतरी आपण ऐकलेले आहे. कधी बरे ? कुठे ? दोन दिवस लावणीच्या त्या ओळी मी अस्वस्थपणे मनात घोळवत राहिले आणि मग आठवला कितीतरी वर्षांपूर्वी, जवळजवळ शाळकरी वयात पाहिलेला 'तानसेन' हा सैगलचा चित्रपट. तानसेन राजधानीत, बादशहाच्या आश्रयाला जायला निघाला आहे. तानी— त्याची बालपणापासूनची सखी— भावी वियोगाच्या जाणिवेने व्यथित झाली आहे. त्या वेळचे तिचे गाणे मनात एकदम प्रकट झाले—

मोरे बालापन के साथी छैला
भूल जइयो ना
कभी न झूले बाग हिंडोले
कभी न बैठे छांव रे
कभी न पूछी बात जिया की
काहे चले परगांव रे

तानी तानसेनला म्हणते, 'अरे, आपण कधी बागेत हिंदोळ्यावर बसून झोके घेतले नाहीत. कधी विश्रब्धपणे झाडाच्या सावलीत विसावलो नाही. कधी जिवाभावाच्या गोष्टी परस्परांना विचारल्या ऐकल्या नाहीत...'' 'अमर भूपाळी'तल्या त्या ओळींत आणि 'तानसेन'मधल्या या ओळींत किती विलक्षण साम्य आहे ! एकमेकांना वेळीच प्रेमनिवेदन करायला हवे होते, ते केले नाही. लाजण्यात, आशंकेत, संभ्रमात दिवस गेले. आणि आता ? आता तर फार उशीर झाला आहे.

प्रणयी युगुले वेगळी, काळ वेगळा, संदर्भ वेगळा, पण पस्ताव्याचा भाव तोच. कितीतरी प्रणयकथांत अशी चुकामूक घडून आलेली दिसते. शरच्चंद्र चतर्जी यांच्या प्रतिभासंपन्न लेखणीतून उतरलेला आणि सैगलनेच आपल्या अप्रतिम अभिनयाने जिवंत केलेला 'देवदास' आठवावा. तिथेही हीच चुकामूक झालेली आहे. देवदासला पारूवरचे आपले प्रेम योग्य वेळी कळले नाही. पारू स्त्री होती, त्यामुळे तिला त्या भावबंधाची जाण आली आणि स्त्रीसहज धिटाईने तिने देवदासपाशी आपले अंतःकरण उघडे केले, पण देवदास स्वतःला ओळखू शकला नाही. पारूही त्याला कळली नाही. परिणामी दोघे एकमेकांना कायमची दुरावली. देवदासला पुढे आपले मन कळले, पण आता फार उशीर झाला होता.

आठवणींतून आठवणी निघत होत्या. 'देवदास' वरून माझ्या मनाने झेप

घेतली, ती थेट एका चिनी कवितेवर. ती कविता बऱ्याच वर्षांपूर्वी मी– अर्थात इंग्रजी अनुवादातून– वाचली होती. तिचाही आशय जवळपास हाच होता. चिनी कवितांमध्ये सूचकतेवर अधिक भर असतो. कवीला जे सांगायचे आहे, ते तो सरळ न सांगता संदिग्धपणे, अर्थपूर्ण प्रतिमांच्या द्वारा निवेदन करतो. मला आठवलेल्या कवितेतला प्रियकर पाचूच्या बासरीच्या प्रतिमेतून आपल्या प्रेमभावनेची अभिव्यक्ती करतो. तो आपल्या प्रियेला म्हणतो, 'तुला आठवते का ? गेल्या वसंत ऋतूत तुझी पाचूची बासरी या बागेत कुठेतरी हरवली होती. आपण ती किती शोधली, पण ती आपल्याला सापडली नाही. आता त्याच बागेत आपण बसलो आहोत. वसंताचा बहर ओसरला आहे. बागेतले गवत खुरटले आहे. वाळून कोळ झाले आहे, त्या गवतात. सायंकालीन उन्हात तुझी ती हरवलेली बासरी चमकत आहे आणि मी विचार करतो आहे, आपल्या प्रीतीचा जी आपल्या सावधपणाखाली इतके दिवस आपल्या नजरेआड छपून राहिली होती !'

काही विशिष्ट कल्पनांचे पडसाद वेगवेगळ्या कवितांतून, गद्य लेखनातून उमटलेले दिसतात, तर कधी विशिष्ट प्रतिमा विशिष्ट संकेत घेऊन भिन्न भिन्न ठिकाणी अगदी वेगळ्या संदर्भात येतात. विंदा करंदीकर यांची एक कविता आहे. त्या कवितेतली गोपी श्रीकृष्णाला अनुलक्षून म्हणते,

> मुक्तीमधले मोल हरवले
> केलिस जेव्हा गोकुळातली पहिली चोरी
> मिसळलास तू काजळकाळा
> आणि गढुळले मी हिमगोरी

गोकुळातल्या गोपींनी श्रीकृष्णाची सगुण भक्ती केली. तो काजळकाळा श्रीहरी त्यांच्यामध्ये मिसळला. कदाचित दैहिक पातळीवरही तो त्यांच्याशी एकरूप झाला असेल, आणि मग त्या हिमगोऱ्या गोपी गढुळल्या. 'गढुळणे' या शब्दाने शुभ्र गौर वर्णात काळा रंग मिसळल्यानंतर त्याला स्वाभाविकपणे येणारे गढूळपण तर सूचित होतेच, पण कृष्णमीलनानंतर व्यावहारिक पातळीवरच्या नैतिक संकेताच्या दृष्टीनेही गोपी मलिन झाल्या. लौकिकदृष्ट्या त्यांचे पावित्र्य कलंकित झाले. कदाचित लोकनिंदेलाही त्यांना सामोरे जावे लागले असेल. तथापि या पार्थिव पातळीवरच्या प्रेममीलनाने त्यांना जे सुख लाभले त्यापुढे मोक्षप्राप्तीचा अलौकिक आनंदही त्यांना तुच्छ वाटला. 'मुक्तीमधले मोल' त्यांच्या दृष्टीने हरवले. कवीने या

कवितेत निर्गुण निराकार परमात्म्याशी एकरूप करणाऱ्या रुक्ष अध्यात्मज्ञानापेक्षा सगुण, साकार परमेश्वराशी समरस करणाऱ्या गोड भक्तिसुखाची थोरवी आपल्याला पटवून दिली आहे.

अर्थात करंदीकरांना हाच आणि असाच अर्थ अभिप्रेत असेल असे नाही. मला मात्र या ओळींमधून हा अर्थ जाणवला. त्याबरोबरच कधीकाळी वाचलेला तुकारामांचा एक अभंग मला अचानक आठवला. त्या अभंगात कवीने हाच भाव जवळजवळ याच शब्दांत, याच प्रतिमांच्या आश्रयाने व्यक्त केला आहे. तिथेही एक गोपीच बोलत आहे. ती म्हणते—

हरि तुझी कान्ती रे सावळी
मी तर गोरी चाफेकळी
तुझ्या दर्शने होइन काळी
मग हे वाळी जन मज ॥

'हे श्रीहरी, तुझी कांती सावळी आहे आणि मी तर गोरीपान, जणू चाफ्याची कळी आहे. तुझ्या दर्शनाच्या नादाने मी काळी होईन आणि मग हा जनलोक मला वाळीत टाकील !' करंदीकरांच्या कवितेतली गोपी श्रीहरीच्या प्रेमसुखापुढे मुक्तीही तुच्छ आहे, असे ठामपणाने म्हणते. तुकारामांच्या अभंगातली गोपी श्रीकृष्णाच्या केवळ दर्शनानेही आपण मलिन होऊ आणि मग सभ्य प्रापंचिक आपल्याला वाळीत टाकतील असे भय बोलून दाखवीत आहे. पण दोघींनीही एकच भाव व्यक्त केला आहे आणि दोन्ही ठिकाणी आशय वेगळा असला तरी त्यातून शेवटी अद्वैत सिद्धांताचाच आविष्कार होत आहे. परमात्म्याशी आत्म्याचे होणारे मीलन आणि गोकुळातल्या गोपींनी कधी भीतियुक्त अन्तःकरणाने, तर कधी निस्सीम आवेगाने श्रीकृष्णाला केलेले आत्मसमर्पण दोहींचा अर्थ एकच. तरीही रुक्ष आध्यात्मिक पातळीवरून होणाऱ्या अद्वैताच्या साक्षात्कारापेक्षा सगुण भक्तीच्या द्वारा लाभणारे अद्वैतसुख अधिक मधुर असते. कबीराची एक ओळ आहे. तो सर्व दोहा मला आठवत नाही. नेमका संदर्भही माहीत नाही; पण अशी कथा सांगतात की, कुणीतरी कबीराच्या थोर ईश्वरभक्तीचे, साधुत्वाचे कौतुक केले. त्यावर कबीर म्हणाला, "माझी कसली भक्ती घेऊन बसलात ? खरी भक्ती केली गोकुळातल्या भोळ्याभाबड्या प्रेमळ गोपींनी. 'एक एक गोपी के प्रेम मे बह गये लाख कबीर' एका एका गोपीच्या निर्व्याज कृष्णप्रेमाच्या कल्लोळात माझ्यासारखे लाखो कबीर वाहून गेले आहेत !"

माणसाचा आत्मा आणि त्याचा देह यांतला संघर्ष हा भावनाबंध– Motif– असाच सर्वत्र आढळतो. बालकवी एके ठिकाणी म्हणतात, 'जीव धावतो वर वर जाया चैतन्यापाठी । परी सुटेना जड देहाची दृढ बसली गाठी'– 'आत्मा काही अलौकिकाचा ध्यास घेऊन अनंत अवकाशात भरारी घेऊ बघतो, पण जड मातीचे शरीर त्याला भूमीवर खिळवून ठेवते.' एक कलावंत या नात्याने बालकवींना देहमनातला हा संघर्ष व्यथित करतो. कलावंताप्रमाणेच अध्यात्मसाधकांनाही हे द्वंद्व कधी ना कधी, कोणत्या ना कोणत्या पातळीवर जाणवते. 'The spirit is willing but the flesh is weak', 'चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवत् दृढम्' यासारखी वचने हाच संघर्ष सूचित करत नाहीत का ? पण कधी कधी ऐंद्रिय दुबळेपणाच्या चिखलात गळ्यापर्यंत बुडालेल्या अवस्थेतही शरीरापलीकडचे ते काही 'अतिंद्रिय' आपल्याला खुणावते. आपल्यावरचा स्वतःचा अधिकार सांगत असते. 'वनफूल' या कवितासंग्रहाचे कवी म. म. देशपांडे यांची एक सुंदर कविता आहे–

अंतरिक्ष फिरलो पण
गेली न उदासी
काहीहि न हाताला
आले अविनाशी

या कवितेत पुढील ओळी आहेत– 'जड म्हणते माझा तू । क्षितिज म्हणे नाही.' जड आपल्या देहावर सतत आग्रहाने अधिकार गाजवते, पण त्याच वेळी क्षितिज म्हणते, 'नाही रे, तू केवळ जडाचा ताबेदार नाहीस, माझ्याशीही तुझे नाते आहेच आहे !'

'किंग लियर'ची शोकात्मिका साऱ्यांना माहीत आहे. भावनेच्या भाबड्या भरात सारे राज्य पोरींना बहाल करून टाकणारा राजा लियर पुढे त्यांच्याकडून झिडकारला जातो. मानवी कृतघ्नतेचा जळजळीत चटका त्याला बसतो. दुःखाच्या, पश्चात्तापाच्या भरात माळरानावर भटकणारा वृद्ध, दुःखी लियर म्हणतो, 'अरे शिशिरातल्या थंडगार वाऱ्या, माणसांच्या कृतघ्नतेच्या डंखाहून तुझा डंख काही अधिक चावरा, झोंबरा नसेल !' शेक्सपियर थोर प्रतिभावंत. त्याने या सर्व परिचित अनुभवाला भव्य शोकात्मिकेचे उत्कट परिमाण दिले. कुटुंबासाठी मर मर मरणाऱ्या आणि शेवटी निराधार होणाऱ्या प्रापंचिकालाही कधीतरी या हताश अवस्थेचा अनुभव येतोच. आता हीच भावना तुकाराम किती थोडक्या शब्दांत आणि तरीही किती

परिणामकारक रीतीने व्यक्त करतात पाहा—

'आयुष्य वेचोनी कुटुंब पोषिले । काय हित केले सांग बापा ?'

असे हे वाङ्मयीन समांतर. इथे-तिथे आढळणारे. मन भुलविणारे. आणि एका वेगळ्याच आनंदाचा प्रत्यय देणारे.

□

# अशीही जनरेशन गॅप

एक जुने इंग्रजी मासिक सहज हाती आले ते चाळत होते. त्यात सॉमरसेट मॉम या ख्यातनाम लेखकाने आपली एक आठवण एका लेखात दिली आहे. लेख मोठा गमतीदार आहे. मॉम एकदा आपल्या एका प्रौढ मैत्रिणीच्या घरी जेवायला गेला होता. तिची वीस बावीस वर्षांची एकुलती एक मुलगी होती. मुलगी तरुण, देखणी होती. तिचे व्यक्तिमत्त्व लाघवी, आकर्षक होते. मॉमला ती मुलगी फार आवडली. आणि ती मुलगी देखील मॉमसारख्या नामवंत लेखकाच्या भेटीने अतिशय प्रभावित झाली. मेजवानीच्या वेळी ती मुद्दाम मॉमच्या शेजारी बसली. त्याच्या साहित्याविषयी ती त्याच्याशी भरभरून बोलत राहिली. मॉमचे साहित्य तर तिने डोळस जाणकारीने वाचलेले होतेच, पण तिचे इतर वाचनही अफाट होते. बुद्धिमत्ता तीक्ष्ण होती. रसिकता चोखंदळ होती. साहित्यासंबंधीचा एकूण समजही चांगला होता. मॉमच्या लेखनाविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया ती उत्कटपणे, निर्भीडपणे व्यक्त करत होती. तिच्याशी गप्पा मारताना साहजिकच मॉमला फार छान वाटत होते. तिच्या सुंदर, प्रसन्न, टवटवीत संगतीत त्याचा वयस्करपणा सुखाने फुलून येत होता. तिने आपल्या साहित्यात इतका रस घ्यावा यामुळे एक कलावंत म्हणून जसा त्याला आनंद होत होता, तसाच एक पुरुष म्हणूनही त्याचा अहंकार तृप्त होत होता. जेवण मोठ्या मजेत पार पडले, हे वेगळे सांगायला नकोच.

सांगण्यासारखे आहे ते पुढेच आहे. जेवणानंतर सर्व मंडळी कुठल्याशा एका नाटकाला जाणार होती. सॉमरसेट मॉम, त्याची ती प्रौढ मैत्रीण, तिची ती लाघवी गोड मुलगी आणि मेजवानीला हजर राहिलेला, पण आतापर्यंत अगदी बाजूला असलेला असा त्या मुलीचा एक समवयस्क मित्र, ही सर्व मंडळी नाटकाला निघाली. गाडी तो मुलगा चालवणार होता. मॉमची साहजिकच अशी कल्पना होती की,

मैत्रिणीची मुलगी गाडीतसुद्धां आपल्या शेजारीच बसणार. पण झाले ते अगदी वेगळे. त्या तरुण मुलाने गाडी पोर्चमध्ये आणून उभी केली मात्र, इतका वेळ मॉमशी अगदी जवळिकीने गप्पा मारणारी ती तरुण मुलगी आता त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून एखाद्या खारीच्या चपळाईने आपल्या तरुण मित्राशेजारी गाडीत जाऊन बसली आणि मॉमला मात्र गाडीच्या मागल्या बाजूच्या बैठकीवर आपल्या प्रौढ वयस्कर मैत्रिणीशेजारी निमूटपणे बसावे लागले. ही सगळी घटना सांगून झाल्यावर मॉमने मोठे मजेदार वाक्य लिहिले आहे. तो म्हणतो, 'आधी मी जरासा खट्टू झालो, पण मग मला हसू आले !' त्या मुलीच्या संगतीत मॉम घटकाभर तरुण झाला होता. ती मुलगी मात्र त्याच्या बरोबरीने प्रौढ झाली नव्हती. बौद्धिक चर्चेसाठी, त्यातून लाभणाऱ्या आनंदासाठी तिला मॉमची संगती बरी वाटली, त्या संगतीचे सुख तिने मनसोक्त अनुभवले, पण प्रत्यक्ष शारीरिक निकटतेचा, पुरुषी सहवासाच्या उष्ण, उबदार, वासनात्मक माधुर्याचा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा तिने चटकन मॉमला डावलले आणि आपल्या समवयस्क तरुण मित्राशेजारी ती जाऊन बसली. वृद्ध बौद्धिक साहचर्य बाजूला पडले. तारुण्यानें तारुण्याकडे धाव घेतली !

मॉमने ही सर्व हकीकत मोठ्या गमतीदार पद्धतीने निवेदन केली आहे. त्यात खेदाचा, कटुतेचा लवलेशही नाही. मॉमची म्हणून एक खास विनोदी शैली आहे. शाब्दिक कोट्या न करता किंवा कल्पनाचमत्कृतीने वाचकांना स्तिमित करून खदखदा न हसवता तो केवळ आपल्या मिष्कील, काहीशा 'सिनिकल' अशा लेखनपद्धतीने वाचकांच्या मुखांवर ओझरते स्मित फुलवत राहतो. वर उल्लेखिलेल्या लेखातही त्याचा हा मिष्किलपणा उत्तम रीतीने प्रकट झाला आहे. स्वतःची झालेली फजिती त्याने सहजपणे, मोकळ्या मनाने सांगून टाकली आहे. मला मात्र हा लेख एका वेगळ्याच कारणामुळे आवडला. ते कारण म्हणजे मॉमचे ते वाक्य : 'आधी मी जरासा खट्टू झालो, पण मग मला हसू आले !' मॉम हसू शकला, ही गोष्ट माझ्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मॉमच्या त्या हास्यात विलक्षण समजूतदार, पण थोडा उदास शहाणपणा आहे. त्यात आपल्या प्रौढपणाचा शांत स्वीकार आहे आणि तारुण्याच्या लहरी चंचलपणाकडे बघण्याची एक क्षमाशील वृत्तीही आहे.

मला हा लेख पटण्याचे आणखी एक कारण म्हणजे आमच्या घनिष्ठ ओळखीच्या एका बाईंशी माझे नुकतेच झालेले बोलणे. बाईंचे वय आता

पन्नाशीच्या पलीकडे गेलेले आहे. त्या चांगल्या सुशिक्षित, पदवीधर महिला आहेत. समाजकार्य, राजकारण यांत सक्रिय सहभाग घेणाऱ्या आहेत. बदलत्या जीवनाची पावले ओळखण्याइतका समंजसपणाही त्यांच्यापाशी आहे आणि तरी देखील मनातून त्या दुःखी आहेत. त्यांच्या दुःखाचे कारण काय, तर म्हणे त्यांची दोन्ही तरुण मुले – मुलगा आणि मुलगी – आजकाल त्यांना दूर ठेवतात. अलीकडेच त्यांनी माझ्याकडे ही तक्रार केली.

खरे तर मला बाईंच्या तक्रारीचा नीटसा अर्थच समजला नाही. त्यांची दोन्ही मुले मी चांगली ओळखते. त्यांच्या लहानपणापासून मी त्यांना जवळून बघत आले आहे. मुले खरोखरीच फार छान आहेत. मुलगा नुकता बी. कॉम. झाला आहे. मुलगी बी. ए. च्या दुसऱ्या वर्षाला आहे. मुलगा सिनेमापासून स्पोर्टस्पर्यंत आणि साहित्यापासून संगीतापर्यंत सर्व गोष्टींबद्दल जिवंत कुतुहल बाळगणारा आहे. सामाजिक जाणिवेने भोवतालचे जीवन बघणारा आहे. वास्तवाचे परखड भान राखणारा आहे. मुलगी त्यामानाने जरा लाजाळू, भावुक, स्वप्नरंजनात रमणारी आहे. ती कविता करते, चित्रे काढते, सुंदर वस्तूंची साक्षेपाने जपणूक करते, हळवेपणाने फुले कुरवाळते, गाणी गुणगुणते. तिचे जग तसे सीमित आहे. आपल्या काही मोजक्या मित्रमैत्रिणींतच ती उमलते. मोकळी होते. हास्यविनोदात रमते. दोन्ही मुले वाढाळू वयांतली आहेत. जीवनाचा ती हळूहळू परिचय करून घेत आहेत. त्यांचे संवेदनांचे विश्व बहरत आहे. देहात आणि मनात सूक्ष्म, गुंतागुंतीचे, आश्चर्यकारक असे बदल होत आहेत. अशा वेळी त्या मुलांच्या या शहाण्या, समजूतदार आईने खरे म्हणजे मुलांपासून जरासे अलिप्त राहायला हवे. त्यांचे जीवन त्यांना त्यांच्या पद्धतीने जगू द्यायला हवे. त्यांनी मागितला तरच सल्ला द्यायला हवा आणि दुरून त्यांच्यावर घारीची नजर ठेवून त्यांना गरज पडेल तेव्हा आपला मायेचा हात त्यांच्या आधाराला सज्ज ठेवायला हवा. पण घडते आहे ते भलतेच. ही आई आपल्या मुलांच्या जीवनात एकसारखी घुसू बघते. त्यांच्या मित्रमैत्रिणी आल्या की, त्यांच्या गप्पांत त्यांच्या बरोबरीने भाग घेते. त्यांच्याबरोबर सिनेमा, पार्ट्या, पिकनिक सगळीकडे जाण्याची तिची तयारी– नव्हे, अगदी अट्टाहास असतो. थोडक्यात सांगायचे, तर आई सारखा आपला सहवास, आपले अस्तित्व मुलांवर लादत राहते. त्यांना ते हवे आहे की नाही याचा ती विचारच करत नाही.

बाईंशी एकदा दोनदा मी याबद्दल थोडे स्पष्ट, थोडे आडून बोलण्याचा प्रयत्न

करून पाहिला, पण त्या मुळी काही समजूनच घ्यायला तयार नाहीत. त्यांचे म्हणणे असे की, त्या आपल्या मुलांच्या बरोबरीच्याच आहेत. त्यांनी आपले शारीरिक आणि मानसिक तारुण्य (?) छान टिकवले आहे. म्हणजे काय, तर 'फिगर' कसोशीने राखली आहे. पॉप म्युझिकपासून कॉंक्रीट पोएट्रीपर्यंत सारे काही त्यांना अवगत आहे. त्यांचे वाचन अद्ययावत आहे. नव्यातले नवे मराठी आणि इंग्रजी साहित्य त्या साक्षेपाने वाचतात. सभासंमेलनांना, संगीताच्या मैफलींना आवर्जून उपस्थित राहतात. 'टाइम', 'न्यूजवीक' वाचून जगातल्या यच्चयावत घटनांशी मानसिक संपर्क साधतात. खरे तर हे सारे त्यांना कसे काय जमते आणि जमत असले तरी ते त्या इतके धडपडून का करतात, असा मला नेहमी प्रश्न पडतो. पण तो मुद्दा वेगळा. सांगायचे कारण, हे सगळे असे असताना आपल्या मुलांनी आणि त्यांच्या मित्रमैत्रिणींनी आपणाला त्यांच्यामध्ये बरोबरीने सामावून का घेऊ नये हे त्या बाईंना कळतच नाही. पण तसे घडते खरे ! काय होते, मुलांकडे त्यांची मित्रमंडळी जमते. गप्पा, हास्यविनोद, थट्टामस्करी यांना ऊत आलेला असतो. खाणेपिणे मजेत चालते. अशा वेळी या बाई अकस्मात तिथे जातात. गप्पांत भाग घेऊ लागतात. मुलामुलींशी सलगीने बोलतात. आपल्या वडीलकीला न शोभेशा लडिवाळ अवखळपणाने त्यांची चेष्टा करतात. असे झाले की, ती तरुण मुले आतल्या आत आक्रसतात. संकोचाने एवढीशी होऊन जातात. साऱ्या बैठकीवर एकदम कसली तरी नकोनकोशी सावली पडते. रंगात आलेल्या गप्पा खंडित होतात. हसणे खिदळणे थांबते. मुले चोरट्यासारखी एकमेकांकडे बघू लागतात. मैफलीचा रंगच उतरतो. आणि थोड्या वेळाने सारा कार्यक्रम संपुष्टात येतो. त्या प्रौढ बाईंचे दुःख यातून निर्माण झाले आहे, आपली मुले आपल्याला दूर ठेवतात, आपल्या 'कंपनी'त आपणास समाविष्ट करून घेत नाहीत, ही त्यांची व्यथा आहे. ही त्यांची तक्रार आहे.

मी बाईंचे बोलणे पूर्ण सहानुभूतीने ऐकून घेतले, पण त्यांची समजूत कशी, कोणत्या शब्दांत घालावी हेच मला समजेना. बाई इतर बाबतीत एवढ्या हुशार असताना ही लहानशी गोष्ट मात्र त्यांना आकलन होत नव्हती. नव्हे, समजत असतानाही त्या वस्तुस्थितीचा स्वीकार करण्यास त्या तयार नव्हत्या. झाडापासून फांद्या अलग होतात, तशी बाईंची मुले आता त्यांच्यापासून अलग होऊ लागली होती. ती सरसरून वाढत होती. मोकळ्या आभाळात झेपावत होती. आपल्या स्वतंत्र

दिशा शोधत होती. मुलांच्या त्या प्रौढ आईने हे जाणून घ्यायला नको का ? दुसरी गोष्ट अशी की, तारुण्य आणि प्रौढपण या मुळात अगदी वेगवेगळ्या गोष्टी आहेत. प्रौढपणी मनाने तरुण राहणे— नव्हे, केशवसुत म्हणतात त्याप्रमाणे प्रौढत्वी देखील आपले शैशव जपणे निराळे आणि देहाचे नि मनाचे प्रत्यक्ष तारुण्य अनुभवणे निराळे. बाईंनी मनाने आपले तरुणपण टिकवले असेल, पण त्यांची मुले तारुण्य जगत आहेत. त्या अवस्थेतून साक्षात जात आहेत. या वयातल्या वासना वेगळ्या, विकार वेगळे, रंगरस वेगळे, आनंद वेगळा आणि दुःखेही वेगळी. तारुण्य जसे अविचारी असते, निर्भय, निःसंकोच असते तसे कधीकधी ते फार लाजाळू, संकोची, सहज दुखावले जाणारे, स्वतःशी झुरणारे, कुढणारेही असते. प्रौढ वयात रक्त थंड होते. भित्रा शहाणपणा अविवेकी साहसाला पायबंद घालतो आणि इतक्या वर्षांच्या अनुभवांनी तोंड बेचव, कडवट झालेले असते. उलट तारुण्यात नसांतून उष्ण रक्त धावत असते. वृत्ती बेबंद, बेगुमान असतात. विचारांना मागे सारून वासना आवेगाने उफाळतात. तारुण्य वेडे असते. प्रौढ वय उदास शहाणे असते. दोहोंचा मेळ जमणे अवघड आहे. तारुण्याने प्रौढत्वाच्या अनुभवसंपन्नतेपुढे नम्र व्हावे आणि प्रौढ वयाने सुंदर लाजाळू तारुण्याचा मान राखावा. पण तारुण्याच्या फुलत्या बहरत्या उपवनात प्रौढांनी बळेच घुसावे, तिथले खासगीपणाचे पडदे दूर सारून पलीकडे काय चालले आहे ते बघण्याचा आग्रह धरावा, तरुणांच्या भावविश्वावर आक्रमण करावे, यासारखा दुसरा गुन्हा नाही. सुंदर, निर्भर, निर्मळ तारुण्याचा यासारखा दुसरा अपमान नाही.

बाई नेमका तोच गुन्हा करत आहेत, हे मला स्पष्ट दिसते आहे, पण त्यांना ते मी सांगू शकत नाही. तसे काही मी सांगणे कदाचित त्यांना रुचणार नाही. आता मी विचार करते आहे, सॉमरसेट मॉमचा तो लेखच बाईंना वाचायला द्यावा की काय ?

□

निबंध 3866
२६७८२

# रमणा, वागुरा, कामण्णा, मदरंगी

आमच्या घरी माझ्या लहानपणापासून खूप पुस्तके असायची. माझ्या आईला वाचनाची अतोनात आवड. वडील पुण्यामुंबईकडे गेले की ते आईसाठी भरपूर पुस्तके घेऊन येत. त्यामुळे मीही फार लवकर वाचू लागले. वाचता वाचता पुस्तकांत रमले. मनाने त्यात गुरफटत गेले. तो स्नेहबंध आजतागायत टिकला आहे.

तर सांगायची गोष्ट अशी की, लहान वयात मी वाटेल ती पुस्तके वाचत असे. त्यातले अनेक शब्द डोळ्यांखालून जात, पण त्यांचा अर्थ मला कळत नसे. गडकरी हे माझ्या आईवडिलांचे परमप्रिय दैवत. मग मीही त्यांची नाटके वाचली. कविता वाचल्या. 'राजसंन्यास' हे नाटक तर मी अगदी नकळत्या वयात वाचले. त्यातल्या झगमगत्या किनखाबी भाषेने मनावर विलक्षण भुरळ घातली. ती अनुप्रासयुक्त वाक्ये भराभर पाठ होत गेली. गाणीसुद्धा मी आपली स्वतः स्वतःशी गुणगुणत असे. त्यामध्ये शिवांगीच्या तोंडच्या एका गाण्यात ओळ होती, 'करूनिया दिलाचा रमणा ! अहो भगवाना । लुटवा या पंचप्राणा' त्या वयात अर्थाशी मला फारसे कर्तव्य नसेच. शब्दांच्या नादमाधुर्याने मी मंत्रमुग्ध होऊन जाई. 'रमणा' शब्द मला फार आवडला. त्याचा अर्थ मात्र अनेक वर्षे ठाऊक नव्हता. पुढे मी कॉलेजात जाऊ लागले, तेव्हा बखर वाङ्मय वाचताना 'रमणा' शब्द अचानक भेटला. पेशवे 'रमणा' भरवत. तिथे विद्वान ब्राह्मणांना ते दक्षिणा देत. सोने-मोती-मोहरा एकत्र करून ती 'खिचडी' ब्राह्मणांकडून लुटवत. जाणकारांची कदर करीत. हा तपशील कळला आणि मग 'करूनिया दिलाचा रमणा. . .लुटवा या पंचप्राणा' या गडकऱ्यांच्या कल्पनेतले काव्य उलगडले.

असे माझे कित्येक शब्दांच्या बाबतीत झाले आहे आणि इतरांच्याही बाबतीत होत असेल. आमच्या घरी खूप नाटके होती. त्यांतल्या कुठल्या तरी नाटकातून—

मला वाटते ते संस्कृत 'मृच्छकटिका'चे मराठी भाषांतर असावे — गाण्याची ओळ अवचित मनात घुसली— 'नितंबिनी वागुरा पसरिल्या कामि कुरंगाला.' ती ओळ देखील तशीच सतत जिभेवर खेळत राहिली, पण मी कितीतरी मोठी होईपर्यंत मला तिचा नेमका अर्थ कळला नव्हता. आवडत्या कवितापंक्ती, इतकेच नव्हे तर गद्य वाक्येदेखील सतत म्हणत राहण्याची मला सवय आहे. काही वर्षे लोटली. 'नितंबिनी' शब्द संस्कृतच्या अभ्यासामध्ये अनेकदा येतो. तेव्हा तो शब्द ओळखीचा झाला. तरी संपूर्ण ओळ आकलन झाली नाहीच. एम. ए. झाल्यावर मी 'नवयुग' ऑफिसात काही वर्षे काम केले. तिथे अनेक लेखक संपादक यांची ये जा असे. एकदा प्रुफे तपासता तपासता माझ्याच नादात तल्लीन होऊन मी ती ओळ गुणगुणत होते. त्या दिवशी प्रभाकर पाध्ये आमच्या ऑफिसात आले होते. ते माझ्या टेबलाशी थांबले आणि म्हणाले, 'हे तुम्ही काय म्हणत आहात ?'

मी चपापले. संकोचाने मुकी झाले. ऑफिसात असे वेड्यासारखे कुणी बडबडते का ? मला फार लाज वाटली. पण त्या ओळीने पाध्यांचे कुतुहल जागे झाले होते. ते मनापासून विचारत होते. मी त्यांना सांगितले, नाटकांतलं गाणं आहे हे, त्यातली ओळ म्हणत होते मी स्वतःशी.

"ते खरं !" पाध्ये म्हणाले, "पण या ओळीचा अर्थ काय ?"

अर्थ मला तरी कुठे माहीत होता ? मी आपले अज्ञान कबूल केले.

पाध्ये पुढे काही बोलले नाहीत. ते निघून गेले. दोन दिवसांनी ते पुन्हा ऑफिसात आले. दरम्यान त्यांनी त्या ओळीच्या खनपटीला बसून तिचा अर्थ उलगडला होता. ऑफिसात येताच ते मला म्हणाले,

"अहो, त्या ओळीचा अर्थ मजेदार आहे. 'वागुरा' म्हणजे जनावरं पकडण्यासाठी पारध्यानं लावलेलं जाळं आणि 'कामिकुरंग' म्हणजे 'लंपट पुरुष, हेच कुणी हरीण.' 'नितंबिनी' म्हणजे अर्थात लावण्यवती ललना. 'सुंदर स्त्रिया म्हणजे कामुक पुरुषरूपी हरिणांना पकडण्यासाठी पारध्यानं पसरून ठेवलेली जाळीच होत' असा या संपूर्ण ओळीचा अर्थ आहे !"

मी पाध्यांचे मनःपूर्वक आभार मानले. अनेक वर्षे मनात घोळत असलेल्या, जिभेवर खेळत असलेल्या ओळीचा अर्थ आता कुठे मला संपूर्ण कळला होता. त्यातही 'वागुरा' म्हणजे 'जाळे' हा अर्थ, तर आता मी कधीच विसरणार नव्हते.

गडकऱ्यांच्याच नाटकातला आणखी एक शब्द. त्यांच्या 'भावबंधन'

नांटकातला महेश्वर कानडी माणसाचे सोंग घेऊन येतो आणि आपले नाव तो 'कामण्णा' म्हणून सांगतो. कामण्णा हे भरपूर हंशा पिकविणारे गडकऱ्यांचे एक विनोदी पात्र, एवढीच आपल्याला त्याची माहिती आहे. पण यापलीकडे 'कामण्णा' शब्दाच्या अर्थाचा विचार क्वचितच कधी कुणी केला असेल. सुप्रसिद्ध विनोदी नट दिनकर ढेरे हे कामण्णाची भूमिका फार सुरेख रंगवत, असे मी ऐकले आहे; पण ती कशी ते कधी पाहिले नाही. नंतर अनेक वर्षांनी कृष्णा जे. कुलकर्णी या अकाली निधन पावलेल्या प्रतिभावंत कथालेखिकेचा 'यमुनातीरीचे बुलबुल' हा कथासंग्रह मी वाचत होते. कृष्णा कुलकर्णी या बेळगावच्या होत्या. कानडी भाषेशी त्यांचा उत्तम परिचय असणार. त्यांच्या एका कथेत 'कामण्णा' हा शब्द आला होता आणि पुढे कंसात 'मदन' असा त्याचा अर्थ लेखिकेने दिला होता. तो अर्थ वाचला आणि मी अक्षरशः थरारून गेले. किती सुंदर शब्द. कामण्णा, मदन. आता माझ्या मनातला 'कामण्णा' हे केवळ विनोदी पात्र राहिले नाही. त्याला एकदम एक रोमँटिक, सुंदर परिमाण आले.

कानडी भाषा आपण नेहमीच क्लिष्ट, खडबडीत मानली आहे. पण ती फार सुंदर भाषा आहे, असे म्हणतात. मला कानडी येत नाही, तरीदेखील तिचे ज्ञान अजिबात नसता आपण जी तिची चेष्टा करतो ती मला योग्य वाटत नाही. कधीतरी एखादा कानडी शब्द कुठेतरी वाचनात येतो आणि त्याचा अर्थ कानडी भाषकाकडून समजावून घेतल्यानंतर त्याचे सौंदर्य आणि गोडवा मनाला अगदी मोहून टाकतो. मागे एकदा एक कानडी शब्द मी कुठेतरी वाचला 'मदरंगी.' मी त्याचा अर्थ समजावून घेतला, तो भलताच काव्यमय निघाला. 'मदरंगी' म्हणजे मेंदी. आता आपली 'मेंदी' किंवा हिंदीतला 'हिना' यापेक्षा 'मदरंगी' हा शब्द किती अन्वर्थक, नादमधुर आणि सुंदर आहे. 'मादक रंग असलेली', असे 'मदरंगी'चे मराठीत स्पष्टीकरण करता येईल. कानडीत आणखी असे कितीतरी काव्यमय शब्द असतील. तिकडे कुठल्या तरी औषधी वनस्पतीला 'कामकस्तुरी' असा शब्द असल्याचे मला कुणी सांगितले. तोही शब्द मला फार आवडला.

पण हे निदान अपरिचित भाषेतले शब्द झाले. जी मराठी भाषा आपण जन्मभर बोलत आलो, तिच्यातले देखील कितीतरी शब्द असेच आपला अर्थ लपवून ठेवत असतात.

एकदा मी 'बिरबल आणि बादशहा' यांच्या कथा वाचत होते. बिरबलाच्या

गोष्टींत मी अगदी रमून गेले होते. बादशहाची त्याने केलेली फजिती वाचताना गंमत वाटत होती आणि अकस्मात मला एक शोध लागला. 'बिरबल' नावाचा अर्थ मला उलगडला.

'बिरबल' हा मुळात 'वीरबल' असला पाहिजे. 'बिरबल' हा उच्चारसौकर्यार्थ झालेला त्याचा अपभ्रंश. वीरबल— वीरासारखा बलिष्ठ. हा अर्थ मला लागला आणि मग 'वीरबल' म्हणून एक धिप्पाड, देखणा, उमदा, पाणीदार डोळ्यांचा आणि तरतरीत तल्लख मुद्रेचा पुरुष डोळ्यांसमोर उभा राहिला. आता त्याच्या कथांना एक वेगळे परिमाण आले. त्या केवळ गमतीच्या कथा राहिल्या नाहीत, तर त्यातून मनुष्यस्वभावाची गूढता मला जाणवू लागली. सर्व बिरबलसाहित्यावरच एक वेगळा प्रकाश पडला.

शब्दांचे अर्थ असे अचानक मनातही स्फुरतात. 'बजरंगबली' हा शब्दच घ्या. तो भेटला प्रथम हरिभाऊ आपटे यांच्या 'उषःकाल' कादंबरीत. तिच्यामधला तो शूर घोडेस्वार पावसाळी काळोख्या रात्रीत प्रवास करता करता मुक्कामासाठी एका मारुतीच्या देवळात येतो. मूर्ती पुढे सरकताना दिसल्यावर तिच्या आसनाखाली एक चौकोनी झरोका असल्याचे त्याला कळते. आतून उजेडही येत असतो. मग हा शूर घोडेस्वार 'बजरंगबली की जय' म्हणून त्या झरोक्यातून आत उडी घेतो. हे सगळे वाचताना मी थरारून गेले होते. विशेषतः 'बजरंगबली' हा शब्द मला फार आवडला होता. त्याचा अर्थ मात्र कळला नव्हता. 'बजरंग'मधल्या रंग शब्दाची मी कुठे तरी लाल रंगाशी सांगड घातली होती. मारुतीच्या शेंदराचा, कौपिनाचा रंग लाल. तालमीतल्या मातीचा रंग लाल. जन्मतःच मारुतीने ज्या सूर्यबिंबाला हात घातला त्याचाही रंग लाल. बजरंगबली हा शब्द उच्चारताच हे वेगवेगळे लाल रंग मनात जागे होत. पण एके दिवशी मी निवांत बसले असताना आणि मारुतीचा विचारही मनात नसताना 'बजरंगबली' म्हणजे 'वज्रांगबली', वज्रासारख्या बलिष्ठ देहाचा हा अर्थ मला अचानक स्फुरला. मला झालेल्या या अर्थप्रतीतीने मी थक्क झाले. तशीच विलक्षण आनंदितही झाले. 'बजरंगबली' म्हणजे 'वज्रांगबली' हा अर्थ किती सुंदर होता. मग इतक्या दिवसांत तो मला का बरे कधी उमगला नाही ? आणि आज असा अवचित का कळला ? काही का असेना, 'वज्रांगबली' शब्दाबरोबर माझ्या मनातला मारुती सरसर वाढत गेला. गावाबाहेरच्या मोडक्या पडक्या देवळातली, शेंदूर माखलेली, काहीशी हास्यास्पद, काहीशी केविलवाणी

मूर्ती हे त्याचे माझ्या मनातले चित्र पार बदलून गेले आणि 'कोटिच्या कोटि उड्डाणे झेपावे उत्तरेकडे' असे रामदासांनी ज्याचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे, तो प्रचंड, असामान्य शक्तिशाली, अतिशय रेखीव, पीळदार स्नायुबंध असलेला वज्रदेही हनुमान माझ्या डोळ्यांसमोर साक्षात उभा राहिला. इतकी वर्षे कानावर पडत असलेल्या एका साध्यासुध्या भाबड्या शब्दाने अकस्मात तोंडावरचा बुरखा दूर सारला आणि आपले अस्सल, सुंदर रूप माझ्यापुढे प्रकट केले.

□

# मी एक ऐकणारी

माझ्या लहानपणापासून मी एक गोष्ट पाहून ठेवली आहे, माझ्याकडे आपली सतत श्रोत्याची भूमिका येत राहिली आहे. समोरचे माणूस, मग ते वडील असो, धाकटे असो, सुशिक्षित असो, अशिक्षित असो, अधिकारी असो, अनधिकारी असो, त्याने मला उपदेश करत राहायचे आणि मी मान खाली घालून, कान पाडून त्याचे बोलणे निमूट ऐकून घ्यायचे, हा एक अलिखित संकेतच होऊन बसला आहे. महाकवी शेक्सपियरने जगाला रंगभूमीची उपमा दिली आहे. या रंगभूमीवर अनेक जण अनेक प्रकारच्या भूमिका वठवत असतात. कुणी नेतृत्व करतात, कुणी वीररसपूर्ण भाषणे करतात, कुणी अतिशय मार्मिक आणि विनोदी बोलून इतरांना हसवतात, तर कुणाच्या मुखातून विद्वत्तापूर्ण चमकदार सुभाषितांची हिरेमाणके सारखी गळत असतात. काही माझ्यासारखी गरीब बिचारी पात्रे मात्र नुसती ऐकण्याचे काम करतात. जगाच्या रंगभूमीवर सतत चालू असलेल्या या प्रचंड नाटकात त्या परमेश्वर नावाच्या प्रतिभासंपन्न नाटककाराने मला इतके कमी 'डॉयलॉग' का द्यावेत, एखादाही प्रभावी, हृदयस्पर्शी 'मोनोलॉग' माझ्या वाट्याला कधीच का येऊ नये, याचे कोडे मला उलगडलेले नाही. कुणी म्हणेल, म्हणजे ही बाई कधी बोलतच नाही की काय ? स्त्रीजातीला हे शक्य तरी आहे का ? खरी गोष्ट. तशी मी बोलते. पुष्कळ बोलते. जन्मभर मी शिक्षिकेचा व्यवसाय करत आले. तिथे तर बोलणे हाच माझा दैनंदिन उद्योग होता आणि भाषणे देण्याचीही मला हौस आहे. मग माझी तक्रार का ? तक्रार अशासाठी की वर सांगितले ते बोलणे आपले व्यावसायिक स्वरूपाचे झाले, रोजचा व्यवहार सुरळीत चालू ठेवण्यापुरते झाले. पण वादविवाद करणे, आपली मते ठासून मांडणे, समोरच्या माणसाला नामोहरम करणे किंवा टोल्याला प्रतिटोला देऊन त्याला गप्प बसवणे यासाठी जो

हजरजबाबीपणा लागतो, जे वाक्चातुर्य आवश्यक असते आणि मुख्य म्हणजे जो प्रचंड आत्मविश्वास आपल्या ठायी असावा लागतो त्याचा माझ्यापाशी पूर्ण अभाव आहे. त्यामुळे चर्चेत, वादात, अगदी साध्या घरगुती मतभेदांच्या प्रसंगात देखील समोरचा माणूस ठासून मला काही काही ऐकवत असतो आणि मी जीभ हरवल्यासारखी ते सगळे ऐकून घेत असते. या जीवननाट्यात माझ्याकडे केवळ श्रोत्याची भूमिका आली आहे, असे मी म्हणते ते या अर्थाने !

तशी मी लहानपणापासून मुखदुर्बळ आणि न्यूनगंडाने पछाडलेली होते. माझ्याहून चार वर्षांनी धाकटी असलेली माझी बहीण मात्र खूप बोलकी, फटाकडी आणि एखादेच वेचक पण मार्मिक वाक्य उच्चारून समोरच्या माणसाला गार करणारी होती. अजूनसुद्धा ती तशीच आहे. मला आठवते, आम्ही जेव्हा एकत्र खेळत असू तेव्हा खेळाचे स्वरूप तिने ठरवायचे, मैत्रिणींची निवड तिने करायची, भातुलकीचा 'मेनू' तिने आखून द्यायचा आणि मी आपली नंदीबैलासारखी मान डोलावत ते सगळे कबूल करायची. बहिणीचा एक शब्द ठरलेला असे, 'नाही !' उदाहरणार्थ मी जर भीत भीत तिला विचारले, 'रोज रोज सागरगोटे काय गं ? आज आपण काचापाणी खेळू या ना ?' तर ती लगेच ठामपणे म्हणायची, नाही, सागरगोटेच ! मी जरा धीर करून तिला म्हणे, असं का गं ? काचापाणी का नाही ? त्यावर ती उग्र चेहरा करून पुन्हा म्हणे, नाही. सागरगोटेच. आणि मी सागरगोटे खेळायला बसे. माझी काचापाण्याची हौस बिचारी मनातल्या मनात राहून जाई. या बहिणीपायी मला न आवडणारे खेळ, न आवडणाऱ्या सोबतिणी, फार काय न आवडणारा खाऊसुद्धा पत्करावा लागे. मला रेवड्या फार खाव्याशा वाटत. अजूनही वाटतात, पण 'रेवड्या घाण असतात' म्हणून ही बहीण मला फक्त चुरमुरे फुटाणे खाऊ द्यायची. फार तर बत्तासे. असा तिचा विचित्र जोरा आणि माझी निमूट शरणागती असे.

जी गोष्ट लहानपणी घरात घडत आली, तीच पुढे प्रथम शाळेत आणि नंतर कॉलेजातही होत राहिली. आत्मविश्वासाच्या अभावामुळे, स्वतः काही निर्णय घेण्याची कुवत अंगी नसल्यामुळे प्रत्येक वर्गात आधारासाठी मला एक एक मैत्रीण लागत असे आणि ती माझ्या मनाचे सुकाणू हाती धरून मला सहज हव्या त्या दिशेला वळवी. आमच्या अभ्यासाचे, रंजनाचे स्वरूप तिने ठरवायचे. मला जर संस्कृत श्लोक लावावेसे वाटले, तर ती नेमकी गणिते सोडवायला मला बसवी.

शाळेतून घरी जोडीने परत येताना मला पिवळेधमक पेरू हवेसे वाटले, तर ती नेमकी उसाच्या गुऱ्हाळात जाऊन रस पिण्याचा निर्धार जाहीर करी. मला पाडाच्या कैऱ्या खाव्याशा वाटल्या, तर ती गाभुळलेल्या चिंचांची गंमत पाडाच्या कैऱ्यांत कशी नाही, हे मला तात्काळ सप्रयोग पटवून देई. फार काय सांगावे, मी जर तिला म्हटले, 'ए, कुलकर्णीबाई इतिहास किती छान शिकवतात, नाही ?' तर ती म्हणे, 'अहाहा ! काय पण शिकवणं ! त्या नुसती नावं नि तारखा सांगतात, यापेक्षा आपले सायन्सचे देशमुखसर बघ. एवढा अवघड विषय, पण गमतीची उदाहरणं देऊन ते किती हशा पिकवतात वर्गात !' आता एखादा विषय उत्कृष्ट शिकवणे आणि वर्ग सतत खिदळत ठेवणे यामध्ये अर्थाअर्थी काही संबंध नाही हे मला त्या वयातही कळत होते, पण आपला मुद्दा दुसऱ्यापुढे ठामपणे मांडण्याइतकी स्पष्टवक्ती मी होते कुठे ? त्यामुळे बिचाऱ्या कुलकर्णीबाई मागे पडायच्या आणि देशमुखसरांचे गुणवर्णन मला ऐकून घ्यावे लागायचे.

माझ्या या विशिष्ट स्वभावामुळे मला कुणाशी वाद घालणे किंवा आपल्या मतांना पक्के धरून राहणे कधीही जमलेले नाही. बरोबर असलेल्या मैत्रिणीला विरोध करण्याची ताकद अंगी नसल्यामुळे मी नको असलेले सिनेमे पाहिले आहेत. काठ, पदर किंवा रंग पसंत नसलेल्या साड्या खरेदी केल्या आहेत. इडलीडोसा न खाता बटाटेवडे खाल्ले आहेत आणि कंटाळवाण्या रस्त्यांवरून हिंडत, त्याहून अधिक कंटाळवाण्या दुकानांतल्या वस्तू बघत तास न् तास घालवले आहेत. 'स्वभावो दुरतिक्रमः' दुसरे काय ?

हे सगळे आज आठवण्याचे कारण म्हणजे परवाचा एक दिवस. तो अगदी असा — केवळ इतरांचे ऐकून घेण्यात आणि त्यांच्याशी प्रतिवाद न करता निमूट गप्प बसून राहण्यात गेला. स्वतःच्या दुबळेपणाची फिरून एकदा विलक्षण खंत वाटली. गोष्टी म्हटल्या तर अगदी क्षुल्लक होत्या, पण म्हटल्या तर मोठ्या अर्थपूर्णही होत्या. त्या दिवशी सकाळी आमच्याकडे आमच्या नात्यातल्या एक प्रौढ बाई आल्या. त्या शिकलेल्या आहेत आणि भरीत भर म्हणून नुकत्याच अमेरिकेत चार सहा महिने राहून आलेल्या आहेत. बोलता बोलता विषय निघाला कामवाल्या बायकांचा; आणि मी त्यांना म्हटले, 'मला माझ्या व्यक्तिगत कामांपुरती एखादी बाई मिळेल का ? मुलगी असली तरी चालेल—' माझे वाक्य संपते न संपते तोच बाई असा विस्मयचकित चेहरा करून माझ्याकडे बघत राहिल्या की जणू मी कामवाली

बाई नव्हे, तर आकाशातला चंद्रच मागत होते !

'बाई ? कामाला बाई ?' त्या डोळे विस्फारीत करून मला म्हणाल्या.

'हो, बाई.' मी उत्तर दिले. माझ्या प्रश्नात त्यांना चकित करण्याजोगे एवढे काय होते ते मला कळले नाही.

'अहो, तुम्ही कुठल्या काळात वावरता आहात ?' बाई माझ्याकडे अधिक्षेपाची नजर टाकून तुच्छतेने म्हणाल्या.

'ते कामवाल्या बायका वगैरे विसरा बरं सगळं. पूर्वीचे सरंजामशाही दिवस राहिले नाहीत आता ! या समाजाच्या अधस्तरावरील स्त्रियांना आपल्या रास्त अधिकारांची जाणीव झाली आहे. त्यांची अस्मिता आता जागृत झाली आहे. त्यांना प्रॉपर ट्रेनिंग दिलं, तर त्या कारखान्यात, फॅक्टऱ्यांत कामं करतात. छान साड्या नेसतात. अगदी तुमच्यामाझ्यासारख्या नाटकसिनेमा बघतात, त्या आता धुणीभांडी नाही करणार..'

बाईंना कसे थांबवावे हेच मला कळेना. खरे म्हणजे त्यांच्या कुठल्याही विधानाला माझा आक्षेप नव्हता. अधस्तर, अस्मिता, सरंजामशाही वातावरण, काय काय कानांवरून जात होते. मला त्याचा नीटसा अर्थबोधही होत नव्हता. धुणे, भांडी, फरशी पुसणे वगैरे कामे आपण सगळ्याचजणी करतो. तेव्हा त्यात काही अस्मिता वगैरे दुखावते, असे मला वाटत नव्हते. प्रश्न होता, मला अशी कामे करायला कुणीतरी बाई किंवा मुलगी मिळवून देण्याचा, आणि बाई एकदम वेगळ्याच मुद्द्यांमध्ये शिरल्या होत्या. त्यानंतर त्यांनी अमेरिकेत कसे सर्वांना स्वावलंबी व्हावे लागते, हे मला ऐकवले आणि बाईचा विषय डावलून विजयानंदात त्या निघून गेल्या.

त्याच दिवशी दुपारी एक समीक्षक मला भेटले. खरे म्हणजे त्यांची मते मला माहीत आहेत, त्यामुळे मी त्यांना आपली मते ऐकवण्याच्या किंवा आपल्या आवडीच्या साहित्याबद्दल त्यांच्याशी बोलण्याच्या कधी भानगडीतच पडत नाही. पण त्या दिवशी काय झाले कोण जाणे, नुकत्याच वाचनात आलेल्या एका नव्या कवितासंग्रहाबद्दल मी जरा जादा उत्साहाने त्यांच्याशी बोलले. मला तो कवितासंग्रह फार आवडला होता. समीक्षकांनी ओठांवर एक करुणामय स्मित आणून माझे बोलणे ऐकून घेतले. माझी सामान्य अभिरुची, ढोबळ अरसिकता, एकूण साहित्यासंबंधीच्या अगदी जुजबी गोष्टींबद्दलचे माझे अज्ञान या

साऱ्यांबद्दलची कीव त्यांच्या या स्मितात होती आणि आधुनिक इंग्रजी साहित्याच्या वाचनाचा माझ्या ठायी असलेला अभाव तर त्यांना फारच खेदकारक वाटत होता. मला आवडलेला कवितासंग्रह त्यांना मुळीच आवडला नव्हता. ते एक झालेच, पण त्या संग्रहाच्या अनुषंगाने त्यांनी एकूण मराठी साहित्यावरच झोड उठवली. तुच्छतेने मान झटकून ते म्हणाले,

'खरं सांगू तुम्हाला? आपले साहित्यिक अजून त्याच त्या भावविश्वात गुरफटलेले आहेत. जुन्या संकेतांना चिकटून बसले आहेत. वास्तवाला ते धीटपणे सामोरे जात नाहीत. मानसशास्त्रातली नवी प्रमेयं त्यांना माहीत नाहीत. पाश्चात्त्य साहित्याचा तर त्यांना गंधही नसतो. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन—'

समीक्षक आणखी किती वेळ बोलत राहिले असते कोण जाणे, पण तेवढ्यात रस्त्याच्या पलीकडच्या बाजूने एक प्राध्यापक चालले होते, त्यांनी यांना हाक मारली, तेव्हा मराठी साहित्याचे उणेपण मला समजावून देण्याचे काम अर्ध्यावरच सोडून ते लगबगीने समोरच्या प्राध्यापकांकडे गेले. मी जागच्या जागीच गोंधळून उभी राहिले होते. माझा स्वतःच्या विद्वतेबद्दल मुळीच गैरसमज नाही. माझ्या ज्ञानाच्या मर्यादा मी चांगली जाणून आहे, पण आपल्यात काव्यप्रेम, रसिकता तरी थोड्याबहुत प्रमाणात आहे, असा माझा स्वतःविषयी समज होता. आज त्या समीक्षकमहाशयांनी माझ्या रसिकतेचीही सालडी काढली होती आणि माझा अधिक्षेप करता करता बिचाऱ्या साऱ्या मराठी साहित्यावरदेखील त्यांनी टीकेची झोड उठवली होती. 'मराठी साहित्य फार इमॅच्युअर आहे' असे एक त्यांचे लाडके मत आहे व ते मत ते वेळोवेळी इतरांना आवेशाने ऐकवत असतात. 'मराठी समीक्षा कितपत मॅच्युअर आहे?' असा एक प्रश्न त्यांना विचारावा हे एकसारखे मनात येत होते, पण माझा नेहमीचा भिडस्त, मुखदुर्बळ स्वभाव आड आला. त्या एकाच दिवसात दोन माणसांनी माझ्या अडाणीपणाचे भरपूर माप माझ्या पदरात घातले होते आणि मी नेहमीप्रमाणे 'एक ऐकणारी' होऊन बसले होते. आपण इतक्या मठ्ठ का राहिलो, हा प्रश्न मनाला त्रस्त करत होता. मी अशी बसले असता माझ्या भाचीची मुलगी माझ्याजवळ आली. वय वर्षे साडेचार. विद्वानांच्या सहवासाला मी कंटाळले होते. आता या मुग्ध, अजाण, निष्पाप शैशवाच्या संगतीत तरी मन रमवावे, या हेतूने मी तिला जवळ घेतले आणि कुठल्याशा कार्यक्रमात मला मिळालेले रिबनचे सुंदर नक्षीदार फूल तिच्या हातात देत मी मोठ्या प्रेमाने तिला म्हटले,

'हा घे तुला बिल्ला, आपण तो तुझ्या फ्रॉकवर लावू या का ? कसा छान दिसतोय बघ !'

त्यावर त्या पोरटीने नाक मुरडून माझ्याकडे पाहिले आणि समीक्षकांच्या मुद्रेवर उमटले होते तसेच करुणमय, उच्च पातळीवरचे स्मित ओठांवर आणून ती मोठ्या आढ्यतेने मला म्हणाली,

'आत्याबाई, याला बिल्ला नाही म्हणायचं काही !'

'मग काय म्हणायचं ?' मी चकित होऊन विचारले.

'त्याला ना, बॅज म्हणतात !' त्या चिमणीने उत्तर दिले. ज्ञानात नवी भर पडली आणि मी धन्य झाले... !

□

# शोकान्तिका एका मांजराची

मी त्याला प्रथम पाहिलं ते मुंबईला माझ्या एका विद्यार्थ्याच्या घरी. त्याचे ते पहिले दर्शन मला अजूनही आठवते. त्याने आपले दोन्ही पंजे पुढे पसरले होते आणि त्यावर आपले मस्तक टेकवून तो स्वस्थ पडला होता. तो गाढ झोपला असावा असेच वाटत होते. त्याची किंचित हलणारी शेपटीच काय ती त्याच्या जागेपणाची साक्ष पटवत होती. माझी चाहूल लागताच त्याने आपले कान टवकारले आणि डोळे उघडून सरळ माझ्याकडे पाहिले. त्याच्या भल्या थोरल्या, गोल, हिरव्यागार बुबुळातली नजर खोल, भेदक पण अस्वस्थ करणारी होती. त्याच्या त्या नजरेने मी काहीशी दचकलेच. त्याहीपेक्षा अधिक दचकले ती त्याच्या आकारमानाने. त्याचे सडपातळ शरीर खूप लांब होते आणि जवळजवळ तितकीच त्याची शेपटी लांबलचक होती. त्याचे पायही लांब, बारीक पण बळकट होते. आणि एकूण शरीराची ठेवण सगळीच खूप थोराड होती. आपल्या गावठी मांजरांमध्ये इतकी उंच, बळकट, लांब, पुष्ट मांजरे सहसा बघायला मिळत नाहीत. मी त्याच्या त्या भल्यामोठ्या शरीरानेच भारल्यासारखी होऊन त्याच्याकडे बघत राहिले. त्याने आपल्या हिरव्यागार डोळ्यांनी एकवार मला पाहून घेतले आणि मग माझी यापेक्षा अधिक दखल घेण्याची काही गरज नाही असे वाटूनच की काय, तो आपले मस्तक दुसरीकडे वळवून पुन्हा झोपी गेला, पण झोपेचे ते नुसते सोंग असावे. कारण त्याची शेपटी सावधपणे हलत होती.

एकूण मांजरांचे आणि माझे राजनैतिक संबंध चांगले आहेत. रस्त्यावरची गुंड, मवाली, गलिच्छ आणि बेवारशी मांजरेही मी हाक मारताच पटकन माझ्यापाशी येतात. माझ्या पायांना अंग घासतात, पोटातून घुरघुर आवाज काढून मला मैत्रीची पावती देतात. मांजरांच्या जगात तशी मला प्रतिष्ठा आहे. त्यामुळेच की काय या

मांजराने केलेली माझी उपेक्षा माझ्या मनाला बोचल्याखेरीज राहिली नाही. त्याला आपली कदर नसेल, तर आपणही त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही, असे ठरवून मी माझ्या विद्यार्थ्याच्या घरातल्या माणसांशी बोलत राहिले, पण मनाने ठरवलेले असूनही माझी नजर जणू एखाद्या अदृश्य धाग्याने खेचावी तशी सारखी त्याच्याकडे वळत होती. पहिल्या भेटीतच त्याने माझ्यावर इतके प्रभुत्व गाजवले हे खरे तर मला रुचले नाही. पण माझा तरी काय इलाज ? त्या मांजराचे व्यक्तिमत्त्वच तसे रुबाबदार होते. काही माणसांप्रमाणे काही मांजरे देखील भोवतालच्या जगावर सत्ता गाजवण्यासाठीच जन्माला आलेली असतात. त्यांतलाच तो होता. त्याची जणू 'स्वयमेव मृगेन्द्रता' होती.

जरा वेळाने तो उठला. मागचे पाय मागे अन् पुढचे पाय पुढे ताणून त्याने एकवार चांगला ऐसपैस आळस दिला. त्याचे शरीर रबरासारखे लवचिकपणे ताणले गेले आणि मग तो पुन्हा पूर्ववत झाला. नंतर त्याने तोंड उघडून मोठी जांभई दिली. तेव्हा रांगेने लागलेले त्याचे शुभ्र, टोकदार, तीक्ष्ण दात अन् सुळे क्षणभर दिसले. मग त्याने आपली लालचुटूक पातळ जीभ बाहेर काढून डावीउजवीकडचे अंग चाटले. त्याच्या त्या साऱ्या हालचाली इतक्या मोहक, कुतुहलजनक होत्या की, माझा सर्व आग्रह, प्रतिकार क्षणार्धात कोलमडला. मी झटकन उठून त्याच्याजवळ गेले. मोठाले काळे टिपके असलेल्या त्याच्या मखमली अंगावरून हात फिरवला. त्याच्या ओल्यागार नाकाला बोट लावले आणि त्या क्षणापासून आमची कायमची गट्टी जमली.

माझ्या त्या विद्यार्थ्याच्या घरी आणखीही चार-पाच मांजरे होती. एक कुटुंबवत्सल मांजरी, तिची दोन पिले, आणखी एक-दोन तरणी मांजरे असा एकूण मोठा मांजरपोळच होता. ती मांजरेही छान होती. पण या बोक्याबद्दल मला जे प्रेम वाटे ते त्या दुसऱ्या मांजरांबद्दल वाटत नसे. त्याला माझ्या मनात एक खास स्थान होते. त्याचे कारण त्याचा विशिष्ट स्वभाव. साऱ्या मांजरांपेक्षा तो दिसायला वेगळा होताच, पण तसा देखील तो त्यांच्यातून वेगळाच असे. त्याचे खाणे एकट्याने चाले. तो बसे एकटा आणि हिंडतही बहुधा एकटाच असावा. इतर मांजरांपाशी सलगी करण्याइतके तर तो त्यांना महत्त्व देत नसेच, पण त्यांच्याशी भांडण्याइतकीदेखील तो त्यांची दखल घेत नसे. माझ्या विद्यार्थ्यांचे घर कोकणी लोकांचे. त्यांच्याकडे जवळजवळ रोज मासे असत. जेवताना मांजरे ताटाभोवती गोळा होत. त्यांना भरपूर

मासळी खायला मिळे, पण त्यासाठी देखील हा बोका कधी हावरटपणा दाखवताना दिसला नाही. माशाचा तुकडा, पोळी पुढ्यात पडली की, इतर मांजरे एकदम त्यावर झडप घालत. एकमेकांपुढचा घास ओढत. एकमेकांवर फिस्कारून पंजे उगारत. पण असला प्रकार हा बोका कधी करत नसे. तो मानाने बाजूला असे. जे मिळेल ते मानानेच खाई. त्याच्या सगळयाच वागण्यात गांभीर्य, दिमाख असे. आपली 'पोझिशन' सांभाळून जगात कसे वागावे, याचे एक उपजत ज्ञान त्याला होते.

माझी आणि या विद्यार्थ्याच्या घरच्या लोकांची चांगलीच मैत्री होती. मी अगदी घरातल्यासारखी त्यांच्याकडे वागे. त्या बाजूला कुठे कामाला जायचे असेल, तर मी त्यांच्याकडे जेवतही असे. इतके ते घर माझे हक्काचे ठिकाण होते. आता या बोक्याची ओळख झाल्यापासून तर ते मला आणखी एक आकर्षण झाले. त्याचे अजून कुणी नावही ठेवलेले नव्हते. मी त्याचे नाव 'संभाजीराव' ठेवले आणि 'संभू' म्हणून त्याला हाक मारू लागले. संभाजीराजांसारखा तो दिमाखदार होताच मुळी. आता त्या नावाने त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आणखी एक परिमाण प्राप्त झाले. त्याचा रुबाब आणखी वाढला.

माझी आणि संभूची खूपच गट्टी जमली. आता मी घरी गेले की, तो न बोलवता मजजवळ येई. माझ्यापाशी बसून राही. मी पाठीवर हात फिरवला की, आतल्या आत लाडाने गुरगुर करी. 'संभू' म्हणून मी हाक मारली की, पोटातून खोल 'म्यांव' असा आवाज काढून तृप्ततेने डोळे किलकिले करत माझ्याकडे पाही. मला तर संभू आवडत होताच, पण त्याला मी इतकी आवडले याचे माझे मलाच नवल वाटे. कारण तसे मी त्यासाठी खास वेगळे काहीच करत नव्हते ना ? माझ्या विद्यार्थ्याची आई मला म्हणे, 'मेला तुम्हाला बरा धार्जिणा आहे, एरवी अगदी तुसडा माणूसघाण्या आहे तो. आम्ही हाक मारली तर ढुंकूनसुद्धा न बघता सरळ पुढच्यापुढे निघून जातो !'

मध्यंतरी काही काम निघाले आणि तीन चार महिने मला माझ्या विद्यार्थ्याकडे जाणे जमले नाही. एकदा एका संध्याकाळी मी त्यांच्या घरी गेले. संभू मला कुठे दिसला नाही. विद्यार्थ्याच्या आईकडे चौकशी केली तेव्हा ती म्हणाली, 'अहो, अलीकडं संभू घरात ठरतच नाही. साऱ्या वाडीभर उंडारत असतो. सगळी मांजरं त्याला भितात. लहान पोरंसुद्धा त्याच्या वाटेला जायला धजत नाहीत. एरव्ही आमच्या वाडीतल्या मुलांना मांजरांची कधीच भीती वाटत नाही. इथं काय, बघाल

तिकडं मांजरंच मांजरं ! पोरं खुशाल त्यांच्या शेपट्या ओढतात. त्यांना उचलून इकडून तिकडं टाकतात, फेकतात, त्यांच्या तोंडातसुद्धा हात घालतात. पण संभूला हात लावायची छाती नाही कुणाची. अलीकडं झालाय सुद्धा कसा गलेलठ्ठ बघा. मडक्यासारखं डोकं दिसतं मेल्याचं !'

आमचे असे बोलणे चालणे होते तोवर संभू बाहेरून आत आला. त्याचे नुकतेच ऐकलेले वर्णन किती अचूक होते, याची त्याला बघताच मला साक्ष पटली. तो मांजरांशी मारामारी करून आला असावा. त्याच्या नाकावर एक ओरखडा होता. अंगावरचे केस विस्कटले होते. तो खूप मळकट, घाण झाला होता. संभू आला. डोळे उचलून त्याने एकवार माझ्याकडे पाहिले आणि मग नेहमीप्रमाणे तो माझ्याजवळ येऊन बसला. आज पहिल्यांदाच त्याचा स्पर्श मला नकोसा वाटला. मला त्याची भीती वाटली. इतकेच नव्हे, तर आणखीही काहीतरी वाटले. काय ते माझे मलाच नीटसे कळले नाही. पण संभू कुठेतरी फार बदलला होता, एवढे खरे. त्याचे डोळे अनोळखी वाटत होते. चेहरा उग्र, मवाली दिसत होता. थोडक्यात सांगायचे, तर त्याच्यावर चक्क 'गल्लीतल्या दादा'ची कळा आली होती. आपला नेहमीचा सभ्य, रुबाबदार, आपली शान सांभाळून वागणारा संभू हा नव्हे, असे काहीसे माझ्या मनात आले.

आणि त्यानंतर संभू झपाट्याने बदलत गेला. घरात तो क्वचित सापडे. हल्ली तो रोज शेजाऱ्यांची भांडणे घेऊन येई. कुणाच्या घरामध्ये पातेल्यावरचे झाकण उडवून दूध पिऊन टाकी, तर कुणाच्या घरी तव्यावर तळून ठेवलेले मासेच मटकावून टाकी. घरातले आपल्या हक्काचे खाणेदेखील मुळीच अधाशीपणा न करता चवीने खाणारा संभू आता चोऱ्या करू लागला होता. इतर मांजरांपासून फटकून वागणारा खानदानी अलिप्त संभू आता वाडीतल्या मळक्या गलिच्छ बोक्यांमध्ये मिसळत होता. त्यांच्याशी भांडणे, मारामाऱ्या उकरून काढत होता. इतकेच नव्हे, तर स्वतःही आता तो फार घाणेरडा दिसू लागला होता. त्याच्या अंगावरची मऊ मखमली लव कोरडी भरड दिसत होती. तोंड मोठे झाले होते. त्यावर सतत ओरखडे असत. कधी तो माझ्याजवळ येई, तर कधी अकारण फिस्कारत दूर पळे. संभू आता वाढीला लागला होता. एक मात्र खरे— भाट्यांबद्दल त्याला अद्याप कुतूहल किंवा आकर्षण वाटत नव्हते. सर्व मार्जार स्त्रियांकडे तो अजूनही तुच्छतेने बघे.

आणखी काही दिवस गेले आणि संभू आपला बेपत्ताच झाला. तो शेजारच्या लोकांचा खूप मार खाई. त्यामुळे कुठे तरी जास्त मार खाऊन तो मेला तर नसेल, असा मला धसका बसला. पण माझ्या विद्यार्थ्याच्या आईला मात्र कधी तसे वाटले नाही. ती मला म्हणे,'अहो, त्याला काही झालं नसणार बघा. तुम्ही उगीच काळजी करता. तो कुठे तरी भटकत असेल इकडे-तिकडे, नाही तर मार खाऊन जखमी असेल. मांजरं अशी दोन दोन-चार चार महिने बेपत्ता होतात, पण घर नाही सोडत ती कधी. संभू नक्की येणार.'

आणि खरेच एकदा मी माझ्या विद्यार्थ्याच्या घरी गेले, तर संभू परत आलेला. तो आपल्या नेहमीच्या जागी कोपऱ्यात बसला होता. प्रथम मी त्याला ओळखलेच नाही आणि ओळखले तेव्हाही 'संभूच का हा ?' असा मला प्रश्न पडला, इतका संभू नखशिखान्त बदलला होता. तो खूप रोड झाला होता. त्याची एकेकाळची गोंडस झुपकेदार शेपटी आता वाळून दोरखंडासारखी झाली होती. अंगावरचे केस जागोजाग झडून विरळ दिसत होते. नेहमी ताठ असणारे कान त्याने आता पाडले होते. अति घाबरल्यावर मांजरे असे कान पाडतात म्हणून मी ऐकले होते. संभूची ती दशा पाहून माझ्या डोळ्यांत पाणीच आले. मी त्याला हाक मारली तेव्हा तो उठला, एकदा अंग ताणून त्याने आळस दिला आणि मग तो हळूहळू पावले टाकत म्हाताऱ्यासारखा माझ्याकडे आला. पोटातून 'म्यांव' असा खोल केविलवाणा उद्‌गार काढून गरीबपणे माझ्याशेजारी बसला.

संभू फारच बदलला होता. जुन्या संभूचे जणू हे भूत होते. हा बदललेला संभू पुन्हा कधीच बदलला नाही. त्याचा जुना अवतार जणू कायमचा अंतर्धान पावला होता. नंतर मी जेव्हा जेव्हा माझ्या विद्यार्थ्याच्या घरी जाई तेव्हा संभू घराबाहेर पायरीवर बसलेला असे. कधी तो घरातच आपल्या नेहमीच्या कोपऱ्यात झोपलेला दिसे. आता तो शेजारची भांडणे घरी आणत नव्हता, चोऱ्या करत नव्हता, इतर बोक्यांशी मारामाऱ्या करत नव्हता किंवा वाडीतल्या मांजरांसमोर दादागिरी गाजवत नव्हता. सगळ्यात खेदाची गोष्ट म्हणजे एके काळी त्याला भिणारी घरातली मांजरे आता खुशाल त्याच्या खोड्या काढत. त्याला बोचकारत. त्याच्या पुढ्यातले खाणे ओढून घेत आणि संभू ते सारे अपमान निमूटपणे सहन करी. त्याच्या चेहऱ्यावरचा एकेकाळचा रुबाब पार नाहीसा झाला होता. तिथे एक उदास, दीनवाणा, विरक्त भाव उमटला होता.

मध्ये दोन महिने संभू बेपत्ता होता तेव्हा नेमके काय घडले असेल ? तो कोणत्या अनुभवातून गेला होता ? त्याला त्याच्या सवाई बोके भेटले होते का ? त्याला कुणी भयानक दहशत घातली होती का ? कुणी क्रूरपणे मारहाण केली होती का ? काय झाले होते ? मला ते कधीच कळले नाही. संभूला विचारावे म्हटले, तर त्याला बोलता येत नव्हते, सांगता येत नव्हते.

मी संभूकडे बघे. त्याला विचारी, 'संभू, अरे होतास कुठं इतके दिवस ? तुला कुणी काय केलं राजा ? तुला काय झालं ?'

संभू उत्तरादाखल फक्त केविलवाणे 'म्यांव' करी. संभूचे कोडे मला कधीच उलगडले नाही. आजही ते एक कोडेच आहे.

□

# अनाहूत पाहुणा

दोन दिवसांचा पाहुणा घरी यावा, तसा तो येतो, अगदी अचानक येतो आणि दोन दिवसांसाठी आलेल्या पाहुण्याचा मुक्काम काही कारणाने अकल्पितपणे लांबावा तसा कधी चार, कधी सहा, तर कधी आठ दिवससुद्धा आपल्याकडे ठाण मांडून बसतो आणि मग आला तसाच अवचित आपला एके दिवशी निघून जातो.

त्याला आपण तसे आमंत्रण दिलेले नसते हे खरे, पण त्याच्या येण्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने आपणच कारण असतो हेही तितकेच खरे. आपण करू नये तितके कष्ट बेफिकीरपणे केलेले असतात. खाऊ नये ते अबरचबर खाल्लेले असते. आइस्क्रीमवर ताव मारलेला असतो. भर उन्हातून घरी आल्यावर फ्रीजमधील बर्फगार पाणी त्यावर घटाघटा प्यायलेले असते. वेडीवाकडी भटकंती केलेली असते. रात्री जागरणे करून नाटक, सिनेमा, गाण्याची मैफल असल्या चैनी केलेल्या असतात. हे सारे करताना आपल्याला काही वाटत नाही, उलट अतिशय गंमत वाटते. मागचा-पुढचा विचार न करता स्वतःच्या कुवतीवर, शरीरप्रकृतीवर बेसुमार अत्याचार केलेले असतात, पण 'वेत्रंदशाही' की 'राजसंन्यास' कुठल्याशा नाटकात म्हटलेले आहे ना, 'कालचक्राला क्षमा मंजूर नसते', तशीच ती निसर्गालाही मंजूर नसते. तुमच्या या साऱ्या बेशिस्तपणाचे प्रायश्चित्त म्हणून निसर्ग या पाहुण्याला तुमच्याकडे धाडून देतो. तुम्हाला पाहुणा हवा असला-हवा नसला तरीही.

तशी पाहुण्याच्या आगमनाची चाहूल आपल्याला आधी लागलेली असते, नाही असे नाही. आपले डोळे जळजळू लागतात. श्वास जड आणि गरम होतो. नाकातोंडातून वाफा निघू लागतात. अंगातले हाड न् हाड चरकात घालून कुणीतरी पिळत आहे, असा भास होण्याइतके त्यावर घाव बसू लागतात. मस्तकात मंद पण आग्रही ठकठक सुरू होते आणि ही सगळी उपद्रवकारक लक्षणे एकीकडे जाणवत

असतानाच दुसरीकडे आपल्याला एक चमत्कारिक, उत्तेजित असा 'मूड' येतो. सान्या संवेदना अकल्पितपणे तीक्ष्ण, टोकदार होतात. भोवतालच्या वस्तूंचे आकार प्रमाणाबाहेर वाढल्यागत वाटतात. त्यांच्या कडा रेखीव होतात. लखलखीत दिसू लागतात. आतून खूप कसल्या कसल्या ऊर्मी येतात. आपण बोलू लागतो, अनावरपणे बोलू लागतो. कधी नुसतेच हसतो, तर कधी चक्क कवितांच्या, गाण्यांच्या ओळी बडबडत राहतो. नंतरचे काही मग धडसे आठवेनासेच होते. घरातल्या कुणीतरी तुम्हाला दरडावून बजावल्याचे मात्र अंधुक स्मरते, 'तुम्हाला ताप भरलाय सपाटून. उगीच बडबडू नका. इकडे-तिकडे धावू नका. मुकाट्याने पडून राहा पाहू !' आणि एव्हाना आपल्याही अंगातले त्राण ओसरलेले असते. आपण मलूलपणे बिछान्यावर पडून राहतो. 'ए. पी. सी.'ची नाही तर 'क्रोसिन'ची गोळी धुंडून काढून ती पाण्याच्या घोटाबरोबर आपल्याला दिली जाते. कपाळावरून कुणाची तरी बोटे स्नेहलपणे फिरत असतात किंवा कोलन वॉटरची सुवासिक थंड पट्टी त्यावर ठेवली जाते. आता घरात आपला 'आजार' कायदेशीरपणे जाहीर होतो. गरम श्वास टाकत, बडबडत, कण्हत जाणीव-नेणिवेच्या सीमारेषेवर आपण काही काळ रेंगाळत राहतो आणि मग जाणिवेपलीकडच्या एका अद्भुत गूढ प्रदेशात अलगद जाऊन पोहोचतो, जिथे केवळ ब्रह्मानंद असतो !

आता सान्या जगाचे एकदम दोन भाग केले जातात. एका भागात बाकीचे सगळे लोक आणि दुसऱ्या भागात आपण, एकटे आपण. तिथे आपलेच साम्राज्य असते अन् त्यात आपण अगदी सुरक्षित असतो. आपल्या या सार्वभौम साम्राज्यात वास्तव आणि कल्पनीय यांच्यामधल्या सीमा पार पुसून गेलेल्या असतात. भोवतालचे खरे जग बाहुल्यांच्या खेळासारखे खोटे, आभासमय वाटू लागते आणि कल्पनेचे जग अत्यंत खरेपणाने जाणवत राहते. मग तापाने उत्तेजित झालेल्या कल्पनाशक्तीचे विविध खेळ सुरू होतात. कधी साताजन्मापलीकडचे काही काही आठवू लागते. कधी मनातल्या मनात शब्दांच्या साखळ्या जुळवल्या जाऊन कवितेच्या ओळी तयार होतात. कधी आयुष्यात न पाहिलेली गावे, माणसे दिसू लागतात; तर कधी कुठला तरी वेगळाच निसर्ग, सुंदर सुंदर देखावे, देवळे, रावळे, लेणी, शिल्पे डोळ्यांपुढे साक्षात उभी राहतात. कधी नानाविध रंगांची डोळे दिपविणारी आतषबाजी सुरू होते, तर कधी मधुर स्वरांचे कल्लोळ उसळत राहतात. एकदा तर अशाच एका तापात मला एक भले थोरले सुंदर, पुरातन देऊळ अगदी

संपूर्ण दिसले. त्याच्या दोन दगडांतला सांधा न् सांधा, इतकेच नव्हे, तर देवळापुढच्या फरसबंद आवारातल्या फरश्यांमधील फटीफटींतून उगवलेल्या गवताचे पाते न् पाते देखील कसे लख्ख दिसत होते. आपल्या देशात असे देऊळ कुठे असेल किंवा काय, हे देखील मला माहीत नाही; मात्र तापात दिसलेले ते देऊळ अजूनही चांगले आठवते.

आपल्याला ताप आला आहे, ही बातमी वेगाने सर्वत्र पसरते. आपण अघळपघळ स्वीकारलेले, अविचारीपणाने कबूल केलेले सारे कार्यक्रम ताबडतोब रद्द केले जातात. शेजारीपाजारी प्रेमाने समाचाराला येऊ लागतात. चेहऱ्यावर चिंता दाखवतात. आपुलकीचे चार शब्द ऐकवतात. 'नाही तरी तुमची भारीच फरपट चाललेली असते हो !' 'या किनई, भिडस्त फार, कुणाला नाही म्हणून म्हणवतच नाही त्यांना.' 'पण आता या वयात हे बरं का ?' म्हणून आपल्या कष्टांबद्दल अनुकंपा व्यक्त करतात, तर कुणी 'आता आयता ताप आलाय. चांगली आठवडाभर विश्रांती घ्या. उगीच उठायची गडबड करू नका हो. आपल्या जिवापेक्षा काम का जास्ती लागून गेलंय ?' म्हणून वडीलधारेपणाने सल्ला देतात. एखादी शेजारीण किंवा नात्यातली गृहिणी सकाळ-संध्याकाळ आमटी-भाजी घरी पोहोचवायचे कबूल करते (आणि तशी ती पोहोचवते !) तर दुसरी एखादी शेजारीण तोंडाला चव यावी म्हणून आंब्या-लिंबाचे लोणचे छोट्या मुलीच्या हाती आपल्याकडे आठवणीने धाडून देते. घरातही आपले कमी लाड होतात असे नाही. मऊ भात, सायीचे दही, टोमॅटोचे नाहीतर आमसुलाचे सार अशा अपूर्वाईच्या चिजा जेवणात आपल्याला आवर्जून वाढल्या जातात आणि तोंड तापाने बेचव पडल्यामुळे त्यावर आपण ताव मारू शकत नाही, याचे फार वाईट वाटते. मात्र आपल्यावर होणाऱ्या प्रेमाच्या या सार्वत्रिक वर्षावाने आपण अगदी गहिंवरून जातो. एरव्ही आपले अस्तित्व तरी जगाला कळते की नाही कुणास ठाऊक, अशी शंका येऊन भोवतालच्या माणसांबद्दल जर काही रागरुसवा मनात कधी डोकावून गेला, तर तो या अकृत्रिम स्नेहदर्शनाने पार पुसून जातो आणि एरव्हीच्या आपल्या आत्मकेंद्रित वृत्तीची आपली आपल्यालाच लाज वाटू लागते. अंगात सपाटून ताप रसरसत असतो त्यामुळे मन जास्त हळवे झालेले असते.

एकदा तापात अशीच एक मैत्रीण भेटायला आली. खरे तर तिच्या-माझ्यात काही तरी गैरसमज उद्‌भवला होता व त्यामुळे अलीकडे आमच्यामध्ये जरासा

दुरावाही निर्माण झाला होता; पण मला ताप आला आहे हे कळले मात्र, ती अगदी आवर्जून मला भेटायला आली. तिला बघून मला रडे कोसळले. तिच्या प्रेमळ वर्तनाने मला अगदी भरून आले होते. तिने मात्र माझ्या रडण्याचा वेगळाच अर्थ लावला. माझे कपाळ चेपत ती म्हणाली, 'अग, साधा तर ताप आहे. घाबरतेस काय अशी ?' तिचा गैरसमज मी दूर केला नाही. डोळ्यांत वारंवार जमणारे पाणी पुसत मी बाजूला मान वळवून नुसतीच पडून राहिले. आधी दुरावलेली माणसे तापाने कशी परत आपल्याला मिळतात, याचे नवल करू लागले.

आंघोळ नाही, खाणे नाही, पिणे नाही, या दुःखद अवस्थेतच काम नाही, बाहेर जाणे-येणे नाही, कसली निकड किंवा जबाबदारी नाही या सुखद अवस्थेच्या छटाही अलगद मिसळलेल्या असतात. डोके भयंकर दुखत असल्यामुळे पुस्तक वाचवत नाही आणि आवाज सहन होत नसल्याने रेडिओवर अगर ट्रांझिस्टरवर गाणीही ऐकवत नाहीत. निद्रा आणि जागृती यांच्या सीमेवर आपण घुटमळत असतो. डोळ्यांवर झापड येते. मग, एवीतेवी ताप आलाच आहे तर तो पुरता 'एंजॉय' का करू नये, अशी एक धूर्त मतलबी भावना मनात जागी होते आणि आपण थोडे नाटक करतो. थकवा आहे त्याहून जास्त आल्यासारखे दाखवतो. अंग दुखते त्याहून अधिक दुखल्यासारखे करून जरा जास्तच कण्हू लागतो. 'अग आई ग', 'अरे देवा रे' वगैरे 'डायलॉग' जोरदारपणाने फेकत राहतो. चिडचीड, आरडाओरडा यांचे प्रमाण वाजवीहून अधिक वाढवतो. या नाटकाला बाहेरची माणसे फसतातही; पण घरातली माणसे आपल्याला पुरती ओळखून असतात. ती या नाटकाने मुळी देखील फसत नाहीत. आपली कणखर, फटकळ धाकटी बहीण येऊन दरडावते, 'एवढासा तर ताप, पण काय सोंगं चालवली आहेस ? गप्प पडून राहा. काय कुणी कधी आजारी पडत नाही ? त्याचा येवढा गाजावाजा कशाला ?' मग आपण उदास हसतो. तिच्या उमटपणाची तिला क्षमा करतो.

घरात आपली बडदास्त मात्र उत्तम राखली जात असते. वेळच्या वेळी चहा दूध मिळते. औषधाच्या वेळा बिनचूक पाळल्या जातात. अपथ्यकारक खाण्याचे लाड मात्र घरात कुणी पुरवत नाही. थालीपीठ, भजी असले पदार्थ केले देखील जात नाहीत. मग ते आपल्याला मिळणे दूरच राहिले ! घटके घटकेने ताप पाहिला जातो. कपाळावर हात ठेवून धीर दिला जातो आणि कडू, घाण वासाची औषधे घड्याळापेक्षाही काटेकोर नियमित दक्षपणाने आपल्या घशाखाली उतरवली

जातात. आपले कण्हणे, रडणे, चिडणे कशाकडेही लक्ष न पुरवता, दाद न घेता !

चार-सहा दिवस अशी धमाल उडवतो आणि मग एके दिवशी सकाळी उठून बघावे, तर हा अनाहूत आलेला पाहुणा पुन्हा तितकाच अचानक निघून गेलेला असतो. अगदी उपद्रवी पाहुणा देखील घरातून गेल्यानंतर मनाला थोडी हुरहूर लागते ना, तसेच हा पाहुणा गेल्यावर देखील मन जरा खिन्न होते. चार दिवसांच्या आजाराने अंगात एक सुखद, गोड आळस भरलेला असतो. ती सुखासीन अवस्था सोडायचे जीवावर येते, पण आता गत्यंतरच नसते. आपला आजार संपला आहे हे सत्य अकस्मात समोर उभे ठाकते. रोजचे व्यवहार अंगावर चाल करून येतात. अनेक बारीकसारीक त्रासदायक कामे 'आधी माझ्याकडे लक्ष दे' म्हणत अहमहमिकेने आपल्याभोवती गर्दी करतात आणि अत्यंत अनिच्छेने, पण अपरिहार्यपणे आपण अंथरूण सोडतो.

पण चार दिवसांच्या आजारात आपल्यामध्ये आश्चर्यकारक बदल झालेले असतात. चैनीने उपभोगावा असा सुखद हल्लकपणा अंगभर पसरलेला असतो. चालताना तरंगल्यासारखे वाटते. शरीर पारोसे असते, पण नानाविध भावनाकल्लोळातून गेलेले मन आंघोळून निघाल्यासारखे लख्ख झालेले असते. डोळे ताजे, तरुण होतात. जिभेची रुची हलके हलके परत येऊ लागते. वृत्तींना तरतरी येऊन त्या तल्लख होतात. हसण्यात धार भरते, शरीर कात टाकते आणि आपण पुन्हा नव्याने जन्मतो. नव्या नजरेने आसमंत न्याहाळू लागतो. साऱ्यांबद्दल मनात आपुलकी भरते. सर्व जुन्या परिचित गोष्टींना आपण नव्या प्रेमाने कुरवाळू लागतो. स्पर्शाचा नवा आनंद घेऊ लागतो.

दरम्यान तुमच्या आजाराची वार्ता उशिरा कळलेला एखादा मित्र अगत्याने येऊन विचारपूस करतो,

'आजारी होता म्हणे. मला जरा उशिरा कळलं. काय विशेष ?'

'नाही... तसं विशेष नाही... जरासा ताप... आपला फ्लू हो !'

□

# कलकत्त्याचे कावळे

कलकत्त्याच्या 'पार्क' हॉटेलमधल्या एका सुंदर, सुसज्ज आणि प्रशस्त खोलीच्या खिडकीशी मी उभी होते. तिथला 'चौरंगी' हा विभाग अतिशय संपन्न, ऐटदार, दुकानांनी गजबजलेला, वाहनांनी आणि माणसांनी भरभरून अष्टौप्रहर वाहात असलेला असा आहे. इथला 'भद्र' समाज बहुधा या विभागात संध्याकाळी फिरायला, खरेदीला आलेला दिसतो. याच चौरंगीमध्ये तेव्हा 'पार्क' हॉटेल नुकतेच सुरू झाले होते. पंचतारांकित असलेले हे हॉटेल भलतेच श्रीमंती थाटाचे, झोकदार आणि महाग़डे होते, हे सांगायला नकोच. माझ्यासारखीला इथे सहज चहा घेणे देखील न परवडणारे, मग तिथे राहाण्याची तर गोष्टच सोडा. पण माझ्या काही श्रीमंत मैत्रिणींबरोबर, त्यांची पाहुणी म्हणून मी या हॉटेलमध्ये आले होते. म्हणजे माझ्यासारखीचे त्या हॉटेलात त्या वेळी तसे असणे हा निव्वळ योगायोगच होता. पण आपल्या आयुष्यातल्या अनेक बऱ्या आणि वाईटसुद्धा गोष्टी तशा योगायोगानेच घडत नाहीत का ?

तर सांगायचे कारण असे की, मी 'पार्क' हॉटेलच्या एका खिडकीशी उभी होते. वेळ सकाळची होती. इतकी सकाळची की, अजून रात्रपाळीची नोकरचाकर मंडळी वगळली तर, सारे हॉटेल झोपेत बुडालेले होते. रस्ते सुनसान, निर्मनुष्य होते. गावातले, घराघरांतले दैनंदिन व्यवहार अद्याप सुरू झाले नव्हते. हॉटेलच्या समोरच्या बाजूचा चौरंगीमधला प्रशस्त, झगमगता, ऐश्वर्यसंपन्न राजमार्गही अगदी तुरळक माणसांनी इथेतिथे हलत होता. त्याला अद्याप उधाण आले नव्हते. मला मात्र, परगावी गेल्यावर पुष्कळदा येते तशी, फार लवकर जाग आली होती आणि नुसती चूळ भरून, तोंडावरून, डोळ्यांवरून पाण्याचा हात फिरवून मी खिडकीशी उभी होते.

हॉटेलमध्ये आम्ही जिथे उतरलो होतो, ती खोली हॉटेलच्या एका बाजूला अशी होती. चौरंगीचा वाहता रस्ता हा खोलीच्या समोर होता. या दुसऱ्या बाजूला नव्हता. तो खिडकीलगतच्या या छोट्या रस्त्याशी काटकोनात मिळाला होता. मी उभी होते, त्या खिडकीतून बाहेर पाहिले की, या लहानशा रस्त्यापलीकडे दूरवर पसरलेल्या अनेक इमारती दिसत. घरामागून लागलेली घरे, त्यांच्या बंद दारेखिडक्या आणि बहुतेक घरांच्या माडीला लागून असलेल्या ऐसपैस गच्च्या कितीतरी लांबपर्यंत नजरेच्या टप्प्यात येत होत्या. हॉटेलच्या अगदी समोर, केवळ एका छोट्या बोळवजा रस्त्याने विभागलेली दुसरी इमारत होती. इमारत खूप मोठी होती. तिची तेवढीच मोठी, चुन्याने बांधलेली, जुनाट वळणाची गच्ची होती. गच्चीला रस्त्याच्या बाजूला एक कठडा होता. तोही असाच चुन्याचा, जाळीजाळीचे जुने, पण देखणे नक्षीकाम केलेला होता. गच्चीच्या पलीकडल्या बाजूला शयनगृह असावे. कारण तिकडल्या बाजूच्या दारां-खिडक्यांवर फुलाफुलांचे सुरेख पडदे झुलत होते. सकाळच्या झुळझुळत्या; प्रसन्न, थंडगार वाऱ्यात हेलकावत होते. मी तिथे राहाणाऱ्या कुटुंबाचा विचार करत होते. काय असेल या मंडळींचे आडनाव ? चतर्जी, मुखर्जी, बानर्जी, हालदार ? मला आठवतील तेवढी बंगाली आडनावे मी त्या कुटुंबाला चिकटवत होते. एक निरर्थक चाळा म्हणून. त्या घरात कोण असेल, ते काय करीत असेल, याबद्दलचे एक फिकट आळशी कुतूहल मनात जागत होते.

तरीही मी ते सारे विमनस्कपणेच बघत होते. माझ्या मागे भली थोरली खोली होती. सुखदायक ऊब होती. आरामशीर विलासी वातावरण होते. ठिकठिकाणी काचेच्या पुष्पपात्रांतून ठेवलेली सुवासिक फुले होती. चिमुकले, देखणे पुतळे. कलावस्तू होत्या. भिंतींवर निवडक चित्रे होती आणि हे काहीच मला अवघड वाटू नये, अशा आपुलकीने मला इथे आणणाऱ्या प्रेमळ मैत्रिणीही होत्या. ती सर्व मंडळी अजून झोपेत होती. मी मात्र उदास होऊन खिडकीशी उभी होते. परक्या अनोळखी गावात वाटू लागते, ते एकाकीपण अचानक काळजात दाटून आले होते. ते कलकत्ता नावाचे प्रचंड शहर, तिथल्या इमारती, तिथले रस्ते, तिथली माणसे— कशाशीच माझ्या मनाचे नाते जुळत नव्हते.

दूरच्या महाराष्ट्रातली एक कुणी मी, बंगालमध्ये अगदी योगायोगाने आले होते. तशी गेले चार-पाच दिवस मी कलकत्त्यात खूप हिंडले होते. कालीचे मंदिर पाहिले होते. बेलूर मठाला भेट दिली होती. तिथल्या अत्यंत निर्मळ आणि प्रसन्न परिसरात

मनसोक्त हिंडले होते. एका बंगाली कुटुंबात जेवण्याचा योग आला होता. तिथले 'मिष्टी' नावाचे गोड रुचकर दही प्रथमच चाखले होते आणि संदेश, रसगुल्ला, चमचम, रसमलाई या प्रसिद्ध बंगाली मिठाईचा आस्वाद घेतला होता. कलकत्त्याच्या 'ढाकेश्वरी' या सुप्रसिद्ध दुकानातून बंगाली साड्यांची खरेदीही केली होती. माझ्या मैत्रिणींनी हौसेने जेवढे कलकत्ता दाखविता येईल, तेवढे मला अगदी आवर्जून दाखवले होते. तरी चार दिवसांत कोणताही प्रांत तसा काय कळणार ? हा सुंदर वंगदेश— पुष्करिणींनी आणि कमळाच्या तळ्यांनी भरलेला. कलांचे आणि संस्कृतीचे नाना उन्मेष प्रकट करणारा, रवींद्रनाथांच्या काव्य-कादंबऱ्यांमधून जवळ आलेला, बंकिमचंद्र आणि शरदबाबू यांच्या साहित्यांतून परिचित झालेला— मला किती अनोळखी, दूरस्थ, परका वाटत होता. सकाळच्या गूढ, अबोल शांततेत गुरफटलेले कलकत्ता नावाचे हे इतिहासप्रसिद्ध शहर एखाद्या माणसाने मुद्दाम पाठमोरे होऊन बसावे, तसे या क्षणी बसले होते आणि त्या अवाढव्य विस्ताराकडे मी बावरलेल्या स्तिमित नजरेने बघत होते. नुसतीच बघत होते.

दरम्यान, केव्हा कोण जाणे, समोरच्या इमारतीतल्या त्या बंद शयनगृहाचा दरवाजा उघडला गेला होता आणि त्यातून एक तरुण, पोरसवदाच म्हणता येईल, अशी स्त्री बाहेर आली होती. या क्षणी मला जरा तिरपीच दिसेल अशी गच्चीत उभी राहिली होती. बंगाली स्त्रियांच्या प्रथेला अनुसरून भल्या पहाटेच तिने डोक्यावरून पाणी घेऊन आपले स्नान उरकले असावे. आता ती वाऱ्याला पाठ देऊन आपले केस सुकवत होती. तिचा चेहरा मला ओझरता दिसला. तरुण, आतुर, जिवंतपणाने सळसळणारा चेहरा. खास बंगाली वळणाचे मोठेमोठे डोळे. हसरी जिवणी. चेहऱ्याभोवती महिरप करून पाठीवरून खाली नितंबापर्यंत उतरलेला, पावसाळी ढगांसारखा ओथंबलेला प्रचंड केशसंभार, रंग सावळा, अंग किंचित स्थूलतेकडे झुकलेले आणि त्यावर नेसलेली लाल काळ्या काठांची पांढरी सुती साडी. मी तिला पाहिले आणि बंकिमचंद्राच्या, शरदबाबूंच्या कादंबऱ्यांच्या पानांतूनच ती स्त्री सरळ बाहेर आली आहे, कठड्याशी उभी राहून केस सुकवत आहे, असा मला भास झाला. आतापर्यंत दूरस्थ, अनोळखी वाटणारे कलकत्ता शहर जरा जरा ओळखीचे वाटू लागले. त्याच्या रहस्यमय मुद्रेवर एक स्मितरेषा उमटली. आश्वासक तशीच आमंत्रक. मी डोळे भरून त्या स्त्रीकडे बघत होते. तिच्या नावाबद्दल तर्क करीत होते. कोण असेल ही ? बंकिमचंद्रांची 'देवी चौधुराणी'? शरदबाबूंची पार्वती ?

अन्नदाअक्का ? राजलक्ष्मी ? किरणमयी ? कमल ? विराज बहू ? काय असेल बरे या बंगाली स्त्रीचे नाव ?

माझ्या मनात त्या स्त्रीच्या नावाबद्दल असे नाना प्रकारचे तर्क चालू होते. इतक्यात एक मजेदार घटना घडली. पलीकडच्या एका जुनाट आणि भल्या थोरल्या वडाच्या झाडामधून दोन कावळे बाहेर पडले आणि ते सरळ त्या गच्चीच्या कठड्यावर येऊन बसले. सकाळचा ताजा वारा उल्हासाने अंगावर घेत घेत ते 'काव काव' करू लागले. ती बंगाली स्त्री अन् ते कावळे एकमेकांच्या ओळखीचे होते की काय कुणास ठाऊक. कदाचित ते नेहमी त्या गच्चीवर येत असतील. पण ते घरच्या मालकिणीला भ्यायले नाहीत एवढे खरे आणि तिनेही त्यांना हुसकून लावले नाही. कावळे कठड्यावर बसून मजेत 'काव काव' करत होते आणि ती स्त्रीही जवळ अगदी विश्रब्धपणे केस सुकवत उभी होती.

कावळ्याला बंगालीत काय बरे म्हणतात ? हो, काक; काकच. मला कधीतरी चुकून ऐकलेल्या एका बंगाली गाण्यातल्या दोन ओळी आठवल्या.

काक कालो कोयल कालो । कालो भिंगेर बेश
ताहार ऊपर कालो गोरी । तोमार माथाय केश

मला काही बंगाली येत नाही. तेव्हा या कवितापंक्तीत काही चुकाही असण्याची शक्यता आहे. पण त्या ओळींचा अर्थ मात्र फार सुंदर आहे. कवी आपल्या प्रेयसीला म्हणतो, 'कावळा काळा. कोकिळ काळा आणि भ्रमराचा-भुंग्याचा-वेषही (वर्ण) काळा, पण हे सुंदर मुली, तुझ्या माथ्यावरचा केशसंभार मात्र त्याहूनही कितीतरी काळाभोर आहे !'

कवितेतले कावळे अस्सल बंगाली होते. कठड्यावर येऊन बसलेले कावळेही 'बंगाली'च होते. मला मात्र ते कावळे बघताक्षणी विलक्षण घरगुतीपणा वाटायला लागला होता. आतापर्यंत दूर असलेले कलकत्ता शहर त्या बंगाली स्त्रीच्या दर्शनाने जरा जवळ आले होते आणि सकाळच्या त्या निःस्तब्ध चित्रात कावळ्यांनी जेव्हा काव काव करीत प्रवेश केला तेव्हा तर कलकत्त्याची ओळख अगदी परिपूर्ण होऊन गेली. ते कावळे थेट महाराष्ट्रातून इथे आले आहेत, नव्हे, त्यांची काव काव देखील बंगाली भाषेतली नसून, शुद्ध मराठी भाषेतली आहे, अशी माझी खात्री पटली. ज्ञानदेवांच्या प्रसिद्ध विराणीतल्या 'काऊ'शी या कावळ्यांचे नाते असले पाहिजे, असे मला उगाच वाटून गेले. बंगाली कावळे काव काव कसे करतील ? बंगालीत

'काव काव'ला काही वेगळा प्रतिशब्द असेल, नाही का ? पण हे कावळे तर आपल्या महाराष्ट्रातल्या कावळ्यांसारखेच काव काव करताहेत ! एकीकडे माझ्या या तर्कटाचे मला हसू येत होते, पण दुसरीकडे माझे विचार मला अगदी अचूक वाटत होते. त्या कावळ्यांना बघताक्षणी बंगाल आणि महाराष्ट्र यांचा सांधा माझ्या मनात नकळत जुळला होता. कावळ्यांच्या कावकावीने माझ्या आवडत्या महाराष्ट्राची एक झुळूक या परक्या वंगदेशात किती सहजपणे आणली होती ! मला एकदम पुणे जिल्ह्यातले माझे आजोळ आठवले. तिथली कातर संध्याकाळ आठवली. मनाला अबोध हुरहूर लावणारी ती झिलमिल वेळ. अंगणातील तुळशी वृंदावनात मावशीने नुकतीच लावून ठेवलेली मंद पिवळसर तेवणारी पणती. अंगणापलीकडे उभे असलेले वडाचे झाड आणि संध्याकाळी त्यावर गोळा होऊन काव काव करणारे असंख्य कावळे— सारे चित्र डोळ्यांसमोर उभे राहिले आणि मग या प्रसन्न सकाळी समोरचे ते वडाचे झाड, ते वरचे आभाळ, ती गच्ची, तो परिसर मला आपला, अगदी आपला वाटू लागला. मनावरचे उदासीनतेचे पटल क्षणार्धात दूर झाले. एका विचित्र आनंदाने हृदय दाटून, गहिंवरून आले आणि मनातल्या मनात त्या कावळ्यांचे मी भरभरून आभार मानले.

□

# शब्दांच्या आगेमागे. . .

मी तेव्हा इंग्रजी तिसरी चौथीत असेन. माझी एक जिवलग मैत्रीण माझ्याच वर्गात होती. आमचे दोघींचे मिळून एक स्वतंत्र विश्व होते आणि त्यात आम्ही सतत वावरत असू. अनेक गुपितांची, रहस्यांची एकमेकींत देवाणघेवाण करत असू. चिंचेच्या बोटकापासून ते एखाद्या अल्लड निरागस स्वप्नापर्यंत एकही आवडती गोष्ट एकमेकींपासून चोरून ठेवत नसू. तासन् तास आमची हितगुजे चालत. असे वाटे की, हृदयाचा एकही भाग, जीवनाचा एकही कोपरा आता परस्परांपासून अज्ञात राहिला नसेल.

ते वय विभूतिपूजनाचे होते. कोणावरून तरी जीव ओवाळून टाकावा, कुणाची तरी मूर्ती हृदयात सतत पुजावी आणि अगदी बारीकसारीक बाबतींतही तिचे अनुकरण करून आयुष्याचे सार्थक करून घ्यावे, असे तेव्हा वाटत असे. आम्हा लहान मुलींच्या दृष्टीने त्या वेळच्या मॅट्रिकच्या वर्गातल्या मुली सर्वतोपरी आदर्श असत. केवळ वयानेच नव्हे तर बुद्धीने, कर्तृत्वाने, ज्ञानानेही त्या आम्हाला मोठ्या वाटत. त्यांच्याएवढे आणि त्यांच्यासारखे व्हावे, हे त्या वयातले आमचे प्रिय स्वप्न असे. त्या मुलींचा आणि आमचा परिचय होण्याचे भाग्य मात्र आम्हाला क्वचित लाभे. एखाद्या स्वर्गीय देवतेकडे बघावे तशा आम्ही त्यांच्याकडे अलिप्त आदराने डोळे भरून बघत असू. दुरून त्यांची निःशब्द पूजा करत असू.

अशाच एकदा आम्ही मॅट्रिकच्या वर्गातल्या एका मुलीच्या प्रेमात पडलो. सारा वेळ तिचाच विषय. तिचे रूप, तिची वेषभूषा, तिची बुद्धिमत्ता, तिचे तेजस्वी डोळे, तिचे प्रसन्न हसू, गोड स्वर. . सारे आम्हाला निरतिशय सुंदर वाटे. त्या मुलीने काही दिवस आमचे अवघे आयुष्य भरून टाकले. त्याला अर्थ आणला. आणि तरीही तिची आणि आमची प्रत्यक्ष ओळख नव्हती. तिचे नावही आम्हाला ठाऊक नव्हते.

एखाद्या दूरस्थ तारकेसारखी शांत, सुनीळ तेजाने ती आमच्या शैशवाच्या क्षितिजावर तळपत होती.

आणि मग एके दिवशी एक विलक्षण घटना घडली. त्या दिवशी शाळेत काही समारंभ होता. शाळेच्या प्रमुख हॉलमध्ये आम्ही साऱ्याजणी एकत्र जमलो होतो. योगायोग असा की, मॅट्रिकच्या मुली आमच्यासमोर, जवळ बसल्या होत्या. त्यांच्या निकट सान्निध्यात येण्याची ती आमची पहिलीच वेळ होती. त्या स्वर्गीय देवतांकडे आम्ही डोळ्यांत प्राण आणून बघत राहिलो. तेवढ्यात माझ्या मैत्रिणीने बोटाने खुणावून आमची देवी मला दाखवली. आणि मी विलक्षण चमकले. कारण माझी देवता 'ती' नव्हती. ती दुसरीच कुणी होती. काय झाले होते ते माझ्या लक्षात आले. आम्ही दोघी मैत्रिणी दोन वेगवेगळ्या मुलींवर प्रेम करत होतो. आमची दैवते भिन्न होती. प्रीतीची, आदराची, पूजेची अधिष्ठाने वेगळी होती. आमचे जे बोलणे आजवर चाले, तेही अर्थात वेगवेगळ्या मुलींच्या संदर्भात होत होते आणि आम्ही मात्र ते सारे एकाच व्यक्तीविषयी आहे, असे धरून चाललो होतो. आज त्या विचित्र गैरसमजाचा अचानक उलगडा होत होता. माझे दैवत वेगळे होते. माझ्या मैत्रिणीचे दैवत वेगळे होते.

ती जाणीव झाली आणि मला मोठाच धक्का बसला. माझी मैत्रीण मला एकदम परकी, अनोळखी वाटू लागली. तिचे आणि माझे मन, तिच्या आणि माझ्या आवडीनिवडी एक असल्याची जी जाणीव आजवर मी निश्चितपणे उराशी बाळगून होते, ती एकदम मला सोडून गेली. मला पायांखालचा आधार सुटल्यासारखे वाटले. हातातला हातच निसटून जावा, तसे काहीतरी झाले. माणसामाणसांतल्या अफाट आणि भयानक दूरतेचा मला प्रथमच, पण अगदी तीव्र अशा उत्कटतेने साक्षात्कार झाला. आयुष्यात प्रथम मी एकटी— अगदी पार एकटी झाले.

त्यानंतर हे एकाकीपण आयुष्यात मी अनेक वेळा अनुभवले आहे. माणसे एकत्र येतात, एकत्र काम करतात, एकमेकांवर प्रेम करतात. एखादे स्वप्न किंवा ध्येय एकत्रितपणे समोर बाळगून त्याची साधना करतात. एकमेकांचा द्वेषसुद्धा करतात. पण हे सारे करत असताना पुन्हा ती तशी एकमेकांपासून दूरच असतात. प्रत्येकजण आपापल्या कोषात एकटाच वावरत असतो. निर्वात वातावरणात राहावे तसा आपला, आपल्यापुरताच राहतो. आपण उभयता एकजीव आहोत असे त्याला वाटत असते, पण तो त्याचा भ्रम असतो. एखाद्या क्षणी त्याला अचानक असे

आढळून येते की, जे आपण दोघांनी समोर ठेवले, पूजले, जपले, एकच आहे असे मानले, ते तसे एक नव्हते. ते काही वेगवेगळेच होते. अर्थात त्याला वाहिलेल्या आपल्या भावनाही एक नव्हत्या. त्या देखील वेगवेगळ्या होत्या. हे दाहक सत्य एकदा उमगले की, मनाला जो धक्का बसतो तो विलक्षणच. मग साऱ्या गोष्टींचे संदर्भच मुळी बदलतात. माणसामाणसांतली नाती अर्थशून्य होतात आणि स्वतःच्या भयाण एकटेपणाचा मनाला थरकाप भरवणारा प्रत्यय येतो. तो प्रत्यय मला असा शाळकरी वयात आणि माझ्या अगदी जिवलग मैत्रिणीच्या बाबतीत आला !

मला आठवते, त्यानंतर ती माझी मैत्रीण आणि मी हलकेहलके एकमेकींना दुरावतच गेलो. तिच्याकडे बघताना प्रत्येक वेळी माझ्या मनात येई, अरे, हिची आवडनिवड वेगळीच आहे. हिची आदराची, पूजेची स्थाने निराळी आहेत. हिला जे सुंदर वाटते, आदर्श वाटते ते माझ्या सौंदर्याच्या आणि आदर्शांच्या कल्पनांहून अगदी भिन्न आहे. आणि तो विचार मनात आला की, मला अगदी गुदमरल्यासारखे होई. माझा जीव कासावीस होऊन जाई. एखाद्या अनोळखी वस्तूकडे, अपरिचित व्यक्तीकडे बघावे तशा शंकित, भयभीत नजरेने मी तिच्याकडे बघत राही. माझ्या डोळ्यांतला दूरत्वाचा चटका तिलाही कुठेतरी बसत असेल, मग तीही हळूहळू मजकडे त्याच अनोळखी नजरेने बघू लागली. आम्ही एकमेकींपासून दूरदूरच गेलो. बाळपणातला एक निरागस, मधुर स्नेह, पाण्यावरचा बुडबुडा फुटावा तसा फुटून गेला !

हे असे का होत असेल बरे ? होते यात शंकाच नाही. माझ्यासारख्या शाळकरी, अबोध वयातल्या एका सामान्य मुलीला हा अनुभव आला. मग अत्यंत संवेदनाक्षम, जीव तोडून प्रेमबंध जुळवणाऱ्या थोर प्रतिभावंतांच्या बाबतीत ही व्यथा केवढी जीवघेणी असेल ! अनेक कवींनी हा भाव वेगवेगळ्या प्रकारे आपल्या लेखनातून व्यक्त केला आहे. माधव ज्यूलियन आपल्या एका कवितेत म्हणतात—

मित्राचा पुरवेल मृत्यु न परी केव्हाहि तो मैत्रीचा

आपले आणि मित्राचे जिव्हाळ्याचे नाते तुटून भावनिक पातळीवर तो आपल्याला दुरावण्यापेक्षा त्याचा शारीरिक मृत्यूही सहन होईल, असे हा कवी म्हणतो. सकृत्‌दर्शनी कुणाला हे विधान क्रूरपणाचे वाटेल, पण त्यामागची कवीची मनोऽवस्था किती पिळवटलेली, व्यथित झालेली असेल, याची कल्पना केली तर

त्या विधानातले कारुण्य आपल्याला खोलवर स्पर्शून जाते. ही झाली दोन मित्रांच्या नात्यातली गोष्ट. पण एकमेकांवर अनुरक्त असलेले स्त्री-पुरुष जेव्हा मनाने एकमेकांपासून दूर जातात, त्या वेळी त्या उभयतांमध्ये जी व्यक्ती अधिक संवेदनाक्षम असेल, तिला होणाऱ्या वेदना अधिक तीव्र असतात. अशाच एका क्षणी मर्ढेकरांसारखा थोर कवी म्हणतो—

अनोळख्याने गतजन्मीची
ओळख कैशी द्यावी सांग
येथल्याच जर कोमल ओल्या
आठवणींची बुजली रांग !

या जगात एकमेकांच्या सहवासात अनुभवलेल्या कोमल, ओल्या आठवणी जर इथल्याइथेच बुजून गेल्या, तर गतजन्मीच्या नात्याचा हवाला कुणी कुणाला आणि कसा द्यायचा ? सुविख्यात कवी टी.एस. इलियट यांनी एके ठिकाणी म्हटले आहे—

I Have been wondering of late why we haven't developed into friends.

इलियटचे हे उद्गार आपणा सर्वांना अगदी आपल्या मनातले वाटतात. ही व्यथा त्याची एकट्याची नाही. ती आपणा सर्वांचीच आहे. माणसे सहवासानंतर जवळ यावीत, पण ती हळूहळू एकमेकांना दुरावतात. समानतेऐवजी वेगळेपणाच्याच खुणा त्यांना अधिक पटू लागतात. आवडीनिवडी, ध्येये, स्वप्ने, विचारविनिमय. . . .सारे मुळी वेगळे असल्याचा प्रत्यय येतो. या वेगळेपणात, स्वभावभिन्नत्वाच्या पसाऱ्यात समानधर्मित्व असतेच कुठे ? त्याचा फक्त आभास असतो आणि आभासाच्या या धुक्यातच आपण एकमेकांना शोधत, चाचपडत, आंधळेपणाने फिरत असतो. मानवी संबंधातले सत्य म्हणून जर काही असेल, तर ते एवढेच आहे आणि ते फार विदारक आहे.

मला वाटते, याच एक कारण असे की, सारा मानवी संसार शब्दांच्या देवघेवीवर चालला आहे. शब्द हे माणसांना जवळ आणणारे एकमेव साधन आहे. त्यांच्याद्वारा आपण आपले मनोगत एकमेकांना निवेदन करतो. पण शब्द म्हणजे तरी अखेर काय ? केवळ खुणा, प्रतिके- आणि शब्द एकच असला तरी प्रत्येकाच्या बाबतीत त्या शब्दाने सुचवला जाणारा अर्थ वेगळा असतो. कारण त्या शब्दामागची

प्रत्येकाची अनुभवपरंपरा वेगळी असते. त्या शब्दाने सुचवले जाणारे भावना-संवेदनांचे विश्व,संकेत हे प्रत्येकाच्या बाबतीत खास त्याचे स्वतःचे असते. म्हणजेच, प्रत्येकाचा 'शब्द' हा शेवटी वेगळा असतो. उदाहरणार्थ, सदैव वापरला जाणारा आणि एका इंग्रजी कवीच्या भाषेत अत्यंत बदनाम झालेला 'प्रेम' हा शब्द घ्या. प्रत्येकाच्या मनात या शब्दाचा झंकारणारा अर्थ वेगळा असतो. दुष्यन्त प्रेम विसरून जातो. शकुन्तला त्या अनुभवाच्या आगीत सर्वस्वाने होरपळून निघते. ऑफेलियाला प्रेम गुलाबपाण्यासारखे शीतल, सुंदर वाटते, तर हॅम्लेटला 'प्रेम' हा शब्द ॲसिडसारखा भाजून काढतो. प्रेम तेच, अनुभव तोच, पण त्या शब्दामागे उभे असलेले अर्थाचे अफाट विश्व दोघांच्या बाबतीत इतके वेगळे असते की, शब्दही वेगळे बनतात, मग माणसामाणसांतल्या शब्दांच्या देवघेवीला तरी कुठे अर्थ राहतो ? एकाची भाषा दुसऱ्याला कळेनाशी होते. मूक चित्रपटात हलत राहावेत, तसे केवळ ओठच हलताहेतसे वाटते.

आणि तरी माणसे एकमेकांशी जीव तोडून बोलत असतात. तेच तेच शब्द वापरतात. राग, द्वेष, प्रेम, आपुलकी, मत्सर, क्रोध, शब्दांच्या साहाय्याने परस्परांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. या धडपडीत हाती काय येते ? बोलण्याचे श्रम, काळजाचे पिळवटणे, मनाची अपरंपार वेदना आणि तरी जे शब्दांतून व्यक्त करायचे होते, ते शेवटी अव्यक्तच राहिल्याची मन खिन्न करणारी जाणीव. आपण सर्वजण हीच यातना कमीअधिक प्रमाणात अनुभवत असतो. मर्ढेकर म्हणतात त्याप्रमाणे माणसे भणंग भटकत असतात. जुळेल तेथे खूण जुळवण्याचा प्रयत्न करतात. आणि तरीहि शेवटी ती तशीच अतृप्त, तहानेली राहतात. कारण या खुणा जुळवणेच फार अवघड असते.

पण कधीतरी ही खूण जुळते. हा चमत्कार घडतो. शब्दांच्या काळोखात चाचपडणारी माणसे एखाद्या अद्‌भुत क्षणी एकदम एकमेकांच्या जवळ येतात. काहीतरी फार मोलाचे, फार सुंदर असे त्यांना सापडते. मनामनांची जुळणी होते. पण अशा वेळी मग माणसे ही मुळी माणसे राहातच नाहीत. ती कुणीतरी वेगळीच होतात. ही वेगळी अनुभूती गवसणे, हे मनामनांचे सामरस्य होणे याहून माणसाच्या जीवनात अधिक कृतार्थतेचा क्षण दुसरा कुठला असेल ?

□

# शकुन्तला सासरी जाते. . . .

मुलीचे लग्न व्हावे, ती सासरी जायला निघावी आणि तिला निरोप देताना पित्याचे हृदय विदीर्ण व्हावे, ही घटना घरोघरी घडणारी. पण ती सासरी जाणारी मुलगी जर शकुन्तलेसारखी मुग्ध मुनिकन्या असेल, तिचे माहेर लता-वेलींनी, मोरांनी, हरिणशावकांनी गजबजलेले तपोवन असेल आणि तिचा पिता जर कण्वासारखा अत्यंत प्रेमळ असा मुनिश्रेष्ठ असेल, तर या प्रसंगातले कारुण्य शतपटीने अधिक तीव्र होते.

शाकुन्तलाचा चौथा अंक आपल्या मनावर इतका परिणाम करतो, याचे कारण या अंकातली, पात्रे, तिथली परिस्थिती, तिथला निसर्ग हे सारे काही असामान्य आहे. मुलीला सासरी धाडताना बापाला होणारे दुःख हे सर्वसामान्य; पण इथे त्या दुःखाला असामान्यत्व प्राप्त झाले आहे. त्यात अद्‌भुताच्याही छटा मिसळल्या आहेत आणि हे सारे रंगवले आहे कालिदासासारख्या अत्यंत सहृदय, रसिक आणि उत्तुंग प्रतिभाशाली कवीने. मग या प्रसंगाची रोचकता विलक्षण वाढावी, यात नवल ते काय ! शकुन्तला पतिगृही जायला निघते आणि तिचा पिता तिला निरोप देतो, हा या चौथ्या अंकातला कथाभाग. शकुन्तलेचे सुखी, निश्चिंत, निरामय बालपण इथे संपते आणि इथून पुढे तिच्या जीवनातला दुःखाचा भाग सुरू होणार असतो. या भावी दुःखाच्या अनाकलनीय छाया चौथ्या अंकात सर्वत्र पसरल्या आहेत आणि त्यामागे विरहाचा करुण, उदासवाणा सूर सारखा लागलेला आहे. शकुन्तलेशी लग्न करून दुष्यन्त राजधानीत परत गेला आहे खरा; पण त्याच्याकडून पत्र नाही, निरोप नाही म्हणून शकुन्तलेच्या मैत्रिणी अनसूया आणि प्रियंवदा या दोघी चिंतातुर झाल्या आहेत, हे दृश्य अंकाच्या प्रारंभीच बघायला मिळते आणि त्यामुळे आपल्याही मनाला एक अबोध हुरहूर लागते. त्यानंतर दुष्यंताच्या विचारात भान

हरवून बसलेली शकुन्तला दिसते. तिला दुर्वासाचे आगमन कळत नाही आणि तो चिडून तिला शाप देतो. शापाची वीज मस्तकावर कडाडून पडली तरी बिचाऱ्या शकुन्तलेला त्याचा पत्ताही नसतो. 'ज्याच्या चिंतनात मग्न होऊन तू मजकडे दुर्लक्ष केलेस, त्याला तुझी ओळख पटणार नाही,' असा हा शाप असतो. शकुन्तलेला तो ऐकू येत नाही, पण अनसूया आणि प्रियंवदा दुर्वासाचे शापवचन ऐकतात. प्रियंवदा दुर्वासाची मनधरणी करते आणि मग तो आपला शाप सौम्य करतो. शकुन्तलेने खुणेची एखादी वस्तू दाखवली, तर तिचा पती तिला ओळखील, असे दुर्वास सांगतो आणि प्रियंवदेला जरा हायसे वाटते. तथापि या शापामुळे शकुन्तलेचे भवितव्य अनिश्चित व्हायचे ते होतेच. भावी अशुभाची छाया इथेच पडते.

शकुन्तला ज्या दिवशी सासरी जाणार असते, त्या दिवशी पहाटे प्रभातकालाचे वर्णन करणाऱ्या ऋषिकुमाराचे शब्ददेखील शकुन्तलेच्या भावी दुर्दैवाचे सूचक आहेत. एकीकडे चंद्र मावळत आहे आणि दुसरीकडे सूर्य उगवत आहे, हे सांगून, हा ऋषिकुमार म्हणतो, 'जीवनातले सुखदुःखाचे चढउतार हे असेच असायचे !' त्यानंतर चंद्राच्या विरहाने म्लान झालेल्या रात्रविकासी कुमुदिनीचे वर्णन करताना भावी काळातल्या विरहिणी शकुन्तलेचे चित्रच जणू तो आपल्यासमोर रेखाटतो.

मानव आणि निसर्ग यांतला अभेद हा सर्व शाकुन्तल नाटकाचाच एक हृद्य असा विशेष आहे. पण चौथ्या अंकात हे अभिन्नत्व पराकोटीला गेलेले दिसते. शकुन्तला सासरी जायला निघते, त्या वेळी सारा साजशृंगार वनदेवतांकडून तिला मिळतो. एक वृक्ष अंगावर पांघरण्याचे रेशमी दुकूल तिला देतो. दुसरा वृक्ष तिच्या पायांना लावण्यासाठी अळिता देतो, तर इतर वृक्षांमधून आपले कोमल हात बाहेर काढून वनदेवता तिला अंगावरचे अलंकार देतात. शकुन्तला सासरी जात आहे, ही वार्ता कण्वमुनी लतावेलींनाही आवर्जून सांगतात. ते म्हणतात, 'हे लतावेलींनो, तुम्हाला पाणी पाजल्याशिवाय जी स्वतः कधी पाणी प्याली नाही; पुष्पपल्लवांची अत्यंत हौस असूनसुद्धा केवळ तुमच्यावरील आत्यंतिक ममतेमुळे जिने तुमची पाने-फुले कधी खुडली नाहीत आणि तुमचा पहिला बहर पाहून जिचा आनंद गगनात मावेनासा होई, ती ही तुमची प्रियसखी शकुन्तला, सासरी जायला निघाली आहे. तिला निरोप द्या.' शकुन्तला सासरी जाताना आपल्या पित्याच्या आणि मैत्रिणींच्या वियोगकल्पनेने जेवढी व्याकुळ होते, तेवढाच लतावेली, वृक्ष, हरिणबालके यांचा भावी वियोगही तिला विव्हळ करतो. अनसूया आणि प्रियंवदा

यांचा ती जसा निरोप घेते, त्याप्रमाणे आम्रवृक्षाशी जिचे लग्न लागलेले आहे, त्या वनज्योत्स्ना नामक वेलीलाही ती प्रेमाने कवटाळते. आपली आवडती मृगी गरोदर आहे, हे त्याच वेळी तिला आठवते आणि स्वतः गर्भवती असलेल्या शकुन्तलेला त्या मृगीबद्दल कणव वाटून, ती आपल्या पित्याला म्हणते, 'बाबा, या बिचारीची हातीपायी नीट सुटका झाली म्हणजे ती शुभवार्ता कुणाबरोबर तरी मला ताबडतोब कळवा बरे का !' शकुन्तला जरा पुढे जाते, तो तिचा मानलेला मुलगा असलेला हरिणशावक तिचा पदर तोंडात धरून तिला मागे ओढू लागतो. दर्भाच्या टोकांनी त्याच्या ओठांना जे व्रण पडलेले असतात, ते शकुन्तलेने स्वतः ममतेने इंगुदीफळांचे तेल लावून बरे केलेले असतात आणि 'श्यामक' नावाच्या धान्याच्या मुठी आपल्या हातांनी चारून या हरिणबाळाला तिने पोटच्या मुलासारखे वाढवलेले असते. त्याला सोडून आता आपण जाणार, या कल्पनेने तिचे काळीज फुटून जावे, यात नवल कसले ? आपल्या प्रिय तपोवनाचा वियोग शकुन्तलेला जितका जाणवतो, तितकेच तिच्या भावी वियोगाने ते तपोवनही दुःखी झालेले असते. हरिणाच्या तोंडातले दर्भकवळ गळून पडतात, मोर आपले नृत्य अर्ध्यावरच थांबवतात आणि लतावेली पानांचे अश्रू ढाळू लागतात. मानव आणि निसर्ग यांच्यामधला स्नेह आणि सहसंवाद इतक्या सहृदयतेने आणि जिव्हाळयाने दुसऱ्या कुणा कवीने कुठे चित्रित केला असेल काय ?

शकुन्तलेच्या विरहकल्पनेने जिथे तपोवनातील लतावेली आणि हरिणशावके इतकी व्याकुळ होतात, तिथे तिच्या सख्यांची आणि पित्याची अवस्था काय झाली असेल ! त्यांच्या या दुःखाच्या छटा कालिदासाने उत्कटपणे रंगवल्या आहेत. या वेळी व्यथित झालेले कण्वमुनी म्हणतात, 'शकुन्तला आज सासरी जाणार म्हणून माझ्या हृदयाला वेदना होत आहेत. गळा आसवांनी दाटून रुद्ध झाला आहे, सारी ज्ञानेंद्रिये स्तंभित होऊन गेली आहेत. वात्सल्यप्रेमामुळे माझ्यासारख्या अरण्यवासी तपस्व्याला जर इतके दुःख होते, तर कन्यावियोगाच्या वेळी कुटुंबवत्सल प्रापंचिकाची काय बरे अवस्था होत असेल !' शकुन्तला सासरी जाणार म्हणून तिच्या अंगावर वस्त्रेभूषणे चढवणाऱ्या सख्या तिला म्हणतात, 'आम्हा रानात राहणाऱ्या मुलींना हे अलंकार कुठे आणि कसे घालावेत याची काही कल्पना नाही, पण चित्रात आम्ही पाहिले आहे, त्याप्रमाणे या आभूषणांची योजना करतो झाले !' त्यावर शकुन्तलेला एकदम उमाळा येऊन गहिवरून ती म्हणते, 'प्रिय मैत्रिणींनो,

आजपासून तुमच्या हाताच्या या साजशृंगाराला मी मुकणार !' आपल्या लाडक्या वनज्योत्स्ना या वेलीचा निरोप घेताना शकुन्तला अनसूया आणि प्रियंवदा यांना म्हणते, 'मैत्रिणींनो, माझी ही आवडती वनज्योत्स्ना मी आता तुमच्या हाती निरवून जाते.' यावर त्या मैत्रिणी रडत रडत तिला म्हणतात, 'बाई शकुन्तले, या वेलीला तू आमच्या हाती निरवलेस, पण आम्हाला कुणाच्या हाती निरवणार ?' कण्वाचा निरोप घेताना तर शकुन्तला पराकाष्ठेची व्याकुळ होते. आपल्या वृद्ध आणि वत्सल पित्याला मिठी मारून ती त्याला म्हणते, 'बाबा, वार्धक्याने आणि तपाचरणाने तुमचे शरीर आधीच कृश, दुबळे झाले आहे. माझ्यासाठी शोक करून त्या देहाला अधिक पीडा देऊ नका बरे !' त्यावर कण्व गहिवरून म्हणतो, 'बाळे, आश्रमाच्या दाराशी बळी म्हणून तू टाकलेले नीवार तिथे रुजले आहेत. ते रोज मला दिसतील. तर मग तुझा विसर मला कसा पडेल सांग पाहू ?' तपोवन सोडून जाताना शकुन्तलेला एका चक्रवाकीचे रुदन ऐकू येते. तेव्हा ती आपल्या मैत्रिणींना म्हणते, 'चक्रवाक अगदी जवळ असूनसुद्धा केवळ कमळाचे एक पान आड आल्यामुळे चक्रवाकीला तो दिसेनासा झाला आहे आणि आपल्या प्रियाचा आपल्याला कायमचा वियोग झाला, असे समजून ही चक्रवाकी शोकविव्हल झाली आहे.' या वाक्यातूनही शकुन्तलेला नंतर सोसाव्या लागणाऱ्या विरहव्यथेची सूचना आपणास मिळते.

शाकुन्तलात वास्तव आणि अद्‌भुत यांचे विलक्षण मिश्रण झाले आहे. दुर्वासाने शकुन्तलेला शाप देणे, हे मूळच्या महाभारत कथेत नाही. तो प्रसंग कालिदासाने आपल्या कल्पनेने निर्माण केला आहे. दुष्यन्त-शकुन्तलेच्या गांधर्व विवाहाची वार्ता कण्वाला कळते, ती अशाच अद्‌भुत रीतीने. तो अग्निशाळेत गेला असता, अशरीरिणी वाणी त्याला या विवाहाची माहिती देते. शकुन्तला सासरी जाताना तिला उचित असे अलंकार तपोवनात कुठून मिळणार ? या गोष्टीचे अनसूया आणि प्रियंवदा यांना वाईट वाटते. पण त्याच वेळी एक तापसकुमार रेशमी दुकूले, अळिता, अंगराग, नानाविध अलंकार घेऊन तिथे येतो आणि शकुन्तलेच्या मैत्रिणींना म्हणतो, 'वनातल्या वृक्षांनी आणि वनदेवतांनी शकुन्तलेसाठी हा साज, ही वस्त्रे-भूषणे तिला दिली आहेत !' सामान्य आणि असामान्य, वास्तव आणि अद्‌भुत यांच्या या विविध छटांनी शाकुन्तलाच्या चौथ्या अंकाचे स्वरूप फार मनोज्ञ झाले आहे.

शकुन्तला पतिगृही जात असता, कण्वाने तिला मोठा हृद्य उपदेश केला आहे. आपल्या कृतकपुत्रीला कण्व म्हणतो, 'बाळे ! पतिगृही गेल्यावर तिथे तू आपल्या

वडीलधाऱ्या माणसांची सेवा कर. आपल्या सवतींशी मैत्रिणीप्रमाणे वागत जा. पतीने कधी तुझ्यावर अन्याय केला, तरी तू त्याची केव्हाही अवज्ञा करू नकोस. हाताखालच्या नोकरांचाकरांशी सौजन्याने वाग. ऐश्वर्याने कधी फुगून जाऊ नकोस. ज्या मुली सासरी अशा तऱ्हेने वर्तन करतात, त्याच आपल्या कुळाचे भूषण ठरतात. याहून वेगळे वागणाऱ्या स्त्रिया मात्र कुळाला कलंक लावतात.' थोड्याफार फरकाने हा उपदेश आजसुद्धा कालसापेक्ष वाटतो.

शकुन्तलेला ज्याप्रमाणे कण्वाने उपदेश केला आहे, त्याप्रमाणे दुष्यन्ताला सांगण्यासाठी म्हणूनही त्याने एक निरोप दिला आहे. तो निरोप असा : 'हे राजा, माझ्या या मुलीने तुझ्यावर अकृत्रिम आणि निष्कपट प्रीती केली आहे. आपल्या इतर राण्यांना तू जसा वागवतोस, त्याच ममतेने आणि आदराने माझ्या कन्येलाही तू वागव. यानंतरच्या गोष्टी मात्र दैवाधीन आहेत. मुलीच्या नातेवाईकांनी त्याविषयी काही न बोलणे हे चांगले !'

उत्कृष्ट स्वभावरेखनाबद्दल कालिदासाची ख्यातीच आहे. स्वभावरेखनाचे त्याचे हे चातुर्य शाकुन्तलाच्या चौथ्या अंकातही प्रकट झाले आहे. दुर्वासाचा शाप ऐकून अनसूया आणि प्रियंवदा दोघीही घाबरून जातात. पण प्रियंवदा नुसती हातपाय गाळून स्वस्थ बसत नाही. ती लगेच दुर्वासाकडे जाते आणि 'प्रियंवदा' या आपल्या नावाला साजेसे दुर्वासांशी गोड बोलून, ती त्याने दिलेला शाप त्याला सौम्य करायला लावते. शकुन्तलेचा दुष्यन्ताशी गांधर्वविवाह झाला हे कळताच कण्वाच्या मुखातून जे उद्गार बाहेर पडतात, ते त्याच्या वयाला, ज्ञानाला आणि तपाचरणाला किती साजेसे आहेत ! कण्व म्हणतो, 'धुराने डोळे भरून गेल्यामुळे काही दिसत नसतानासुद्धा यजमानाच्या हातातली आहुती नेमकी यज्ञीय अग्नीत पडावी, तसेच हे झाले !' आणि शकुन्तलेला पोटाशी धरून तो तिला म्हणतो, 'बाळे, योग्य शिष्याच्या हाती दिलेल्या विद्येप्रमाणे तुझ्याविषयी मी आता निश्चिंत झालो आहे.' शकुन्तला सासरी जाताना आपल्या जामाताला आपण काही निरोप दिला पाहिजे, हे कण्वाच्या ध्यानात येते. त्याप्रमाणे मुलीलाही काही उपदेश केला पाहिजे, या गोष्टीची त्याला जाणीव होते आणि तो लगेच म्हणतो, 'वनौकसोऽपि सन्तः लौकिकज्ञाः वयम् ! अरण्यात राहणारे असलो, तरी आम्हालाही व्यवहार कळतो बरे का !' कण्वाची ही भावना किती सुंदर वाटते. शकुन्तलेला तपोवनाच्या तोंडाशी पोहोचवून तिच्या सख्या माघारी वळतात, त्या वेळी व्यथित मनाने शकुन्तला म्हणते,

'काय, या इथवरच का माझ्याबरोबर येणार ?' त्यावर कण्व चटकन म्हणतो, 'वत्से, इमे अपि कन्ये प्रदेये– या दोघींचीसुद्धा अजून लग्ने व्हायची आहेत. त्यांना तुझ्याबरोबर तुझ्या सासरी पाठवणे, कसे बरे दिसेल सांग पाहू ?' शकुन्तला तपोवन ओलांडून जाते आणि तिच्या सख्या खिन्नपणे म्हणतात, 'हा धिक् हा धिक् अन्तर्हिता शकुन्तला वनराज्या !– शकुंतला वनराईच्या आड दिसेनाशी झाली !' चौथ्या अंकातले सारे वियोग, दुःख, सर्व कारुण्य या एका चिमुकल्या वाक्यात साररूपाने आले आहे, असे वाटते. शकुन्तला हे जणू त्या तपोवनाचे निरागस, सुंदर, आनंदमय शैशव. ती तपोवन सोडून गेली म्हणजे ते मुग्ध शैशवच तिच्याबरोबर तिथून अंतर्धान पावले.

अशी अर्थपूर्ण आणि सूत्रबद्ध चिमुकली वाक्ये चौथ्या अंकात सगळीकडे विखुरली आहेत. 'अतिस्नेहः पापशङ्की– उत्कट प्रेमाच्या पोटीच भलभलत्या वाईट शंका मनात येत राहतात.' 'न खलु कश्चित् धीमतां अविषयो नाम-बुद्धिवंतांना अगम्य, अनाकलनीय असे काहीच नसते !' 'अर्थोऽहि कन्या परकीय एव– कन्या ही दुसऱ्याने रक्षणार्थ आपल्यापाशी ठेवलेली ठेव आहे.' यांसारखी वाक्ये या दृष्टीने मुद्दाम बघण्याजोगी आहेत.

शकुन्तलेच्या निरोपाचा हा प्रसंग कालिदासाने अतिशय उत्कटपणे रंगवला आहे. तपोवनाची पवित्र पार्श्वभूमी, दुःखाने विकल झालेल्या अनसूया-प्रियंवदेसारख्या निरागस सख्या, पानांचे अश्रू ढाळणाऱ्या लतावेली, शकुन्तलेच्या पाठोपाठ जाऊ बघणारी हरिणशावके, कण्वाचा संयमपूर्ण शोक आणि वियोगदुःखाने फुटू बघणारे शकुन्तलेचे हृदय...या साऱ्यांतून कवीने विरहाचे कारुण्यपूर्ण चित्र आपणासमोर रंगवले आहे. कालिदासाच्याच एका वचनात थोडा फेरफार करून सांगायचे, तर संयोग हा जीवनातला एक अपघात आहे. वियोग, दुरावा हीच जीवनाची खरी प्रकृती, खरे अंतिम सत्य आहे. विरहाचे इतके प्रत्ययकारी चित्र साहित्यात दुसरीकडे कुठे रेखाटलेले क्वचितच दिसून येईल.

□

# एक जपानी काव्यविशेष

जपानी हायकू हा काव्यप्रकार आपल्याकडे आता चांगलाच परिचित आणि लोकप्रिय झाला आहे. आकाराने चिमुकल्या, अल्पाक्षर, चित्रदर्शी आणि अर्थगर्भ अशा या काव्यप्रकाराने मराठी रसिकांच्या मनाची तर तात्काळ पकड घेतलीच, पण अनेक मराठी कवींनाही त्याने भुरळ घातली. काही कवींनी मूळ जपानी हायकूंचे मराठीत सुंदर अनुवाद केले, तर सुरेश मथुरे, शिरीष पै यांच्यासारख्या काही कवींनी स्वतंत्र मराठी हायकू लिहिल्या.

या हायकूंप्रमाणे जपानमध्ये आणखी दोन प्राचीन काव्यप्रकार प्रचलित होते. आजही त्यांत रचना केल्या जातात. हायकूप्रमाणेच अल्पाक्षरत्व हे त्यांचे ठळक वैशिष्ट्य आहे. या प्रकारांची नावे 'टांका' आणि 'यूता' अशी आहेत. त्यांपैकी 'टांका' या काव्यप्रकाराला कविश्रेष्ठ रवींद्रनाथ ठाकूर यांनी 'कणिका' हे नाव दिले आणि बंगालीमध्ये त्यांनी काही सुंदर, स्वतंत्र कणिका लिहिल्या. मला आठवते, कित्येक वर्षांपूर्वी गोपीनाथ तळवलकर यांनी कविवर्यांच्या या बंगाली कणिकांचा मराठीत रसाळ अनुवादही केला होता. त्यांतल्या दोन कणिकांचे आशय आजही माझ्या स्मरणात राहून गेले आहेत. ते असे होते :

फूल म्हणाले, 'फळा, तू कुठे आहेस ?'

फळ म्हणाले, 'फुला, मी तुझ्या हृदयातच आहे !'

'—कालच्या रात्रीच्या वादळाने आजच्या उषेच्या मस्तकावर सोन्याचा झळझळीत मुकुट चढवला आहे !'

'टांका'प्रमाणेच 'यूता' हाही एक प्राचीन जपानी काव्यप्रकार आहे. माझ्याकडे एक इंग्रजी पुस्तक आहे. त्यात अनेक 'यूतां'चे इंग्रजी अनुवाद आहेत. त्याप्रमाणेच 'यूता' या काव्यप्रकाराची त्यात माहितीही दिली आहे. 'यूता' हा अगदी चिमुकला

असा काव्यप्रकार आहे. विषम लांबीच्या पाच ओळींत तो लिहिला जातो. ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकापासून तो थेट आजतागायत जपानमध्ये 'यूता' लिहिल्या जात आहेत. जपानच्या प्राचीनतम काव्यामधले काही काव्य 'यूता' पद्धतीचे आहे. तिथले वृद्ध आणि तरुण कवी सारख्याच उत्साहाने आजही 'यूता' लिहितात. दरवर्षी त्यांचे अनेक संग्रहही प्रसिद्ध होत असतात. 'यूता'ची रचना विशिष्ट प्रकारचीच असली पाहिजे, असा संकेत आहे. पाच-सात, पाच-सात सात अशा स्वराघातात 'यूता'च्या ओळी बांधलेल्या असतात. रचनेचे हे तंत्र अगदी कटाक्षाने पाळले जाते का ? याला एक उत्तर असे आहे की, या प्रकारच्या रचनेत विशिष्ट शक्ती आहे. आपल्याकडे अनुष्टुभ, ओवी, अभंग या छंदांभोवती जसे एक धार्मिक वलय आहे, मंत्रांमध्ये जशी जादूची शक्ती असते, तसेच 'यूता'च्या रचनेमध्ये मनाला मंत्रविद्ध करण्याचे, त्याला मारून टाकण्याचे सामर्थ्य आहे, असे जपानी लोक मानतात. वेद लिहिणाऱ्या आपल्या ऋषींनी ज्याप्रमाणे काही दैवी शक्तीने प्रेरित होऊन स्फूर्तीच्या दिव्य ऋचा उच्चारल्या, त्याचप्रमाणे प्राचीन जपानी कवींनी एका अतींद्रिय, भारलेल्या अवस्थेत 'यूता'चे उत्स्फूर्त उच्चारण केले, या समजुतीत थोडेफार तथ्य असावे, असे वाटते. कारण अनेक प्राचीन 'यूता' मंत्रांप्रमाणे वापरल्या जातात. काही 'यूता' विशिष्ट दैवतांची स्तुती करतात. त्यांना आवाहन करतात. आपल्या साह्यार्थ त्यांनी त्वरित यावे, म्हणून त्यांचा 'धावा' करतात. इतकेच नव्हे, तर बौद्ध धर्माच्या तांत्रिक कर्मकाण्डामध्येही 'यूतां'ना आवर्जून स्थान दिलेले आढळते.

ही झाली 'यूता'ची तांत्रिक आणि धार्मिक महती. पण काव्य म्हणून त्या कशा आहेत ? अनेक पौर्वात्य आणि पाश्चात्त्य समीक्षकांच्या मते 'यूतां'मध्ये जितके रमणीय काव्य आढळते, तितके उत्कृष्ट काव्य जपानमध्ये 'यूतां'पूर्वी आणि नंतरही क्वचितच लिहिले गेले असेल ! या काव्यात निसर्गाला महत्त्वाचे स्थान आहे. प्रचंड पर्वतांचे सौंदर्य, सागराची अथांगता, बदलत्या ऋतूंचे चंचल रूपाविष्कार, प्रेयसीच्या किंवा प्रियकराच्या दर्शनाची-भेटीची उत्कंठा, आपल्याला सोडून कायमच्या दूर निघून गेलेल्या प्रियजनांच्या शोकपूर्ण, मधुर स्मृती— 'यूतां'मध्ये हे सारे अनुभव उत्कटपणे व्यक्त झालेले दिसतात. पाश्चात्त्यांच्या संसर्गामुळे झालेल्या यांत्रिक आणि भौतिक प्रगतीने माणसांचे जीवन प्रदूषित करण्यापूर्वी त्यात जे साधेपण, सत्य आणि माधुर्य होते, ते 'यूतां'मध्ये परिपूर्णतेने अवतरले आहे. प्रत्येक 'यूता' हे जणू निसर्गप्रेरणेने फुललेले एक फूल असते. फुलाइतकेच नाजूक, संपूर्ण,

सुंदर आणि रहस्यमय. पौर्वात्य मनाला प्रिय असणारा गूढवाद त्यात असतो. त्याप्रमाणेच त्या मनाला मोहून टाकणारे अल्पाक्षरत्व, सूचकता, संदिग्धताही 'यूतां'मध्ये आढळून येते. या काव्यामधली प्रतिमासृष्टीही अतिशय कोवळी, तरल असते. या प्रतिमा मुख्यत्वे निसर्गातूनच घेतलेल्या असतात. पंचमहाभूतांचे इथे सतत दर्शन घडते. पाणी, हिमवर्षाव, वासंतिक मोहर, बांबूची कोवळी पालवी, निळ्या आभाळावरची पाखरांची भरारी, ऋतूंची ये-जा हेच 'यूतां'चे प्रतिमावैभव आहे. प्राचीन काळी जपानी लोक एकमेकांना पत्रे पाठवण्याऐवजी 'यूता' लिहून त्यांतून आपले मनोगत एकमेकांना कळवत. त्यायोगे मने जुळत, तुटत. भावनांचे सूक्ष्म हेलकावे दिले-घेतले जात. प्रेमाचे नाजूक बंध दोन जिवांना एकत्र आणत. फार काय, दोन देशांत युद्धे किंवा तहदेखील होत असत. सुरांची रेषा, चित्रांचे रंग, पाण्यावरच्या तरल लहरी यांनीच जणू 'यूता' लिहिल्या जात.

माझ्या संग्रही असलेले 'जपानी कविता— यूता' हे संकलन आर्थर वेले नामक लेखकाने तयार केलेले आहे. वेले हा पौर्वात्य संस्कृती, साहित्य आणि परंपरा यांचा गाढा अभ्यासक, अत्यंत रसिक आणि स्वतःही कवी. पौर्वात्य विचारसरणीने तो पूर्ण भारलेला आहे. तो स्वतः कमी बोलत असे. त्यामुळेच की काय, स्वभावतःच अल्पाक्षर आणि सूचक असलेल्या जपानी काव्याने त्याला मोहिनी घातली असावी. प्रस्तुत संकलनात काही 'यूतां'चे त्याने इंग्रजीमध्ये अनुवाद केले आहेत. त्याचे हे अनुवाद फार गोड, रसाळ आहेत. त्या इंग्रजी अनुवादांमधून मी मला आवडलेल्या काही 'यूतां'चे मराठी अनुवाद केले आहेत आणि ते इथे दिले आहेत. अर्थात कोणतीही कविता वाचावी तर ती मुळातूनच. जपानी 'यूतां'चा इंग्रजी अनुवाद आणि त्यावरून मी माझ्या कुवतीनुसार केलेला मराठी अनुवाद— यात मूळच्या काव्याचे माधुर्य, तरलता आणि भावनोत्कटता कितपत उतरली असेल कोण जाणे. अनुवादाचा अनुवाद हा तिसऱ्या चौथ्या कार्बन कॉपीइतकाच फिकट आणि अस्पष्ट उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही हे अनुवाद करून बघण्याचा मोह मला आवरता आला नाही, हे मान्य केलेच पाहिजे. 'यूतां'ची जी वेगवेगळी वैशिष्ट्ये आहेत, ती या अनुवादांमध्ये शक्यतो प्रकट व्हावीत, असा माझा प्रयत्न आहे. तो कसा व किती साधला आहे, हे अर्थात वाचकांनीच ठरवायचे आहे. या मराठी अनुवादांमुळे मूळच्या अस्सल 'यूतां'चा आस्वाद घ्यावा असे एखाद्या वाचकाला जरी वाटले, तरी माझा अनुवादांमागचा हेतू सफल झाला, असे

म्हणण्यास हरकत नाही.

निसर्गाला 'यूतां'मध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे, हे वर सांगितलेलेच आहे. अनेक 'यूतां'मध्ये फार सुंदर निसर्गचित्रे रेखाटलेली दिसतात. निसर्गाच्या भाषेत इथे भाव प्रकट होतात. उदाहरणार्थ, 'ओतो तो योशिको' नामक कवीची ही एक 'यूता' बघावी. तो म्हणतो—

माझे प्रेम आहे गवतासारखे
जे असते दडलेले उंच सखल
पर्वतरांगांत
वाढलेले भरगच्च, उदंड
तरीहि साऱ्यांच्या नजरेतून दूर, अज्ञात

'ताकात्सुकासा' नामक एका कवयित्रीची ही 'यूता' आहे. तिचा बाप राजपुत्र होता आणि आईही कवयित्रीच होती. ती म्हणते—

अकस्मात जर उमटले नसते
हे भेदक कोकिळकूजन,
तर या डोंगरातल्या खेड्याला
—जिथे अद्याप बर्फहि नाही वितळला—
कसे कळले असते वसंताचे आगमन ?

ही एका अनामिक कवीची 'यूता' आहे. त्यात एक नाजूक निसर्गचित्र रेखाटलेले आहे.

पाण्याच्या या डबक्यात
बेडूक करताहेत डराव डराव
पाण्यात उमटलेल्या
केरिया फुलांच्या प्रतिबिंबाचा
लागला आहे का त्यांना खालूनच ठाव ?

'कियोवारा मोटुसुके' नावाच्या कवीची ही एक 'यूता' बघावी. तो म्हणतो—

शेवंतीच्या फुलांवरून
दररोज ठिबकणाऱ्या दवबिंदूंनी
ओलावते आहे माझे अंगण

किती युगांनी माझ्या दारी
शुभ्र झऱ्यात त्यांचे होईल परिवर्तन !

सुंदर निसर्गचित्रांप्रमाणे प्रेमाच्या नाजूक, मधुर छटाही अनेक 'यूतां'मधून कवींनी रंगवल्या आहेत. "तारिहिरा' नामक कवीला आपल्या प्रियेच्या वर्तनात अकस्मात दुरावा जाणवू लागला. तेव्हा व्यथित मनाने त्याने ही 'यूता' लिहिली असे म्हणतात:

तो चंद्र
पूर्वीचा नसेल का उरला ?
आणि तेव्हाचा वसंतऋतूहि
काय कायमचाच हरवला ?
तर मग मीच तेवढा कसा उरलो
तेव्हाचा ? तसाच ?

ही एका अनामिक कवीची 'यूता' आहे. तो म्हणतो—

निदान स्वप्नात तरी
आपण भेटू म्हणून
रात्रभर मी वाट पाहिली,
पण सारी रात्र
झोपेशिवाय तळमळतानाच गेली !

आणि ही देखील एका अनामिक कवीची (कवयित्रीची ?) 'यूता' आहे. तिचा आशय असा—

तू आहेस आभाळातल्या ढगांवर
लखकन् चमकून जाणाऱ्या विजेसारखा-
हवासा आणि नकोसाहि,
तू दिसलास तर मी घाबरते
न दिसलास तर उदास होते !

उर्दू गझलांमध्ये प्रियकराला वाटते, जिवंतपणी नाही, तर निदान आपल्या मरणानंतर तरी प्रियेने आपल्यापाशी यावे. दोन अश्रू ढाळावेत. 'हितोमारो' नामक एका कवीच्या 'यूतां'मध्ये जवळपास हाच भाव व्यक्त झाला आहे. हा कवी म्हणतो—

या दारुण प्रेमभंगाने
मी जर मेलो तर-
पण तेच मरण मला यावे,
निदान त्या योगाने तरी
प्रियेचे पाऊल माझ्या उंबऱ्यावर पडावे !

जीवनाची मर्त्यता, क्षणभंगुरता, सुखक्षणांची चंचलता हाही अनेक 'यूतां'चा विषय आहे. या एका 'यूता'त असे वर्णन आहे—

सफरचंदाचा शुभ्र मोहर
प्रियकराला मोठ्या कौतुकाने
दाखवीन— मी मनाशी म्हटले,
पण ते तर आहे शिशिरातले हिम
फांद्याफांद्यांतून गुंतलेले !

'याकामोची' नामक कवीने आपली विरहवेदना पुढील साध्या, पण सुंदर 'यूता'मधून उत्कटतेने व्यक्त केली आहे.

ही बर्फगार राने-
बाहेरचा अखंड हिमवर्षाव
माझी बाग झाकतो आहे, कशाला ?
एकटाच का झोपणार मी आज ?
कुठलाच कोमल बाहू मिळणार नाही उशाला ?

या एका 'यूता'मधला शिशिर हा वस्तुतः वार्धक्याचाच निदर्शक आहे. 'तोशियुकी' नावाचा हा कवी म्हणतो,

डोळ्यांना नीटसे दिसत नाही
तरीहि शिशिर येतो आहे,
जवळजवळ येतो आहे...
सळसळणाऱ्या थंड वाऱ्यांनी
जीव घाबरून जातो आहे !

जपानी 'यूतां'चे थोडेसे स्वरूप इथे दिलेल्या 'यूतां'वरून कळून येईल. हायकू, टांका, यूता हे सारे काव्यप्रकार तसे परस्परांशी संबद्ध आहेत. अल्पाक्षरी रचना, सूचकता, निसर्गप्रतिमांमधून केलेले भावनांचे चित्रण आणि या साऱ्यांतून अनुस्यूत

असलेली जीवनाच्या, जीवनातल्या सुखक्षणांच्या भंगुरतेची मन उदास करणारी जाणीव, ही या सर्वच प्रकारच्या काव्याची ठळक लक्षणे आहेत. मुख्य म्हणजे निसर्गात रमणारे आणि गूढवादात अंतिम शांतता शोधणारे पौर्वात्य मन त्यांत सातत्याने प्रकट होताना दिसते. पाश्चात्त्य काव्याहूनही हा पौर्वात्य काव्याविष्कार मराठी मनाला अधिक जवळचा वाटतो, यात शंका नाही.

□

# कवडसे

प्रकाशाचा प्रखर झोत काय किंवा त्याचाच एखादा कवडसा काय, दोहोंमध्ये प्रकाशतत्त्व एकच असते. आत्म्याला उजळून टाकण्याचे सामर्थ्य दोहोंतही असते. माझ्या सुदैवाने प्रकाशाच्या लखलखीत तेजोगोलांसारखी व्यक्तित्वसंपन्न माणसे मला अनेकदा बघायला मिळाली, पण अल्पकाळ सहवासात आलेली आणि तरीही मनावर खोल ठसा उमटवणारी अशी काही मोठी माणसेही मला आयुष्यात भेटली.

तेव्हा मी एम.ए. होऊन नुकतीच मुंबईत गेले होते. नोकरी जेमतेम होती. त्यामुळे अर्थार्जनाची इतर साधने शोधणे आवश्यक होते. साहित्याच्या क्षेत्रात नुकतेच हातपाय हलवू लागलेल्या माझ्यासारख्या नवख्या होतकरू लेखकांना रेडिओ हे त्या वेळी चार पैसे मिळवण्याचे आणि मोठ्या मानाचे एक आकर्षक साधन वाटत असे. रेडिओचा कार्यक्रम आला की, मी अतिशय आनंदून जाई. तेव्हा मी कामगार विभागासाठी छोटी नाटुकली लिहिणे, वनिता मंडळासाठी भाषणे, पुस्तक परीक्षणे करणे, क्वचित संस्कृत नाटकात एखादी भूमिका वठवणे, कविता वाचनाचा कार्यक्रम देणे, असे नाना प्रकार करत असे. रेडिओचे मानधन त्या वेळी पंधरा रुपये असे. वीस-पंचवीस रुपये मिळाले म्हणजे तर अगदी डोक्यावरून पाणी गेले ! पण त्या दिवसांत त्या लहानशा रकमेलाही फार मोल असे. माझ्या दरिद्री संसारात त्या पैशांची मला चांगली मदत होई. रेडिओ कलावंत म्हणून ऐट मिरवायला मिळे ती वेगळीच.

मी रेडिओवर जाई त्या वेळी तिथे एक पोक्त बाई वावरताना दिसत. पांढरे नऊवारी पातळ, डोक्यावरून पदर, चेहऱ्यावर अत्यंत सात्त्विक व प्रेमळ भाव, अशा त्या होत्या. त्यांच्या लुगड्याला काठपदर नसत. हातांत बांगड्या किंवा कपाळावर कुंकू काहीच नसे. अंगावर कसला दागिनाही नसायचा.

आमच्यासारख्या पोरसवदा मुली कार्यक्रमाला आल्या म्हणजे बाई आपुलकीने आमची दखल घेत. पाठीवरून मायेने हात फिरवत. 'तू कोण ग ? नाव काय ? काय शिकलीस ? आज कसला प्रोग्रॅम आहे ?' असे प्रश्न विचारून मनात जवळीक, धीर निर्माण करत. सर्वांत गमतीची गोष्ट म्हणजे कमरेला खोचलेली जुन्या पद्धतीची कापडी पिशवी काढून तिच्यातून एखादी पेपरमिंटची किंवा लिमलेटची गोळी हातावर ठेवत. खरे म्हणजे खाऊ खाण्याचे ते वय नव्हते. पण बाईंच्या हातून मिळालेल्या त्या गोळीची अतिशय अपूर्वाई वाटे. बाई कोण, हे प्रथम मला नीटसे कळले नव्हते. पण रेडिओवरचे अधिकारी त्यांच्याशी आदराने वागत. शिपाईसुद्धा त्यांना मान देत. बाईंविषयी माझ्या मनात जबरदस्त कुतुहल होते. पुढे मला समजले की, जुन्या जमान्यातल्या प्रसिद्ध गायिका सुंदराबाई जाधव म्हणजेच आमच्या या वडीलधाऱ्या बाई ! बाईंचे नाव कळले मात्र, त्यांच्याबद्दलच्या अनेक गोष्टी मनात उचंबळून आल्या. 'माणूस' चित्रपटामध्ये गणपत पोलिसाच्या आईची त्यांनी केलेली सुंदर भूमिका आठवली. देवापुढे बसून त्यांनी गायिलेले 'मन पापी भूला कौन इसे समझाये' हे गाणे स्मरणात जागे झाले. 'एकच प्याला' या गडकऱ्यांच्या नाटकाच्या गोड व समर्पक चाली बाईंनीच दिल्या होत्या, ही कुठेतरी ऐकलेली दंतकथाही आठवली. आयुष्याच्या अखेरच्या काळात बाईंना विपन्नावस्था आली होती आणि म्हणून रेडिओने या थोर कलावतीला सन्मानपूर्वक रेडिओवर ठेवून घेतले होते. बाई काही दिवसच रेडिओवर होत्या, पण त्या अल्पकाळात त्यांनी मजवर केलेले प्रेम, मला लावलेला लळा आजही आठवतो. मनात गोड, पण उदास हुरहूर निर्माण करतो.

असाच आणखी एक प्रसंग मला आठवतो. तेव्हा मी मुंबईत आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग' साप्ताहिकात काम करत होते. 'नवयुग'च्या ऑफिसात साहित्य, समाजकारण, राजकारण, नाट्य, चित्रपट अशा विविध क्षेत्रांतल्या व्यक्ती मला बघायला मिळत. क्वचित कुणाशी एखादा शब्द बोलण्याचीही संधी मिळे. मला त्या सर्वांविषयी माझ्या त्या वेळच्या वयाला साजेसे एक भाबडे बालिश कुतूहल असे आणि आदर तर असायचाच. त्यांतल्या बऱ्याच व्यक्ती तशा आधी मला ठाऊकही असत. परंतु एखादे वेळी एखादी अगदीच अनोळखी, अपरिचित व्यक्ती आमच्या ऑफिसात येई आणि मग ती कोण असेल याचा विचार मी करत राही.

एके दिवशी असेच एक प्रौढ गृहस्थ आमच्या ऑफिसात आले. धोतर, सदरा,

कोट, डोक्यावर काळी टोपी, असा त्यांचा अगदी साधा आणि मुंबईच्या तेव्हाच्या वातावरणाशी काहीसा विसंगत पोशाख होता. नीटसे आठवत नाही, पण मला वाटते, त्यांनी कपाळावर गंधाची टिकली लावलेली असावी. ते गृहस्थ आले, ते एकदम अत्र्यांच्या आतल्या लिहिण्याच्या खाजगी खोलीत गेले. काही वेळ आतून गप्पांचे, हसण्याचे आवाज येत होते. जरा वेळानें मला आत बोलावणे आले. मी आत गेले. खुर्चीवर न बसता अदबीने बाजूला उभी राहिले. माझी ओळख अत्रेसाहेबांनी त्या गृहस्थांना आधीच सांगितली असावी. मला बघताच साहेब म्हणाले, 'यांना ओळखलंस की नाही ?'

मला ओळख पटणे शक्यच नव्हते. मी नुसतीच त्यांच्याकडे बघत राहिले. त्यावर अत्रे मोठ्या आदराने म्हणाले,

'अग, हे कन्नड महाकवी दत्तोपंत बेंद्रे. फार मोठा माणूस आहे बरं. 'अंबिकातनय दत्त' या नावाने ते कानडीत कविता करतात.'

बेंद्रे यांची वाङ्मयीन ओळख मला अर्थातच होती. पण त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यावर मन एका वेगळ्याच आनंदाने भरून गेले. मी त्यांना चरणस्पर्शपूर्वक नमस्कार केला आणि काही न बोलता स्तब्ध राहिले.

'काही वाचलं आहेस की नाही यांचं लेखन ?' अत्र्यांनी मला काहीसे दरडावून विचारले. मला बोलायला सुचेना. पण बेंद्रे यांना माझी अवघडलेली मनःस्थिती कळली आणि माझी अडचणही त्यांनी ओळखली. ते हसत हसत मला म्हणाले,

'तुला माझं कन्नड काव्य माहीत असणं शक्य नाही. पण मी अधूनमधून मराठीतही कविता करतो बरं का ! ऐकवू का तुला एक छोटीशी मराठी कविता ?'

मी नुसतीच मान हलवली आणि बेंद्र्यांनी आपली एक दोन ओळींची कविता मला ऐकवली. ती अशी होती :

एक होती बालविधवा, तिचं नाव प्रेमा. नाव काय ? गाव काय ? अरे रामा रामा !

मी कविता ऐकली पण तिचे मर्म मला कळले नाही. मी नुसतीच बेंद्रे यांच्या चेहऱ्याकडे बावचळल्यासारखी बघत राहिले. त्यावर ते आणखीच हसत सुटले. आणि मग एकदम प्रेमळ स्वरात मला म्हणाले,

'अग, त्या मुलीचं नाव आहे प्रेमा. किती गोड नाव ! पण ती बिचारी बालविधवा

आहे. म्हणून मी म्हटलंय, नाव काय, गाव काय, अरे रामा रामा ! तिच्या दुर्दैवाबद्दल मला वाटणारं दुःख मी त्या ओळीत व्यक्त केलं आहे. कळलं ना तुला ?'

आता कुठे बेंद्र्यांच्या कवितेतल्या कारुण्याचा मला उलगडा झाला. मी त्यांच्याकडे बघून मान डोलावली. थोड्या वेळाने आचार्य अत्रे यांचा निरोप घेऊन कविवर्य बेंद्रे निघून गेले. पुन्हा त्यांची माझी कधीही भेट झाली नाही. पण त्यांचे ते प्रेमळ वागणे, किंचित कानडी हेल असलेले मराठी बोलणे आणि मुख्य म्हणजे त्यांची ती छोटी पण हृदयस्पर्शी कविता, यांचा मात्र मला अद्यापही विसर पडलेला नाही.

अशीच आणखी एक सुंदर भेट. मुंबईच्या एका ऑफिसात माझ्या मैत्रिणी होत्या. त्यांनी ऑफिसतर्फे, पनवेलला की अलिबागला आठवत नाही, एक ट्रीप काढली होती. माझा खरे तर त्या ऑफिसशी काही संबंध नव्हता. पण मैत्रिणींनी फार आग्रह केला म्हणून मी त्यांच्याबरोबर त्या ट्रीपला गेले. आम्ही मुक्कामावर पोहोचलो, तेव्हा एका जुन्या पद्धतीच्या पण प्रशस्त, स्वच्छ घरात आमची थांबण्याची, जेवण्याची सोय केली आहे, असे मला कळले. घरात वृद्ध ब्राह्मण जोडपे होते. ती दोघेही पतिपत्नी फार प्रेमळ होती. आमचे चहापाणी चालले असताना बाई सहज सांगावे तशा आम्हाला म्हणाल्या,

'इथं बरीच माणसं सहलीला येतात. बहुधा आमच्याकडेच उतरतात. आमची मुलं परगावी असतात. इथं आम्ही दोघेच राहतो. आम्हाला माणसांचं अगत्य आहे. कुणी आलं गेलं तर बरं वाटतं. आता हेच बघा ना, काल आमच्याकडे एक गृहस्थ आले आहेत. काही लिखाण वगैरे घेऊन आले आहेत. निवांतपणी त्यांना ते काम करायचंय. त्यांना माडीवर जागा दिलीय !'

'लिखाण' शब्द कानी पडला तेव्हा मला अत्यंत कुतूहल वाटले. लेखनासाठी इकडे आडगावी मुद्दाम येऊन राहणारा कोण लेखक असेल हा ? मी उत्सुकतेने विचारले,

'कोण हे लेखक ? नाव काय त्यांचं ?'

'कुणी र. वा. दिघे म्हणून आहेत.' बाईंनी निर्विकारपणे उत्तर दिले. र. वा. दिघ्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व किंवा कर्तृत्व यातल्या कशाचीच त्यांना माहिती नव्हती. मी मात्र दिघ्यांचे नाव ऐकून अगदी थरारून गेले. 'सराई', 'पाणकळा' या त्यांच्या वेगळ्या बाजाच्या ग्रामीण कादंबऱ्या मी आवडीने वाचल्या होत्या. त्यांच्या

अद्‌भुत, रोमांचकारी कथाही मला अपरिचित नव्हत्या. दिघे माझे फार आवडते, आदरणीय लेखक होते. ते आपल्याबरोबर याच घरात, आता या वेळी माडीवर आहेत, या कल्पनेने मला क्षणभर काही सुचेना. आता मैत्रिणींबरोबरची ट्रीप, गप्पा, खाणेपिणे साऱ्यांतले माझे लक्ष उडाले. दिघ्यांना भेटावे, त्यांच्याशी दोन शब्द बोलता आल्यास बोलावेत, याचीच मला आतुरता लागून राहिली. मी आमच्या यजमानीणबाईंना भीत भीत विचारले,

'त्यांचा परिचय करून घेता येईल का ? थोडं बोलता येईल ? परवानगी देतील ते ?'

'आता बघा बाई !' यजमानीणबाई हसून म्हणाल्या, 'न द्यायला काय झालं ? माणूस मोठा दिलदार, मोकळ्या मनाचा आहे हो. तुम्ही भेटा ना त्यांना. अगदी कामातच असतील, तर नाही भेटायचे, पण एरव्ही काही हरकत दिसत नाही मला.'

आमच्या ग्रूपमध्ये माझ्यासारखी आणखी एक साहित्यप्रेमी मैत्रीण होती. तिचे मन मी वळवले आणि मग आम्ही दोघीजणी दिघे यांना भेटण्यासाठी— अर्थात आधी निरोप पाठवून— माडीवर गेलो. दिघे एका सतरंजीवर बसले होते. समोर छोटेसे डेस्क होते. वर कागद होते. भोवतालीही कागद पसरले होते. काही पुस्तके होती. दिघे आमच्या अपेक्षेपेक्षाही साधे आणि उमदे निघाले. दोन सर्वार्थाने सामान्य अशा मुलींसाठी आपण आपल्या कामाचा बहुमोल वेळ देत आहोत, अशी आढ्यता किंवा तोरा त्यांच्या वागण्यात लवलेशही दिसला नाही. उलट त्या आडगावी कुणीतरी आपल्या साहित्याच्या प्रेमाने आणि कुतूहलाने आपल्याशी बोलण्याची उत्सुकता दाखवत आहे याचेच त्यांना फार अपरूप वाटलेले दिसले. त्यांनी लगेच पुढ्यातले कागद बाजूला सारले आणि आमच्याशी ते अगदी दिलखुलासपणे गप्पा मारू लागले. त्यांचा थोरला मुलगा माझ्या भावाचा मित्र होता. ती ओळख मी दिल्यावर तर मी त्यांना अगदी घरातलीच वाटले. दिघे त्या वेळी 'कार्तिकी' कादंबरी लिहीत होते. कादंबरीत त्यांना एक अभंग वापरायचा होता. 'एक गाय चरते तान्ही, वरल्या रानी' असा काहीसा त्या अभंगाचा प्रारंभ होता. अभंग बहुधा तुकारामांचा असावा. विश्वजननीवर केलेले ते गाईचे रूपक फार सुंदर आणि अर्थपूर्ण होते. दिघे त्या अभंगात रंगून गेले होते. त्यातले रूपक उलगडण्याची, त्याचा अर्थ लावण्याची खटपट करत होते. माझ्याशी ते त्या अभंगावर चर्चा करू लागले. रसिकपणे बोलत राहिले. मला जाणवले की हा कलावंत एखाद्या लहान मुलासारखा निर्व्याज आहे.

वयाने किंवा इतर कोणत्याही दृष्टीने त्यांच्यापेक्षा अगदी लहान असलेल्या आमच्यासारख्या नगण्य व्यक्तींनासुद्धा ते कुतूहलाने प्रश्न, शंका विचारत होते. आम्ही सांगत होतो ते शांतपणे ऐकून घेत होते. कल्पनांची मनमोकळी देवाणघेवाण करत होते. त्यात त्यांना कसलाही कमीपणा वाटत नव्हता. उलट आम्हालाच संकोचाने अवघडल्यागत झाले होते. मी दिघ्यांचे तोवरचे बहुतेक सर्व लेखन वाचले होते. जरा वेळाने त्यांच्या कथांचा विषय निघाला. मी मला आवडलेल्या त्यांच्या कथांचे उल्लेख करू लागले, तेव्हा तर त्यांना फार आनंद झाला. ते मला म्हणाले,

'मी तिकडे खोपोलीलगत विहारीला असतो. तिथे भातशेती करतो. वारल्याकुळवाड्यांत मिसळतो. अशी साहित्यावर प्रेम करणारी, त्याविषयी उत्सुकतेनं बोलणारी माणसं आम्हाला तिकडे कुठं भेटतात ? तुमचा परिचय झाला. गप्पा झाल्या. फारच बरं वाटलं हो. आता असं करा. एकदा आमच्या विहारीलाच या. सगळी शेती दाखवतो. झाडंझुडपं, ससे, खारी दाखवतो. बघा तर जरा खेड्यातली गंमत !'

दिघ्यांचे ते सारे बोलणे अगदी मनापासून होते. त्यात आढ्यता नव्हती. वडिलकीचा डौल नव्हता. काही नव्हते. होता तो एका प्रतिभावंत, निर्मळ, कलासंपन्न मनाचा सुंदर आविष्कार. दिघ्यांकडे जाणे अर्थात मला कधी शक्य झाले नाही. त्यांच्या परिचयामुळे त्यांच्या साहित्याला मात्र एक नवे परिमाण मिळाल्यासारखे वाटले. नंतर अनेक वर्षे गेली. 'कार्तिकी' प्रसिद्ध झाल्यावर मी ती आतुरतेने वाचली. त्या कादंबरीबद्दल अजूनही मला एक वेगळीच आपुलकी वाटते. आणखी काही वर्षे गेली. दिघ्यांचे लेखन वयोमानामुळे मंदावले आणि नंतर तर त्यांच्या निधनाचीच वार्ता कानावर आली. तेव्हा मला पनवेलची ती माडी आठवली. दिघ्यांबरोबर मनसोक्त केलेली ती चर्चा आठवली. त्या गप्पा, हसणे, बोलणे आठवले आणि मन उदास झाले.

या वर्षी बाबूराव पेंटर यांची जन्मशताब्दी साजरी होत आहे. त्या निमित्ताने त्यांच्या कलेबद्दल, कर्तृत्वाबद्दल अनेक लेख लिहिले जात आहेत. त्यांच्या चित्रांचे, शिल्पांचे प्रदर्शनही नुकतेच भरले होते. बाबूराव पेंटरांवरचे ते लेख वाचताना, त्यांच्या कलाकृतींची छायाचित्रे बघताना एक फार जुनी आठवण मनात जागी झाली. तेव्हा बाबूराव दादरला विजयनगरमध्ये आपल्या मेव्हण्यांकडे आले होते आणि कुठल्या तरी एका वृत्तपत्राने, बहुधा 'लोकसत्ता'ने त्यांची मुलाखत घेण्याचे काम

मजवर सोपवले. मुलाखत मला आता काहीच आठवत नाही ! मुलाखतीचे कात्रणही मजजवळ असेल की नाही कोण जाणे, पण बाबूरावांची ती भेट मात्र मला चांगली आठवते. त्यांचे बोलणे स्पष्ट नव्हते. दाढीमुळे ते सर्वसामान्य माणसापेक्षा वेगळेच दिसत आणि त्यांच्या नावाचा तर फारच मोठा दबदबा होता. त्यामुळे मी मनातून फार घाबरले होते. पण बाबूराव माझ्याशी अतिशय मोकळेपणाने वागले, बोलले. त्यांच्या वृत्तीत साधेपणा होता, वात्सल्य होते आणि त्याबरोबरच खास कोल्हापुरी वाणाची अशी एक अस्सल आणि दुर्मिळ अशी विनोदबुद्धी होती. पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवातून मिळालेले ज्ञान जास्त मोलाचे असते, असा एक सिद्धान्त ते मला सांगत होते. त्या अनुषंगाने एक फार मजेदार गोष्ट त्यांनी मला सांगितली. ती मात्र माझ्या आजही ध्यानात आहे. गोष्ट अशी— परदेशातून इंजिनिअरिंगची मोठी पदवी घेऊन आलेले एक गृहस्थ कोल्हापूरजवळच्या एका खेड्यात आले होते. दिवस पावसाचे होते. नदी तुडुंब भरलेली होती. इंजिनिअर साहेबांना बैलगाडीतून नदी ओलांडायची होती. गाडीवाला त्यांना म्हणाला, 'साहेब, या दिवसात नदीमध्ये गाडी घालणे धोक्याचे असते. पाण्याला फार ओढ असते. गाडीला, बैलांना, माणसांना ते काही बरं नाही.' पण साहेब ऐकायला तयार नव्हते. त्यांना आपल्या पुस्तकी ज्ञानाची, विद्वत्तेची घमेंड होती. त्यांनी लगेच एक कागद काढला. त्यावर गणित मांडले. नदीची लांबी, रुंदी, पाण्याचे घनफुटात केलेले मोजमाप, पाण्याची असलेली खोली व पाण्याची खेच साऱ्यांचा हिशोब केला. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार सर्व झाले. शेवटी विजयानंदाने साहेब मजकूर ओरडले,

'बघ, शून्यास शून्ये उडाली. गाडी खुशाल पाण्यात घाल !'

गाडीवान त्यावर काय बोलतो ? त्याने गाडी पाण्यात घातली. अर्ध्या प्रवासात गाडी जाते न जाते, तो बैल सापटीतून सुटून वाहत गेले. गाडी वाहावली. गाडीवानाने इंजिनिअर साहेबांना बुडताबुडता वाचवून पाण्याबाहेर आणले. थंडीने व भीतीने ते थरथर कापत होते. त्यांना जरा शांत होऊ दिल्यावर गाडीवान मिष्किलपणे म्हणाला,

'साहेब, एक प्रश्न विचारू ?'

साहेबांनी नुसतीच मान हलवली. त्यांच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

'साहेब,' गाडीवान म्हणाला, 'मघाशी तुम्ही एवढं थोरलं गणित मांडलं आणि म्हणालात, शून्यास शून्ये उडाली, तर आता मला एकच सांगा, शून्यास शून्ये उडाली,

तर गाडी बैलं कशी काय बुडाली ?'

इंजिनिअर साहेब काय बोलणार ? ते मुकाट बसले.

बाबूराव पेंटर यांच्यावरचे अनेक लेख वाचताना मला ती गोष्ट आठवली. ती सांगताना बाबूरावांचे चमकणारे डोळे, मुद्रेवरचे मिष्किल स्मित आठवले आणि त्या कलावंतामधल्या गमतीशीर विनोदी माणसाचा हृद्य साक्षात्कार झाला.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. ३४८६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# पुठ्ठे, कव्हरे, सैनिकीकरण. . .

मी पुण्याला कायमची राहण्यासाठी आले तेव्हा भावाने माझ्यासाठी माडीवर नवीन खोल्या बांधल्या. परवा एक साहित्यिक मित्र सहज मला भेटण्यासाठी म्हणून घरी आला होता. त्याला मी माझी ही जागा दाखवली. बाहेरच्या खोलीतल्या भिंतीमध्ये पुस्तकांसाठी मुद्दाम उघड्या कप्प्यांचे लाकडी फडताळ केलेले आहे, तेही दाखवले. माझ्या आवडीची सर्व पुस्तके मी तिथे काळजीपूर्वक, मोठ्या प्रेमाने ठेवली आहेत. माझा हा मित्र स्वतः चांगला साहित्यिक आहे, तसाच तो खूप पुस्तकवेडाही आहे. जुनी नवी पुस्तके तो सतत गोळा करत असतो. माझा पुस्तकसंग्रह खास काही नसला तरी बऱ्यापैकी आहे. तो बघून माझ्या मित्राला कौतुक वाटेल, अशी माझी कल्पना होती, पण तो त्या पुस्तकांकडे कपाळाला आठ्या घालून बघत राहिला. त्याच्या नजरेत थोडी कीव, थोडा राग, थोडा तिटकारा अशा अनेक भावनांचे मिश्रण झालेले दिसले. मी गोंधळून त्याला विचारले,

'का ? काय झालं ? पुस्तकं आवडली नाहीत माझी तुम्हाला ?'

'पुस्तकं चांगली आहेत.' मित्र म्हणाला. 'म्हणजे खरंच चांगली आहेत !'

'मग ?' मी प्रश्न केला.

'पुस्तकांना ती कव्हरं कशाला घातली आहेत ?' मित्र म्हणाला. 'मला ती खाकी कव्हरं मुळीच आवडत नाहीत. पुस्तकांचं पुस्तकपणच नाहीसं होतं त्यामुळं ! कशी बिचारी निमूट केविलवाणी बसली आहेत बघा. आधी ती कव्हरं काढून टाका बघू, की मी काढून टाकू ?'

'नको, नको !' मी घाईघाईने म्हटले.

'माझं म्हणणं पटलेलं दिसत नाही तुम्हाला !' मित्र जरा कणवेने हसून म्हणाला. खरे तर त्याचे म्हणणे मला पटले नव्हतेच. पण कुणाला विरोध करणे माझ्या

स्वभावात नाही. त्यामुळे मी त्याला म्हटले, 'नाही. तुमचं म्हणणं बरोबर आहे. .. पण... मी काढीन ना कव्हरं माझ्या सवडीने ! तुम्हाला कशाला उगीच त्रास ?'

नंतर चहापाणी झाले. मित्र माझा निरोप घेऊन निघून गेला. त्याचे म्हणणे मला पटले नव्हते, पण त्यामुळे मी जरा अस्वस्थ, अंतर्मुख झाले होते, हे मात्र खरे. तो गेल्यावर मी विचार करू लागले. खरेच, आपण पुस्तकांना कव्हरे का घालतो ? त्यामागे आपली नेमकी कोणती मानसिक गरज असते ? माणसाला अनेक चित्रविचित्र, स्पष्टीकरणं न देता येण्याजोग्या खोडी असतात. तशीच माझी ही एक खोड आहे. एखादे पुस्तक, मग ते मी स्वतः खरेदी केलेले असो, कुणी मला प्रेमाने भेट दिलेले असो, पहिली जर काही गोष्ट मी करत असेन, तर ती म्हणजे त्या पुस्तकाला ब्राऊन पेपरचा व्यवस्थित, नीटनेटका पुठ्ठा घालणे. तो घातल्याशिवाय मला चैनच पडत नाही. माझ्याकडे अनेक पुस्तके अशी आहेत की, ती मी अद्याप धड वाचलीसुद्धा नाहीत, पण त्यांना पुठ्ठे, कव्हरे घालण्याचे काम मात्र मी अगदी ताबडतोब केलेले आहे. त्यासाठी केवळ ब्राऊन पेपरवर मी कितीतरी पैसे खर्च करते. माझ्याबाबतीत ते एक अगदी धार्मिक कर्मकाण्ड—Ritual– होऊन बसले आहे. हे मी का करते ? पुस्तके हाताळून खराब होतात म्हणून त्यांना कव्हरे घालायची असतात, हे तर सर्वांनाच ठाऊक आहे. पण हे काही संपूर्णतया खरे नाही. अलीकडे मराठीत पुस्तकांची निर्मितिमूल्ये उत्तम असतात. पुस्तकावर जाणकार, कलाकुशल चित्रकाराचे पुस्तकातल्या आशयाला अर्थपूर्ण परिमाण देणारे सुरेख चित्र असते. मागल्या बाजूला पुस्तकाचे वैशिष्ट्य थोडक्यात सांगणारा मजकूर असतो. काही पुस्तकांच्या मागच्या पानावर त्या त्या लेखकांची, कवींची छायाचित्रेही असतात. पुस्तकाचा संपूर्ण आस्वाद घ्यायचा म्हटले तर वरचे चित्र, मागचा मजकूर, लेखक-कवींचे छायाचित्र हे सर्व एका दृष्टीने आवश्यक, अपरिहार्य असते आणि तरीही पुस्तक हाती येताच ते घाईघाईने बघून लगेच मी ते जाड पुठ्ठ्याआड बंदिस्त करून टाकते. पुस्तकांना कव्हरे घालण्याचा माझा हा उद्योग न चुकता अगदी धडाक्याने चालू असतो.

मी विचार करू लागले. आपल्याला ही सवय कशी लागली ? कुणी लावली ? आणि मन एकदम भूतकाळात गेले. मी तेव्हा शाळेत शिकत होते. काकांकडे राहात होते. आमचे घर गरीब होते. त्यात काका आवडीने आम्हा सर्व भावंडांची शिक्षणे करत होते. मी घरातली थोरली मुलगी. माझी पुस्तके पुढे धाकट्या भावंडांना

उपयोगी पडायची. त्यासाठी ती जपणे, नीट वापरणे, त्यावर वेडीवाकडी चित्रे न रेखाटणे आवश्यक होते. आमचे काका या बाबतीत फार कडक होते आणि पुस्तकेच काय, पण कोणतीही वस्तू पुरवून पुरवून वापरणे हा त्या काळात गरीब श्रीमंत साऱ्याच घरांतला दंडक होता. आजच्यासारखा तो श्रीमंतीच्या फुगवट्याचा, उधळमाधळ करण्याचा काळ नव्हता. आणि आमच्या घरात शिक्षणाची परंपराही नव्हती. त्यामुळे शाळा, अभ्यास, पुस्तके या गोष्टींना तिथे एक धार्मिक म्हणावे असे महत्त्व प्राप्त झालेले होते. पुस्तकाला, वहीला पाय लागला तर पाया पडावे अशी घरची शिकवण होती. आणि ती आम्ही भक्तिभावाने पाळत असू. परीक्षा पास होऊन नव्या वर्गात मी गेले की, काका माझ्यासाठी अभ्यासाची नवी पुस्तके विकत आणत. त्याबरोबर भरपूर ब्राऊन पेपर. पुस्तकांचे कोरे रंगरूप, त्यांचा विशिष्ट ताजा वास यांमुळे मी हरखून जाई. एका अनोख्या आपलेपणाच्या भावनेने मन भरून येई. इकडे काका पुस्तके, कात्री, डिंक इत्यादी साहित्य पुढ्यात घेऊन बसत. कात्रीने कागद कापत आणि एकेका पुस्तकाला अगदी काळजीपूर्वक कव्हर घालत. काका कव्हरे छान घालायचे. कागदाचे कातरकाम, पुठ्ठ्याची नीटनेटकी घडी, त्रिकोणी कापलेले कोपरे, आतल्या बाजूच्या पट्ट्या अलगद दुमडणे आणि त्या डिंकाने चिकटवणे सारे कसे नेटके, निर्दोष असे. कव्हरे घालून एकावर एक रचून ठेवलेली पुस्तके अक्षरशः सुंदर दिसत, पण तो नुसता सौंदर्यानुभव नसे. त्यात एक सुरक्षिततेची भावनाही असे. जणू पुस्तकांनाच नव्हे, तर मलाही काकांनी 'कव्हर' घालून आपलेसे केले आहे, असे काहीतरी मनात येऊन जाई. त्या वयात ती भावना हवीहवीशी वाटे.

त्या वेळी मी हुजूरपागेत जात होते आणि शाळेत एक घटना घडली. आमच्या लेडी सुपरिंटेंडंटच्या मनात आले की, मुलींना शाळेचा गणवेष असावा. लगेच त्यांनी आमच्याकडून पैसे गोळा केले आणि लाल काठाच्या पांढऱ्या साड्यांचा गणवेष आम्हा मुलींना दिला. त्या साड्या बघून आम्ही काय पण आनंदून गेलो होतो ! आता आपण या साड्या नेसलो की हुजूरपागेच्या अगदी अधिकृत विद्यार्थिनी दिसू, या जाणिवेने मन अभिमानाने तुडुंब भरून आले. काका पुस्तकांना कव्हरे घालत, तसे शाळेनेही या साडीचे एक कव्हरच जणू आमच्यावर चढवले होते ! आणि पुस्तकांना कव्हर घातल्यावर वाटे, तशी एक सुरक्षिततेची भावना त्या साडीने आम्हाला दिली होती.

हा वेळपावेतो काकांनी मला स्वतःला कव्हरे घालायला शिकवले होते आणि माझ्या पुस्तकांना मीच कव्हरे घालू लागले होते. मी काकांच्या इतकी नाही, तरी खूपच व्यवस्थित कव्हरे घाली आणि त्या कसबाचा मला अभिमानही वाटे. कॉलेजात शिकू लागले, तेव्हा पुस्तकांच्या जोडीला टिपणे घेण्यासाठी जाड पुठ्ठ्यांची बाऊंडबुके आली व माझ्या सवयीप्रमाणे त्यांनाही छान कव्हरे चढली. त्या कव्हरांवर कोरीव अक्षरात 'वाङ्मयाचा इतिहास', 'काव्यशास्त्र', 'संस्कृत-पहिला पेपर', 'संस्कृत-दुसरा पेपर', 'व्याकरण' अशी विषयांची नावे लिहिताना आपल्या विद्वतेचा, अभ्यासूपणाचा (इतर कुणाला फारसा न येणारा) प्रत्यय मला येई आणि मन सुखावे. त्याबरोबर एक जबाबदारीची जाणीवही वाटू लागे. तरी अजून कव्हरांना एक व्यावहारिक उपयुक्तता इतकेच माझ्या लेखी महत्त्व होते आणि त्याबरोबर स्वतःला वाटणाऱ्या सुरक्षिततेची एक भावना होती. पण याच सुमाराला कधीतरी माधव ज्यूलियनांचे 'विरहतरंग' मी वाचले आणि पुस्तकांच्या कव्हरांना अचानक फार सुंदर असा एक 'रोमँटिक' संदर्भ मिळाला. तो काळ कविता-कादंबऱ्यांच्या वाचनात गढून जाण्याचा आणि नायिकेच्या ठिकाणी स्वतःला कल्पून स्वप्नरंजनात रमण्याचा होता. 'विरहतरंगा'ची नायिका इंदू ही कॉलेजात शिकणारी, 'अभ्यासू, रमणीय' अशी विद्यार्थिनी असते. तिला अभ्यासाला स्वतंत्र खोली असते. (आम्हाला त्या वयात अशा खोल्या कुठून मिळायला ?) इंदूच्या त्या खोलीचे वर्णन करताना माधव ज्यूलियनांनी लिहिले आहे—

पुठ्ठे घालून नीट बाजुस उभी रांगेमध्ये पुस्तके
ग्रीकांचा इतिहास, भूमिति, महाकाव्ये, कथा, नाटके,
हार्डी, केशवमिश्र, टेनिसन ये तो कालिदासासह,
चित्रे रम्य जयांमध्ये प्रिय तुझे ते 'गर्व-पूर्वग्रह'

या ओळीत निर्देशिलेल्या पुस्तकांहून आम्हाला नेमलेली पुस्तके वेगळी होती. पण म्हणून काय झाले ? इंदूप्रमाणेच मीही कॉलेज विद्यार्थिनीच होते ना ? तेवढे साम्य मला पुरेसे होते. इंदूसारखी अभ्यासाची स्वतंत्र खोली नसली, तरी तिच्यासारखी माझ्याजवळही कॉलेजची पुस्तके होती. त्यांना नीटनेटकी कव्हरे घालून मीही ती रांगेने फळीवर ठेवू शकत होते. त्या वेडेपणाचे आज हसू येते. पण त्या काळी तेवढ्या साधर्म्याने देखील मन इंदूशी सामरस्य अनुभवू शकत होते.

माधव ज्यूलियनांच्या इंदूप्रमाणेच फडके-खांडेकरांच्या नायिकाही कॉलेज विद्यार्थिनी होत्या आणि आम्ही कधी निर्मलेत तर कधी इंदूमतीत, कधी मंदाकिनीत, तर कधी सुलभेत आमची प्रतिबिंबे बघत होतो. दिवास्वप्नांत रमून जात होतो !

आता मी जेव्हा विचार करते, तेव्हा पुस्तकांना कव्हरे घालण्याच्या माझ्या हव्यासाचे मला थोडे स्पष्टीकरण करता येते. मला असे वाटते की, जेव्हा स्वतःला कसलेच व्यक्तिवैशिष्ट्य नसते, स्वतःची 'आयडेंटिटी' स्वतःला सापडलेली नसते, तेव्हा समूहात मिरवण्याचा, त्याच्याशी एकरूप होण्याचाच एक आनंद हवा असतो. त्यातून मिळणारा Sense of belonging ही मनाची फार मोठी गरज असते. साऱ्या पुस्तकांना कव्हरे घालून त्यांना बाह्यतः एकरूप करताना मी माझ्याच मनाची ती गरज भागवत होते. पुस्तकांना कव्हरे घालणे, माणसांना गणवेष देणे म्हणजे त्यांचे स्वतःचे खास वेगळेपण नाहीसे करून त्यांना सैनिकांसारखे रांगेत उभे करणे, त्यांचे सैनिकीकरण करणे होय, असे आता आपण मानतो. हे सैनिकीकरण लेखक, कलावंत यांचेही केले जाते. त्यांनी एकसारखे एकाच विषयावर लिहावे, एकाच राजनीतीचा, एकाच तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करावा, अशी जबरदस्ती रशियासारख्या देशात केली गेल्याचे आपण ऐकतो. माणसाचा मुक्त आत्मा तिथे बंदिस्त करून त्यावर वैचारिक गणवेष चढवला जातो. पुठ्ठे घातलेल्या पुस्तकांची त्याला कळा येते, हेही आपल्याला माहीत असते. खरी गरज कव्हरे घालण्याची नव्हे, तर ती काढून टाकण्याची. आपल्या नेमक्या वेगळेपणाचा कसून शोध घेण्याची, मोकळ्या हवेत श्वासोच्छ्वास करण्याची, मुक्त अनिर्बंध वातावरणात विहरण्याची, आपले मनोगत मोकळ्या आणि उंच स्वरात बोलून दाखवण्याची आहे. ग्रंथ हे तर माणसाच्या विचारस्वातंत्र्याचे, उच्चारस्वातंत्र्याचे सुंदर प्रतीक आहे. मग त्यांना असे बंदिस्त का करून ठेवायचे ? माझ्याजवळच्या बऱ्यावाईट, लहानमोठ्या पुस्तकांना कव्हरांचे ते खाकी गणवेष चढवून मी त्यांचे एक प्रकारे सैनिकीकरण तर करत नसेन ना ? माझ्या साहित्यिक मित्राला पुस्तकांच्या कव्हरांचा इतका राग आला त्याचे हेच कारण असेल का ?

आता मलाही वाटू लागले आहे की, मजजवळच्या पुस्तकांना चढवलेली सर्व कव्हरे काढून टाकावीत. त्यांचे गणवेष उतरवावेत. त्यांची 'आयडेंटिटी' त्यांना द्यावी. त्यांच्या केवळ अंतरंगालाच नव्हे, तर बहिरंगालाही मोकळ्या हवेचा ताजा उत्तेजक स्पर्श होऊ द्यावा. आल्या गेल्या साऱ्यांना ती बघू द्यावीत. हाताळू द्यावीत.

पण खरी अडचण वेगळीच आहे. कव्हरांची ती गरज पुस्तकांची नसून कदाचित माझीच असेल तर ?... अशा मानसिक गणवेषाखेरीज मलाच पोरके, असुरक्षित वाटत असेल तर ?...

□

# थोडेसे शब्दांविषयी

या जगात अनेक चित्रविचित्र गोष्टी आहेत, पण माणसामाणसांमधील संबंधांइतके कुतूहलजनक आणि विस्मयकारक त्यात दुसरे काही असेलसे मला वाटत नाही. माणूस हा सामाजिक प्राणी आहे, तो कळप करून राहणारा प्राणी आहे, असे आपण म्हणतो. सामाजिकात किंवा कळपात परस्परसंबंध सतत येणारच. ते टाळणे केवळ अशक्य असते आणि या संबंधांतून अनेक समस्या उद्‌भवतात. परस्परांबद्दल निर्माण होणारे गैरसमज ही त्यांतील एक सार्वभौम समस्या. या गैरसमजांना वेगवेगळ्या गोष्टी कारणीभूत होत असतील, पण भाषेचे अज्ञान हे त्यांचे एक प्रमुख कारण आहे. माणसामाणसांतले अनेक गैरसमज भाषेच्या अज्ञानातून किंवा वेगळ्या ज्ञानातून निर्माण होतात. याची कितीतरी गमतीदार उदाहरणे देता येतील.

भाषा हे माणसांच्या सामाजिक अभिसरणाचे एक प्रमुख साधन. आपण एकमेकांशी संवाद किंवा विसंवाद साधतो, तो मुख्यत्वे भाषेच्या द्वारा. भाषा ही शब्दांची बनलेली असते. शब्द हा एक सामाजिक संकेत असतो. पण हा संकेत प्रांतपरत्वे, माणसाच्या सामाजिक श्रेणीपरत्वे, भाषाभिन्नत्वापरत्वे बदलत असतो. इतकेच नव्हे, तर माणसागणिक शब्दाचा अर्थ वेगळा होऊ शकतो. शब्दाच्या मागे उभा असलेला अर्थ प्रत्येकाचे पूर्वजीवन, त्याचे अनुभवसंचित, त्याच्या वाट्याला आलेली सुखदुःखे यांमधून सिद्ध झालेला असतो. म्हणजे असे पहा की, दोन व्यक्ती एकमेकांशी बोलताना एकच शब्द वापरत असतात, पण प्रत्येकाच्या मनातली त्या शब्दाच्या अर्थाची संकल्पना मात्र अगदी वेगळी असते. 'भूक' हा शब्दच घ्या. तो गरीब आणि श्रीमंत दोघेही वापरतात, पण दोघांच्या 'भुकां'च्या कल्पनेत जमीन-अस्मानाचे अंतर असते. श्रीमंताची भूक एवढे-तेवढे तोंडात टाकून तृप्त

होणारी; तर गरिबाची भूक सदैव त्याची आतडी कुरतडून रात्री त्याला झोपसुद्धा येऊ न देणारी. 'श्रीमंती' हा शब्दही असाच स्थलकालपरत्वे बदलत जाणारा. मला आठवते, माझ्या लहानपणी एखाद्याजवळ आठदहा हजारांची पुंजी असेल, तर तो सहज 'श्रीमंत' ठरत असे. पण आजची 'श्रीमंती'ची व्याख्या किती बदलली आहे ! हजाराची जागा लाखांनी घेतली आहे. तिशीच्या आतबाहेर असणारी तरुण मुले जेव्हा पाचदहा लाखाच्या गोष्टी हवापाण्याच्या गोष्टींइतक्या सहजपणे बोलू लागतात तेव्हा माझ्यासारखीला त्याचा अचंबा वाटल्याखेरीज राहात नाही. 'स्वस्त' आणि 'महाग' या शब्दांचे अर्थही असेच पिढ्यांच्या अंतरांवर ठरत असतात. माझी एक तरुण मैत्रीण परवा आठ साड्या खरेदी करून आली आणि त्या ती मला दाखवू लागली. आधी एका वेळी इतक्या साड्या कुणी खरेदी करू शकते, हीच गोष्ट मला अद्यापही अद्‌भुत वाटते. वर्षाकाठी दोन साड्या पुरवून पुरवून जपून वापरण्यात माझे तरुण वयच नव्हे, तर प्रौढ वयातलीही अनेक वर्षे गेली. ठेवणीतली एखादी भारी ( !) साडी असली की, आम्हाला तेवढे पुरी होत असे. ती साडी कॉलेजच्या गॅदरिंगपासून लग्न-मुंजीसारख्या समारंभापर्यंत सरसकट आम्ही नेसत असू आणि त्यात काही वावगे आहे असे कुणाला वाटत नसे. अशा मला एकदम आठ साड्यांची खरेदी म्हणजे जरा जास्तच वाटल्यास त्यात काही आश्चर्य नव्हते, पण त्याहीपेक्षा विशेष म्हणजे मैत्रीण त्या साड्या सेलमध्ये 'स्वस्तात' मिळाल्याचे मला मोठ्या आनंदाने आणि अभिमानाने सांगू लागली, तेव्हा मात्र मी चकरावले. आठशेची साडी सहाशेला, हजाराची आठशेला, पाचशेची अडीचशेला अशा 'स्वस्त' किमती मी तिच्या तोंडून ऐकल्या आणि माझा विस्मय मनात मावेनासा झाला. त्या स्वस्त ( !) साड्यांच्या किमतीचा हिशेब करता करता माझाच श्वास कोंडायची वेळ आली. खरे तर माझ्या या मैत्रिणीला कपड्यांचे जरा जादाच वेड आहे. तिच्याकडे आधीच साड्यांचा भरपूर स्टॉक आहे. असे असता पुन्हा या इतक्या साड्या खरेदी करण्याची निकड तिला का वाटली, हेच आधी मला कळेना आणि ती खरेदीही इतके पैसे एकरकमी घालवून ! जणू माझेच पैसे गेले आहेत अशी मला हळहळ वाटू लागली. मी तसे तिला म्हटले देखील. म्हटले, 'अग, इतक्या भारी साड्या, एवढे पैसे खर्चून घ्यायची तुला काही आवश्यकता होती का ? तुझ्याकडे तर केवढ्या तरी साड्या पडल्या आहेत.'

त्यावर मैत्रिणीने माझी कीव करणाऱ्या नजरेने एकवेळ माझ्याकडे पाहिले

आणि मग किंचित हसून ती म्हणाली,

'तुला नाही ते कळायचं ! अग, सेलमध्ये या साड्या किती स्वस्त मिळाल्या मला, बघ ना ! प्रत्येक साडीमागे दोनशेतीनशे रुपये वाचले ना माझे ! म्हणजे एकूण सौदा फायद्यातच पडला की ! आता भरपूर साड्यांचं म्हणशील, तर साड्या कधीच जास्त होत नाहीत. जितक्या नव्या साड्या संग्रही जमा होतील तितक्या हव्याच असतात आजकाल !'

मैत्रिणीचे बोलणे ऐकले आणि मी गप्प बसले. 'स्वस्त' आणि 'महाग' या शब्दांचे आमचे दोघींचे अर्थच वेगवेगळे होते. मला तीनशे रुपयांची साडीसुद्धा 'महाग' वाटते आणि मैत्रिणीला आठशे-नऊशे रुपयांची साडीदेखील 'सेल'मध्ये मूळ किमत जरा कमी करून मिळाली, तर ती 'स्वस्त'च वाटते. हा आमच्या दोघींच्या स्वभावातलाच मूलभूत भेद आहे, त्याला काय करायचे ? स्वभावभिन्नतेप्रमाणेच पिढ्यांच्या अंतरानेही शब्दांचे अर्थ बदलतात. माझ्या आईचे वय आता बरेच आहे. ती आपल्या तरुणपणच्या काळातल्या हकीकती सांगताना तेव्हाच्या किमतींचा हटकून उल्लेख करते आणि त्या तुलनेने आजचे सारेच तिला 'महाग' वाटते. चौदा-सोळा रुपयाला तोळाभर सोने तिने घेतलेले आहे. गव्हाचे-तांदळाचे पोते दोन-तीन रुपयांना खरेदी करण्याचा काळ तिने अनुभवला आहे. भाकरीसारखी जाड साय ज्यावर येत असे, अशा गंधासारख्या दाट दुधावर आणि कणीदार साजूक तुपावर तिचा पिंड पोसलेला आहे. अशा आठवणींचा बहुमूल्य साठा तिच्यापाशी आहे. त्या तुलनेने आजचे सारे तिला निकस, निःसत्व, भिकार आणि महागडे वाटत असल्यास, त्यात काही नवल नाही. किमती कशा वाढत जातात, रुपयाचे अवमूल्यन कसे होते, चलनफुगवटा का व कसा निर्माण होतो, याविषयी माझेच ज्ञान मुळात फार तुटपुंजे आहे आणि तरीही कधी जर मी तिला काही समजावून सांगू लागले, तर तिचे एक वाक्य त्यावर अगदी ठरलेले असते,

'काही सांगू नकोस मला आजकालच्या गोष्टी. तुझ्यापेक्षा मी खूप आयुष्य पाहिलं आहे आणि खूप चांगले दिवस अनुभवलेले आहेत !'

तिच्या या बोलण्यावर माझ्यापाशी काही उत्तर नसते.

पिढ्या किंवा स्वभावधर्म यांतल्या भेदामुळेच माणसामाणसांतला शाब्दिक संवाद तुटतो असे नाही, इतरही अनेक कारणांमुळे तो तुटू शकतो. मला आठवते, ना. धों. महानोरांची एक कविता मी वाचत होते. कविता सुंदर होती, पण त्यातल्या

दोन ओळींवर मी अडले,

तिचा मरठ भरला

मीही चांदण्या गोंदून

'मी चांदण्या गोंदून तिचा मरठ भरला', असा या ओळींचा अन्वय मला सरळ लावता आला, पण 'मरठ' म्हणजे काय ? त्या शब्दाचा अर्थ काही केल्या मला कळेना. मी अनेक प्रकारे माझी कल्पनाशक्ती लढवून पाहिली, पण 'मरठ' शब्द मला अनोळखीच राहिला. नंतर एकदा स्वतः महानोरच भेटले, तेव्हा त्यांना मी 'मरठ' शब्दाचा खुलासा विचारला. ते माझ्याकडे विस्मयाने बघत राहिले आणि मग म्हणाले,

'शांताबाई, तुमचं बरंच आयुष्य खेड्यात गेलंय ना ?'

'हो, गेलंय.' मी म्हटले.

'मग तुमच्यात लग्नाकार्यामध्ये मरठ नाही भरत ?'

'अहो, पण मरठ म्हणजे काय, तेच जर मला ठाऊक नाही, तर लग्नाकार्यात मरठ भरतात की नाही, ते मी कशी सांगणार ?'

महानोर हसत सुटले. मग ते म्हणाले,

'असं काय करता ? मरठ तुम्हाला नक्कीच ठाऊक असणार. कोरडं कुंकू पाण्यात भिजवून ते कपाळावर माखतात बायका. आणि त्यावर अक्षता चिकटवतात. तो मरठ पाहिला नाही कधी ?'

'मळवट !' मी एकदम उत्साहाने ओरडले. ओले कुंकू कपाळभर माखून, त्यावर अक्षता चिकटवून तो मळवट भरून माझ्या बाळपणी अनेक लग्नांतून मी हौसेने मिरवले होते. महानोरांच्या खुलाशाने माझी ती आठवण इतक्या तीव्रतेने जागी झाली की, ओल्या कुंकवाचा तो विशिष्ट हवाहवासा वासदेखील एकदम माझ्या अवतीभोवती दरवळू लागला. मला खुणावू लागला. चांदण्या गोंदून मळवट भरण्याच्या महानोरांच्या कल्पनेतले काव्यसौंदर्यही मनाला भिडले आणि आतापर्यंत केवळ एका अनोळखी शब्दामुळे दुर्बोध राहिलेली ती कविता कशी सहजपणे सरसर उलगडत गेली.

शब्दाचा अर्थ न कळल्यामुळे दोन माणसांत होणाऱ्या गैरसमजाची आणखी एक गमतीदार आठवण आहे. फार वर्षांपूर्वीची गोष्ट. मुळगावकर तेव्हा फार लोकप्रिय चित्रकार होते. दलालांच्या बरोबरीने मुळगावकरांचीही चित्रे अनेक

मराठी पुस्तकांची मुखपृष्ठे सजवत असत. एकदा मी माझ्या काही कामासाठी मुळगावकरांकडे गेले होते. त्यांच्या स्टुडिओत आम्ही बोलत बसलो होतो. तेवढ्यात एक नवोदित लेखिका मुळगावकरांकडे आली. तिचे पहिलेच पुस्तक — एक कथासंग्रह — प्रकाशित व्हायचे होते. पुस्तकावर तिला मुळगावकरांचे चित्र हवे होते. त्यासाठी व्यक्तिशः स्वतः त्यांना भेटून विनंती करावी म्हणून ती आली होती. तिने मुळगावकरांना आपले कामाचे स्वरूप समजावून सांगितले. दिवाळी तोंडावर येऊन ठेपली होती. मुळगावकर अनेक मासिकांची सजावट करण्यात गुंतले होते. ते त्या लेखिकेला म्हणाले,

'काम खूप आहे हो. तुमच्या पुस्तकाचं मुखपृष्ठ करायला मला वेळ होईलसं दिसत नाही.'

'तुम्ही काय हो, मनात आणलं तर ताबडतोब माझ्या चित्राचं काम कराल, अगदी सिद्धहस्त चित्रकार आहात तुम्ही !' ती लेखिका म्हणाली. का कोण जाणे, तिचे बोलणे ऐकून मुळगावकर एकदम फार नाराज झाल्यासारखे दिसले. त्यांनी त्या लेखिकेचे काम नाकारले. पण तिने बरीच आर्जवे केली. मीही थोडी रदबदली केली. मग त्यांनी मुखपृष्ठ काढायला संमती दिली. ती लेखिका निघून गेली. मी मात्र बुचकळ्यात पडले होते. ती गेल्यानंतर मी मुळगावकरांना त्यांच्या नाराजीचे कारण विचारले. त्यावर ते भडकून म्हणाले,

'एवढीशी लेखिका. आत्ता कुठे पहिलं पुस्तक निघतंय. तो ही चोर मला खुशाल 'सिद्धहस्त' म्हणते ! वाटलो कोण मी तिला ?'

माझ्या ध्यानात आले. 'सिद्धहस्त' शब्दाविषयी मुळगावकरांचा गैरसमज झाला होता. जो शब्द बिचाऱ्या लेखिकेने स्तुतिपर म्हणून वापरला होता, ती मुळगावकरांना आपली निंदा वाटली होती. 'सिद्धहस्त' म्हणजे 'सिद्धसाधक', 'लबाड' असा काहीतरी त्यांचा समज झाला होता. मग मी 'सिद्धहस्त' म्हणजे काय, ते म्हणताना त्या लेखिकेला मुळगावकरांची चित्रकलेची सहजता, चापल्य कसे अभिप्रेत होते, पर्यायाने ती त्यांचे कलावंत म्हणून मोठेपणच कसे सांगत होती, हे सारे त्यांना सविस्तर समजावून सांगितले, तेव्हा कुठे त्यांचा गैरसमज आणि राग दूर झाला.

वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळ्या अर्थांनी त्याच गोष्टीचे, त्याच वस्तूचे वर्णन केले जाते. एकच मराठी भाषा, पण ती कोकणात निराळी, साताऱ्याकडे निराळी,

खानदेशात निराळी, वऱ्हाडात निराळी आणि मराठवाड्यात तर आणखीच निराळी. आपल्या अळूच्या पानांना खानदेशात 'पोथीची पाने' म्हणतात, हे मी ऐकले आणि अळूच्या पानांना अर्थाचे एक वेगळे परिमाण मिळाले. बेळगावच्या मराठीला कानडीचा हळुवार स्पर्श झाला आहे, तर मराठवाड्यातल्या मराठीला उर्दूची वळणे मिळाली आहेत. मराठवाड्यातल्या एका लेखकाशी बोलताना त्यांच्या तोंडी 'दस्ती' हा शब्द आला, तेव्हा मी बुचकळयात पडले. 'दस्ती' म्हणजे काय, ते मला मुळीच कळेना. तेव्हा त्यांनी हसत हसत खिशातली 'दस्ती' मला काढून दाखवली आणि मग 'दस्ती' म्हणजे हातरुमाल हे ज्ञान मला झाले. माझा थोरला भाऊ जवळजवळ चौदापंधरा वर्षे मद्रासला राहत होता. तेव्हा त्या सर्वच मंडळींना तमीळ उत्तम येऊ लागले. मद्रासेत एकूण फुले खूप आणि तिकडच्या बायकांच्या केसांत फुलेही सतत माळलेली. या फुलांना तिकडे मजेदार नावे असतात. आपल्या चमेलीला तिकडे 'जादिमल्ली' म्हणतात, तर मोगऱ्याला 'गुंडुमल्ली' म्हणतात. 'जादिमल्ली'ची जातकुळी चक्क संस्कृत आहे. 'जाति' म्हणजे संस्कृतात जाईचे फूल आणि 'जातिमल्ली' म्हणजे अर्थात जाईची वेल. तमिळमध्ये 'जाति'चे 'जादि' झाले. मोगऱ्याला 'गुंडुमल्ली' हा शब्द तर मला फारच समर्पक आणि अर्थपूर्ण वाटला. टपोरा मोगरा गुंड मुलासारखा गुटगुटीत वाटतो ना !

साहित्यातले-विशेषतः कवितेतले शब्द कळणे तर अधिकच अवघड जाते. कारण ते अनुभवाशी संलग्न असतात. चिपळूणच्या सुप्रसिद्ध माधव कवींची 'हिरवे तळकोकण' ही एक अतिशय गोड कविता आहे. मला ती फार आवडते. बरीचशी पाठही आहे. कोकणातला निसर्ग, तिथला समुद्र, तिथली झाडे, फुले, तिथल्या सुंदर दंतकथा यांचे या कवितेत अतिशय सुंदर वर्णन आले आहे. त्यांच्या इतर कवितांतही कोकणातील निसर्गाचे संदर्भ वारंवार येतात. शाळकरी वयापासून ही कविता मी वाचत आले आहे; पण गतवर्षी कोकणात चिपळूण इथे मी गेले, ऐन श्रावणातला, पावसात निथळणारा तिथला सुंदर निसर्ग मी पाहिला आणि माधव कवींच्या कवितेचे स्वारस्य कितीतरी उत्कटतेने मनात मुरत गेले. 'सीतेचे पोहे' मी अनेकदा ऐकले होते. त्यामागची दंतकथाही मला माहीत होती, पण कोकणात पोह्यांसारखे हुबेहूब दिसणारे बी टोकाशी असलेले गवत मी पाहिले तेव्हा 'सीतेचे पोहे' या काव्यकल्पनेतले सौंदर्य मला खऱ्या अर्थाने जाणवले. माधव कवींच्या कवितेतली सोनावळ, पांढऱ्या पानांची स्त्रावडे, सीतेचे हात, गौरीच्या डोळ्यांतून

ओघळलेली आसवे – ही सर्व फुले कोकणात बघायला मिळाली. तेव्हा खऱ्या अर्थाने ती कविता मला कळली.

शब्द आपण सारेच वापरतो. शब्दांनीच परस्परांशी संवाद साधतो. आपल्या रोजच्या व्यवहारात शब्दांचा जितका वापर होतो तितका अन्य कशाचाच होत नसेल. माणसे बोल बोल बोलतात. तरीही खऱ्या अर्थाने आपणाला शब्दांतून परस्परांचे मनोगत किती आणि कसे कळते, हा वादाचाच मुद्दा आहे. अनेकदा हे शब्द मने सांधण्याऐवजी मने तोडतात. अनेकदा मनात समजाऐवजी गैरसमज निर्माण करतात. भाषा शब्दांनी बनलेली असते हे खरे; पण दोन माणसांतल्या शब्दांच्या पुलावरून अर्थाची रहदारी नेहमी चालू असतेच असे नाही. मग निःशब्दाच्या, स्पर्शाच्या भाषेवरच आपल्याला अवलंबून राहावे लागते.

□

# चिनी शहाणपण

नुकतेच एक इंग्रजी पुस्तक माझ्या वाचनात आले. पुस्तक छोटेसेच पण फार सुंदर आहे. 'विज्डम फ्रॉम चायना' हे त्याचे नाव. 'विज्डम' ला नेमका समानार्थी शब्द मला मराठीत सापडला नाही. ज्ञान, जाण, शहाणपण, असे काही प्रतिशब्द मला सुचले, पण त्यातही मूळच्या इंग्रजी शब्दाच्या सगळया सूक्ष्म अर्थच्छटा येतात असे वाटले नाही. तूर्त मी या पुस्तकाच्या इंग्रजी शीर्षकाचे 'चिनी शहाणपण' असे मराठी रूप सोयीपुरते केले आहे.

पुस्तकाचे स्वरूप संकलनात्मक आहे. या छोट्या पुस्तकात कॉन्फ्युशियस, मेन्शियस, लाओ त्झु, चुआंग त्झु आणि ली त्झु या पाच चिनी तत्त्वज्ञांचे, विचारवंतांचे विचार संग्रहित केले आहेत. त्यांची अवतरणे दिली आहेत. यांपैकी कॉन्फ्युशिअस आणि लाओ त्झु यांची नावे मी आधी ऐकलेली होती. त्यांचा एखाददुसरा विचारही कुठे तरी वाचलेला होता. बाकीच्या विचारवंतांची नावे मात्र या पुस्तकात मी प्रथमच पाहिली. त्यांचे विचार इथेच वाचले.

हे चिनी तत्त्वज्ञ प्रामुख्याने कशाविषयी बोलत आहेत ? आपले दैनंदिन जीवन, माणसामाणसांचे परस्परांशी असलेले संबंध, त्यांतले विविध ताणतणाव, मानवाच्या वाट्याला आलेला सनातन दुःखभोग हेच त्यांच्या चिंतनाचे विषय आहेत आणि त्यासंबंधी अगदी मोजक्या शब्दांत ते आपणाला सांगत आहेत. त्यात साधेपणा आहे, सहजता आहे आणि सुंदर सूत्रबद्धताही आहे. काही उतारे तर गद्यात असले, तरी त्या छोट्या छोट्या कविताच वाटतात. या तत्त्वज्ञांनी आयुष्य खूप बारकाईने पाहिले आहे आणि त्या निरीक्षणानंतर त्यांना जी सत्ये जाणवली, गवसली, त्यांचा त्यांनी आपल्या लेखनातून आविष्कार घडवला आहे. पुस्तकाच्या पानापानांवर ही सत्ये विखुरली आहेत.

सर्वच चिंतनशील विचारवंतांना माणसामाणसांतल्या संबंधाबद्दल काही कुतूहल असते, काही प्रश्न पडतात. या चिनी तत्त्वज्ञांनी या संबंधांचा खूप खोल शोध घेतला आहे. माणसाने कसे असावे, हे सांगताना लाओ त्झु म्हणतो, 'अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा भलेपणा पाण्यापासून माणसाने शिकून घ्यावा. पाणी हे सर्वांना जीवन देते. धडपड, तडफड, महत्त्वाकांक्षा यांचा त्याला स्पर्शही झालेला नसतो. अगदी खालची, तळाची जागा पाणी स्वतःसाठी निवडते. माणसे अशी वागतील तर किती छान होईल ?'

माणसाचे सर्वांत श्रेष्ठ गुण कोणते ? कॉन्फ्युशियस म्हणतो, 'समजूतदारपणा, औदार्य आणि सहनशीलता— माणसाच्या ठायी असायला हवेत असे, हे अत्यंत थोर सद्गुण होत. काही माणसांपाशी जन्मापासूनच हे गुण असतात. काही जण प्रयत्नपूर्वक ते आपल्या अंगी बाणवतात आणि काहींना कठोर, दुःखदायक अनुभवांतून पार पडल्यावरच या गुणांची महती कळते.'

थोरामोठ्यांशी कसे वागावे, हे सांगताना कॉन्फ्युशियस म्हणतो, 'थोरांशी आदराने वागावे, पण त्या आदरालाही एक मर्यादा असावी. नाही तर ते वागणे ओंगळ, लाळघोटेपणाचे वाटते. थोरांशी वाजवीहून अधिक सलगी केली, तर त्यात आपला उर्मटपणा दिसून येतो. बोलण्यातली धिटाई आणि अतिरेक हा तर केवळ निर्लज्जपणाच होय. थोरांशी वागता-बोलताना सौजन्य, संयम आणि विवेक पाळला तरच ते वर्तन सुंदर वाटते.'

श्रीमंत कुणाला म्हणावे ? लाओ त्झु म्हणतो, 'जो अधाशीपणाने पैशाच्या मागे धावून अमाप संपत्ती जमवतो तो श्रीमंत नव्हे, तो भिकारी. आपल्याला गरजेपुरते मिळते, यात जो संतुष्ट असतो तोच खरा श्रीमंत होय.' श्रीमंतीबद्दल लाओ त्झुने आणखीही एका ठिकाणी मोठे मार्मिक उद्गार काढले आहेत. तो म्हणतो, 'चित्रविचित्र रंगांचे भरजरी, नक्षीकाम केलेले कपडे परिधान करणे, लांबलचक तलवारी ऐटीने हातात पेलणे, खाद्यपेयांबद्दल अत्यंत चोखंदळ असणे, भरपूर जमीनजुमला आणि संपत्ती जवळ असणे याला काही मी श्रीमंत म्हणणार नाही. गरजेहून अधिक वस्तू, दागिने, पैसा जवळ बाळगणारे लोक हे केवळ चोर, लुटारू, दरोडेखोर म्हटले पाहिजेत.'

श्रीमंतीप्रमाणे दारिद्र्याविषयी मेन्शियसने व्यक्त केलेले विचार असेच अर्थपूर्ण आहेत. गरिबी आणि श्रीमंती, जन्म आणि मृत्यू, उत्पत्ती आणि विनाश या एकाच

नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे सांगताना मेन्शियस म्हणतो, 'तुम्ही जर उपासमारीच्या असह्य वेदना कधी सोसल्या नसतील, तर पोटभर जेवणाचे सुख तुम्हाला कळणार नाही. अस्थिर जीवन अनुभवल्यानंतरच सुस्थिर आयुष्याचे मोल उमगते. वादळातून जो हेलपाटत गेला आहे त्यालाच नंतरच्या शांत निवाऱ्यातल्या विसाव्याचा अर्थ आकलन होतो.'

भारत आणि चीन हे दोन्ही पौर्वात्य देश असल्यामुळेच की काय, चिनी तत्त्वज्ञांचे अनेक विचार वाचताना भारतीय तत्त्वज्ञानाचे पडसाद त्यात वारंवार उमटलेले आढळून येतात. सुख-दुःख, जन्म-मृत्यू, इहलोक-परलोक यासंबंधी या चिनी विचारवंतांनी जी विधाने केली आहेत, ती वाचताना मला आपल्या ज्ञानेश्वर-तुकाराम-रामदासांच्या कितीतरी तत्सदृश ओळी आठवल्या आणि त्या उभयतांतले आश्चर्यकारक साम्य जाणवले.

लाओ त्झुचे एक अवतरण वर दिले आहे, त्यात तो म्हणतो, 'माणसाने पाण्यासारखे असावे.' साधूंचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी नेमकी हीच कल्पना मांडली आहे. ते म्हणतात :

जो कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडीबांधी करी ।
आणि जळाचियें परी । तळवटु घे ॥

याचा अर्थ असा की, मोक्षाला, कैवल्याला तोच पुरुष पात्र होतो, जो पाण्यासारखे तळाचे, खालचे स्थान पत्करतो— 'जळाचिये परी । तळवटू घे ।' तुकारामांच्या 'नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता', या वचनातही याच कल्पनेचा पडसाद उमटलेला दिसेल. आपण ज्याला ब्रह्मज्ञान म्हणतो, त्याला हे चिनी विचारवंत अंतिम सत्य Absolute Truth असे म्हणतात. हे आत्मज्ञान कुणाला झालेले असते ? लाओ त्झु म्हणतो, 'ज्याला दुसरी माणसे समजतात तो हुशार आहे, पण ज्याने स्वतःला ओळखले तो खरा ज्ञानी होय. जो इतरांना जिंकतो तो शूर आहे, यात शंकाच नाही, पण ज्याने स्वतःला जिंकले, स्वतःच्या वासनाविकारांवर मात केली, त्याचे शौर्य फार मोठे म्हटले पाहिजे.'

आपल्या सर्व संतांनी ऐहिक ऐश्वर्य, सुखोपभोग, ऐंद्रीय विकारांचे चोचले पुरवणे यांविषयी धिक्काराचे उद्गार काढले आहेत आणि संयम, साधेपणा, गरिबी यांचे महत्त्व मनावर ठसवले आहे. या चिनी विचारवंतांनीही याच पद्धतीचा उपदेश वारंवार केला आहे.

चिनी लिपी ही चित्रांचीच लिपी आहे, असे म्हणतात. म्हणूनच की काय, या चिनी विचारवंतांची भाषा चित्रमय आहे. तिच्यात निसर्गातल्या प्रतिमा वारंवार येतात. आकाश, पाणी, गवत, झाडे, फुले, पाखरे, ढग यांच्या प्रतिमांतून या तत्त्वज्ञांनी आपले विचार, कल्पना मांडल्या आहेत. त्यामुळे यांचे लेखन प्रत्ययकारी झाले आहे.

लाओ त्झु म्हणतो, 'या विश्वात सनातन अशा दोनच गोष्टी आहेत— आकाश आणि पृथ्वी. आकाश साऱ्यांवर छाया धरते. पृथ्वी सर्वांचे पोषण करते. आकाश आणि पृथ्वी परोपकारार्थ जीवधारणा करतात, म्हणून त्यांना विनाश नाही, मृत्यू नाही.'

आणखी एके ठिकाणी लाओ त्झु म्हणतो, 'निसर्गातल्या अत्यंत मृदू, कोमल, क्षीण गोष्टी टिकाव धरतात, तर कठोर, प्रचंड, शक्तिमान गोष्टी कोसळून विनाश पावतात. गवताचे कोवळे पाते चिवटपणे जगते. वृक्ष मोडून पडतात.' 'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळी वाचती ।' या तुकारामांच्या वचनाची आठवण लाओ त्झुचे हे अवतरण वाचताना येते की नाही ?

शांत, अबोल सेवेचे महत्त्व सांगताना लाओ त्झु म्हणतो, 'निसर्गातल्या सर्व गोष्टी शांतपणे आपली कामे करतात. त्या अस्तित्वात येतात, उमलतात, नष्ट होतात. त्या वस्तू संपत्ती जमवीत नाहीत; त्यांना कसला लोभ, कसला हपाप नाही; त्या आपले कर्तव्य पार पाडतात आणि नेमून दिलेले काम केले की, मुकाट्याने दृष्टीआड होतात. केल्या कामाचा त्या गाजावाजा करीत नाहीत, की त्याचा गर्वही बाळगत नाहीत.'

तर असे हे चिनी शहाणपण. 'विज्डम फ्रॉम चायना' या पुस्तकाने मला वाङ्मयीन आनंद तर दिलाच, पण त्याबरोबर त्याने मला अंतर्मुखही केले. शिवाय या प्रकारची पुस्तके वाचताना नेहमीच जी जाणीव मला होते, ती पुन्हा एकवार प्रकर्षाने झाली. ती जाणीव ही की, अध्यात्म किंवा तत्त्वज्ञान हे काही क्षितिजावरील चांदणीसारखे नुसतेच अंतरावरून बघण्याचे आणि तोंड भरून कौतुक करण्याचे धूसर, अस्पष्ट, दूरस्थ असे सौंदर्य नाही. तत्त्वज्ञान हा आपल्या रोजच्या जीवनसरणीचा एक अविभाज्य घटक आहे. दैनंदिन श्वासोच्छ्‌वासाइतके हे सारे आपल्या जवळचे, अंगभूत, अत्यावश्यक असे काही आहे. ती आपली निकडीची गरज आहे आणि तो आपला श्रेष्ठ दर्जाचा आनंदही आहे !

# शेबा, परत ये !

बऱ्याच वर्षांपूर्वी एक इंग्रजी चित्रपट मी पाहिला होता. चित्रपटाचे नाव होते, 'कम बॅक, लिटल शेबा.' चित्रपटाचे कथानक काहीसे असे होते :

शहरात राहणारे एक तरुण जोडपे असते. त्यांच्या लग्नाला काहीतरी पाच-सहा वर्षे लोटलेली असतात. त्यांना मूलबाळ नसते. लग्नानंतरच्या पहिल्यावहिल्या वासनात्मक प्रेमाचा आवेग आता ओसरलेला असतो आणि इतकी वर्षे ध्यानात न आलेले एकमेकांच्या स्वभावातले कोनेकंगोरे जाणवून त्यांतून निर्माण होणारे मतभेद, वादविवाद, भांडणे आता दोघांमध्ये सारखी झडत असतात. दोघेही पतिपत्नी सालस, सुस्वभावी, चारचौघांत वागायला अतिशय चांगली, पण एकमेकांशी मात्र त्यांचे अजिबात पटत नाही. त्यामुळे दोघेही त्रस्त, चिडचिडी बनली आहेत. घरात एक प्रकारचा ताण निर्माण झाला आहे आणि प्रत्यक्षात कुणी उच्चार केलेला नसला तरी घटस्फोट घेण्याचा विचार दोघांच्याही मनात सारखा घोळत आहे.

चित्रपटाची सुरुवात या वातावरणामध्ये होते. याच सुमाराला, ही पतिपत्नी ज्या इमारतीत राहात असतात, त्याच इमारतीच्या तळमजल्याच्या एका खोलीत एक तरुण मुलगी राहायला येते. या मुलीने नुकताच आपल्या पतीपासून घटस्फोट घेतलेला असतो, त्यामुळे ती एकाकी, उदास, दुःखी मनःस्थितीत असते. ती कुठे जात नाही, येत नाही. कसल्याही सार्वजनिक आनंदाच्या प्रसंगात भाग घेत नाही. एकटीच स्वतःशी कुढत आपल्या खोलीत बसून असते.

लौकरच या पतिपत्नींचा आणि तिचा परिचय होतो. कुठे, कुणाकडे न जाणारी ती मुलगी या जोडप्याकडे येऊ-जाऊ लागते. या दोघांना तिच्या परिस्थितीबद्दल वाईट वाटते आणि तिला तिच्या एकाकीपणाच्या कोषातून बाहेर काढण्याची हे

मनापासून खटपट करतात. दरम्यान या उभयतांतले ताण, संघर्ष चालूच असतात आणि यातूनच एक नाजूक, अवघड समस्या निर्माण होते. या जोडप्यातला पती हलकेहलके त्या तरुण, एकाकी मुलीकडे आकर्षिक होऊ लागतो. ती घटस्फोटासारख्या दुःखदायक अनुभवातून नुकतीच गेलेली आहे आणि याने प्रत्यक्ष घटस्फोट घेतलेला नसला, तरी पत्नीपासून तो मनाने अलग होत चाललेला आहे. तेव्हा एका अर्थी समान परिस्थितीत सापडलेले हे दोन दुःखी जीव एकमेकांकडे ओढले जावेत हे स्वाभाविकच असते. मात्र आपल्या मनातल्या भावनेला त्यांनी कधीही ओझरता देखील उद्‌गार दिलेला नसतो किंवा या पतीने आपल्या पत्नीशी यत्किंचितही प्रतारणा केलेली नसते. आपण एक विवाहित पुरुष आहोत, आपल्या पत्नीशी एकनिष्ठ राहणे आपले कर्तव्य आहे, याचा त्याने स्वतःला क्षणभरही कधी विसर पडू दिलेला नसतो.

याच वेळी या कुटुंबात आणखी एक घटना घडते. या पतिपत्नींनी शेबा नावाची एक कुत्री पाळलेली असते. दोघांचाही तिच्यावर फार जीव असतो. एके दिवशी ही शेबा हरवते. दोघेजण तिचा खूप तपास करतात. वर्तमानपत्रांतून जाहिराती देतात, पण शेबा जाते ती जातेच. ती काही पुन्हा सापडत नाही. घरातले कष्टी वातावरण यामुळे अधिकच कष्टी बनते. तळमजल्यावर राहणाऱ्या त्या तरुण मुलीला एकंदर परिस्थितीची स्पष्ट जाणीव होते. आपले प्रेम या विवाहित पुरुषावर जडू लागले आहे, हे तिच्या ध्यानात येते. हा प्रेमाचा अंकुर आपण मनात रुजू दिला, तर त्यामुळे त्या पुरुषाच्या पत्नीवर मोठा अन्याय होईल, हा विचार तिला सुचतो आणि एके दिवशी आपली जागा सोडून, त्या पतिपत्नींचा निरोप घेऊन ती त्या इमारतीतून— आणि त्यांच्या जीवनातूनही कायमची दूर निघून जाते. वादळात सापडलेले तारू पुन्हा सुखरूप बंदराला लागावे त्याप्रमाणे मधला काही काळ एकमेकांपासून मनाने दूर गेलेली ही पतिपत्नी मधल्या काळातल्या भावनिक संघर्षातून अधिक शहाणी, समंजस होऊन पुन्हा एकमेकांजवळ येतात. चित्रपट संपतो.

चित्रपटाच्या अखेरीस एक फार सुंदर, हृदयस्पर्शी प्रसंग आहे. या कुटुंबातले तणाव चालूच असतात. त्यात शेबा हरवल्यामुळे झालेल्या दुःखाची भर पडते. त्यातच तळमजल्यावरची ती मुलगी जागा सोडून जाते. एकूण सगळेच वातावरण उदास असते. त्यात एके दिवशी सकाळी झोपेतून उठल्यावर ही पत्नी आपल्या पतीकडे येते आणि रडत रडत त्याला म्हणते,

'तुम्हाला माहीत आहे ? आपली शेबा आता परत कधीसुद्धा घरी येणार नाही.'

'— घरी येणार नाही ?' पती आश्चर्याने विचारतो. 'का येणार नाही ? तुला कसं कळलं ?'

त्यावर ती पत्नी म्हणते, 'काल रात्री शेबा माझ्या स्वप्नात आली. एक लांबच लांब रस्ता होता आणि त्यावरून ती दूर दूर चालली होती. मी तिला किती हाका मारल्या, जवळ बोलावले, पण ती मागेसुद्धा वळून न बघता तशीच निघून गेली. म्हणून म्हणते मी की शेबा आता परत कधीच येणार नाही. आपण तिचा शोध थांबवू या.'

बोलता बोलता तिला रडे कोसळते. तेव्हा तिचा पती तिला जवळ घेतो, कुरवाळतो, तिचे सांत्वन करतो. मला वाटते, इथेच चित्रपटाचा शेवट आहे.

तसे या चित्रपटाचे कथानक साधेच आहे. प्रेमाचा सनातन त्रिकोण त्यात रंगवलेला आहे आणि या प्रकारच्या कलाकृती आपण नेहमी पाहातो-वाचतो. माझ्या दृष्टीने या चित्रपटाचे खरे सौंदर्य शेबाचा त्यात जो वापर केलेला आहे त्यात आहे. चित्रपटात शेबाला प्रतीकात्मक स्वरूप आलेले आहे. लग्न झाल्यावर या जोडप्याने हौसेने खरेदी केलेली शेबा कुत्री त्यांच्या प्रेममीलनाच्या प्रारंभीच्या आनंदाची, सुखाची साक्षीदार आहे. शेबा हे त्या सौख्यपूर्ण दिवसांचे प्रतीक आहे. प्रत्येक जोडप्याला विवाहोत्तर काळात सुरुवातीला अमाप सुख लाभते. मनोमीलनाबरोबर त्यात शरीरमीलनाचे, आसक्तीचे, ओढीचे रंग मिसळलेले असतात. हे सुख आयुष्यात एकदाच भेटते. वैवाहिक जीवन जसजसे प्रौढ, परिणत होत जाते, तसतसे त्यात वेगळे भावबंध निर्माण होतात. पण प्रारंभीचे ते सुंदर सुख पुन्हा गवसत नाही. ते हरवते. नाहीसे होते. चित्रपटातली पत्नी आपल्या पतीला म्हणते, 'शेबा दूर निघून गेली. ती आता पुन्हा येणार नाही.' हे तिचे उद्‌गार जेवढे शेबाला अनुलक्षून आहेत, तेवढेच ते विवाहोत्तर प्रणयमीलनाच्या सुखाच्या दिवसांनाही उद्देशून आहेत. चित्रपटातल्या जोडप्याला आला तो अनुभव सर्वपरिचित आहे. प्रत्येक जोडप्याला कधी ना कधी तरी हे जाणवतेच. मन आक्रंदत असते, 'कम बॅक, लिटल शेबा.' पण शेबा कधीच परत येत नाही. ते हरपलेले सुख पुन्हा लाभत नाही. चित्रपटात हा जो सूचक अर्थ आहे त्यामुळेच तो मला इतका आवडला. मनात खोल ठसून राहिला.

साहित्यात, कलेत भावनांचे काही रचनाबंध (Motifs) सनातन असतात. ते

वारंवार आपणाला आढळून येतात. या चित्रपटातली जी मध्यवर्ती कल्पना आहे, तीच मला हरिभाऊ आपटे यांच्या 'स्फुट गोष्टीं'तल्या एका कथेत सापडली. कथेतली नावे रूपकात्मक आहेत. जीवसुंदर आणि प्रेमसुंदरी या जोडप्याला आनंदसुंदर नावाचा एक गोड मुलगा झालेला असतो. जीवसुंदर आणि प्रेमसुंदरी त्या बालकासह कालसागराच्या विस्तीर्ण तीरावरून चाललेले असतात. इतक्यात बोट सुटून आनंदसुंदर कुठेतरी दूर जातो, हरवतो. ही पतिपत्नी अत्यंत शोकाकुल होऊन मुलाला हाका मारत वाळवंटातून, रानातून, काट्याकुट्यांतून धावत सुटतात. पण मुलगा जातो तो जातोच. तो काही पुन्हा त्यांना सापडत नाही. इतक्यात आनंदसुंदरच्याच वयाचा, पण गंभीर मुद्रा आणि उदास डोळे असलेला एक दुसरा मुलगा सामोरा येतो, तो या पति-पत्नींना हाती धरून चालवतो. त्यांच्या वाटेतले काटे, खडे दूर करतो, त्यांना त्या मुलाचा विलक्षण लळा लागतो. पण हरवलेल्या मुलासाठी त्यांचे आक्रंदन चालूच असते. त्यांचा शोक पाहून तो दुसरा मुलगा त्यांना म्हणतो, 'तुमचा आनंदसुंदर तुम्हाला भेटेल. पण तो यायला हवा असेल, तर मला इथून जावे लागेल.' त्यावर ही पति-पत्नी त्याला पोटाशी धरून म्हणतात, 'बाळा, आमचा आनंद आम्हाला हवाच पण तू जाऊ नकोस. तुझ्यावाचून आम्ही क्षणभरही जगू शकणार नाही,' त्यावर हा मुलगा उदास हसून त्यांना म्हणतो, 'तुमचा हरवलेला आनंदसुंदर मीच आहे. फक्त मी आता जास्त मोठा, गंभीर, उदास होऊन आलो आहे. मला तुम्ही ओळखले नाहीत का ?'

हरिभाऊ आपट्यांच्या या कथेत आणि 'कम बॅक, लिटल शेबा' चित्रपटाच्या कथानकात विलक्षण साम्य आहे. दोहोंमध्ये एकच कल्पना आहे. विवाहोत्तर प्रणयाचा आनंद हरपतो. पण तो कायमचा नष्ट होत नाही. तो एक वेगळे रूप धारण करून येतो इतकेच. तो आनंद जरा उदास, खिन्न, अधिक शहाणा व समंजस असा होऊन येतो, पुष्कळ जोडप्यांना त्याची ओळख पटत नाही. पण ज्यांना ती पटते ते भाग्यवान. त्यांचा संसार सुरक्षित राहतो. ती पतिपत्नी मनाने अधिक जवळ येतात. पण जे हरवले ते हरवलेच. ते तसे पुन्हा कधीच मिळत नाही. अशा वेळी वास्तवाचा निमूटपणे स्वीकार करायचा असतो. त्यालाच सामोरे जायचे असते.

तरीही आत खोल कुठेतरी एक हुरहूर, एक हरवलेपणाची, काहीतरी मोलाचे गमावल्याची जाणीव ठुसठुसत दुखत राहतेच. आणि मन मूकपणे साद घालत असते, 'कम बॅक, लिटल शेबा. शेबा, परत ये.'

# अलगूजवाली

माझ्या बैठकीच्या खोलीत एक तसबीर आहे.

तसबिरीत सर्वत्र सौम्य, शीतल, हिरवट पिवळा रंग पसरला आहे. माझ्यासमोर तसबिरीचा जो उजवा भाग येतो, तिथे कोपऱ्यात बांबूचे बन आहे. हिरवी पालवी सळसळत आहे. त्या पार्श्वभूमीवर एक तरुण, पंधरा-सोळा वर्षांची मुलगी अलगूज वाजवत आहे. तिचा चेहरा अर्धवट माझ्याकडे वळलेला आहे. तिच्या मस्तकावरचे मोकळे पिंगे केस गालांवर झेपावले आहेत. त्या केसातून तिच्या डाव्या कानातली सोनेरी रिंग अर्धवट चमकत आहे. त्याखेरीज कोणतेही आभूषण या मुलीच्या अंगावर नाही. तिच्या अंगातही काही नाही. तिचे डोळे खाली वळलेले आहेत. दृष्टी अंतर्मुख आहे. ओठ अलगुजाला भिडले आहेत. कोवळी सुंदर बोटे अलगुजावरून फिरत आहेत. त्या मुलीचे हातही नाजूक आहेत आणि त्या हातांआडून तिचे मोकळे उघडे स्तन ओझरते दिसत आहेत. स्तनही कोवळे, नुकता आकार घेऊ लागलेले असे आहेत. मुलीच्या कमरेखालचा भाग तसबिरीत येत नाही. मात्र तिच्या कमरेला परकरासारखे एक कटिवस्त्र आहे. दोन्ही गुडघे वर करून त्यांवर दोन्ही हातांची कोपरे अलगद टेकवून ही मुलगी अलगूज वाजवते आहे. एकाग्रपणे. एकतानतेने.

खरे तर ही तसबीर म्हणजे एक घड्याळ आहे. जपानी बनावटीचे घड्याळ. माझ्या एका मैत्रिणीकडे ते होते. मला ते फार आवडले तेव्हा तिने ते मला भेट म्हणून दिले. तसबिरीमध्ये काचेआड उजवीकडे ही अलगूज वाजवणारी मुलगी आहे अन् माझ्या डाव्या हाताला समोर काचेवरती घड्याळाचे आकडे, काटे बसवलेले आहेत. त्यांचा रंग सोनेरी आहे, पण तो सोनेरी रंग मागच्या हिरव्या पिवळ्या रंगात कधीकधी असा बेमालूम मिसळून जातो की, हे घड्याळ आहे असे सहसा कुणाच्या ध्यानातच येत नाही. तसबीर बघताच प्रथम डोळ्यात भरते, मनात ठसते ती ही

अलगूज वाजवणारी मुलगी. मी तिचे नाव 'अलगूजवाली' असे ठेवले आहे.

चार एक वर्षांपूर्वी ही तसबीर आमच्या घरात आली. मी ती माझ्या बैठकीच्या खोलीत लावली. प्रथम माझे मन तसबिरीबद्दल अगदी निर्विकार होते. सुरुवाती सुरुवातीला चित्रात घड्याळ बसवणाऱ्या जपानी कल्पकतेचे, कारागिरीचे मला भारी कौतुक वाटे आणि एक घड्याळ म्हणूनच आम्ही तसबिरीकडे बघत असू. केवळ एक उपयुक्त वस्तू म्हणून तिचा वापर करत असू. पण नंतर कसा कोण जाणे, घड्याळाचा मला विसर पडत गेला आणि ही अलगूजवाली मला जवळची, जिव्हाळ्याची वाटू लागली. प्रथम ती अगदी योगायोगाने घरात आली, पण नंतर नंतर जणू घरातलेच एक माणूस होऊन बसली.

मी या बैठकीच्या खोलीत दिवसाचा बराच वेळ घालवते. तिथे लिहिते, वाचते, माझी किरकोळ कामे करते. दुपारची विश्रांती तिथेच घेते. लिहिताना, वाचताना, काम करताना कधी कंटाळा आला, थकल्यासारखे वाटले, तर डोळे नकळत वर वळतात. तो समोर भिंतीवर आपली ही अलगूजवाली दिसते. ती जणू मला म्हणते, 'थकलीस ? जरा विसावा घे. ही बघ. मी आहे ना इथे जवळ, तुझ्या सोबतीला !' आणि खरेच की, थोडा वेळ त्या तसबिरीकडे बघितले की मला बरे वाटते. जिवाला हुरूप येतो. थकवा दूर पळून जातो. मी पुन्हा उमेदीने, उत्साहाने कामाला लागते. अलगूजवालीची अबोल, पण आश्वासक संगत मला दिलासा देते.

मी या खोलीत बसलेली असते हे सर्वांना माहीत झाले आहे. त्यामुळे मला भेटायला येणारी माणसे इकडे तिकडे न रेंगाळता थेट इथेच येतात. शेजारीपाजारी, मित्रमैत्रिणी, साहित्य क्षेत्रातली मंडळी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी— कुणीही घरी आले तरी त्यांनी सरळ इथेच यायचे, हे अगदी ठरून गेले आहे. आलेल्या माणसांची नजर कधीतरी आपोआप तसबिरीकडे वळते. कारण तसबीर तशी चांगलीच मोठी आहे, पण तसबिरीकडे बघताना साऱ्यांच्या डोळ्यात भरते, ती प्रथम ही अलगूजवाली. हे एक घड्याळ आहे, हे सहसा कुणाच्या ध्यानातच येत नाही. ध्यानात आणून दिले, तर त्याचे त्यांना कौतुक वाटते, पण ते तेवढ्यापुरतेच. माझ्या एका एका मैत्रिणीने तर घड्याळाकडे मी तिचे लक्ष वेधल्यावर त्रासिक सुरात मला विचारले, 'इतक्या सुंदर चित्रात हे घड्याळ कशाला बसवलं आहे ! केवढा अरसिकपणा !'

माझ्याकडे आलेल्या अनेकांनी आजवर अलगूजवाली पाहिली आहे, पण

कुणालाही तिचे उघडे स्तन कधी जाणवले नाहीत किंवा त्यात कसली अश्लीलता दिसून आली नाही. प्रत्यक्ष किंवा पर्यायानेदेखील त्या गोष्टीचा कुणी उल्लेख केला नाही वा त्यावर कर्मठ शेरे मारून नाक मुरडले नाही ! कारण या अलगूजवालीच्या चर्येवरचा भावच इतका साधा, मुग्ध, निरागस आहे की, तिचे उघडे ऊर आधी मुळी ध्यानातच येत नाही आणि आले तरी त्याचे उघडेपण नजरेला खुपत नाही. लहान मुलाचे नागडेपण जसे जाणवत नाही ना, अगदी तसेच. आणि माझी अलगूजवाली तशी खरोखरी अजून पोरसवदाच आहे. तिच्या तारुण्यापेक्षा तिचे शैशवच मनाला मोह घालते. तिच्याविषयी वात्सल्याचा भाव जागा करते.

कधी कधी माझ्याकडे माणसे जमलेली असतात. बोलताबोलता नाना प्रकारचे विषय निघतात. त्यांमध्ये साहित्य असते. राजकारण असते. एखादा नवा चित्रपट वा नव्याने प्रकाशित झालेले पुस्तक असते. नुकती वर्तमानपत्रात वाचलेली सनसनाटी बातमी असते किंवा कधी कधी अगदी क्षुल्लक असा किस्सा, चक्क गावगप्पा किंवा कुणाच्या उखाळ्यापाखाळ्यादेखील असतात. मग गप्पामधून गप्पा निघतात. बोलण्यावरून बोलणे वाढत जाते. खेळीमेळीच्या चर्चेला कठोर वादावादीचे स्वरूप येते. माणसांची डोकी फिरतात, तापतात. अहंकार दुखावले जातात. कधी एखादा उणाअधिक शब्ददेखील फट्कन कुणाच्या तोंडावाटे बाहेर पडतो. माझेही डोके भडकते. अनेकदा या वादावादीत मी स्वतः नसतेच; पण घरी आलेल्या माणसांचेच आपापसात वाद सुरू होतात, त्याला काय करायचे ? मला फार अवघडल्यासारखे होते. बरे, सारी आपलीच मित्रमंडळी. अगत्याने आपल्या घरी आलेली. त्यांना अडवायचे तरी कसे ? आणि मुख्य म्हणजे मी कुणाची बाजू घ्यायची ? एकाच्या वतीने बोलले तर दुसऱ्याला राग यायचा. एकाची कड घेतली, तर दुसरा माझ्याविषयी गैरसमज करून घ्यायचा. त्याचा अपमान व्हायचा. माझी भलतीच पंचाईत होते. काय करावे ते कळत नाही. शेवटी कसातरी एकदाचा साऱ्यांचा समझोता होतो. मी पुन्हा एकदा चहा करून आणते. त्या कपात वादळ शमते. मंडळी हसत हसत निघून जातात. जाताना मला फार त्रास दिल्याबद्दल काही क्षमायाचनेचे उद्‌गारही काढतात आणि मलाही हायसे वाटते. मी माझ्या इतर उद्योगांकडे वळते, पण तेवढ्यात माझे लक्ष तसबिरीतल्या अलगूजवालीकडे जाते. खोलीत घटकेपूर्वी झालेल्या आरडाओरडीचा, वादावादीचा, उठलेल्या धुरळ्याचा तिला स्पर्शही झालेला नसतो. ती तशीच शांत, अविचल, आपल्या नादात मग्न,

आपल्या अलगूजाच्या सुरात रमलेली अशी असते. तिच्याकडे बघताना माझे मन एकदम हलके होते. तापलेले मस्तक निवते. वाटते, माणसे कशासाठी इतकी भांडतात ? का असा वाद घालतात ? आपले रक्त का तापवून घेतात ? या वादविवादांना, चर्चांना, भांडणांना खरोखर काही महत्त्व आहे का ? कालाच्या असीम प्रवाहात कसले साहित्य, कसले राजकारण ? कसले प्रश्न अन् कसल्या समस्या ? किती क्षणिक आहे हे सारे ? आणखी समजा, हजार दोन हजार वर्षांनी यांतले काय मागे राहील ? तेव्हा ही नावे, या व्यक्ती कुणाच्या स्मरणात तरी असतील का ? हे सारे पाण्यावरचे बुडबुडे. आता उठतील तर घडीभराने पुन्हा फुटूनही जातील. त्यापेक्षा तसबिरीत काचेआड राहणारी, हिरव्यापिवळ्या बांबूच्या बनात, निसर्गाच्या सहवासात रमणारी, अलगुजाच्या स्वरात देहभान विसरणारी, ही आत्ममग्न अलगूजवाली जास्त खरी. ती शाश्वत आहे. काळ तिला स्पर्श करू शकत नाही. तशी ती दूरची, कुण्या यक्षलोकातली, अपार्थिव आहे. तिला इथल्या दैनंदिन जीवनाशी, या क्षुद्र घडामोडींशी काही कर्तव्य तरी आहे काय ? मग आपणही असेच का असू नये ? शांत, अलिप्त, अंतर्मुख, आत्मलीन ? मी अलगूजवालीकडे टक लावून बघत राहते. तिच्या अलगुजाचे सूर मला चक्क ऐकू येतात. ते माझ्या प्रक्षुब्ध मनाला हळुवारपणे गोंजारतात. शांत करतात.

पण अलगूजवालीचे आणि माझे नेहमीच असे सख्य असते, असे मात्र समजू नये. आपल्या घरातली माणसे आपल्याला आवडतात. त्यांच्याशी आपले अतूट नाते, त्यांच्याविषयी उत्कट जिव्हाळा असतो, पण त्यांचासुद्धा कधी कधी आपल्याला राग येतोच की नाही ? तीच गोष्ट या अलगूजवालीची. तिचाही असाच कधीकधी मला खूप राग येतो. एक प्रसंग माझ्या ध्यानात राहून गेला आहे. त्या दिवशी काय झाले होते कुणास ठाऊक ? पण सकाळपासून सारे काही बिनसतच गेले होते. रोजची कामवाली आज नेमकी सकाळी कामावर आली नव्हती. त्यामुळे भांडी घासणे, कपडे धुणे, फरशी पुसणे ही तिची सगळी कामे मलाच करावी लागली होती. त्यात कधी नव्हे ती सकाळपासून माणसांची रीघ लागलेली. अगदी सूड घेतल्यासारखी एकापाठोपाठ माणसे येत होती. बरे कुणी आले, तर नाराजी दाखवण्याची सोय नाही. लगेच हातचे काम टाकून बाहेर यायचे. त्या माणसाशी बोलायचे. खोटेखोटे अगत्य दाखवायचे. खोटे खोटे हसायचे. खोटे कुतूहल प्रकट करून त्यांची सारी बडबड ऐकून घ्यायची. या साऱ्यात भरीस भर म्हणून फोनचा

गजर, फोन आला की उठून तो घ्यायचा. तो चुकीचा कॉल आहे, असे कळले की वैतागात आणखीच भर पडायची. त्यात दर पंधरा-वीस मिनिटांनी गॅसवर चहाचे आधण चढवायचे आणि अगदी घशाशी आला तरी प्रत्येकाबरोबर घोटघोट चहा प्यायचा ! बारा वाजेपर्यंतचा वेळ तर असाच गेला. स्वयंपाकाला सवडच मिळाली नाही. मग कसचे जेवण नि कसचे काय ? मग एकदम मला आठवण झाली की एका ठिकाणी आज मला जाऊन यायलाच हवे होते. करते काय ? तशीच उठले. घाईत आंघोळ उरकून कपडे बदलून धडपडत त्या ठिकाणी गेले, पण भेटायला हवी होती ती माणसे नेमकी त्याच दिवशी काही अपरिहार्य कारणामुळे बाहेरगावी गेली होती. झाले. पुन्हा निमूटपणे घरी आले. काम व्हायला हवे होते ते झाले नाहीच, पण रिकामा हेलपाटा मात्र पडला. वेळ गेला, पैसे गेले, शीण झाला. सकाळपासून मला निवांत दोन घासदेखील खायला मिळाले नव्हते. आले ती हताश होऊन बाहेरच्या माझ्या खोलीत, खाटेवर अंग टाकून पडले, तो समोर नेमकी अलगूजवाली डोळ्यांपुढे आली. तशीच आपली मजेत अलगूज वाजवत बसलेली. स्वतःच्या दूरस्थ विश्वात रममाण झालेली. खरेच सांगते— त्या वेळी तिचा मला फार फार राग आला. त्या वेळी ती मला रोम जळत असताना मजेने फिडल वाजवत बसलेल्या कुठल्याशा त्या नीरोसारखी दुष्ट, क्रूर, हृदयशून्य वाटली. मनात आले, आपण हिला आपली जिवलग सखी, सोबतीण मानतो, पण आपल्या सुखदुःखाचे हिला काडीमात्र तरी सोयरसुतक आहे का ? हिला ना कामधाम. ना पैशांची अडचण. ना प्रपंचाची चिंता. ना व्यावहारिक सभ्यपणाची, उपचारांची बंधने. रोजच्या जीवनात आपल्याला हरघडी ज्या अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते, नाना तऱ्हेच्या माणसांशी हजार प्रकारचे जे बरेवाईट संबंध येतात. वेगवेगळ्या रीतींचे जे शारीरिक आणि मानसिक ताणतणाव अनुभवावे लागतात, त्यांतल्या कशाचाही हिला लेशमात्र उपसर्ग नाही. ही आपली आरामात बसली आहे अलगूज वाजवत. म्हणे फार सुंदर चित्र आहे. म्हणे तिच्या मुद्रेवरचे भाव फार निरागस आहेत. म्हणे अलगुजावर फिरणारी तिची बोटे फार सुंदर आहेत. असेनात का ! मला काय त्याचे कौतुक ? हिला जर माझे सुखदुःख नाही; माझ्याविषयी कणव, सहानुभूती नाही, तर मग मलाही हिच्याशी काही कर्तव्य नाही. माझे आणि हिचे आयुष्यच मुळी वेगळे आहे. माझे आणि तिचे मार्गही वेगळे आहेत. माझ्या जगातली धूळ, घाण, उकाडा, मनस्ताप आणि इतर हजार समस्या यांतले काहीसुद्धा हिच्या जगात नाही.

तिथे आहे सळसळणारे बांबूचे बन, सततची हिरवीगार शीतल सावली आणि हे कधी न संपणारे अलगुजाचे सूर. हे सारे तिचे तिलाच लखलाभ असो. तिची आपली तुलनाच होऊ शकत नाही. ती अपार्थिव. मी पूर्णपणे इथल्या या मातीची घडवलेली. ती शांत, मी अशांत, अस्वस्थ. छे. आपल्याला ही तसबीरसुद्धा नको. कारण ही अलगूजवाली अशीच रोज निवांतपणे भिंतीवर काचेआड एका सुरक्षित जगात अलगूज वाजवत बसणार आणि तिथून मला सारखी हिणवणार. ठरले. उद्या ही तसबीरही भिंतीवरून काढून टाकायची. अलगूजवालीवरच्या माझ्या रागाने अगदी कमाल मर्यादा गाठली. मला तिचे दर्शनही नकोसे झाले. तिच्याकडे पाठ फिरवून, कूस पालटून मी झोपून गेले.

पण दुसरा दिवस उजाडला, तोवर माझ्या ताणलेल्या वृत्ती खूप सैलावल्या होत्या. मन निवळले होते. मी अलगूजवालीकडे नजर टाकली आणि तिच्याविषयीच्या उमाळ्याने माझे मन भरून गेले. माझ्या ध्यानात आले की, हिच्यावरचा आपला सगळा राग निघून गेला आहे. ती बिचारी काचेआड निवांत बसून अलगूज वाजवते आहे, यात तिचा काय दोष ? कुणा कलावंताने तिची योजना या चित्रात केली. तिची वेषभूषा त्याने ठरवली. तिच्या हाती हे अलगूजही त्यानेच दिले. ते ती वाजवते आहे. जशी माझी वाट कुणीतरी ठरवून दिली तशीच तिचीही वाट कुणीतरी योजूनच ठेवली आहे. माझी धावपळ, चिंता, व्याप जेवढे अटळ, तेवढेच तिचे अहर्निश अलगूज वाजवणेही अपरिहार्य. मग तिच्यावर कशाला रुसायचे ? कशाला रागवायचे ?

मी अलगूजवालीकडे प्रेमभराने नजर टाकली. नजरेनेच तिची क्षमा मागितली, पण खरे तर त्याचीही जरूर नव्हती. अलगूजवाली अलगूज वाजवण्यात नेहमीसारखी रमलेली होती. माझा राग आणि माझी उपरती, मी मनःपूर्वक केलेली क्षमायाचना यांतले तिला काय आणि किती कळले असेल कुणास ठाऊक. मला मात्र त्या क्षणी असा साक्षात्कार झाला की, अलगूजवाली आपल्याला आवडते. फार फार आवडते. ही तसबीर काही आपण भिंतीवरून कधी हलवणार नाही. सहवासाने आपुलकी वाढत जाते. अलगूजवालीशी आपले आता असेच सहवासजन्य प्रेमाचे नाते जुळले आहे. घडीभराच्या रागरुसव्याने तुटावेत इतके काही हे धागे कच्चे वा दुबळे नाहीत.

चित्राशी असा स्नेह जमतो का ? माझा तर अनुभव आहे की जमतो. लिओनार्दो

द व्हिंची या विख्यात चित्रकाराचे 'मोनालिसा' हे चित्र जगातली पहिल्या क्रमांकाची थोर कलाकृती मानली जाते. 'मोनालिसा' चे मूळ अस्सल चित्र पॅरिसच्या 'लूव्र' म्युझियममध्ये आहे. तिथे जाऊनसुद्धा त्या दिवशी संप असल्यामुळे मूळ चित्र मला पाहता आले नाही. परंतु या चित्राच्या अनेक प्रतिकृती मी पाहिल्या आहेत आणि इतरही अनेकांनी त्या पाहिल्या असतील. 'मोनालिसा' हे त्या चित्रातल्या स्त्रीचे नाव. लिओनार्दो द व्हिंचीने म्हणे आपल्या कुणा एका स्नेह्याच्या पत्नीचे हे चित्र रेखाटले. मोनालिसाची नजर समोर आहे. त्यामुळे कुठूनही तिच्याकडे बघितले तरी ती आपल्याकडेच बघते आहे असे वाटते. तिच्या ओठांवर एक गूढ, अबोध, अंतर्लीन असे स्मित आहे. या स्मिताचा अर्थ अद्याप कुणालाही कळलेला नाही. अनेक रसिकांनी, समीक्षकांनी, विचारवंतांनी आपापल्या परीने त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे, पण त्या साऱ्या प्रयत्नांना हुलकावण्या देऊन मोनालिसा अद्याप तशीच अगम्य, रहस्यमय राहिली आहे. 'मोनालिसाचे स्मित' हे आता गूढतेचे, अगम्यतेचे एक प्रतीकच बनले आहे. मी जेव्हा जेव्हा मोनालिसाच्या चित्राकडे बघते तेव्हा तेव्हा तिचे सौंदर्य मला जाणवते, पण तिच्या त्या मजवर खिळलेल्या आग्रही नजरेने आणि ओठांवरील त्या अबोल गहन स्मिताने मी काहीशी अस्वस्थ होऊन जाते. म्हणून 'मोनालिसा'शी माझा स्नेह असा कधीच जुळला नाही. तिच्या स्मितासारखी तीही सतत मला दूरस्थ, अलिप्तच राहिली.

उलट ही अलगूजवाली मात्र तिची नजर खाली वळलेली असूनही माझी जिवलग सखी बनली. 'मोनालिसा' ही जगातली सर्वश्रेष्ठ कलाकृती, तर अलगूजवाली ही एक सामान्य जपानी घड्याळातली आकृती. तीही कुणा प्रतिभावान चित्रकाराने रेखाटलेली नव्हे, तर धंदेवाईक कारागिराने मॉडेलवरून फोटो घेऊन तयार केलेली. मोनालिसा ही अव्वल दर्जाची सृजनशील कला आणि अलगूजवाली ही नाही म्हटले तरी— सामान्य बाजारू कारागिरी ! दोन्हींची मुळी तुलनाच होऊ शकत नाही. तरीही जपानी घड्याळात सजावटीदाखल घेतलेल्या फोटोमधल्या एका अनोळखी मुलीशी माझे जिवाभावाचे सख्य जमले. तिच्याशी उत्कट जवळीक निर्माण झाली.

अलगूजवाली ही माझी मोनालिसाच आहे. माझी. माझ्यापुरती.

□

# प्रेमपुराण

जिच्यासंबंधी सतत खूप बोलले जाते आणि तरीही जिच्यासंबंधीचे गैरसमज कधी संपत नाहीत, अशी मानवी जीवनातली एकमेव गोष्ट 'प्रेम' हीच असेल. जन्मभर एकमेकांवर उत्कट प्रेम करणारी माणसे देखील प्रेमाबद्दल अत्यंत चुकीच्या कल्पना मनात बाळगून असतात, असे आढळून येते. प्रेम करणे वेगळे आणि प्रेम म्हणजे नेमके काय हे समजणे वेगळे. 'प्रेम' म्हणजे दुसऱ्याला आपले सर्वस्व समर्पण करणे इथपासून तो 'प्रेम' म्हणजे दुसऱ्याकडून सारे काही घेणे इथपर्यंत प्रेमभावनेविषयी विविध प्रकारच्या कल्पनांमध्ये पराकाष्ठेची तफावत आढळून येते. कुणाला 'प्रेम' याचा अर्थ 'सेवावृत्ती' असा वाटतो. कुणाला प्रेम म्हणजे दुसऱ्यावर संपूर्ण मालकी हक्क गाजवणे असे वाटते. कुणी प्रेमामुळे दुसऱ्याला सतत छळत राहतात, तर प्रेमामुळेच कुणी दुसऱ्याकडून एकसारखे स्वतःला छळून घेतात आणि त्यातच एक विकृत आनंद मिळवतात. एकाच वेळी सुख आणि यातना देणारी, सहवासाचे समाधान आणि एकाकीपणाची व्यथा भोगायला लावणारी प्रेम ही एक अजब गोष्ट आहे. देवाने म्हणा वा निसर्गाने म्हणा, मानव जातीला घालून ठेवलेले एक सनातन कोडे म्हणजे प्रेम.

हॅरॉल्ड एच. ब्लूमफील्ड हे अमेरिकतले एक विख्यात एम. डी. डॉक्टर आहेत. त्यांनी एके ठिकाणी या प्रेमभावनेची बारकाईने चिकित्सा केली आहे आणि त्यातून त्यांनी मनोरंजक तसेच उद्बोधक निष्कर्ष काढले आहेत. ज्याला आपण 'रोमँटिक' किंवा स्वप्नाळू प्रेम म्हणतो, ते यौवनात उदय पावते. डॉ. ब्लूमफील्ड यांच्या मते प्रेम ही जीवनातली एक अत्यावश्यक गोष्ट, एक अद्भुत शक्ती आहे. तारुण्यात प्रत्येकाला एकदा तरी या प्रेमभावनेचा अनुभव यायला हवा. तथापि हे प्रेम म्हणजेच जन्मभर टिकणारे उत्कट प्रेम असा जर कुणाचा समज असेल, तर तो अगदी चुकीचा

आहे. 'रोमँटिक' प्रेम हे क्वचितच गाढ वैवाहिक निष्ठावंत नात्यामध्ये परिणत होते. ते धुक्यासारखे तरलविरल भोवती पसरलेले असते आणि धुक्याप्रमाणेच कठोर व खडबडीत वास्तव झाकून ते आपल्या नजरेआड करते. इतकेच नव्हे, तर शेवटी धुक्याप्रमाणेच ते बघता बघता अचानक विरघळूनही जाते. पण तरीही 'रोमँटिक' प्रेम हे 'वाईट' नाही. ती एक फार सुंदर अशी अनुभूती आहे. प्रेमाचे अद्‌भुत नंदनवन प्रथमच आपल्या डोळ्यांपुढे उघडणारी ती जणू एक खिडकी आहे. प्रेमजीवनातल्या संभाव्य सुखाची आपली पहिली तोंडओळख या 'रोमँटिक' प्रेमामुळेच होते.

'खरे प्रेम, खरे प्रेम' अशा शब्दांचा आपण एकसारखा जप करीत असतो, पण खरे प्रेम म्हणजे नेमके काय ? डॉ. ब्लूमफील्ड यांच्या मते खरे म्हणजे आपल्या आवडत्या सहचराच्या सान्निध्यात आपले व्यक्तिमत्त्व अधिक वाढवणे, अधिक समृद्ध आणि संपन्न करणे. संपूर्ण विश्वास, संपूर्ण समर्पण आणि आपल्यापाशी असेल ते सारे कसल्याही परतफेडीची अपेक्षा मनात न बाळगता आपल्या प्रिय व्यक्तीला देण्याची सिद्धता म्हणजे खरे प्रेम. या प्रेमाची आणखी एक कसोटी म्हणजे आवडत्या व्यक्तीचा, ती जशी असेल तसा, तिच्या अंगच्या सगळ्या गुणदोषांसकट निःसंदेह स्वीकार करणे ! प्रेमात तडजोड नसते. कसल्याही अटी नसतात. कसले 'जर-तर' नसते. कसला करार नसतो. प्रेम हे प्रेमासाठी, प्रेम करण्याच्या निर्मळ आनंदासाठी करायचे असते. त्यामध्ये व्यावहारिक परतफेडीची अपेक्षा ठेवली, तर प्रेमाला व्यवहाराची रुक्ष कळा येते. अनादर करणे, टाकून बोलणे, निष्ठुर वर्तन करणे, सूडभावना बाळगणे, कठोर शासन करणे किंवा निर्दय उपेक्षा करणे— यातली एक गोष्टसुद्धा जातिवंत प्रेमाचा विध्वंस करू शकते. खरे प्रेम आपल्या प्रिय माणसाला मान देते. त्याच्या चुका विसरते. त्याला निर्मळ स्नेह व ममता देते आणि त्याचे संरक्षण करते. प्रेमामध्ये सर्वस्व द्यायचे ते केवळ देण्यामधल्या अपार आनंदासाठी. कारण हे देणे आपल्याला स्वतःलाच तृप्त, संतुष्ट करत असते. खऱ्या प्रेमाची आणखी एक अट म्हणजे प्रिय व्यक्तीची सतत दखल घेणे. यासाठी आपले मन, आपले लयलक्ष, आपला वेळ देण्याची सिद्धता असावी लागते.

प्रेमाची चर्चा करताना डॉ. ब्लूमफील्ड यांनी एक मोठा मजेदार सिद्धांत मांडला आहे. ते म्हणतात, 'दुसऱ्यावर चांगले प्रेम करता यावे यासाठी माणसाने प्रथम 'स्वतः'वर प्रेम करायला शिकले पाहिजे.' ज्या व्यक्तीला स्वतःची किंमत कळत नाही, जिला स्वतःविषयी प्रेम किंवा आदर वाटत नाही, ती व्यक्ती दुसऱ्या माणसावरही

खऱ्या अर्थाने प्रेम करू शकणार नाही. तुम्हाला इतरांकडून मान, गौरव, प्रेम हवे असेल, तर तुम्ही त्यासाठी स्वतः पात्र ठरले पाहिजे. आपण स्वतःलाच जर तुच्छ, क्षुद्र, हलके किंवा उपेक्षणीय मानू लागलो, तर दुसरी व्यक्तीही त्याच दृष्टीने आपल्याला हीनपणे वागवणार हे पक्के ध्यानात ठेवायला हवे. स्वतःवर प्रेम करणे म्हणजे पोकळ अहंकार बाळगणे नव्हे किंवा स्वार्थी आणि लबाड बनणेही नव्हे. थोडेसे विचित्र विधान करायचे झाले, तर असेही म्हणता येईल की, तुम्ही स्वतःशी जेव्हा निकटचा आणि गौरवास्पद संबंध जोडाल तेव्हाच इतरांशीही तुम्ही खऱ्या अर्थाने उत्कट जवळीक साधू शकाल. एरव्ही नाही. म्हणून आत्मसन्मान, आत्मगौरव ही प्रेमाच्या नातेसंबंधातली एक अत्यावश्यक बाब आहे.

प्रेमाचे प्रदर्शन करणे योग्य नाही, अशी विशेषतः आपल्याकडे एक समजूत आहे. मनात प्रेमाचा लवलेश नसताना त्याचा बाह्य देखावा करणे, हे अर्थात केव्हाही वाईटच. पण जिथे मनात प्रामाणिक आणि उत्कट प्रेमभावना आहे तिथे ती नुसती असून भागत नाही, तर ती बाहेर दिसावीही लागते. आणि हे 'दिसणे' अनेक लहानसहान क्षुल्लक गोष्टींमधून प्रत्ययाला येते. माणसांनी तुडुंब भरलेल्या दिवाणखान्यात, मध्ये केवढे तरी अंतर असताना, प्रेम करणाऱ्या दोन व्यक्ती परस्परांकडे नुसता ओझरता दृष्टिक्षेप करतात. एकमेकांकडे बघून नुसते स्मित करतात आणि त्या दृष्टिभेटीने, त्या स्मिताने दोघांमधले अंतर एकदम नाहीसे होते. ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी' मध्ये एक सुंदर ओवी लिहिली आहे. दूर राहूनही अत्यंत जवळीक साधणाऱ्या प्रेमिकांचे ते शब्दचित्र आहे. ज्ञानेश्वर लिहितात—

आपुला ठावो न सांडता । आलिंगिजे चंद्रु प्रकटता
हा अनुराग भोगिता । कुमुदिनी जाणे ॥

कुमुदिनी म्हणजे चंद्रविकासी कमल. ते चंद्रावर अंतःकरणपूर्वक प्रेम करते. चंद्र आकाशात उगवला म्हणजे ही कुमुदिनी आपली जागा न सोडताही दुरूनच चंद्राला मनाने आलिंगन देण्याचे सौख्य अनुभवते. हा अनुराग कसा भोगावा हे तीच जाणते. दूर अंतरावरूनही क्षणात एकमेकांचे निकटत्व खऱ्या प्रेमाला अनुभवता येते. खऱ्या प्रेमाला नजरभेट, स्मित, ओझरता स्पर्श, साध्या चौकशीतून व्यक्त होणारा जिव्हाळा एवढे देखील पुरेसे असते. गोविंदाग्रज म्हणतात, त्याप्रमाणे 'डोळेभेट दुरून, भाव अथवा आशाहि त्याला पुरे.' प्रेमाची खातरजमा पटवून देण्यासाठी मोठ्या देणग्या, मूल्यवान अलंकार, भारी भारी वस्तू प्रेमविषय झालेल्या

व्यक्तीला द्याव्या लागतात, ही कल्पना चुकीची आहे. प्रेम हे वस्तूंच्या मोलाने मापायचे नसते, त्या वस्तू देण्यामागे जी भावना असते तिने त्याचे मूल्यमापन करायचे असते.

प्रेमामुळे माणसाचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व बदलले पाहिजे, उमलले पाहिजे, फुलले पाहिजे. डॉ. ब्लूमफील्ड यांनी प्रेमाची तुलना चुंबनाशी केली आहे. जितक्या उत्कटपणे तुम्ही प्रिय व्यक्तीचे चुंबन घ्याल, तितका त्याचा खरा आनंद तुम्हाला स्वतःला मिळतो. फूल जितके रसरसून, हर्षोत्कट होऊन फुलते तितका त्याचा दरवळ इतरांना तृप्त करतो. प्रेमामुळे आपण उल्हसित होतो. जीवनातल्या साध्या सुखांचाही मनःपूर्वक आस्वाद घेतो. अगदी क्षुल्लक गोष्टींमधले सौंदर्य प्रेमामुळे जाणवू लागते. एकूण आयुष्यालाच एक सुंदर रसरशीत कळा येते. व्यक्तीवर काय, समाजावर काय, एखाद्या ध्येयावर काय, जीव तोडून प्रेम करणारी माणसे उदंड आशावादी असतात. प्रसन्न असतात. तृप्त असतात. याचे कारण हेच आहे. जीवन उल्हसित करणारे, संपूर्ण व्यक्तिमत्त्व पालटून टाकणारे प्रेमासारखे दुसरे अद्‌भुत रसायन नाही.

प्रेमाविषयी बोलताना डॉ. ब्लूमफील्ड यांनी अनेक विरोधी विधाने केली आहेत. त्यांतले एक विधान असे. संपूर्ण मोकळिकीसारखे दुसरे बंधन नाही. याचा अर्थ असा की, आपल्या प्रिय व्यक्तीला तुम्ही जितके मोकळे ठेवाल तितकी ती व्यक्ती प्रेमाने तुमच्याशी अधिक दृढ बांधली जाईल. फूल फुलण्यासाठी पाकळ्यांना उमलण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य हवे आणि पाकळ्या उमलत उमलत फुलापासून जितक्या दूर जातील तितक्याच खऱ्या अर्थाने त्या फुलाच्या अधिक निकट येतील. फूल आणि फुलाचे उमलणे या दोन गोष्टी मुळी वेगळ्या नसताततच ! प्रेम म्हणजे दोन व्यक्तींनी एकमेकांना जन्मभर स्वतःशी पक्के जखडून ठेवणे नव्हे, तर प्रेम म्हणजे दोन व्यक्तींनी एकमेकांना पूर्ण फुलण्याचे, पूर्ण विकासाचे स्वातंत्र्य देणे होय. आपले आवडते माणूस खूप आवेगाने आपल्याजवळ यायला हवे असेल, तर त्याला हवे तितके दूर जाण्याचे स्वातंत्र्य प्रथम तुम्ही दिले पाहिजे. कारण दुरावा म्हणजेच जवळीक, अशी ही प्रेमाच्या घरची उलटी खूण आहे ! मग अशा मुक्त प्रेमात मत्सर, द्वेष, कटूपणा, कुत्सितता अशा क्षुद्र गोष्टींना मुळीच वाव नाही, हे वेगळे सांगायला नकोच.

प्रेमाविषयी एकंदर माणसांच्या मनात खूपच गैरसमज असतात. त्यांचेही डॉ.

ब्लूमफील्ड यांनी आपल्या विवेचनात निराकरण केले आहे. प्रेम कुणी कुणावर करावे याचे विचित्र संकेत आपल्या मनात दृढमूल झालेले असतात. सुंदर आणि कुरूप, उच्चकुलीन आणि नीचकुलीन, विद्वान आणि अशिक्षित, उच्च पातळीवरील सामाजिक श्रेणीत वावरणाऱ्या आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय वातावरणात असणाऱ्या– अशा विषम व्यक्तींमध्ये प्रेम जमत नाही, जमणे शक्य नाही, अशी काहीशी आपली समजूत असते. पण ती अत्यंत भ्रामक आहे. प्रेमाला असे बुद्धिनिष्ठ निकष लावता येत नाहीत. प्रेम हे फारसे तर्कशुद्धही असत नाही. प्रेम कोणत्या दोन व्यक्तींमध्ये निर्माण होईल, याला काहीही नियम नसतो. अगदी परस्परविरोधी रूपाच्या, ज्ञानाच्या, मानसिक वा शारीरिक कुवतीच्या दोन स्त्री-पुरुषांमध्येही अत्यंत उत्कट, काव्यमय प्रेमाचा उदय होऊ शकतो. नव्हे, तो तसा झाल्याची अनेक उदाहरणे आपल्याभोवती प्रत्यक्ष आपणास दिसून येतात. त्यामुळे प्रेमाविषयी अमूक एक नियम स्वीकारणे सर्वथा अशक्य आहे.

जे प्रेम जुळण्याबाबत, तेच त्याच्या आविष्काराबाबतही म्हणता येईल. अनेक जोडपी सतत एकमेकांशी भांडताना आपल्याला दिसतात आणि त्यामुळे त्यांच्या प्रेमाविषयी आपल्या मनात संशय उभा राहतो. पण कडकडून भांडणे हीच मुळी काहींच्या प्रेमाची गरज असते, त्या भांडणातूनच त्यांच्या प्रीतीचा आविष्कार होत असतो. भांडणे, रडणे, त्यानंतर समेट करणे यात काही स्त्रियांना एक वेगळे सुख लाभते. त्यातूनच एक प्रकारे स्थैर्याची जाणीव त्यांना होते. उलट काही जोडपी वरकरणी फार सुखासमाधानात दिसतात. तरी त्यांच्यामध्ये खरे प्रेम नसते. माफक आणि कोमट अशा नात्यानेच ती एकमेकांशी बांधलेली असतात. कुठल्याही तीव्र उत्कट संवेदनेचा त्यांना कधी स्पर्श झालेला नसतो. बाहेर चारचौघांमध्ये पतिपत्नीच्या नात्याचा उत्तम देखावा करणारी कित्येक जोडपी घरामध्ये एकान्तात एकमेकांशी वर्षानुवर्षे अबोला ठेवून वागत असल्याची उदाहरणे निदर्शनाला आली आहेत. ही जोडपी केवळ लोकलाजेसाठी वा अन्य व्यावहारिक सोयींसाठी विभक्त झालेली नसतात, पण मनाने ती एकामेकांपासून शेकडो योजने दूरच असतात.

आपल्याला वाटते त्याप्रमाणे प्रेम हे भव्य, दिव्य, अलौकिक वगैरे काही नसते, असे डॉ. ब्लूमफील्ड म्हणतात. सुखी संसार हा अनेक लहान लहान गोष्टींनी सिद्ध होत असतो. नवरा थकूनभागून घरी परत आल्यानंतर बायकोने केवळ वत्सल

स्मिताने त्याच्या थकव्याचा केलेला परिहार, तापलेल्या कपाळावरून अलगद फिरणारा हात, दोघांनी मिळून केलेली एखादी वाटचाल, काढलेल्या जुन्या आठवणी, पैसे साठवून विकत घेतलेली दोघांच्या आवडीची एखादी वस्तू, वाटून घेतलेले दुःख, वाटून घेतलेला आनंद, उभयतांनी मिळून अनुभवलेली एखादी विनोदी घटना— संसाराचे महावस्त्र अशा लहान लहान, सकृद्दर्शनी क्षुद्र वाटणाऱ्या धाग्यांनी विणले जाते. खऱ्या प्रेमाला यापेक्षा वेगळे काही लागते, ही कल्पना भ्रामक आहे आणि श्रीमंतीने वैवाहिक जीवनातले सुख खरेदी करता येते, ही कल्पना तर सर्वस्वी चुकीची आहे.

शेवटी डॉ. ब्लूमफील्ड म्हणतात, 'प्रेमाची कसोटी फार मोठ्या त्यागावर अवलंबून नसते, तर लहानलहान सुखसोयींवर आपल्या प्रियजनासाठी पाणी सोडण्याच्या तुमच्या तयारीवरून त्या प्रेमाचा अंदाज बांधायचा असतो. प्रेम म्हणजे शयनगृहातला घडीभराचा उन्माद नव्हे, तर प्रेम म्हणजे आयुष्यभराची स्नेहपूर्ण, सोशिक व समंजस अशी निःस्वार्थ संगत होय. ही संगत दोन माणसे आपखुषीने पत्करतात आणि प्रयत्नपूर्वक शेवटपर्यंत निभावून नेतात.

लेखाच्या अखेरीस डॉ. ब्लूमफील्ड यांनी प्रेमाचे वर्णन करणारा बायबलमधला एक उतारा दिला आहे. तो अतिशय सुंदर आहे. हा उतारा असा आहे—

'प्रेम हे सोशीक असते. मायाळू असते. प्रेम कुणाचा मत्सर करीत नाही. अहंकाराची भाषा कधी बोलत नाही. प्रेम गर्विष्ठ नसते. उद्धट नसते. तुसडे नसते. स्वार्थी नसते. प्रेम चिडत नाही. प्रिय व्यक्तीने केलेल्या अपराधाची नोंद ठेवत नाही. त्या व्यक्तीच्या चुका बोलून दाखवण्यात आनंद मानत नाही. प्रेमाला हवे असते सत्य. प्रेम ज्याला तोंड देऊ शकणार नाही, असे जगात कुठलेही संकट नाही. प्रेमाच्या विश्वासाला, श्रद्धेला मर्यादा नाही. प्रेमाच्या आशेला अंत नाही आणि प्रेमाला अजिंक्य असे या जगात काही सुद्धा नाही !'

□

# ... रूटीन

'छे बुवा ! विटलो या रूटीनला. आता अगदी नको झालंय हे सारं.'

इतकी वर्षं या एकाच ऑफिसात नोकरी करतोय. एकाच खुर्चीवर बसतोय अन् तेच ते सरकारी कागदाचे पिंगट खाकी रंगाचे गठ्ठे उलथेपालथे करतोय. ऑफिसात तोच काळोख. भोवती वर्षानुवर्षे तेच चेहरे. कँटीनमधल्या चहाची तीच ठराविक गुळचट चव आणि साहेबाचे तेच डाफरणे. एकदा रिटायर झालो की, पुन्हा म्हणून या ऑफिसचं मला तोंड बघणं नको.'

'या कॉलेजमधल्या प्राध्यापकीला कंटाळलो बुवा. प्राध्यापकी कसली, मास्तरकीच म्हणा. समोर उर्मट पोरं अन् बावळट पोरी. कॉमनरूममध्ये जावं तर तेच ते निर्बुद्ध सहकारी. सुट्टी लागली की पेपरांचे तेच ते गठ्ठे. रतीब घातल्यासारखं रोज पोरांच्या अंगावर तेच तेच वाचलेलं ज्ञान आम्ही ओततो आणि त्यांच्या अंगावरून ते सारं वाहून जातं. सहकाऱ्यांशी संवाद नाही. मुलांच्या मनापर्यंत पोहोचण्याचा आनंद नाही, की काही चांगलं शिकवण्याचं 'थ्रिल' नाही. इथं आल्यापासून बुद्धी गंजून चाललीय पार. संस्कृत काव्यावरचा ग्रंथ कधीचा अर्धवट पडलाय, तो पुरा करायचा...'

'आता घरात सून आली आहे. सारं घर तिच्यावर सोपवणार आणि सामाजिक कार्याला मी स्वतःला वाहून घेणार !'

'मी सतार शिकणार, किती वर्षांपासून बाळगलेलं स्वप्न आहे.'

'मी चित्रं काढणार !'

'मी आता भरपूर प्रवास करणार. हिचाही फारा दिवसांचा हट्ट आहे. अन् आता अनायासे सवड आहे. पैसेही आहेत'

अशी अनेक वक्तव्ये आपण आपल्याभोवती नेहमी ऐकतो. आपण स्वतःही

असे काही अधून मधून बोलतो. ज्यांच्या बापजाद्यांनी बऱ्यावाईट मार्गांनी पैसा कमावून आपल्या पुढल्या सात पिढ्यांची तरतूद करून ठेवली आहे, असे काही मोजके भाग्यवंत हरीचे लाल सोडले, तर आपणांपैकी प्रत्येकाला पोट भरण्यासाठी काही ना काही उद्योग हा करावाच लागतो. काहींच्या दुर्दैवाने न आवडणारे काम त्यांना करण्याची पाळी येते. पण पुष्कळांनी आपखुषीने आणि मोठ्या उमेदीने आपला व्यवसाय पत्करलेला असतो. सुरुवातीला माणसे त्यात रमतातही. नवे काही करण्यासाठी धडपडतात. जिद्दीने आणि हौसेने भरपूर कष्ट करतात. पण काय होते कुणास ठाऊक. जे एकेकाळी फार आवडीचे होते, ते हळूहळू 'रूटीन' बनते. त्याला एक कळकट कळा येते. शिळवट आंबूस वास मारू लागतो. मग ते सारेच कंटाळवाणे होऊन बसते. नकोसे वाटू लागते.

बऱ्याच वर्षांपूर्वी 'द सेव्हन इयर्स इच' नावाचा एक मजेदार, सुरेख चित्रपट येऊन गेला. वैवाहिक जीवनात विशिष्ट कालावधीनंतर एक अशी अवस्था येते की, त्या वेळी पती आणि पत्नी दोघांनाही एकमेकांचा सहवास नकोसा वाटू लागतो आणि प्रणयाच्या अनोळखी पण रोमांचकारी प्रांतात त्यांना पुन्हा एकदा धाडसी मुशाफिरी करावीशी वाटते. असे काहीसे त्या चित्रपटाचे कथानक होते. पण मला वाटते, हे केवळ वैवाहिक संबंधापुरतेच खरे आहे असे नाही. इतरही सर्व प्रकारच्या संबंधात हाच न्याय लागू पडतो. सवयीने म्हणा, अतिपरिचयाने म्हणा किंवा त्या विशिष्ट व्यवसायाबद्दल, नातेसंबंधाबद्दल मनात जोपासलेली स्वप्ने विफल ठरल्यामुळे म्हणा, काही काळानंतर ते सारेच नकोसे होऊन जाते. आणि मग पौगंडावस्थेत मनाच्या तळाशी बाळगलेल्या इतर काही हौशी, छंद, आशाआकांक्षा हलकेच डोके वर काढू लागतात. तशी आपण सारी सामान्य माणसे असतो. पण सामान्य माणसांनी स्वप्ने बघू नयेत असे थोडेच आहे ? आपल्यापैकी प्रत्येकाने स्वतःचे मन तपासून बघावे आणि तिथे अशी काही उत्कट स्वप्ने आपण कधीतरी जपलेली आहेत किंवा नाही याचा शोध घ्यावा. अनेकदा आपल्या सामान्य व्यक्तित्वाशी त्यांचा दूरतःही संबंध येऊ शकणार नाही, इतकी ती अशक्य असतात. पण ती असतात यात शंका नाही. वर्गाच्या चार भिंतींपलीकडे ज्याचे वक्तृत्व पोहोचण्याचा संभव नाही, अशा एखाद्या मास्तरला स्वातंत्र्यवीर सावरकर किंवा बॅ. जयकर ह्यांच्यासारखा फर्डा वक्ता होऊन सभा गाजवण्याची हौस असते. सतार, तंबोरा, सारंगी यांतला फरक सुद्धा जिला कळत नाही, अशा एखाद्या व्यक्तीला

रविशंकरसारखी सतार वाजवायची इच्छा असते. दोन रेघाही सरळ मारता न येणारा एखादा माणूस चित्रकार होऊन रंगरेषांचे अद्‌भुत इंद्रजाल निर्माण करण्याची आशा मनाशी बाळगून असतो. कुणाला राजकारणात काही कर्तबगारी गाजवायची असते. कुणाला संतवाङ्मयाचा अभ्यास करायचा असतो. कुणाला उत्तम लेखन करायचे असते. कुणाला परदेशात नाही, तर निदान भारतात तरी भरपूर प्रवास करायचा असतो.

एक ना दोन. पण प्रत्येकाला दूर कुठे तरी क्षितिजावर सुंदर सुंदर स्वप्नांची इंद्रपुरी दिसत असते. कधी ना कधी आपण ती गाठायचीच, असा त्याने निश्चय केलेला असतो. मन तिकडे झेप घेत असते, पण शरीर रोजच्या व्यवसायात गुंतून पडलेले असते. मग तो स्वतःशी म्हणतो, 'आता नाही, पण एकदा या कामातून सुटलो, सेवानिवृत्त झालो, पैसा आणि सवड मिळाली की, मी हे सर्व करणार आहे. साऱ्या हौशी पुरवून घेणार आहे. छंदांची जोपासना करणार आहे. करणारच आहे.'

पण प्रत्यक्षात अनुभव काय येतो ? जे एकीकडे आपल्याला कंटाळवाणे वाटत असते, 'रूटीन' झालेले असते, त्यावर आपल्या नकळत एव्हाना आपण प्रेम करू लागलेलो असतो. आपला जीव तिथेच गुंतलेला असतो. जे सोडायसाठी आपण अगदी घाईला आलेले असतो ते एकदा सुटले की, आपल्या पायांखालची जमीनच निसटल्यासारखी होते. आपण सैरभैर होतो. आपल्याला निराधार वाटू लागते. परिणामी आपण पुन्हा तिकडेच वळतो. तेच पुन्हा करू लागतो. हे कुणाला चमत्कारिक वाटेल, पण असे असते यात शंका नाही. याची कितीतरी उदाहरणे मी माझ्या अवतीभवती पाहिली आहेत.

माझ्या धाकट्या बहिणीने वीस वर्षे शिवणाचा क्लास चालवला. काहीसा कौटुंबिक गरजेमुळे, तर काहीसा शिवणाची एकच कला तिला अवगत होती म्हणून. पुढे आर्थिक गरज संपली. मुले कमावती झाली. अन् तिने क्लास बंद केला. तेव्हा ती मला म्हणे, 'मशीन, टेप, सुई, दोरा, कातरी या गोष्टींचा मला इतका वीट आला आहे की, मी आता चुकूनसुद्धा त्यांना हात लावणार नाही. आता मला त्याची गरजही नाही. मी खूप वाचणार. आराम करणार. नातेवाईकांकडे जाणार. आजवर जे जे मला करता आलं नाही ते सारे मी करणार !' मला तिचा निर्धार ऐकून आनंद झाला. खरेच, आजवर तिने खूप कष्ट उपसले होते. आता विश्रांतीवर, मनोरंजनावर तिचा अधिकार होता. पण प्रत्यक्ष विश्रांती घेता येईल अशी परिस्थिती निर्माण झाली,

तेव्हा तिने काय केले ? प्रथम काही दिवस तिला मुळीच करमेना. मग ती गंमत म्हणून घरातल्याच माणसांचे कपडे– विनामोबदला शिवू लागली. त्यांत नवे नवे प्रयोग करू लागली. होता होता तिने पुन्हा बाहेरचे कपडे शिवायला घ्यायला सुरुवात केली, आणि आता तर ती इतके काम करते की तिला घटकाभर कुणाकडे जायचे म्हटले, तरी मुद्दाम वेळ काढावा लागतो. जे कंटाळवाणे 'रूटीन' तिने कायमचे सोडण्याचा निश्चय केला होता, तेच ती आता पुन्हा करते आहे. गरज म्हणून नव्हे, तर आवड म्हणून. त्यातच मन रमते म्हणून.

माझ्या ओळखींचे एक प्रौढ जोडपे तरुणपणापासून प्रवासाची स्वप्ने बघत होते. पण हाती पैसा नाही म्हणून, मग मुले लहान म्हणून, पुढे त्यांचे शिक्षण नीट व्हायला हवे म्हणून त्यांनी प्रवासाचा विचार सारखा पुढे पुढे ढकलला. अखेर एक दिवस असा आला की, आता सर्व अडथळ्यांचे निवारण झाले होते. मुले मोठी होऊन नोकरीला लागली होती. सुना शहाण्या होत्या. नोकरीचे जोखड मानेवरून खाली उतरले होते. पैशांचाही प्रश्न नव्हता. मुलांनी मनापासून सांगितले, 'आई, बाबा, तुम्ही मनसोक्त प्रवास करा. काश्मीर, माळवा, दक्षिणेकडे कन्याकुमारी– कुठे हवे तिकडे फिरून या. पैशाची काळजी करू नका. घराचा विचार मनात आणू नका. आम्ही सगळं नीट सांभाळू. तुम्ही जन्मभर कष्ट केलेत. आता मजा करा.' ही प्रौढ पतिपत्नी मोठ्या उमेदीने प्रवासाला निघाली आणि आठ-दहा दिवस लोटले नाहीत तो घरी परत आली ! बाबांना घराबाहेर अनोळखी ठिकाणी रात्री झोप येत नव्हती, तर आईचा जीव संसार, नातवंडे यामध्ये गुंतला होता. सुना कपाटाला चावी लावायच्या विसरतील का, धाकटे बाळ रांगत रांगत जिन्याकडे तर जाणार नाही, थोरल्या लेकाला आईच्याच हातचे विरजलेले दही हवे असे, तसे त्याच्या बायकोला लावायला जमेल का, अशा अनेक काळज्यांनी आई ग्रस्त झाली होती. तात्पर्य, त्यांचा प्रवास तिथेच संपला !

प्राध्यापकीच्या व्यवसायाला भयंकर कंटाळलेले आमचे एक मित्र सेवानिवृत्त झाले, तेव्हा आम्ही सर्वांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. गृहस्थ बुद्धिमान होते, व्यासंगी होते आणि सेवानिवृत्तीनंतर काहीतरी उत्तम लेखन करण्याचा आपला संकल्प त्यांनी आम्हाला अनेकदा बोलून दाखवला होता. तो संकल्प पार पाडण्याइतकी बौद्धिक शिस्त व क्षमताही त्यांच्यापाशी होती. आता हे सर्व होईल म्हणून आम्ही आशेने वाट बघत राहिलो आणि एके दिवशी कळले की, प्राध्यापक

एका खाजगी क्लासमध्ये मुलांना शिकवू लागले आहेत. खरे तर त्यांना तशी आर्थिक अडचण नव्हती. मी एकदा याविषयी त्यांना विचारले, 'शिकवण्याचा तुम्हाला कंटाळा आला होता ना ?' त्यावर ओशाळवाणे हास्य करून ते म्हणाले, 'हो बुवा, निदान मला तसं वाटत होतं. पण सेवानिवृत्तीनंतर मला करमेना, रोज तास घ्यायची, समोर भरलेला वर्ग बघण्याची, पंचेचाळीस मिनिटं अस्खलित बोलायची सवय लागली होती. ते सारखं आठवायला लागलं. मन बेचैन झालं. मग धरली झालं ही क्लासमधली शिकवणी. आता कसं छान वाटतंय !'

'पण तुमचं ते 'सॉलिड' लेखन ? त्याचं काय ?' मी विचारले.

'अं ! त्याचं काय मोटंसं ? करू पुढे मागे. अजून भरपूर वेळ आहे. आताच काय घाई लागलीय ?' ते हसत हसत म्हणाले, 'बाकी क्लासमध्ये शिकवताना मजा येते हं. पुन्हा जुने दिवस आठवतात !'

हे असे का होत असेल बरे ? जे 'रूटीन' आपल्याला अतिशय कंटाळवाणे झालेले असते, त्याच्यावरच दुसरीकडे आपल्याही नकळत आपण प्रेम करत असतो का ? तिटकारा आणि प्रेम या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. Love-Hate Relatioship हा शब्द आपण ऐकलेला आहे. आपल्या व्यवसायाशी, दैनंदिन उद्योगांशी आपले याच प्रकारचे नाते जडलेले असले पाहिजे. ते काम, तो परिसर, ती माणसे ही आपली केवळ मानसिकच नव्हे, तर शारीरिकही गरज होऊन बसत असावी. छापखान्यात काम करणाऱ्या माणसाला शाईचा, खळीचा, कोऱ्या कागदांचा वास अतिशय आवडतो. कारखान्यात काम करणाऱ्या लोकांना तेलाचे, धुराचे, मशीनचे वास असेच आवडतात. तिथल्या यंत्रांच्या धडधडाटाची त्यांच्या कानांना सवयच नव्हे, तर भूक असते. मुंबईला रेल्वेलगतच्या जागेत अनेक वर्षे राहणारे एक कुटुंब नंतर स्वतःच्या मालकीच्या सुंदर, मोकळ्या, हवेशीर फ्लॅटमध्ये राहायला गेले. आपल्या नव्या घरी त्यांनी मला एकदा हौसेने बोलावले. मी त्यांच्या नव्या जागेचे कौतुक केले आणि म्हटले, 'किती शांत, सुंदर परिसर आहे हा ! बऱ्याच वर्षांनी इतका निवांतपणा तुम्हाला लाभला. खरंच. मला इतकं आवडलं तुमचं घर म्हणून सांगू !'

माझे बोलणे ऐकून ते गृहस्थ क्षणभर स्तब्ध राहिले. मग ते म्हणाले, 'तशी जागा छानच आहे हो. पण माझी एक विचित्र अडचण होऊन बसली आहे इथं. इतकी वर्षं रोज रात्री रेल्वेचा धडधडाट ऐकायची सवय झाली होती ना ? आता या

शांततेमुळे रात्री झोपच येत नाही बघा. चुकल्यासारखं वाटतं !'

संकल्प आणि सिद्धी यांच्यामध्ये परमेश्वराची इच्छा उभी असते, असे गडकरी म्हणतात. मला वाटते, संकल्प आणि सिद्धी यांच्यामध्ये परमेश्वरी इच्छेपेक्षा आपली अनिच्छा उभी असते, असे म्हटले तर ते अधिक सार्थ होईल. आपल्याला खूप काही करावेसे वाटत असते, अनेकदा ते करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक अनुकूलता, प्रकृतीचे स्वास्थ्य, भरपूर वेळ हेही आपल्यापाशी असते. करू जरा नंतर, आताच काय घाई आहे, असे म्हणत असतो आणि अनेकदा यांतले काहीही आपण कधीच करत नाही. असे का व्हावे, याचे मला नेहमीच आश्चर्य वाटत आले आहे. कधी कधी यामागे निव्वळ कंटाळा असतो. कधी कधी भरपूर आयुष्य पडले आहे, 'कालो ह्ययं निरवधि' असे खरोखरच आपल्याला वाटत असते, तर कधी कधी या वरवर दिसणाऱ्या कारणांपेक्षा काही अतर्क्य, गूढ मानसिक कारणेही आपल्या कृतिहीनतेच्या मागे असतात. पण माझी कल्पना आहे, ज्या कंटाळवाण्या 'रूटीन'च्या नावाने आपण अनेकदा खडे फोडतो, ते आतून आपल्याला सोडवत नाही. आपले घर, ओळखीचा परिसर, नित्यपरिचयाची आणि रोज भेटत राहणारी तीच तीच माणसे, यांचा आपल्याला वीट आला आहे, असे आपण म्हणतो. ते खरेही असते. तरी देखील कुठली अगम्य प्रेरणा आपल्याला त्यात गुंतवून ठेवते कोण जाणे ! एकीकडे हे आपल्याला नको असते, पण दुसरीकडे ते आपल्याला हवेही असते. त्यात कदाचित सुरक्षिततेची भावना असेल. ती आपली मानसिक आणि शारीरिक गरज होऊन बसलेली असेल. कदाचित स्थळे म्हणा, माणसे म्हणा, अनुभव म्हणा, जे अनोळखी आहे त्याचे आपल्याला भय वाटत असेल. ती प्राणिमात्राची आत्मसंरक्षणाची उपजत प्रेरणाही असेल. पण बदल हवा, बदल हवा, असे म्हणता म्हणता आपण बदल टाळत असतो आणि तो टाळण्यासाठी स्वतःची अनेक प्रकारे फसवणूक करत असतो, हे मात्र खरे. असे का असावे, हे मानसशास्त्रातले एक अगम्य कोडेच आहे. पण त्याचा प्रत्यय मला, तुम्हाला, आपणा सर्वांना येत असतो, यात शंका नाही.

महानुभाव साहित्यामध्ये एक मजेदार कथा वाचल्याचे मला आठवते. एका माणसाची एक गाय होती. त्या गाईसाठी चांगला गोठा बांधणे, त्याला अद्याप जमले नव्हते. गाय जिथे असायची तो गोठा अगदीच गैरसोयीचा होता. वरचे छप्पर गळके असल्यामुळे पावसाळ्यात वरून सारखे गाईच्या अंगावर पाणी ठिबकत असे.

जमीन वेडीवाकडी व भुसभुशीत होती. तिथे चिखल झाला म्हणजे गायीचे खूर त्यात रुतत. खुरांमध्ये कृमी होत. भिंती इतक्या जवळ जवळ होत्या की, गाईने जरा मोकळेपणाने हालचाल केली तर तिची शिंगे भिंतीवर आपटून खटखट आवाज करत. एकूण त्या अरुंद गळक्या गोठ्यात गाईला अजिबात सुखसोयी नव्हत्या. तिचे तिथे हालच होते. नंतर मालकाला गाईची दया आली. नवा गोठा बांधण्याइतके पैसेही त्याच्यापाशी साचले. त्याने एक सुरेख, भक्कम, आरामशीर गोठा बांधला आणि गाईचा मुक्काम तिथे हलवला. पण त्या साऱ्या सुखात गाईला चैन पडेना. तिला पहिलाच गोठा हवा होता. त्याचीच तिला सवय झाली होती. नव्या गोठ्यात गाईने थोडे दिवस मोठ्या कष्टाने काढले. पण नंतर एके दिवशी ते सगळे तिला असह्य झाले. तिने हिसकाहिसकी करून गळ्यातले दावे तोडून टाकले आणि ती जी नव्या गोठ्यातून धावत सुटली, ती थेट आपल्या पहिल्या गोठ्यात, मूळच्या जागेवर येऊन उभी राहिली. तिथल्या साऱ्या गैरसोयींसह तिला तोच गोठा, तेच वसतिस्थान हवे होते.

आपली मने त्या गाईसारखीच असतात. कितीही गैरसोयी असल्या, तरी त्या मनांना पूर्वीचेच सारे ओळखीचे हवे असते. तिथेच त्यांना सुख, सुरक्षितता लाभते. 'छे बुवा ! हे सारे आता नकोसं झालंय !' असे आपण तोंडाने म्हणत असतो खरे, पण तो केवळ एक बहाणा असतो, एक फसवणूक असते.

□

# वो ही किनारा हो गया

शेरोशायरी या प्रकाराबद्दल एकूण मला फारशी आपुलकी नाही. एक तर मला उर्दू, अरबी, फारसी या भाषा येत नाहीत. (शेर या भाषांतलेच असतात ना ?) त्यामुळे शेर कुणी ऐकवले, तर त्यातले मर्म, सौंदर्य, अर्थाच्या सूक्ष्म छटा मला कळत नाहीत. आणि जे कळत नाही त्यात साहजिकच मन रमत नाही. शेर न आवडण्याचे दुसरे कारण असे की, शेर पेश करणे, ऐकणारांनी त्याला जोरदार दाद देणे, मध्येच बेहोष होऊन 'माशाल्ला', 'क्या बात है', 'दुबारा कहिये' इत्यादी अ-मराठी शब्दांची वारेमाप खैरात करत आपली रसिकता व्यक्त करणे, हे सारेच मला अनेकदा फार ढोबळ, सांकेतिक, कृत्रिम वाटते. यात सहजता नाही, उत्स्फूर्तता नाही, एखादे कर्मकांड (Ritual) हेतुपूर्वक आचरावे तसा हा सगळा प्रकार चालला आहे, असे काहीसे मनात येते आणि मग त्या उत्सवात मला काही केल्या भागीदार होता येत नाही. अवघडल्यासारखेच होऊन जाते. कदाचित या विषयाबद्दलचे माझे अज्ञान गाढ आहे, असेही असू शकेल.

अलीकडे मी बघते की, काही निमित्ताने चार रसिक, सुसंस्कृत, साहित्यप्रेमी किंवा साहित्यिक मंडळी एकत्र गमतीने वेळ घालवण्यासाठी जमली, तर त्यात हटकून एखादा 'शेरशहा' असतो. तो संभाषणात मोठ्या चतुराईने मधून मधून शेरांची पेरणी करत राहतो. तळलेल्या बटाटा चिप्स खाताना आपण ज्याप्रमाणे चवीसाठी मधून मधून त्यावर मीठ, मिरपूड पेरतो, तसाच जवळपास हा प्रकार असतो. त्यामुळे संभाषणाची रुचीही थोडीशी वाढत असेल. पण कित्येकदा बाकीच्या संभाषणावर हे शेर नको तितके आक्रमण करतात. त्यातही ते शेर शृंगारिक भावनेकडे झुकणारे असले तर, मग बघायलाच नको. ऐकणारे रसिक पुष्कळदा जणू आपणच तो शृंगार अनुभवत आहोत, अशा पद्धतीने गुदगुल्या

झाल्यासारखा त्यातला आनंद लुटतात. हाही प्रकार अनुचित वाटतो. सर्वांत वाईट गोष्ट ही की, एकदा हे शेरोशायरी प्रकरण सुरू झाले म्हणजे बैठकीचा चेहरामोहराच बदलून जातो. संभाषणाची पातळी खाली येते. गंभीरपणे, उत्कटतेने काही बोलण्याची सोय राहत नाही.

हे सर्व खरे असले, तरी एक गोष्ट मला स्पष्ट केली पाहिजे. शेर या काव्यरचनाप्रकाराशी माझे काही भांडण किंवा वैर नाही. त्याबद्दल माझी वृत्ती पूर्वग्रहाने कलुषित झालेली आहे, असेही नाही. तसा कुठलाही काव्यप्रकार मी वर्ज्य मानलेला नाही. साऱ्यांकडे मी स्वागतशील भूमिकेवरूनच बघत असते. आणि प्रत्येक प्रकारात काही ना काही सुंदर, समर्थ, भावगम्य असा भाग असतोच, यातही शंका नाही. पण मराठीत एक मोठी विचित्र प्रवृत्ती दिसून येते. (इतर भाषांतही ती असू शकेल.) आपल्याकडे एकदा एखादी नवी टूम आली की, सगळीकडे फक्त तिचाच उदोउदो होऊ लागतो. मग एकंदर साहित्यात दुसरे काही सुंदर वा अनुकरण करण्याजोगे नाहीच, अशी एकारलेली भूमिका काही जण घेतात. नव्यानेच पंख फुटलेले काही छोटे छोटे कवी या सार्थीचे बळी होतात. मागे जपानी हायकूंचे असेच सर्वांना वेड लागले होते. काही दिवस जो उठे तो केवळ हायकू लिही. मग आले गझलचे वेड. गझल म्हणजे नेमके काय, ते वृत्त आहे की वृत्ती आहे, रदीफ म्हणजे काय, काफिया म्हणजे काय, मतला म्हणजे काय, या वादात मी पडू इच्छित नाही. कारण गझलचा मी अभ्यास केलेला नाही. अर्थात त्यावर बोलण्याचा मला अधिकारही नाही; परंतु गझलची बांधणी निर्दोष आणि पक्की असावी लागते, मात्रांचा हिशेब तिथे आपल्याकडील वृत्तांइतकाच नेमकेपणाने पाळावा लागतो, हे मी ज्या चांगल्या गझलकारांचे गझल थोडे बहुत वाचले आहेत, त्यावरून माझ्या ध्यानात आले आहे. पण काही नामांकित व प्रतिष्ठित गझललेखक वगळले, तर नव्या कवींचे गझल इतके सुमार असतात, त्यांत मात्रांच्या इतक्या चुका असतात आणि रचनेचा इतका ढिसाळ गलथानपणा असतो की काही पुसू नये. त्यामुळे असे गझल वाचताना कंटाळा येतो. त्यांच्यातला भावनेचा एकसुरीपणा असह्य होतो. आणि त्यातून सातत्याने व्यक्त होणाऱ्या दुःखभावनेबद्दलही संशय वाटू लागतो. पण आज गझलरचनेचे वेड किती अफाट प्रमाणात वाढले आहे. 'गझल के सिवा बात नाही' अशी प्रतिज्ञा करून जो उठतो तो गझल लिहितो आहे. शेरोशायरीत रंगून जाण्याचा प्रकार हा या गझलवेडाचाच एक आनुषंगिक परिणाम— Side

effect आहे. शेर म्हटले की ते नको वाटतात, त्याचे हे एक कारण असावे.

हे सगळे असे असले तरीही मीर, दाग, गालिब यांचे काही गझल मी वाचले आहेत. जाणकारांकडून ते समजून घेण्याचा मनःपूर्वक प्रयत्न केला आहे. त्यांतले काही मला फार आवडले आहेत. आणि माझ्या चमत्कारिक स्मरणशक्तीमुळे ते माझ्या ध्यानातही राहून गेले आहेत. मुंबईला एकदा एका ट्रकच्या मागल्या बाजूला लिहिलेला एक शेर मी वाचला. तो मला इतका आवडला की, लगेच तो पाठही होऊन गेला. शेर असा होता—

फानूस बनके जिसकी हिफाजत हवा करे
वो शम्मा क्या बुझे जिसे रोशन खुदा करे

नंतर मी कुणाकडून तरी या शेराचा अर्थ व्यवस्थित रीतीने समजावून घेतला. तो खरोखरच सुंदर होता. अर्थ असा की 'भोवतालची हवाच कंदील बनून जिचे संरक्षण करते ती ज्योत कशी विझणार ? प्रत्यक्ष परमेश्वरानेच मुळी ती प्रज्वलित केलेली असते ना !'

असाच आणखी एक शेर कुणीतरी मला ऐकवला होता. माझ्या समजुतीप्रमाणे कुठल्या तरी नामवंत गझलकाराच्या गझलमधला तो शेर आहे. मूळ कवीचे नाव मला माहीत नाही. पण शेर पाठ झाला आहे. तो असा—

सितारोंसे आगे जहाँ और भी है
अभी प्यारके इम्तेहा और भी है

या शेराचा अर्थही फार गोड आहे. तो असा— 'आकाशात आपल्याला दिसतात त्या तारकांच्या पलीकडेही अगणित विश्वे आहेत. अरे वेड्या, प्रीतीच्या कितीतरी परीक्षा तुझ्या अजून द्यायच्या राहिल्या आहेत.'

शेरोशायरीबद्दलची माझी उदासीनता व अनावड व्यक्त करता करता मीही शेरच सांगत सुटले, या गोष्टीने कुणाला यात माझा ढोंगीपणा आहे अशीही कदाचित शंका येईल. पण तसे खरोखर काही नाही. मी आधीच म्हटले आहे की जे चांगले आहे त्याची जातकुळी मी कधीच बघायला जात नाही. जे मला आवडते ते आवडतेच. किंबहुना आज मला जे लिहायचे आहे ते एका शेराबद्दलच लिहायचे आहे. उत्तम काव्य एकदम कळत नाही. ते हळूहळू मनात झिरपत— मुरत जाते. वाढत्या वयाबरोबर त्यांचा अर्थ अधिकाधिक खोलपणे आकलन होत जातो. तुकारामाच्या अभंगांबद्दल असेच घडते. आपण लहानपणापासून हे अभंग

वाचलेले असतात, पण त्यांचा अर्थ वय वाढत जाते तसतसा अधिक कळतो, त्या अर्थाला अधिकाधिक परिमाणे येत जातात. त्यातून जीवनाचा तळ स्पष्टपणे दिसू लागतो.

असाच एक सुंदर शेर मी फार वर्षांपूर्वी ऐकला होता. सुप्रसिद्ध संगीतकार आणि प्रतिभाशाली कलावंत वसंत पवार हे आमच्या घरी एकदा आले होते. जरा अवेळीच, म्हणजे रात्री आले होते. थोडे प्यायलेलेही होते. तरीही—किंबहुना त्यामुळेच- दोन अडीच तास मैफल फार रंगली. त्या दिवशी वसंतरावांनी दिलखुलासपणे अनेक गाणी, लावण्या, कवाल्या, तऱ्हेतऱ्हेच्या चाली ऐकवल्या. त्यातच त्यांनी एक शेर मला सांगितला होता. शेर असा होता—

ज़ौक इस बेहरेफनामे कश्तिये उम्रेरवां
जिस जगह जाकर लगी वोही किनारा हो गया

मला तेव्हाही शेरातले काही कळत नव्हतेच. मी वसंतरावांना त्याचा अर्थ विचारला. तेव्हा ते म्हणाले, 'हा शेर ज़ौक नावाच्या कवीचा आहे. तो स्वतःलाच उद्देशून म्हणतो आहे, अरे ज़ौक, सारे जीवन हाच मुळी एक विपत्तींनी भरलेला सागर आहे. या सागरात आपल्या आयुष्याची नौका अशीच कुठेतरी भरकटत जाते. जाता जाता ती जिथे कुठे जाऊन पोहोचते, तोच आपला किनारा म्हणायचा ! बेहरेफना म्हणजे विपत्तीचा सागर. कश्तिये उम्रेरवां म्हणजे आयुष्याची नौका, समजलं ?'

वसंतरावांनी अर्थ अगदी नीट, बारकाईने समजावून सांगितला. मला शेर आवडला. त्याचा अर्थही कळला. पण अर्थ कळला म्हणजे काय, नुसता शब्दार्थ कळला. त्याच्या मागचे जे अपार दुःख होते, आयुष्याच्या अपरिहार्यतेचा जो हताश तरीही समंजस स्वीकार होता, तो मला आकलन झाला नाही. तो आकलन होण्याचे ते वयच नव्हते. आणि आयुष्याचा अनुभवही तितका पक्व झालेला नव्हता. दुःखाचे चटके अजून बसायचे होते आणि नियतीची अतर्क्य वेडीवाकडी वळणेही निदर्शनाला यायची होती.

वसंतरावांनी सांगितलेला शेर मात्र माझ्या ध्यानात राहून गेला. पुढे माझ्या लक्षात आले की, अनेक ठिकाणी, अनेक कारणांमुळे तो शेर आपल्याला आठवतो आहे. आणि प्रत्येक वेळी त्याचा अर्थ पुन्हा नव्याने जाणवतो आहे.

मी कॉलेजात शिकत होते तेव्हा बी. ए.च्या वर्गात पाटणकर नावाचा एक शांत, अबोल, संकोची विद्यार्थी होता. तो वर्गात कधीच बोलत नसे. कॉलेजच्या कुठल्याही कार्यक्रमात कधी चमकत नसे. आपल्या अभ्यास बरा की आपण बरे, ही त्याची मनोवृत्ती होती. वर्गात काही हुशार विद्यार्थी आणि विद्यार्थिनी होत्या. त्यांतल्या अनेकांबद्दल प्राध्यापकांच्या मनात अपेक्षा होत्या. त्यातलेच कुणीतरी मराठीला बी. ए.त पहिले येईल, तर्खडकर पारितोषिक पटकावील, कॉलेजचा आणि प्राध्यापकांचा गौरव वाढवील, असे सर्वांना वाटत होते. पण परीक्षेचा निकाल लागला आणि सगळ्या कॉलेजला आश्चर्याचा धक्का बसला. इतर सगळ्या हुशार विद्यार्थ्यांना अन् विद्यार्थिनींना मागे टाकून पाटणकर पहिला आला होता. त्याला परीक्षेत भरघोस गुण मिळाले होते. इतकेच नव्हे, तर ते कौतुकाचे तर्खडकर पारितोषिकही त्यानेच पटकावले होते. आम्हा सर्वांना अर्थातच आनंद झाला. पाटणकरने स्वतःबरोबर कॉलेजची मान उंचावली होती. पण आनंदाबरोबर आम्हाला काहीसे आश्चर्यही वाटले. पाटणकर पहिला आला ? तसे तर काहीच कधी कुणाला जाणवले नव्हते. त्याच्या हुशारीचा कधी गवगवा झालेला नव्हता, की विशेष अधिकार स्वतःकडे घेऊन प्राध्यापकांशी सलगीने वागतानाही त्याला कधी कुणी पाहिले नव्हते. तरी त्याने शेवटी बाजी ज़िंकली होती. पहिला क्रमांक आणि पारितोषिक मिळवून त्याने सर्वांना थक्क केले होते.

वसंत पवारांनी मला वर सांगितलेला शेर ऐकवला आणि मला पाटणकरची आठवण आली. पाटणकरच्या झगमगत्या यशाने आम्ही सर्वजण भारावून गेलो होतो. आम्हीच त्याच्या भविष्याची उज्ज्वल चित्रे रंगवत होतो. तो आता एम. ए.लाही पहिला येणार. पारितोषिक मिळवणार. मग तो प्राध्यापक होणार. लेखक होणार. समीक्षक होणार. त्याचे नाव सारखे मोठे होऊन गाजत राहणार. एक ना दोन. कितीतरी गोष्टी त्याच्या बाबतीत संभवनीय होत्या. पण पुढे एकदम काय झाले होते कोण जाणे. पाटणकर, मला वाटते, एम. ए.लाही बसला नव्हता. आणि कुणीतरी मला बऱ्याच वर्षांनी सांगितले होते की, तो कोकणात एका आडबाजूला गावातल्या शाळेत हेडमास्तर झाला होता. त्याच्या आयुष्याची नौका कोकणातल्या एका गावाला जाऊन लागली होती आणि तोच त्याचा किनारा बनला होता.

मी शाळेत शिकत असताना आमच्या वर्गात प्रधान नावाची एक मुलगी होती. रूपाने देखणी तशीच बुद्धीनेही अत्यंत तल्लख. तिचे अक्षर सुंदर. वागणे,

नेसणे-सवरणे ऐटबाज. बोलण्यात ठाम आत्मविश्वास. गणित आणि संस्कृत अशा अगदी परस्परविरोधी विषयांत तिची मती सारख्याच वेगाने चाले. अभ्यासाखेरीज वक्तृत्व, चित्रकला, संगीतकला यांतही तिने चांगले प्रावीण्य मिळवले होते. या मुलीबद्दल आम्हा इतर मुलींना कौतुक वाटे आणि थोडी असूयाही वाटे. ही पुढे किती थोर होईल, याच्या कल्पनेनेही आम्हाला गरगरल्यासारखे होऊन जाई. आणि संधी मिळती तर प्रधान कुठच्या कुठे गेलीही असती. पण मॅट्रिक होताच तिचे लग्न झाले. तिच्या सौंदर्यामुळे आणि हुशारीमुळे कुठल्या तरी एका संस्थानच्या माजी दिवाणांनी आपल्या मुलासाठी तिची निवड केली. प्रधानला श्रीमंत आणि खानदानी स्थळ मिळाले. पण हे एक सोडले तर बाकी सर्व बाजूंनी तिची कुचंबणाच झाली. तिला प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांमुळे पुढे शिकण्याची संधी नाकारली गेली. भारी भारी लुगडी नेसून आणि अंगभर दागिने घालून मिरवण्यापलीकडे तिला मुळी काही कर्तव्यच राहिले नाही. लग्नानंतर एकदा दोनदा ती मला भेटली. त्या भेटीत ती मला उदास, कोमेजलेली दिसली. पूर्वीची प्रसन्न, खळखळती, हजरजबाबी प्रधान कुठे हरवूनच गेली होती. काही वर्षे अशीच गेली. प्रधानची व माझी भेटही झाली नाही. आणि मग मला कळले की पहिल्या बाळंतपणात मूल आडवे येऊन प्रधान जग सोडून गेली होती. तिच्या आयुष्याला अगदी विपरीत वळण लागले होते. तिची नौका भलत्याच किनाऱ्याला जाऊन भिडली होती आणि तिथे स्थिरावली होती.

आणखी एक उदाहरण आहे. ते तर फारच मोठ्या माणसाचे आहे. बालगंधर्वांच्या अगदी अखेरच्या दिवसांत काही कारणाने त्यांना भेटण्याची मला संधी मिळाली होती. तेव्हा ते माहीमला मुसलमानी मोहल्ल्यात राहत होते. वय खूप झाले होते. अपंगपणामुळे ते अंथरुणाला खिळले होते. जीभ जड झाली होती. तोंडावाटे नीट शब्दही फुटत नव्हता. ते जिथे राहत होते ती जागाही भकास, मन खिन्न करणारी होती. जुनाट गादी, तिच्यावर मळलेली चादर, भोवती भला थोरला पण सामानाच्या अभावी रिकामा रिकामा वाटणारा हॉल, दिमतीला एक म्हातारा चाकर, असे ते सगळेच केविलवाणे दृश्य होते. माझ्या पिढीने बालगंधर्वांची नाटके पाहिलेली नाहीत. निदान मी तरी कधी ते भाग्य अनुभवलेले नाही. परंतु त्यांचे अलौकिक रूप, लडिवाळ अभिजात अभिनय, त्यांचे गंधर्वतुल्य गाणे, ऐन उमेदीच्या काळातले त्यांचे अफाट वैभव व लोकप्रियता आणि गंधर्व नाटक मंडळीचा राजेशाही रुबाब यांबद्दल अनेक रसभरित कथा मी ऐकल्या होत्या. त्याच

बालगंधर्वांना त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात अशा विकल, हीनदीन आणि कारुण्यास्पद अवस्थेत बघताना मला अगदी गलबलून गेल्यासारखे झाले. त्यांच्या कलेवर, संगीतावर अपरंपार प्रेम करणाऱ्या रसिकांच्या वर्गातलीही मी नव्हते. कारण तो भावबंध कधी जडलेलाच नव्हता. तरीही बालगंधर्वांना तसे बघणे, मला फार अवघड वाटले. मनात म्हटले कुठला माणूस कुठे येऊन पोहोचला आहे हा ! बालगंधर्वांच्या ऐन वैभवाच्या आणि उमेदीच्या काळात या राजस कलावंताची अखेर अशा विपन्नावस्थेत होणार आहे, याचे स्वप्न तरी कुणाला पडले असेल का ? पण सत्य हे कल्पनेपेक्षा अद्‌भुत असते, हे मी प्रत्यक्ष बघत होते. फार उद्विग्न अवस्थेत मी त्या जागेतून बाहेर पडले.

अशा एक ना दोन, अनेक प्रसंगांनी वसंत पवारांचा तो शेर माझ्या मनात उलगडत गेला. टोकदार तीक्ष्ण शस्त्र खोल खोल रुतत जावे, तसा आत खोलवर रुतत गेला. आयुष्याला आपण हवे ते वळण देऊ शकत नाही. आयुष्यच आपल्याला कुठे तरी फरफटत घेऊन जाते. कुठल्या तरी अतर्क्य अनपेक्षित ठिकाणी आपली नौका येऊन पोहोचते. आणि मग तोच आपला किनारा होता असे म्हणावे लागते. तीच जागा आपली म्हणून पत्करणे भाग पडते. . . 'वोहीं किनारा हो गया' या कडू सत्याचा स्वीकार करावा लागतो.

□

# रात्र काळी घागर काळी

मला आठवते, तेव्हापासून मी एक पाहून ठेवले आहे— माझी झोपेची कधी तक्रार नसते. मला खूप लौकर आणि अगदी गाढ झोप येते. लहानपणी तर रात्रीची जेवणे चालू असतानाच झोप मला घेरून टाकी. डोळ्यांवर सारखी पेंग येई आणि कशीबशी मी हाततोंड धुते तोवर मी अर्धी झोपीच गेलेली असे. माझा लळालोंबा उचलून आई मला अंथरुणावर नेऊन टाकी. तेव्हा 'काय अरिष्ट या पोरीची झोप' असे तिचे पुटपुटणे मला जेमतेम ऐकू येई. . . पण झोपेने मला अगदी खाऊन टाकलेले असायचे. या अनिवार झोपेमुळे शाळकरी वयात शहाण्या मुलांसारखा मी कधी पहाटे उठून अभ्यासही केला नाही. रम्य पहाटवेळी, मंगल आणि पवित्र वातावरणात संस्कृतचे दशमगण- पंचमगणाचे धातू घोकत बसणे किंवा गणितातल्या अवघड प्रमेयांशी झटापट करणे, हे मला कधीही जमले नाही. पहाटे उठून अभ्यास करणाऱ्या आणि परीक्षेत भरपूर गुण मिळवून वर नंबर काढणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांच्या सुरस आणि चमत्कारिक कथा मी खूप ऐकल्या होत्या. तशा मुली आणि मुले प्रत्यक्ष वर्गातही मी पाहिली होती. पण तो पराक्रम मला कधी करता आला नाही. आणि खरे सांगायचे, तर पहाटेच्या त्या अभ्यासावाचून माझे कधी फारसे नडलेही नाही. पुढे मोठेपणी मी कॉलेजात नोकरी करू लागले, तेव्हा अर्थातच आठवड्यातून दोन-तीनदा तरी अगदी सकाळचे तास माझ्या वाट्याला येत. पण तेव्हादेखील नाखुषीनेच मी पहाटे उठायची. आणि नोकरी संपल्याबरोबर मी तात्काळ लौकर उठणे सोडून दिले. उशिरा उठण्याचे व्रत पुन्हा अंगिकारले.

सांगायचे कारण मला झोप आवडते आणि एकूणच मला लौकर झोप येते. मुंबईत असताना तर दिवसभर माझी इतकी धावपळ झालेली असे की, रात्री अंथरुणावर अंग टाकते न टाकते तो मी झोपी जायची. आता या वयात धावपळ

नसते. दिवस तसा आरामात गेलेला असतो. तरीही रात्री मला लौकर झोप येते. डोळ्यांसमोर जे पुस्तक मी नावाला म्हणून उघडून धरलेले असते, त्यातली अक्षरे अंधुक होऊ लागतात. ओळी एकात एक मिसळतात. भोवतालचे आवाज दूर जात जात अस्पष्ट होतात. रात्री टीव्ही वर चाललेले शास्त्रीय संगीत किंवा नृत्यही कुठून तरी दूरच्या ग्रहावरून यावे, तसे कानांवर पडत असते. सगळ्या जाणिवांचा हलके हलके लोप होतो आणि पाण्यात थेंब बुडून जावा, तशी मी झोपेत अलगद बुडून जाते. वाढत्या वयानुसार आता झोपेचे प्रमाण जरा कमी झाले असले, तरी सामान्यतः माझे झोपेचे वेळापत्रक हे असेच आहे.

पण एखाद्या दिवशी हे ठरीव वेळापत्रक बिघडते. नेमके काय होते कुणास कळे, मला काही केल्या झोपच येत नाही. दिवसा काहीतरी मनस्ताप देणारी घटना घडलेली असते. एखादा प्रक्षोभक विचार कानांवरून गेलेला असतो. एखादे विलक्षण सुंदर पुस्तक मी वाचलेले असते. कुणी फार आवडीचे माणूस भेटलेले असते. काहीतरी होते आणि झोप डोळ्यांतून उठून जाते. फार चांगले संगीत ऐकले, एखादा वेधक चित्रपट पाहिला तरीही झोप जाते. डोळ्यांपुढून अनेक चित्रे फिरत राहतात. कानांत अनेक सूर घुमत राहतात. संवादांचे अनेक तुकडे मागेपुढे होतात. आणि मग ध्यानात येते, चला, आज जागरण आहे. आजची रात्र झोपेशिवाय जाणार. अर्थात हे सत्य कळले तरी मी मुकाट्याने त्याचा स्वीकार करते, असे मात्र नाही. आज झोप येणार नाही, हे ज्या क्षणी मला जाणवते, त्या क्षणीच त्या वस्तुस्थितीचा मोठ्या निकराने प्रतिकार करण्याचा मी चंग बांधते. आणि त्यासाठी मला माहीत असलेले सारे उपाय मी अमलात आणते. अगदी पहिला आणि अगदी पोरकट उपाय म्हणजे डोळे गच्च मिटून घेणे. आता या उपायाने झोप मुळीच येत नाही, हे तर एखादे लहान मूलही सांगू शकेल. पण झोप येणार नाही या गोष्टीचा इतका धसका माझ्या मनाने घेतलेला असतो की, असा पोरकट उपायही योजून बघावासा वाटतो. या उपायाचे वैफल्य अर्थात लौकरच ध्यानात येते. मी गच्च मिटलेले डोळे उघडते आणि न येणाऱ्या झोपेला पाचारण करण्यासाठी दुसरा उपाय शोधू लागते. झोप येत नसेल तर मेंढरे मोजावीत, असे इंग्रजी पुस्तकातून मी वाचलेले आहे. पण माझे गणित पहिल्यापासून कच्चे असल्यामुळे या उपायाच्या मी कधी वाटेला गेले नाही. जरा वेळाने मला कुठे तरी वाचलेले आठवते की, झोप येत नसेल तर मनातल्या साऱ्या चिंता काढून टाकून, अंग अगदी मोकळे आणि सैल सोडून

बिछान्यावर पडावे. हा उपाय मला ठीक वाटतो. सोपे तर आहे ! मनातल्या चिंता काढून टाकायच्या. पण लगेच माझ्या ध्यानात येते की, हे सुद्धा वाटते तेवढे सोपे नाही. इतर चिंतांचे एक असो, पण झोप येत नाही हीच एक मोठी चिंता असते ना ! ती काढून टाकायची म्हणजे आपल्याला झोप येत नाही हे विसरायला हवे. पण ते विसरायचे तर त्यावर उपाययोजना कशी करणार ? तर्कशास्त्रातली कुठली तरी शृंगापत्ती मला आठवते आणि अशाच काही वैचारिक गोंधळात आपण सापडलो आहोत हे माझ्या ध्यानी येते. त्या गुंत्यातून बाहेर पडण्याची धडपड सोडून देऊन मी उपायाच्या उत्तरार्धाकडे वळते. अंग अगदी सैल आणि मोकळे सोडायचे. हां. हे मात्र सोपे आहे. मी अंग मोकळे सोडते. पापण्या डोळ्यांवर अलगद मिटते. चेहऱ्याचे ताणलेले स्नायू सैल करते. हात आणि पाय बिछान्यावर पसरते. अशा वेळी म्हणे मांजर हा आदर्श डोळ्यांपुढे ठेवायचा असतो. मी अंग मोकळे सोडून सैलावून पडलेले मांजर डोळ्यांपुढे आणते. मला मांजरे फार आवडतात. त्यामुळे अनेकदा रात्री असे एखादे मांजर शेजारी प्रत्यक्ष असतेही. मऊसूत रेशमी किंवा मखमलीची पिशवी जमिनीवर पडलेली असावी, तसे ते मांजर दिसत असते. 'रिलॅक्सेशन'ची अगदी आदर्श अवस्था. फक्त त्याच्या शेपटीचे टोक तेवढे जागरूकपणे हळूहळू हलत असते. शेपटी—मला शेपटी नसते. पण हात, पाय, अंग मी अगदी मांजरासारखे सैल सोडलेले असते. क्षणभर मला बरे वाटते. पण जरा वेळाने एक चमत्कारिक अस्वस्थता खोल कुठे तरी, मनाच्या तळाशी जागी होऊ लागते. हात-पाय इतके सैल आणि मोकळे झालेले असतात की, त्यांचा आपल्या शरीराशी संबंधच सुटला आहे, असे मला वाटू लागते. विलक्षण भीतीने माझ्या अंगाचा थरकाप होतो. मी घाईघाईने अंग चाळवते. आपले हातपाय हे आपलेच असल्याची खात्री करून घेते. तशी ती झाल्यावर सुटकेचा निःश्वास टाकते.

एव्हाना झोप डोळ्यांवरून पार उडून गेलेली असते आणि तिने आपल्याशी असहकार पुकारलेला आहे, हेही निश्चित झालेले असते. घरात सामसूम असते. पाण्याच्या तळाशी गाळ बसावा, तसे सारे लहानमोठे आवाज शांततेच्या तळाशी जाऊन बसलेले असतात. पाण्यातून वर बुडबुडा यावा तसा एखादा आवाज मध्येच सूर मारत वर येतो. एखादा ट्रक मागच्या रस्त्यावरून धडधडत जातो. एखादी मिरवणूक काळोखावर स्वरांचे नक्षीकाम करत पुढे सरकते. कुणी तरी खोकल्याचा आवाज अस्पष्टपणे कानांवर येतो आणि मग आवाज ही गोष्ट वैशिष्ट्याने जाणवते.

दिवसा आवाजांच्या कडा झिजून ते परस्परांत मिसळून जातात. पण रात्री या सर्व आवाजांना धारदार कड येते. प्रत्येक आवाज सुटा, स्वतंत्र होतो. त्याचे वैशिष्ट्य, वेगळेपण मनावर ठसते. यातच जवळ कुणी झोपलेले असेल, तर त्याचा मंद लयबद्ध श्वास या सर्व आवाजांच्या पार्श्वभूमीवर उमटत राहतो. झोपेतल्या माणसाच्या श्वासोच्छ्वासाला किती सुंदर लय असते, ते प्रथमच जाणवते.

जसे आवाज तसा काळोख. सुरुवातीला खोलीतला काळोख इतका गडद वाटतो की, काळया शाईच्या समुद्रात खोल बुडावे, तसा जीव घुसमटतो. पण जरा वेळाने डोळे काळोखाला सरावले की काळा काळोख प्रथम तपकिरी होतो. मग फिका करडा होतो. खोलीतल्या वस्तूंच्या बाह्यरेषा उजळू लागतात. पण रात्रीच्या फिक्या काळोखात त्या वस्तूंचे रंगरूप विलक्षण बदललेले असते. इतकेच नव्हे, तर त्यांच्यात प्राण संचारल्याचा भास होतो. वाटते, दिवसा निर्जीव भासणाऱ्या वस्तू खरोखर निर्जीव नसाव्यातच. त्यांच्यामध्ये चैतन्य असावे. आणि रात्री माणसे झोपी गेल्यावर ते चैतन्य त्या हळूच प्रकट करत असाव्यात. एरव्ही दिवसा अत्यंत ओळखीच्या असलेल्या वस्तू रात्री इतक्या वेगळ्या अन् विक्षिप्त वाटल्याच नसत्या. रात्रीच्या या फिकट फसव्या काळोखात कोपऱ्यातले टेबल एखाद्या प्रागैतिहासिक प्राण्यासारखे दिसू लागते. कपाटाचा मोटा आरसा मिष्किलपणे डोळे मिचकावतो. दोरीवरच्या कपड्यात प्राण संचारून ते भुतासारख्या वाकुल्या दाखवू लागतात. मी कुशीवर वळते, तो मागल्या बाजूंना जीव येतो. कुणीतरी श्वास रोखून जवळ उभे आहे, कुणाच्या तरी अंगाची ऊब मला निकट जाणवते आहे, कुणाची तरी बोटे आता अंगावर, पाठीवर फिरण्याच्या बेतात आहेत—अनेक चमत्कारिक कल्पनांचे मोहोळ माझ्या मनात उठते. मी फटकन उशालगतचा दिवा लावते. भकास पिवळा उजेड खोलीभर पसरतो. जवळ आलेल्या वस्तू लगबगीने मागे सरकतात. काळोखात पांघरलेली विक्षिप्त रूपे अंगावरून उतरवून ठेवून, आपली नेहमीची रूपे धारण करतात. आता त्या अगदी साळसूद, गरीब बिचाऱ्या दिसतात. त्यांचा सारा मिष्किलपणा मावळलेला असतो. मी गोंधळते. हे खरे की ते खरे ? काही कळत नाही.

दिवा भगभगीत उजेड पसरवत असतो. वाटते, काही वाचावे. उशाचे पुस्तक उघडून मी वाचण्याचा प्रयत्न करते. पण लौकरच ध्यानात येते की, या वेळी आपल्याला काही वाचणे शक्य नाही. भोवतालची रात्र क्षणोक्षणी गूढ होत

चाललेली असते. ती गूढता घनदाट आवरणासारखी मनावर चढते. ती मला आकर्षून घेत आहे असे वाटते. मी दिवा घालवते.

आता काळोख पुन्हा जाणवू लागतो. त्याचे काळे केसाळ अंग बोटांनी स्पर्शता येईल, असे मनात येते. मी काळोखात बोटे खुपसते, पण हाताला काही लागत नाही. बोटांच्या वेचक्यांतून खदखदा हसत काळोख आरपार जातो. मग मला वाटू लागते, आपण खोलीत नसून एका प्रचंड गुहेत आहोत. ही गुहा काळाची आहे. तिला आदि नाही, अंत नाही. तिची पोकळी इथून तिथपर्यंत अफाट पसरली आहे. तीत काळोख भरून राहिला आहे. तिच्या खडकाळ भिंतींवरून काळोखाचेच पाणी सारखे ठिबकत आहे. पायांखाली काळोखाची पाणथळ पसरली आहे. बघता बघता काळोख टपटपू लागतो. थेंबांच्या लौकरच धारा होतात. धारांची मुसळधार बनते. गुहा काळोखाने गच्च भरते आणि मी एकटीच तळाशी उरते. भीती वाटायला हवी, पण वाटत नाही. उलट कसला तरी विलक्षण उत्साह मनात संचारतो. क्षणभर वाटते, शरीराचेही आवरण नाहीसे झाले आहे आणि माझ्या आत भरून राहिलेला काळोख बाहेरच्या काळोखाशी मिसळून एकरूप होत आहे. किंबहुना आतबाहेर हे शब्दही आता निरर्थक आहेत. काळोख हाच खरा आहे आणि त्याला एक विलक्षण सौंदर्य आहे. 'आदीचाचि काळा । अनादि बहु काळा' असे ज्या परब्रह्माचे ज्ञानदेव वर्णन करतात, त्याचे रूप बहुधा हेच असावे.

त्या काळोखात माझी समाधी लागते, पण हीही अवस्था फार काळ टिकत नाही. जरा वेळाने भोवतालची गुहा मावळते. एक अफाट सागर भोवती पसरतो. खोलीच्या भिंती त्या सागरात विरघळून जातात. जमीनही विरघळते. बिछान्याचे बेट होते. मध्ये एक चिमुकले बेट आणि भोवती क्षितिजापर्यंत पसरलेले पाणी. पाणीच पाणी. अफाट अनंत पाणी आणि बेटावर मी एकटी. भोवतालच्या जगाशी पार संबंध तुटलेला. काही वेळाने मला वाटू लागते की, पायांखाली आधारापुरते असलेले बेटही कडाकडांनी सुटत आहे. पाण्यात विरघळत आहे. लौकरच ते पाण्याखाली जाईल आणि मग—

मी धसकते. लगबगीने बिछाना चाचपते. शेजारच्या जमिनीवरून हात फिरवते. आसपासच्या श्वासांची चाहूल घेते. आपण सुरक्षित आहोत, याबद्दल स्वतःची खात्री पटवते. मग पुन्हा खोली ही खोलीसारखी दिसू लागते. चार भिंती चारी बाजूंना उभ्या राहतात. डोक्यावर छत पसरते. परिचित वस्तूंचा पसारा भोवताली गोळा

होतो. रात्रीच्या काळोखात हरवलेले माझे नित्याचे सुरक्षित जीवन मला परत मिळते.

दूर कुठे तरी घड्याळात पहाटेचे तीनचे ठोके पडतात. वाऱ्याची गार झुळूक खिडकीच्या फटीतून आत येते.

आता मला कडकडून जांभया येऊ लागतात. सर्वांगात भरलेली शिशासारखी जड बधिरता अधिकच जड होते. इतका वेळ टक्क उघडे असलेले माझे डोळे गपागप मिटू लागतात. झोपेने मजवर पुरता अंमल चढवलेला असतो. बघता बघता काही कळेनासे होते... मिटू आलेले डोळे मी प्रयासाने उघडते, तो सकाळचे आठ वाजलेले असतात. लखलखते ऊन अंगाला गुदगुल्या करते आणि कुणीतरी मला हलवून हलवून जागे करत आहे, असे जाणवते.

□

REFBK-0026728